# लोक-नीति

म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. ९२६६

## विनोबा



REFBK-0010259

परंधाम विद्यापीठ प्रकाशन

# लोक-नीति

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २८९३२ वि: मिवाँ
क्रमांक ९२८४ नों. दि: १०/२/५९

विनोबा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
९०२५९
ग्रा. क्र.
REFBK-0010259

प रं ध ... का श न

मार्च १९५९ ] [ मू. १ रुपया ७५ नये पैसे

प्रकाशक :

भाऊ पानसे

ग्राम-सेवा-मंडळ, परंधाम विद्यापीठ

पो. पवनार, जि. वर्धा.

आवृत्ति १ ली– प्रति २०००

किंमत रु. १.७५ न. पै.

मुद्रक :

भाऊ पानसे

परंधाम मुद्रणालय, परंधाम विद्यापीठ,

पवनार, जि. वर्धा.

# उपोद्घात

लोक ज्यावेळीं आपला कारभार आपण स्वतः करून घेतात त्यावेळीं त्याला 'लोकशाही' किंवा 'सार्वजनिक व्यवस्था' असें म्हणतात. सार्वजनिक व्यवस्थेसाठीं सामान्यतः तीन शब्द रूढ आहेत : लोकसत्ता, लोकतंत्र व लोकनीति. ज्या व्यवस्थेंत नागरिकाला प्रतिष्ठा मिळते व त्याची योग्यता समाजांतील कोणा हि व्यक्तीच्या बरोबरीची मानली जाते त्या व्यवस्थेला 'लोकसत्ता' म्हणतात. सत्तेचा मूळ अर्थ अधिकार असा नसून प्रतिष्ठेचें जीवन हा आहे. ज्या पद्धतींत नागरिकाला प्रतिष्ठा प्राप्त होते व ती कायम राहते त्या पद्धतीला लोक-तंत्र म्हणतात. नागरिकांची परस्परां-विषयीं ज्यावेळीं प्रतिष्ठा-भावना असते व आपल्या सुखसोयींच्या आधीं जेव्हां ते दुसऱ्याच्या सुखसोयींचा विचार करतात तेव्हां त्याला 'लोकनीति' म्हणतात. सारांश हा कीं लोकनीतिखेरीज लोकतंत्र टिकू शकत नाहीं व लोक-सत्ता सार्थ होत नाहीं. नागरिक-चारित्र्याचा आधार लोक-नीति आहे.

राज्य-व्यवस्थेचा किंवा सरकारचा कधीं काळीं अंत होऊं शकेल काय ? हा प्रश्नच अप्रस्तुत आहे. आज सुद्धां जेव्हां एखादा कायदा बनतो त्यावेळीं अधिक लोक कायदा पालन करणारे असतात व तो मोडणारांची संख्या कमी असते असें गृहीत धरून आम्ही चालत असतों. म्हणून जेलमध्यें थोड्या च लोकांच्या राहण्याची व्यवस्था असते. आणि सध्यां तर जेलच्या व्यवस्थेंत हि सक्ति व अधिकाराचा अंश कमी कमी होत जावा असा प्रयत्न असतो. हल्लीं जेलच्या ज्या सुधारणा होत आहेत, त्यांत व्यवस्थेचा भाग अधिक आहे व बंदोबस्त शक्य तो कैद्यांच्या हातीं देण्याचा प्रयत्न आहे. ह्याचा अर्थ आमचा कल स्वतंत्रतेकडे आहे, प्रशासनाकडे नाहीं. स्वातंत्र्यांत स्वयंशासन व आत्मनियंत्रण अभिप्रेत आहे. ह्यालाच अनुशासन किंवा संयम म्हटलें जातें. लोकनीतीचें हें प्राणभूत तत्त्व आहे.

ज्या प्रकारचा सद्व्यवहार किंवा शुभ व्यवहार लोकांत स्थापित व्हावा असें आपणांस वाटतें, त्या प्रकारचे कायदे आपण बनवीत असतों.

त्या कायद्यांना अनुसरून लोकमत निर्माण करणें प्रत्येक जबाबदार नागरिकाचें कर्तव्य आहे. नागरिकांनीं सामुदायिक किंवा संस्थारूपानें हें कर्तव्य पार पाडलें नाहीं तर शिक्षेच्या बळावर त्याचा अंमल करण्याची पाळी येते. शिक्षेच्या जोरावर कायद्याचें पालन करवून घेण्याची पाळी जितकी जास्त जास्त येत जाईल तितकी तितकी लोकसत्ता व नागरिकांची स्वतंत्रता क्षीण होत जाईल आणि समाजांत ज्या आदर्शांचा व सदाचारांचा विकास आपण करूं इच्छितों त्यांची प्रतिष्ठा राहणार नाहीं. उदाहरणार्थ : दारूबंदीच घ्या. काँग्रेस, प्रजासमाजवादी, केवळ समाजवादी सर्वांनाच दारूचें किंवा इतर नशांचें व्यसन समाजांत नको आहे. दारूबंदीचा कायदा करावा कीं नाहीं ह्याबद्दल मतभेद असूं शकेल पण दारूचें व्यसन नसावें ह्या विषयीं कोणाचाच मतभेद नाहीं. कॉम्युनिस्ट देशांनीं ह्या बाबतींत बरेंच पुढें पाऊल टाकलें आहे व त्याबद्दल त्यांना अभिमान वाटतो. एका बाजूनें आम्ही दारूच्या व्यसनाचा अंत करूं इच्छूं व दुसऱ्या बाजूनें दारू ज्यांत वापरली जाते अशा मजलसींना व पार्ट्यांना सभ्य जीवनाचें व आधुनिकतेचें लक्षण समजूं, तर दारूबंदीला लागणारें वातावरण किंवा लोकमत कधींच निर्माण होऊं शकणार नाहीं. सामाजिक आदर्शांना अनुसरून लोकमत बनविण्याचा प्रयत्न राजनीति नव्हे, लोकनीति आहे.

बहुसंख्य लोकांचा स्वार्थ म्हणजे लोकमत नव्हे. समजा एखाद्या क्षेत्रांत शेंकडा ९५ सवर्ण व ५ लोक हरिजन आहेत, तर पंचाण्णव सवर्णांचा स्वार्थवाद काय लोकमत होऊं शकेल ? ह्याच्या उलट एखाद्या क्षेत्रांत हरिजन बहुसंख्य असल्यामुळें अस्पृश्यांचें सरकार बनलें आणि समजा, परंपरागत समजुतीमुळें त्यांना आतांपर्यंत जो त्रास भोगावा लागला, त्याचा सूड घेण्याचा विचार त्यांच्या मनांत आला तर ह्या सूड-वृत्तीला खरोखरीचें लोकमत मानतां येईल काय ? आणखी एक तिसरें उदाहरण घ्या. गोऱ्या लोकांची टोळी क्रोधानें उन्मत्त होऊन अमेरिकेंत नीग्रो लोकांच्या अंगाची सालटी काढूं इच्छिते, तर तो जो सामूहिक उन्माद आहे, त्याला लोकमत म्हणतां येईल काय ?

लोकतंत्रासमोर हे सर्व यक्ष-प्रश्न खडे आहेत. त्यांवर त्याचें जीवन-मरण अवलंबून आहे. अल्पसंख्य, दुर्बळ, व्याधिग्रस्त किंवा अपंग माणसांचें

स्वातंत्र्य ज्या ठिकाणीं अबाधित राहतें व त्यांच्या सुखसोयींची व्यवस्था जेथें होते, त्याला चांगला कारभार किंवा सुव्यवस्था म्हणतां येईल. म्हणून लोकगर्दीची मनोवृत्ति किंवा सामूहिक आवेश ही लोकमत किंवा लोकनीति नव्हे.

खऱ्या लोकतंत्राची कसोटी, प्रत्येक नागरिकाचें स्वातंत्र्य व अल्प संख्यांकांची सुरक्षितता अबाधित राहणें ही आहे. नागरिक व्यक्ति किंवा अल्पसंख्य समुदाय ह्यांच्या हातांत दोन्ही प्रकारच्या शक्ति नसतात. त्यांच्याजवळ शस्त्रांची शक्ति नसते व मतांची हि शक्ति नसते. मग त्यांच्या हक्कांचें अधिष्ठान कोणतें असूं शकेल? बहुसंख्याकांचें सौजन्य व शुभव्यवहार हींच त्यांच्या स्वातंत्र्याचा आधार असूं शकतात. ह्या दोन्ही गोष्टी दंड-निरपेक्ष व सत्ता- निरपेक्ष आहेत. ह्यालाच लोकनीति म्हणतात.

दोन व्यक्तींच्या आपापसांतील व्यवहारांत ज्यावेळीं कायदा किंवा देवघेव दाखल होतात तेव्हां त्या ठिकाणीं स्नेह किंवा विश्वास राहत नाहीं. परस्परांतील सद् व्यवहार क्षीण होतो तेव्हांच त्यांच्या अन्योन्य संबधांत सत्तेचा किंवा कायद्याचा प्रवेश होतो. जगभरच्या सर्व सुधारकांची इच्छा अशी आहे कीं, मनुष्यांच्या परस्पर व्यवहारांचा आधार देवघेव किंवा कायदा नसावा. स्वतःच्या व आपल्या आईच्या बापाच्या किंवा मुलाच्या संबंधांत कायदा यावा असें कोणी च इच्छित नाहीं. देवघेवीचा तर प्रश्न च निर्माण होत नाहीं. कुटुंबाच्या खानदानीचें किंवा कुलीनतेचें लक्षण च हें कीं कौटुंबिक व्यवहारांत देवघेवीचें किंवा कायद्याचें नामोनिशाण सुद्धां नसावें. विनोबांचें म्हणणें तरी हें च आहे कीं, नागरिकांचे आपापसांतील व्यवहार प्रेमाच्या व सद्भावनेच्या आधारावर व्हावेत. त्यांत आज कायदा दखल देत असला तर ती दखल हळूहळू कमी होऊन अगदीं नाहींशी झाली पाहिजे. शासन-मुक्त-समाजाचा अर्थ हा च आहे. शासन-मुक्त व्यवहार हा मनुष्यांचा नैसर्गिक व्यवहार आहे. जेथें स्वार्थास्वार्थांत टक्कर होते, तेथें च कायद्याचा प्रवेश होतो. ह्याचा उपाय च हा कीं व्यक्ति किंवा व्यक्ति-समुदाय ह्यांच्या स्वार्थांत ज्या कारणांनीं टक्कर होते, तीं कारणें च समाजांत राहूं नयेत. स्वार्थाच्या विरोधाचे प्रसंग कमी झाले तर दोन नागरिकांच्या, व्यवहारांत

कायदा येण्याची गरज च राहणार नाहीं. देवघेवीची वृत्ति जेथें कमी होते तेथें कौटुंबिक भावना स्थिर होते. ह्याला च 'शोषण-मुक्त' समाज म्हणतात. ज्या ठिकाणीं शिस्तबाजी व कायदेबाजी नाहींशी होते तेथें कौटुंबिक संबंध स्थापित होतात. ह्याचें च नांव 'शासन-मुक्त' समाज.

सत्तेशिवाय समाजांत व्यवस्था राहील असा दिवस कधीं तरी उगवणार आहे काय? हा प्रश्न नाहीं. प्रश्न असा आहे कीं आमचें तोंड कोणत्या बाजूला आहे. नागरिकांच्या जीवनांत देवघेवीचा व कायद्याचा अंश कमींत कमी असावा असें कोणता स्वातंत्र्यवादी किंवा लोकशाहीचा पुरस्कर्ता इच्छित नाहीं? बस, हिला च लोकनीति म्हणतात.

नागरिकांत सांपत्तिक स्पर्धा नसावी हें तत्त्व तर सध्यां सर्वमान्य झालेलें आहे. म्हणून सर्व च लोक संग्रह, संपत्ति व स्वामित्व ह्यांचें राज्यीकरण, राष्ट्रीयीकरण, किंवा समाजीकरण करण्याच्या गोष्टी बोलत आहेत. दुसरे कांहीं लोक संग्रह व स्वामित्व ह्यांच्या निराकरणाचा व अपरिग्रह व विश्वस्तपणाचा पुरस्कार करीत आहेत. सर्वांचा आशय एक च आहे कीं, आर्थिक क्षेत्रांत व्यक्तींची स्पर्धा नको. सेवेसाठीं किंवा दानासाठीं कां होईना जी व्यक्ति संपत्ति प्राप्त करण्यांत व तिचें रक्षण करण्यांत मग्न असते, तो अर्थाच्या अर्जनासाठीं व संग्रहासाठीं अधिकांत अधिक अनुकूल क्षेत्र शोधते व तिची एक विशेष दृष्टि व मनोवृत्ति बनून जाते. ह्याच प्रकारें जो माणूस लोक-कल्याणार्थ किंवा समाजाच्या सुव्यवस्थेसाठीं का होईना सत्ता प्राप्त करण्यांत व राखण्यांत व्यस्त असतो तो हि अशा क्षेत्राच्या व संधीच्या शोधांत असतो कीं जें क्षेत्र त्याच्या उमेदवारीला व सफलतेला अधिकांत अधिक अनुकूल राहील. लोक-शाहीचा मूलभत विचार च असा आहे कीं जनतेचें प्रतिनिधित्व अधिकांत अधिक सुलभ, प्रत्यक्ष व उपयुक्त असावें. पण त्याच्या ऐवजीं हा माणूस असा विचार करतो कीं मी किंवा माझी पार्टी कोठून व कोणत्या वेळीं निवडणुकींत उभे राहिल्यास यशस्वीपणें निवडून येऊं शकूं. ह्याचा अर्थ घडयाळाचा लोलक लोक-प्रतिनिधित्वाकडून सत्ताप्राप्तीच्या बाजूला झुकूं लागला आहे. पक्षातर्फे उमेदवार उभे करण्याऱ्या लोकशाहींत हा फार गंभीर दोष आहे. प्रत्येक पक्ष किंवा

उमेदवार आपल्या सत्तेचें क्षेत्र निवडत असतो. संपत्तीप्रमाणें सत्तेच्या क्षेत्रांत हि स्पर्धा नसावी ही सुद्धां गोष्ट लोकसत्तेच्या दृष्टीनें अत्यंत आवश्यक आहे. आर्थिक स्पर्धा मनुष्यांचे संबंध बिघडविते तर सत्तेची स्पर्धा हि हे संबंध त्याहून कमी बिघडवीत नाहीं. आर्थिक स्पर्धा अनर्थकारी असली, तर लोकतंत्रांतली सत्तेची स्पर्धा लोकक्षयकारक आहे. थोडया लोकांच्या हातांत संपत्तीचें व स्वामित्वाचें केन्द्रीकरण हें ज्या प्रमाणें समाजाच्या अभ्युदयाच्या दृष्टीनें हानिकारक आहे, त्याच प्रमाणें थोडया लोकांच्या हातांत राज्यशक्ति व दंड-शक्तीचें केन्द्रीकरण हें हि समाजाच्या स्वातंत्र्याला बाधक आहे. म्हणून पुढील पृष्ठांत सत्तेचें विकेन्द्रीकरण व अधिकाराचें विभाजन हें हि लोकसत्तेचें एक लक्षण सांगितलें आहे.

आतां आणखी एक गोष्ट सांगावयाची राहिली. ज्या ठिकाणीं खरी-खुरी लोकशाही व खरेंखुरें स्वातंत्र्य असेल म्हणजे ज्या ठिकाणचे नागरिक एकमेकांच्या सुखाचा विचार करणारे संयम-शील व शिस्त-प्रिय असतील, त्या ठिकाणीं लौकिकता व पवित्रता ह्यांत अंतर राहणार नाहीं. जे सेक्युलर ( धर्मनिरपेक्ष ) असेल तेंच सेक्रेड ( पवित्र किंवा धार्मिक ) असेल. लौकिकताच नैतिकता बनून गेलेली असेल. लोकव्यवहारच ज्या वेळीं सदाचार-मूलक व नीतिमय बनून जातो, त्यावेळीं तेथें सर्वत्र लोकनीति विराजमान असते. लोकनीतीच्या ह्या कसोटया स्थापित करण्यासाठीं ज्या लोकांनीं अपरिग्रहाचें व सत्ता-निरपेक्ष जीवनाचें व्रत घेतलें आहे अशा लोकांचा सल्ला उपयोगी ठरतो. हे लोक सत्ता किंवा दंड ह्यांच्या प्रयोगाशिवाय सभ्य लोक-मताचा विकास करीत असतात व लोकचारित्र्याचा पाया घालीत असतात. हेच लोकात्म्याचे खरेखुरे उपासक व लोकनीतीचे सच्चे रक्षक असतात.

लोक-तंत्राचें अधिष्ठानभूत असे कांहीं लोक-धर्म आहेत कीं ज्यांचें उल्लंघन स्वत: सत्ताधारी पक्ष, किंवा समूह किंबहुना सर्व सत्तेचा मूल-स्रोत अशी स्वत: जनताहि करूं शकत नाहीं. भगवान् शंकराचार्यांनीं ईश्वराच्या ऐश्वर्याची सुद्धां एक मर्यादा सांगितली आहे, कीं तो आपल्या नियतीचा (घालून दिलेल्या नियमांचा) भंग स्वत: हि करूं शकत नाहीं. त्याच्या ऐश्वर्याचा गौरव ह्यांतच आहे. त्याच प्रकारें लोकनीतीचीं जीं प्राणभूत मूल्यें

आहेत, त्यांचें उल्लंघन सर्वसत्ता-संपन्न लोक-समुदाय सर्व-संमतीनें सुद्धां करूं शकत नाहीं. हीच लोकतंत्राची मर्यादा व प्रतिष्ठा हि आहे. सर्व प्रगतिशील व्यक्तींनीं जगभर शुद्ध-व्यवहारासाठीं दोन गोष्टी आवश्यक मानल्या आहेत. एक ही कीं भगवान् व भक्त ह्यांच्यांत कोणी उपाध्याय किंवा पुरोहित नसावा. व दुसरी ही कीं, वस्तु निर्माण करणारे व वापरणारे ह्यांच्या मध्यें कोणी दलाल नसावा. ह्या दोन गोष्टींच्या आधारावर आतांपर्यंत जगांत धर्म-सुधारणा झालेल्या आहेत. आतां एक पाऊल पुढें जावयाचें आहे. परलोकाच्या व व्यापाराच्या क्षेत्रांत ज्या तत्त्वाचा आम्हीं स्वीकार केला तेंच तत्त्व लोकसत्तेच्या व समाज-सुव्यवस्थेच्या क्षेत्रांत हि अंगीकारावयाचें. नागरिकांच्या व्यवस्थेंत व्यवस्थापक व प्रतिनिधि ह्यांची संख्या कमींत कमी पाहिजे. ह्याला च प्रत्यक्ष लोकसत्ता किंवा साक्षात् लोकतंत्र असें म्हणतात. ह्या दिशेनें प्रगति करण्यासाठीं कौटुंबिक भावनेनें अभिमंत्रित अशा मर्यादित क्षेत्रांची गरज आहे. ह्याला च 'ग्राम-स्वराज्य' असें नांव आहे.

सारांश हा कीं राजनीति व लोकनीति ह्यांच्या भूमिकेंत व प्रक्रियेंत मूलभूत अंतर आहे.

( १ ) राजनीतीनें राज्यवादाला पुष्टि मिळते. लोकनीतीनें नागरिकाच्या पुरुषार्थाला प्रोत्साहन मिळतें.

(२) राजनीतींत लोककल्याणाचें मुख्य साधन (उपकरण) राज्यसंस्था मानली जाते. लोकनीतींत नागरिक परस्परांच्या स्वातंत्र्याचे रक्षक मानले जातात व त्यांच्याच अभिक्रमानें स्वायत्त संस्थाद्वारा लोक-हिताचा मार्ग आक्रमिला जातो.

(३) राजनीतींत प्रशासन अधिक विस्तृत व तीव्र होत जातें. लोकनीतींत प्रशासनाची जागा आत्मसंयम व अनुशासन घेतात.

(४) राजनीतींत सत्तेची स्पर्धा व अधिकारग्रहणार्थ अथवा प्रतिनिधित्वासाठीं उमेदवारी ह्या असतात. लोकनीतींत लोकचारित्र्याच्या विकासासाठीं सेवेची तत्परता व उमेदवारीचा निषेध असतो.

(५) राजनीतींत प्रत्येक नागरिक आपल्या हक्काबद्दल व स्वत्वाबद्दल जागरूक असतो. लोकनीतींत प्रत्येक नागरिक आपल्या कर्तव्याबद्दल व (शेजाऱ्यांच्या) दुसऱ्यांच्या हक्काबद्दल जागरूक असतो.

विनोबांनीं ठिकठिकाणीं आपल्या अनुपम शैलीनें व अननुकरणीय विवेचन पद्धतीनें ह्याचें निरूपण केलें आहे. त्यांत हृदयाची उदात्तता, विचारांची सूक्ष्मता व विवेचनाची कलात्मकता सर्व गुण विद्यमान आहेत. वाचकांनीं स्वतःच त्याचें रसास्वादन करावें.

राजघाट, काशी
ता. २१-४-५८

**दादा धर्माधिकारी**

# अनुक्रमणिका

## ( खंड पहिला )

**१ ऋषि-अनुशासन** पृष्ठ १–६

१ तीन प्रकारचीं राज्यें. २ आजच्या पद्धतीचा धोका. ३ मनूची कहाणी. ४ अलिप्त सेवकांची आवश्यकता. ५ सर्वोदयवादी हे राज्यकर्ते आणि प्रजा यामधील दुवा. ६ आपली प्राचीन ग्राम-रचना. ७ उपनिषत्कालीन राज्याचें वर्णन.

## ( खंड दुसरा )

**२ शक्तीचें अधिष्ठान** ७–१०

१ स्वराज्यापूर्वीं राजकारणांत शक्ति होती. २ स्वराज्यानंतर शक्तीचें अधिष्ठान समाज-सेवेमधें. ३ मित्रांना सेवेची सल्ला. ४ सर्वोदय-समाजाची गरज.

**३ सेक्युलर स्टेटचा अर्थ** ११–१५

१ सेक्युलर स्टेट आणि दशविध धर्म. २ वेदांती सरकार, लोकयात्रिक सरकार. ३ गैरसमजाचें मूळः इंग्रजी भाषा.

**४ हिंसा कीं अहिंसा यांच्या निवडीचा समय** १६–२०

१ हिंसेचा परिणाम: गुलामी किंवा जगाचा नाश. २ हिंसेच्या मार्गानें भारताचे तुकडे होतील. ३ देशाच्या मर्यादा विचारांना अडवूं शकत नाहींत. ४ या युगाचे मार्कंडेय बना.

**५ सरकार 'शून्य' आहे आणि जनता 'एक' आहे.** २१–२६

१ विचार हा च मानव-जीवनाचा पाया. २ हितांत विरोध नसतो. ३ क्रांतीचा पाया विचार-प्रवर्तन. ४ दुनियेला आकार देणार कीं

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
क्रमांक

तिचा आकार घेणार ? ५ सरकार आपल्यापेक्षां हि दरिद्री. ६ माणसागणिक केवळ पांच पैसे ! ७ कायद्याची शक्ति.

६ दंड-निरपेक्ष लोक-शक्ति २६–३६

१ श्रद्धा अहिंसेवर, क्रिया सेनावृद्धीची. २ सत्तेची खुर्ची जादूची खुर्ची आहे. ३ दयनीय स्थिति. ४ स्वतंत्र लोकशक्तीची निर्मिति. ५ निष्ठुरतेच्या राज्यांत दया. ६ प्रेमावर विश्वास. ७ विचार-शासन. ८ कर्तृत्व-विभाजन. ९ तिसरी शक्ति.

७ समाज-शास्त्रांत भारत युरोपच्या पुढें ३७–३९

१ आजची निवडणुकीची सदोष पद्धति. २ क्रांति पक्षातीत च असते.

८ गणतंत्र नाहीं गुणतंत्र ३९–४५

१ आज शिक्षा करण्यांत हि सुधारणा. २ सत्ताविभाजनानें सत्ताभिलाषेवर नियंत्रण. ३ स्वार्थाच्या नियंत्रणाकरितां सुखसाधनांचें विभाजन. ४ सात्त्विक लोक निवडणुकींत पडत नाहींत. ५ हें मोहचक्र आहे. ६ कोणता च पक्ष दुर्बल होऊं नये. ७ विनोबा कॉंग्रेसमन होण्यांत कोणाचें भलें नाहीं.

९ 'अभय' आणि 'करुण' ४५–५२

१ आज भारताची विशेष जबाबदारी. २ प्रजेंत अभय असावें. ३ देशांतील भयस्थानें नाहींशीं करावींत. ४ एकरसतेसाठीं नईतालीम हवी. ५ करुणा कशी वाढेल ?

१० पाकिस्तानच्या वाढत्या सैन्यशक्तीला उत्तर ५२–५९

१ आम्हीं स्वतंत्र बुद्धीनें विचार करावा. २ देशाच्या वाणींत शक्ति कशी येईल? ३ पाकिस्तानशीं बोलणें करण्यासाठीं शस्त्र-त्याग. ४ आंतरिक शांततेसाठीं हिंसेचा प्रयोग होऊं नये. ५ लहान हिंसेंत श्रद्धा ठेवणें सर्वांत अधिक भयानक. ६ सैन्य वाढवायचें असेल तर लोकांना

उपाशी मारावें लागेल. ७ कर्तव्याच्या चार गोष्टी. ८ नैतिक शक्तीनें च लढावयाचें आहे. ९ ऐक्याची आवश्यकता.

११ 'पॉवर' पॉलिटिक्स आणि 'स्ट्रेंग्थ' पॉलिटिक्स ६०–६२

१ कायद्यानें जन-शक्ति निर्माण होत नाहीं. २ 'पॉवर' पॉलिटिक्स आणि 'स्ट्रेंग्थ' पॉलिटिक्स. ३ समुद्राचा विरोध नदी करूं शकत नाहीं.

१२ निवडणुकांचा खेळ ६३–६६

१ अप्रत्यक्ष निवडणूक. २ निवडणुकीचा खेळ खेळा. ३ पक्षभेदामुळें प्रेम कमी होऊं नये. ४ घर्षणस्थानीं तेल घाला. ५ परीक्षक जनता.

१३ हायड्रोजन बॉम्ब आणि चाकू ६६–६७

१४ राजे नामशेष झालेले नाहींत ६७–७०

१ आजच्या काळाची गति. २ आजच्या समाजाचा अंतिम शब्द 'लॉ अॅन्ड ऑर्डर.' ३ वेलफेयर नव्हे इलफेयर.

१५ सुशासनाच्या विरुद्ध आवाज ७१–७९

१ धर्मसंस्था आणि शासनसंस्था यांपासून मुक्त होण्याची गरज आहे. २ धर्माचा जीवनावर कांहीं च प्रभाव नाहीं. ३ श्रद्धावान लोकांनीं धर्म नाहींसा केला. ४ श्रद्धाळूंची 'गोपाल-बिडी.' ५ सेवेची जबाबदारी थोडया प्रतिनिधींवर. ६ इंग्लंडचें उदाहरण. ७ सुशासनांतच अधिक धोका. ८ लोकनीतीची निष्ठा. ९ जग सरकाररूपी रोगानें पिडलें आहे. १० आरशांत आपलें च प्रतिबिंब दिसतें. ११ सरकारमुळें च आम्ही सर्व असुरक्षित.

१६ भारतीय राजचिह्नाचा संकेतार्थ ८०

१७ कायद्यानें कामें होत नाहींत ८१–८२

१ काय ही च खरी स्वतंत्रता आहे ?

## ( खंड तिसरा )


१८ सत्ता-निरपेक्ष समाजाचें रूप ८३–८८

१ पंचविध कार्यक्रम. २ जीवन-शोधन. ३ अध्ययनशीलता. ४ निष्काम समाज-सेवा. ५ वाणीनें निर्देश, कृतीनें सत्याग्रह. ६ प्रश्नांचे अहिंसक उपाय शोधणें ७ भौतिक सत्ता गांवांत, नैतिक सत्ता केन्द्रांत. ८ शक्तीचा झरा आमच्या हृदयांत, दिल्लींत नव्हे.

१९ सर्वोदयाचा राजकीय विचार ८८–९५

१ पांचामुखीं परमेश्वर. २ केन्द्रीकरणाचे दोष. ३ विकेन्द्रीकरणाची आवश्यकता. ४ सर्वोदय-रचनेचे दोन सिद्धांत. ५ कुठें एकमतानें तर कुठें बहुमतानें निर्णय. ६ विचार भिन्न असोत, पण आचार मात्र एक असावा. ७ विचार-मंथन अवश्य व्हावें.

२० अहिंसक राज्याची स्थापना ९६–१०६

१ साम्यवाद्यांचा विचार. २ अहिंसक समाज-रचनेला कॉंग्रेस बाधक तर नाहीं ? ३ लोक-सेवक-संघ. ४ नव्या सेवा-संघाची जबाबदारी. ५ खरी ताकत कोठें ? ६ मूल्य-परिर्वतन प्रमुख आणि निवडणुकी गौण. ७ अहिंसेची धोकेबाज व्याख्या. ८ अहिंसेंत तीव्र संवेगाची आवश्यकता. ९ राजाजींची सूचना. १० सैन्य काढून टाकण्याची शक्ति देशांत कशी निर्माण होईल ?

२१ अहिंसा हें च अंतिम शरणस्थान १०६–११०

१ सर्व पक्षांना सर्वोदयांत यावें च लागेल. २ सर्वोदय समुद्र आहे. ३ मूढ हिंसा कोठपर्यंत चालेल ?

२२ लोक-तंत्र व सत्याग्रह १११–११९

१ गांधीजींच्या काळचा सत्याग्रह. २ विधायक सत्याग्रह. ३ सत्याग्रहाचा अर्थ. ४ गांधीजींचा काळ. ५ ह्या युगाची किमया.

२३ **खेड्याखेड्यांत स्वराज्य** १२०–१३०

१ स्वराज्य कोणाच्या देण्यानें मिळत नाहीं. २ गांवागांवांत 'मातृराज्य' दिसावें. ३ ग्रामराज्य आणि रामराज्य. ४ ग्रामे ग्रामे विश्वविद्यापीठम्. ५ प्रत्येक गांव राज्य-कार्य-धुरंधर. ६ अकलेचें वितरण. ७ शासन-विभाजन. ८ ग्राम-संकल्प. ९ गांवागांवांत आयोजन. १० डोकीं अनेक पण हृदय एक. ११ त्रैराशिकाचें काम नाहीं. १२ 'रामराज्य' कां 'अराज्य' नांव स्वेच्छाधीन. १३ समर्थांचें परस्परावलंबन हि ग्राह्य. १४ गांवांतला कच्चा माल गांवांतच पक्का व्हावा.

२४ **ग्राम-स्वराज्याची स्थापना** १३१–१३४

१ पक्ष-भेदाचें विष. २ गांवांनीं स्वतःच्या पायावर उभे रहावें. ३ लोकशाहीचें नाटक. ४ ग्राम-स्वराज्य स्थापन करा.

२५ **स्व-शासनाची स्थापना** १३५–१३९

१ अशांततेचें कारण केंद्रिय सत्ता. २ लोक-राज्य अजून आलेलें नाहीं. ३ स्वयंशासनाच्या दोन बाजू. ४ अहिंसाधिष्ठित तत्त्वज्ञान, शिक्षण-शास्त्र, मानस-शास्त्र.

२६ **सरकारचा अंत करा** १४०–१४२

१ आमचा झगडा सर्व सरकारांशीं. २ राष्ट्राला धारण करणारे =धृतराष्ट्र.

२७ **शासनमुक्तीचा विचार** १४२–१५८

२ सरकारी दृष्टीमधील मौलिक भेद. २ जास्तींत जास्त स्वावलंबन. ३ संकुलसत्तावाद व लोकशाही. ४ 'मुखमें राम बगलमें छूरी.' ५ लोकतंत्राचा खरा अर्थ लक्षांत घ्या. ६ स्वातंत्र्याच्या लढ्याची विशेषता. ७ आत्मज्ञान आणि विज्ञान. ८ भारताचें व्यापक चिंतन. ९ आजची दयनीय दशा. १० सत्तेचें विभाजन व्हावें.

११ आजच्या निवडणूकपद्धतीचे दोष. १२ आरोग्याचें कार्य जनतेनें उचलावें. १३ शिक्षण सरकारच्या हातीं नसावें. १४ लोक-शाहीचें ढोंग. १५ प्रश्न जनशक्तीनें सुटावेत. १६ सत्ता विचाराची, व्यक्तीची नव्हे. १७ मदत ईश्वराची, पुढाऱ्याची नव्हे. १८ शस्त्राचे नांगर बनतील.

२८ **सर्वोदय म्हणजे शासन-मुक्ति** १५८–१६२

१ सर्वत्र स्वतंत्र राज्यसंस्था. २ बेडूक आणि राजा. ३ डोकें मोजणीची लोकशाही. ४ केंद्रित सत्तेचे दोष. ५ सर्वोदय म्हणजे शासन-मुक्ति. ६ सरकारला दोन वर्षांची सुट्टी द्यावी.

२९ **शासन-हीनता, सुशासन, शासन-मुक्ति** १६३–१६९

१ सरकारचें स्वरूप जनतेच्या शक्तीवर अवलंबून आहे. २ शासनहीनता, सुशासन व शासन-मुक्ति. ३ संग्रह हि पाप आहे. ४ सर्वोदयसमाजाकडे. ५ सुशासन शासन-मुक्तींत येऊन जातें. ६ आमचा दुहेरी प्रयत्न. ७ कायदा म्हणजे सर्व कांहीं समाप्त. ८ सरकार फार भयानक वस्तु आहे. ९ बुद्धि-स्वातंत्र्यावर प्रहार

३० **राज्य नव्हे स्वराज्य** १६९–१७५

१ स्वराज्यानंतर निष्काम-सेवा राहिली नाहीं. २ राजकीय पक्ष-वाल्यांची स्थिति. ३ सेवेचा सौदा. ४ राज्य-सत्तेमार्फत धर्म-प्रचार अशक्य. ५ कोणा हि राजाच्या आज्ञेनें काम होत नसतें. ६ शिकंदर व दरोडेखोराची गोष्ट. ७ जन-शक्तीनें स्वराज्य. ८ स्वराज्याचीं दोन लक्षणें.

३१ **सत्ता नष्ट कशी होईल ?** १७५–१८१

१ "सत्तेच्यामार्फत सेवा" हा भ्रांतिमंत्र. २ गृहस्थाश्रमांत सत्ता. ३ विद्यालयांत व धर्मसंस्थांत सत्ता. ४ सत्ता सोडा. ५ सूर्यासारखा निष्काम कर्मयोग. ६ सेवेच्या द्वारा सत्तेची समाप्ति.

३२ सरकार आणि शांति-सेना १८२–१८६

१ सरकारवर भरवंसा तर जनता अनाथ. २ नाममात्र लोकशाही. ३ पक्षांपासून मुक्ति पाहिजे. ४ संमतीचा गोवर्धन. ५ प्रत्येक घरांतून एक गुंडी. ६ कोणाचा तोटा नाहीं. ७ सरकार विरोध कां करील ?

३३ जनतेच्या गुण-विकासाची आवश्यकता १८७–१९०

१ भित्र्या देशाला लष्कर वाचवूं शकत नाहीं. २ ज्ञान-तृष्णा वाढली पाहिजे. ३ उन्नति कारुण्यगुण वाढल्यानेंच होईल. ४ राज्य जितकें उत्तम तितका धोका हि जास्त.

३४ सरकारनें खादीसाठीं काय करावें ? १९०–१९१

३५ 'राज्य' नको 'प्राज्य' हवें १९१–१९५

१ उत्तम राज्याचें लक्षण. २ मी मोठ्या पक्षाचा नेता असतों तर ! ३ डाळिंबाच्या दाण्यासारखें राज्य.

३६ टॉलस्टॉयची वासना १९६

३७ विद्यार्थ्यांनीं लोकनीतिप्रवीण बनावें १९७–२००

१ सर्वानुमतीची लोक-नीति. २ विश्व-व्यापक दृष्टीनें सेवेस लागावें. ३ सेवेचें रहस्य. ४ कल्याण-राज्य म्हणजे जड-दशा.

परिशिष्ट

सर्व-सेवा-संघाचा निवडणूक ठराव २०१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 21132 वि: ...
1216 नों: दि: ...

# लोक-नीति

★

## खंड पहिला

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१०२५८
ग्रं. क्र.

### ऋषि-अनुशासन :१:

#### तीन प्रकारचीं राज्यें

फार प्राचीन कांळीं अशी गोष्ट होती कीं तेव्हां राजे होते, पण त्यांना लोक निवडीत असत. परंतु ते ऋषींचा सल्ला घेत. कोणती हि मोठी गोष्ट असली, प्रश्न उपस्थित झाला, कीं ते ऋषींजवळ जात आणि त्यांच्या सल्ल्यानुसार राज्य चालवीत. त्या वेळीं ऋषींचें राज्य होतें; परंतु ऋषि गादीवर बसत नव्हता, आपल्या आश्रमांत च राहत असे. राजा वेळोवेळीं आश्रमांत त्याच्याकडे जाई. ऋषि ध्यान चिंतन करून राजाच्या प्रश्नांचें उत्तर देई आणि राजा तें मान्य करी. राजा दशरथ वसिष्ठऋषींच्या म्हणण्याप्रमाणें वागत असे. जेव्हां विश्वामित्रानें दशरथाजवळ राम-लक्ष्मणांची मागणी केली तेव्हां मुलें देण्याचा राजाचा धीर होईना, कारण त्यावेळीं मुलें लहान होतीं. त्यानें नकार दिला. परंतु वसिष्ठ म्हणाले, 'राजा, तूं कसा अविचारी आहेस ! विश्वामित्र तुझ्याकडे मुलांची मागणी करतो आहे ती मान्य करण्यांत च मुलांचें कल्याण आहे.' ऋषींची अशी आज्ञा झाल्याबरोबर राजानें तें मान्य केलें आणि मुलें सोंपवून दिलीं. ते ऋषि निवडले जात नव्हते. ते आश्रामांत बसून च ध्यान-चिंतनद्वारां दुनियेचें कल्याण करीत. ते इंद्रिय-निग्रह, एकांत-तपस्या,

उपवास इत्यादि करीत, कंदमुळें खात आणि काम-क्रोधादींना जिंकण्याचा प्रयत्न करीत. अशा ऋषींचें म्हणणें राजे ऐकत व त्यांच्या म्हणण्याप्रमाणें राज्य चालवीत.

राज्याचे तीन प्रकार असतात. १ ऋषीचें राज्य, २ राजाचें राज्य आणि ३ पुष्कळ लोकांचें राज्य. मध्यंतरींच्या काळांत राजाचें राज्य चाले. तेव्हां राजा चांगला असला तर प्रजा सुखी व्हायची आणि वाईट असला तर दु:खी व्हायची; म्हणजे तो नशिबाचा खेळ असायचा. परंतु आतां लोकांच्या अकलेप्रमाणें राज्य चालतें. लोक मूर्ख असतील तर निवडून येणारे मूर्खांचे सरदार बनतील. आणि लोक शिकलेसवरलेले असतील तर निवडून येणारे अक्कलवंताचे सरदार बनतील. म्हणून लोक शिक्षित असले पाहिजेत. परंतु हें होईल तेव्हां होईल. आज तर लोक मूर्ख च आहेत. तेव्हां आजच्या स्थितींत लोकांचें राज्य हवें कीं राजाचें राज्य हवें कीं ऋषीचें राज्य हवें, तें निवडून घ्या.

## आजच्या पद्धतीचा धोका

ऋषींच्या अकलेचें राज्य चांगलें असतें असें नेहमीं म्हटलें जातें. पण ऋषि कोण हें कसें ओळखावें ? म्हणून ऋषींचें राज्य चांगलें असलें तरी चालूं शकत नाहीं. राजाचें राज्य तर टाकाऊ च आहे. म्हणून आज लोकांचें राज्य चालतें. यांत लोकांना दारू हवी असेल तर सरकारला दारूचीं दुकानें उघडावीं लागतात आणि लोकांना ती नको असेल तर दुकानें बंद करावीं लागतात. लोकांना बाहेरून धान्य मागविण्याची इच्छा असेल तर सरकारला तें आणावें लागतें. याचा अर्थ असा कीं लोकांच्या मर्जीची वस्तु होईल. म्हणजे बहुसंख्य लोक जी वस्तु मानतील ती गोष्ट होईल. परंतु जास्त लोकांना जें पसंत असतें तें चांगलें च असतें असें आपण म्हणूं शकत नाहीं. म्हणून ऋषींच्या शोधासाठीं जावें लागतें आणि त्यांचा सल्ला घ्यावा लागतो. कित्येकदां सज्जनांचें मत एक असतें आणि लोकांचें दुसरें. अशा वेळीं कोणाच्या मताप्रमाणें वागावें हा प्रश्न असतो. आजच्या राज्यपद्धतींत सर्वांत मोठा धोका हा च आहे. कोणाला निवडावें हें

जर लोक ओळखणार नाहींत तर सारा आंधळ्यांचा कारभार होईल. तरी हि आम्हीं एक पद्धति सुरू केली आहे, त्यांत धोका असेल तर नाहींसा करूं. नंतर लोकांची अक्कल वाढेल आणि चांगले लोक चांगल्या व्यक्ति निवडतील.

## मनूची कहाणी

एकदां मनुमहाराज तपस्या करीत होते. प्रजा राज्यकारभार चालवीत होती. परंतु चांगलें राज्य चालत नव्हतें, म्हणून लोक मनूकडे गेले आणि त्यांनीं मनूला प्रार्थना केली कीं आपण राजा व्हावें. मनु म्हणाला, मी तर तपस्या करीत आहें. हें सोडून राजाचें काम करीन तर आपल्याला माझें सर्व म्हणणें ऐकावें लागेल. अमुक गोष्ट आम्ही ऐकणार नाहीं असें कधीं म्हणतां कामा नये. प्रजेनें हें कबूल केलें तेव्हां मनु राजा झाला. अशी कहाणी आहे. समाजांत असे लोक हवेत कीं जे निवडणुकींत भाग घेणार नाहींत. मनूला हा साठ आणि चाळीस मतांचा मामला मंजूर नव्हता. ते म्हणाले कीं सर्व लोकांची इच्छा असेल तर मी येईन. नाहीं तर रामनाम घेईन. म्हणजे मला शंभर टक्के मतें मिळालीं पाहिजेत. केवळ बहुमतानें मी राजा होऊं इच्छीत नाहीं.

## अलिप्त सेवकांची आवश्यकता

जे निवडणुकींपासून अलिप्त राहतील आणि योग्य दिशेनें चिंतन-मनन करतील, ते च लोक राज्यकर्ते झाले पाहिजेत. दुनियेचा खेळ तर चालू च आहे, परंतु तो नीट चालतो किंवा नाहीं हें पाहण्यासाठीं खेळाडू चालत नाहीं. खेळापासून अलग राहणारा च असावा लागतो. जो खेळापासून दूर उभा असतो तो च खेळांत कोणकोणत्या चुका होतात तें ओळखूं शकतो. जो खेळांत भाग घेतो तो ओळखूं शकत नाहीं. यासाठीं कांहीं लोक असे असायला हवेत कीं जे निवडणुकीच्या खेळापासून दूर राहतील आणि शांतिपूर्वक चिंतन, मनन व भक्ति करतील. ते लोकांची स्थिति पाहतील. जेथें लोकांची चूक असेल तेथें लोकांना सांगतील व जेथें राज्यकर्त्यांची चूक असेल तेथें त्यांना ती दाखवतील. राज्यकर्ते मानोत

अगर न मानोत, ती त्यांच्या मर्जीची गोष्ट आहे. आपल्या सांगण्याप्रमाणें कोणी वागत आहे कीं नाहीं याची पर्वा सज्जनांना नसावी. त्यांचें काम केवळ अध्ययन, चिंतन, मनन आणि जगाची सेवा हें च असलें पाहिजे. जे केवळ सेवा च करीत असतात ते च राजाची व प्रजेची चूक दाखवूं शकतात.

ही च कल्पना घेऊन गांधीजी गेल्यानंतर सर्वोदय-समाजाची स्थापना केली गेली. यांत फक्त सेवा करणारे असावेत, निवडणुका लढविणारे नसावेत, अशी आमची इच्छा होती. भगवान् श्रीकृष्णांनीं म्हटलें होतें कीं, 'कौरवपांडवांना लढायचें असेल तर ते लढूं शकतात. मी मात्र अर्जुनाच्या रथाचें सारथ्य करीन, पण लढाईंत भाग घेणार नाहीं.' तरी सुद्धां एकदां त्यांना हातांत शस्त्र घ्यावें लागलें. पण व्यासमुनि निराळे च राहिले. जेव्हां अश्वत्थाम्यानें ब्रह्मास्त्र फेंकलें आणि अर्जुनानें हि फेंकलें तेव्हां जगाचा संहार होऊं लागला. त्यावेळीं व्यासमुनि मधें पडले आणि त्यांनीं अर्जुनास ब्रह्मास्त्र परत घेण्यास सांगितलें. अर्जुनानें त्यांचें म्हणणें ऐकलें, याप्रमाणें त्यांनीं लढाईंत भाग तर घेतला नाहीं. परंतु दुनियेला संहारापासून वांचविण्यासाठीं ते मधें पडले. असें हि कांहीं लोक असले पाहिजेत.

## सर्वोदयवादी हे राज्यकर्ते आणि प्रजा यांमधील दुवा

राजा आणि प्रजा यांच्यामधले लोक सर्वोदयवाले आहेत. त्यांचें काम दोघांच्या चुका दाखविणें, दोघांत परस्पर प्रेम वाढविणें, एकमेकांचा संदेश एकमेकांना पोंचविणें आणि प्रजेचें सामर्थ्य वाढविणें हें आहे. ते सरकारांत हि सामील होणार नाहींत आणि लोकांत हि सामील होणार नाहींत. ते दोघांपासून अलग राहतील आणि त्यांचे खरे सेवक बनतील. या दोघांचे जे गुण-दोष दिसतील ते सांगतील, सर्वांवर प्रेम करतील. परंतु कोणत्या हि गटांत दाखल होणार नाहींत. पार्टीमुळें गांवाचे तुकडे होतात, त्यामुळें सर्व गांव उद्ध्वस्त होतें. म्हणून ते लोक, मनुष्य या नात्यानें सर्वांची सेवा करतील. हिंदुस्थानांत अगणित जाति आहेत. जणूं झाडांची पानें ! परंतु सर्वोदयसमाजाचें म्हणणें आहे कीं आम्हांला हजार प्रकार नकोत. गंगाजल हें विचारीत नाहीं कीं "तूं गाय आहेस, बकरी आहेस कीं वाघ

आहेस !" तें हें च म्हणतें कीं तूं तहानेला आहेस, तेव्हां तुझी तहान भागविणें माझें कर्तव्य आहे. जसा गंगाजलाला भेद माहीत नाहीं, तें सर्वांबरोबर सारखा व्यवहार करतें, तशी च बापूंनीं आम्हांला ही शिकवण दिली कीं 'सर्वांवर प्रेम करा. पक्ष, जाति आदि बघूं नका, सत्ता हातांत घेऊं नका.' आम्ही हें च काम करायला आलों आहोंत.

**डींग,** ता. १७-५-५२

## आमची प्राचीन ग्राम-रचना

येथें इंग्रजी राज्य आल्यावर आपली प्राचीन व्यवस्था मोडून गेली. पूर्वीं येथें ग्रामसभा होत असत व पंचायतीचें राज्य चालें. खेड्याचें उत्पादन, शिक्षण, रक्षण वगैरे सगळीं महत्त्वाचीं कामें पंचायत च करीत असे. पंचायत म्हणजे पांच जातींचे लोक एकत्र होऊन कारभार करीत. तें एक प्रकारचें सामुदायिक शासन होतें. खेड्याची सारी जमीन पंचायतीच्या मालकीची असे व तिच्यांतला एकेक तुकडा शेतकऱ्यांना दिला जात असे. या च प्रमाणें न्हावी, धोबी इत्यादि सर्वांना एकेक हिस्सा दिला जात असे. याप्रमाणें खेडें हें एका कुटुंबाप्रमाणें नांदत असे व खेड्यावर पंचायतीचें शासन चालत असे. याला च खरें स्वराज्य म्हणतात.

**पकरी बरावां,** २१-४-५३

## उपनिषत्कालीन राज्याचें वर्णन

उपनिषदांत एक राजा आपल्या राज्याचें वर्णन करीत आहे :—

**न मे स्तेनो जनपदे न कदर्यः न मद्यपः ।**
**न अनाहिताग्निः न अविद्वान्.... ॥**

म्हणजे माझ्या राज्यांत कोणी चोर नाहीं, कोणी कंजूष नाहीं. जेथें कंजूष लोक असतात, तेथें च चोर असतात. मीं कितीदां तरी म्हटलें आहे कीं कंजूष हा चोराचा बाप असतो. कंजूष माणूस च चोऱ्या वाढवीत राहतो. त्या राजानें पुढें सांगितलें कीं, माझ्या राज्यांत कोणी मद्य पीत

नाहीं. त्या काळीं हिंदुस्थानांत कोणी दारू पीत नसे. पण इंग्रजांनीं दारू पिण्याची फॅशन काढली त्यामुळें शहरांतून दारू उघडपणें चालू लागली. आज ती थांबविण्याची हि आम्हांला भीति वाटते. त्या राजानें नंतर सांगितलें कीं, माझ्या राज्यांत कोणी अविद्वान नाहीं. लिहितां वाचतां न येणारा असा कोणी हि येथें नाहीं. तसें च जो देवाची पूजा करीत नाहीं असा हि कोणी माझ्या राज्यांत नाहीं. सारांश, फार प्राचीन काळापासून येथें विद्याध्ययन चालत आलें आहे. पण आज आम्हांला विज्ञान व आत्मज्ञान या दोहोंचें हि अध्ययन करावयाचें आहे. प्राचीन काळापासून चालत आलेलें ज्ञान आम्हांला आत्मसात् करावयाचें आहे व पश्चिमेकडून आलेलें विज्ञान हि हस्तगत करावयाचें आहे. नालंदाचें अवशेष आम्हांला ही च शिकवण देत आहेत. त्या च तऱ्हेनें आपल्याला आपल्या गुणांचा विकास केला पाहिजे.

**नालन्दा, ता. १७-८-५३**

# खंड दुसरा

## शक्तीचें अधिष्ठान : २ :

### स्वराज्यापूर्वी राजकारणांत शक्ति होती

आज आमची कांहींशी दिशाभूल होत आहे. आपल्या लोकांच्या एक गोष्ट लक्षांत येत नाहीं कीं जेव्हां देश परकीयांच्या ताब्यांत असतो आणि स्वातंत्र्य संपादण्याचा प्रश्न असतो तेव्हां शक्तीचें अधिष्ठान राजकारणांत असतें. आणि म्हणून महात्मे सुद्धां राजकारणांत भाग घेणें आपलें कर्तव्य समजतात. लो. टिळकांना जेव्हां विचारलें कीं, "स्वराज्य मिळाल्यानंतर आपण काय कराल ?" तेव्हां ते म्हणाले होते कीं, "मी ज्ञानाची उपासना करीन, विद्यार्थ्यांना शिकवीत राहीन." याचा अर्थ असा कीं अध्ययन-अध्यापन हा च त्यांच्या समाधानाचा आंतरिक विषय होता. दिवसभर राजकीय कामें केल्यानंतर रात्रीं झोंपण्यापूर्वी ते वेदांचा अभ्यास करीत अशी त्यांची ज्ञानपिपासा होती. तरी हि ते राजकारणांत पडले. कारण त्यांना माहीत होतें कीं या वेळीं आपण राजकारणांत पडलों नाहीं तर दुसरी कसली हि सेवा करणें कठिण आहे. म्हणून त्या वेळीं त्यांनीं राजकारण हा परमधर्म मानला. तात्पर्य असें कीं ज्या पुरुषाचा राजकारण हा विषय नाहीं त्याला सुद्धां देशाच्या परतंत्र स्थितींत राजकारणांत उतरणें भाग पडतें. पारतंत्र्यामध्यें राजकारणांत त्यागाला वाव असतो. आणि शक्तीचें अधिष्ठान नेहमीं त्यागांत असतें हें लक्षांत घ्यायला हवें.

## स्वराज्यानंतर शक्तीचें अधिष्ठान समाज सेवेमध्यें

परंतु देश स्वतंत्र झाल्यानंतर शक्तीचें अधिष्ठान बदलतें. स्वराज्यांत शक्ति सामाजिक सेवेंत असते, राजकारणांत असत नाहीं. कारण तेव्हां समाजाची घडण बदलायची असते, आर्थिक विषमता दूर करायची असते. हीं सारीं कामें सामाजिक क्षेत्रांत च करावीं लागतात. त्यांत त्यागाचे, कष्ट सहन करण्याचे, प्रसंग येतात, भोग-लालसेवर अंकुश ठेवावा लागतो आणि वैराग्याची हि गरज पडते. म्हणून शक्ति या क्षेत्रांत असते. परंतु ज्यांना ह्याचें भान असत नाहीं ते अशा भ्रमांत राहतात कीं अजून हि शक्तीचें अधिष्ठान राजकारणांत आहे. आणि तसें समजून ते त्या क्षेत्राकडे धांवत सुटतात. त्या ठिकाणीं सत्ता असते पण शक्ति असत नाहीं.

सत्ता आणि शक्ति यांत महदंतर आहे. थोडा विचार केल्यानें या दोहोंतला फरक ध्यानांत येईल. सत्तेनें एक पदाधिकार प्राप्त होतो. देश स्वतंत्र झाल्यानंतर सत्ता हातांत आली कीं त्या पदावर जाणें जरूर हि असते. परंतु त्या ठिकाणीं मोजके च लोक जाऊं शकतात. तें एक मर्यादित क्षेत्र आहे. घटना आणि कायदा यांच्या चौकटींत तिथें काम करावें लागतें. त्या चौकटींत राहून मालक म्हणजे आम जनता जी सेवा घेऊं इच्छील ती करावी लागते. मोहाचीं साधनें हि तेथें भरपूर असतात. पदोपदीं लोभाचे आणि मोहाचे प्रसंग आल्यानें ध्येयापासून घसरण्याचा संभव असतो. म्हणून त्या ठिकाणीं जनक राजासारख्या अलिप्त वृत्तीच्या लोकांची गरज असते. थोडे लोक च तेथें जाऊं शकतात. बाकी सर्वांनीं सामाजिक क्षेत्रांत काम केलें पाहिजे आणि देशाची उन्नति करण्याची शक्ति निर्माण केली पाहिजे.

आज समाजाची जी स्थिति आहे ती मान्य करून समाजाची सेवा करणें अधिकारारूढ लोकांना हि सोपें नाहीं. उदाहरणार्थ, कोणी हि सत्ताधारी माणूस सत्तेच्या जोरावर हिंदुस्थानामध्यें बिडी पिणें बंद करूं शकणार नाहीं. कारण आजचा समाज तें व्यसन सोडायला तयार नाहीं. समाजांतून असलेल्या वाईट संवयी काढून टाकण्याचें काम समाज-सेवकांचें आहे. समाज-सेवक त्याविरुद्ध जनमत तयार करूं शकतो आणि त्याच्या

प्रयत्नानें अनुकूल वातावरण निर्माण झाल्यावर सत्ताधारी विडी बंद करण्याचा कायदा करूं शकतो. अमेरिकेंतला समाज दारूबंदीला अनुकूल नसल्यामुळें तेथें दारूबंदी होऊं शकणार नाहीं परंतु हिंदुस्थानांत दारूबंदी होऊं शकते कारण येथें त्यासाठीं अनुकूल वातावरण तयार आहे.

राजकीय सत्तेंत समाजाला पुढें नेण्याची अधिक शक्ति असत नाहीं ती शक्ति आणि ती वृत्ति सर्व बंधनांपासून अलिप्त, सर्व अधिकारस्थानांपासून दूर आणि सेवापरायणवृत्तीनें समाजाची सेवा करणाऱ्या लोकांमध्यें च असूं शकते. या गोष्टीचें भान राजकीय कार्यकर्त्यांना नाहीं. म्हणून ते राजकीय क्षेत्राकडे जाण्याचा प्रयत्न करतात. हें भान जर त्यांना होईल तर बरेचसे लोक सामाजिक क्षेत्राकडे येण्याचा प्रयत्न करतील.

म्हणून च गांधीजींनीं दूरदृष्टीनें कॉंग्रेसला लोक-सेवक-संघांत परिवर्तित करण्याची सल्ला दिली होती. परंतु आम्हीं ती सल्ला मानली नाहीं. त्याबद्दल मी कोणाला दोष देत नाहीं. ज्यांनीं कॉंग्रेस-संस्था कायम ठेवली त्यांचा हि एक विचार होता. तो विचार चुकीचा असेल, परंतु मी त्याला मोह म्हणणार नाहीं. एवढें खरें कीं आतां रोज कांहीं ना कांहीं त्यागाचे प्रसंग येतील असा कॉंग्रेसजवळ कार्यक्रम असला पाहिजे. जोंपर्यंत अशा कार्यक्रमावर कॉंग्रेसच्या सभासदांची कसोटी होत नाहीं तोंपर्यंत कॉंग्रेसची शुद्धि मृगजलवत् च होईल असें माझें नम्र मत आहे.

## मित्रांना सेवेची सल्ला

म्हणून माझे जे मित्र आज कॉंग्रेसमध्यें, किसान-मजूर-प्रजापार्टींत किंवा समाजवादी पक्षांत आहेत त्या सर्वांना माझें सांगणें आहे कीं, राजकारणांत जाऊं इच्छिणाऱ्या व्यक्तींना सोडून बाकी सर्वांनीं सामाजिक सेवेला लागलें पाहिजे. नाहीं तर समाजाची प्रगति कुंठित होऊन जाईल; एवढें च नव्हे तर समाजाचें अधःपतन होईल. म्हणून निरंतर सेवेंत गढून गेलेला आणि समाजाची जागरूकपणें सेवा करीत असलेला असा एक मोठा वर्ग समाजामध्यें असला पाहिजे. त्याला राजकारणाचा अनुभव हि असावा परंतु सत्तेपासून अलिप्त राहून निर्भयपणें आणि तटस्थ बुद्धीनें

आपले विचार त्यानें जाहीर केले तर त्याचा नैतिक प्रभाव सरकारवर आणि लोकांवर हि पडेल.

असा वर्ग त्या च व्यक्तींचा बनूं शकेल कीं जे सत्तेमध्यें गुंतणार नाहींत. सत्तेबद्दल तिरस्कार म्हणून नव्हे, तर तिची मर्यादा ओळखून आणि शक्तीचें अधिष्ठान अधिकारांत नसून समाज-सेवेंत आहे, असें मानून ते समाज-सेवेंत मग्न होतील.

## सर्वोदय-समाजाची गरज

अलीकडे असें समजलें जातें कीं बहुमतवाल्या पक्षाच्या विरोधी एक पक्ष असला पाहिजे; नाहीं तर लोकशाहीचें रूपांतर फॅसिझममध्यें म्हणजे एक-तंत्री राज्यांत होण्याची भीति आहे. ही सारी पाश्चात्य परिभाषा आहे. आणि आपण लोकशाहीचा विचार पाश्चात्यांपासून घेतला असल्यामुळें परिभाषा हि ती च राहील आणि विचार हि तो च राहील. या विचारांत चूक च आहे असें नाहीं. परंतु अल्पमतांत असणारांचा आदर करून ते राजकारणांत विरोधी पक्षांतले असले तरी बहुमतवाल्यांनीं मिळूनमिसळून काम करावें, एकमेकांच्या प्रेमामध्यें कुठें बाधा येऊं देऊं नये. असें झालें तर सत्तेवर अंकुश राहून अधिकारारूढ पक्षाची शुद्धि होईल आणि त्यांच्या हातून चुका होण्याचें टळेल.

परंतु एवढ्यानें काम भागणार नाहीं. सत्तेच्या क्षेत्रापासून दूर राहणारा विवेकशील, अध्ययनशील आणि त्यागी सेवकांचा एक वर्ग जेव्हां प्रस्थापित होईल तेव्हां च देशाची खरी शुद्धि आणि उन्नति होईल. आम्हीं अशा वर्गाला ‘ सर्वोदय-समाज ’ हें नांव दिलें आहे. या विचाराशीं लोक सहमत असतील तर त्यांनीं सर्वोदय-सेवक व्हावें. सर्वोदय हा पंथ नाहीं. त्यामध्यें कोणतें हि कार्य अनिवार्य नाहीं. त्यांत कडक नियम नाहींत. प्रेमानें विचार समजून घेऊन सर्वोदयाची सेवा करायची आहे.

**राजघाट, दिल्ली,**
ता. १४-११-’५१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 21932 वि: ...
क्रमांक 5216 नों: दि: ...

# सेक्युलर स्टेटचा अर्थ : ३ :

## सेक्युलर स्टेट आणि दशविध धर्म

एके ठिकाणीं एक गृहस्थ म्हणाले, "मनूनें धर्माचीं दहा लक्षणें सांगितलीं आहेत. पण आमचें सरकार म्हणतें कीं आम्ही धर्म मानीत नाहीं. अशा स्थितींत आमचें कर्तव्य काय ? आम्हीं मनुमहाराजांच्या आज्ञेचें अनुसरण करावें कीं या धर्मविहीन सरकारच्या कल्पनेचें ?"

पुष्कळसे संदेह तर शब्द-मूलक असतात असें च बहुधा आढळून येतें. शब्दांचा नीट प्रयोग केला जात नाहीं म्हणून पुष्कळसे गैरसमज निर्माण होतात. मनूनें दशविध धर्म सांगितला आहे. ख्रिस्ताच्या दहा आज्ञा ख्रिस्ती आणि यहुदी धर्मांत प्रसिद्ध आहेत. त्या दहा आज्ञा आणि मनूचे दशविध धर्म हे एक च आहेत. परंतु ऐतिहासिक नजरेनें पाहिलें तर बहुधा असा निष्कर्ष निघेल कीं मनूच्या त्या दशविध धर्माचें च रूपांतर होऊन यहुदी आणि ख्रिस्ती धर्मांत त्या पोंचल्या आहेत. मनु एक अत्यंत प्राचीन ऋषि होऊन गेला. 'मनुस्मृति' हा त्या मानानें बरा च अर्वाचीन ग्रंथ आहे. मनु स्वतः मात्र अत्यंत प्राचीन आहे. त्याच्या वचनांचा आमच्या समाजावर इतका प्रभाव होता कीं वैदिक धर्मामध्यें एके ठिकाणीं असें सांगितलें आहे कीं "**यत् किं च मनुः अवदत् तद् भेषजम्**" मनूनें जें कांहीं सांगितलें तें भेषज आहे, हितकारी पथ्य आहे, औषध आहे. औषध किती हि कडू असलें तरी परिणामीं गुणकारी असतें म्हणून तें घेतलें पाहिजे असें वाक्य मनुस्मृतींत हि आहे. हें वाक्य आधुनिक मनुस्मृति ध्यानांत घेऊन म्हटलेलें नसून समाजामध्यें परंपरागत श्रद्धेनें जें प्राचीन मनुवचन पोहोंचलेलें आहे तें ध्यानांत घेऊन म्हटलें आहे.

धर्माचें एक लक्षण असें आहे कीं त्याशिवाय समाजाचें धारण च होऊं शकत नाहीं, आणि व्यक्तीचें जीवन हि उन्नत होत नाहीं. त्या

आज्ञांमध्यें एक व्रत आहे 'अ-स्तेय.' अस्तेय म्हणजे चोरी न करणें. अस्तेय तर धर्माला धरून आहे. मग आमचें धर्मातीत सरकार चोरीला मान्यता देईल काय? शुचिता हि धर्म मानला आहे. मग आमचें सरकार सफाई व आरोग्य इच्छिणार नाहीं काय? त्यांत विद्येचा उल्लेख आहे. मग सेक्युलर स्टेटमधें विद्या न राहतां अविद्या राहणार काय? धर्मांत सत्याला स्थान आहे. आणि आमच्या सरकारनें हि 'सत्यमेव जयते' हें ब्रीदवाक्य म्हणून स्वीकारलें आहे. हें ब्रीदवाक्य आपल्या भारत-भूमीच्या मूळ ग्रंथांतून, उपनिषदांतून घेतलें आहे.

तेव्हां 'धर्म' शब्द हा इतका विशाल आणि व्यापक आहे कीं त्याचे सर्व अर्थ विशद करणारा शब्द मला दुसऱ्या कोणत्या हि भाषेंत आढळला नाहीं. सर्व अर्थ तर जाऊं देत परंतु त्यांतले बरेचसे अर्थ ज्यांत असतील असा हि शब्द मला आढळला नाहीं. म्हणून जे लोक सरकारला धर्म-विहीन म्हणतात ते जणू सरकारला शिव्या च देतात. धर्मातीत अथवा धर्मबाह्य अशी वस्तु अधर्माशिवाय दुसरी कोणती असणार? सरकारचा धर्माशीं संबंध नाहीं असें म्हटलें तरी तें बरोबर नाहीं. म्हणून धर्माशीं असंबद्ध किंवा धर्म-विहीन आपलें सरकार आहे असें म्हणणें म्हणजे एक भ्रम पसरविणें च आहे. असा भ्रांत प्रचार बरा च झाला आहे आणि कांहीं भल्या भल्या लोकांनीं हि अशी टीका केली आहे.

## वेदान्ती सरकार, लोकयात्रिक सरकार

हें सर्व काय चाललें आहे? 'सेक्युलर' शब्दाचें भाषांतर आम्हीं आमच्या भाषेंत काय करावें हा एक निष्कारण प्रश्न आमच्यापुढें उभा आहे. 'सेक्युलर' शब्दाचा अर्थ आपण 'पंथातीत' किंवा 'अपांथिक' असा केला तरी हि अर्थ बरोबर प्रकट होत नाहीं. 'पंथ' म्हणजे मार्ग. याला च इंग्रजींत 'पाथ' म्हणतात. म्हणजे पंथातीत म्हणजे 'मार्ग-विहीन' सरकार असा त्याचा अर्थ होईल. परंतु तो शब्द 'वाट चुकलेला' या शब्दाचा पर्याय आहे. म्हणून तो हि शब्द बरोबर नाहीं.

म्हणून सेक्युलर शब्दाचा अर्थ स्पष्ट करण्याकरितां मीं 'वेदान्ती' हा शब्द निवडला आहे. आमचें सरकार 'वैदिक' नाहीं पण

'वेदान्ती' आहे. वेदान्तांत कुठल्या हि उपासनेचा निषेध नाहीं. जितक्या उपासना आहेत त्या सर्वांकडे वेद समान भावनेनें पाहतो. वेदान्तानें आपली स्वतःची अशी कांहीं उपासना ठेवलेली नाहीं; म्हणून जर आम्हीं सरकारला वेदान्ती म्हटलें तर कांहीं चांगला अर्थ प्रकट होईल.

एकदां तर असा अनुभव आला कीं रामकृष्ण-आश्रमचे एक संन्यासी सांगूं लागले कीं, "आमचा देश कोणीकडे चालला आहे?" रामकृष्ण-मिशनच्या लोकांत कोणत्या हि प्रकारची सांप्रदायिक भावना बहुधा असलेली दिसत नाहीं. तरी हि त्या संन्यासी मित्रानें असा प्रश्न केला. मीं विचारलें, "कां बरें?" ते म्हणाले, "सेक्युलर स्टेटवाले तर आध्यात्मिक मूल्यांचा हि इन्कार करीत आहेत." मीं म्हटलें, "अशी गोष्ट असती तर सरकारनें सत्य हें आपलें ब्रीद मानलें नसतें." परंतु 'सेक्यलर' या इंग्रजी शब्दानें हा सारा गोंधळ निर्माण केला आहे. सेक्युलरचा अर्थ वेदान्ती असा केला पाहिजे. आणि ज्या वेदान्तावर तुमची श्रद्धा आहे त्या च वेदान्तावर आपल्या सरकारची हि श्रद्धा आहे.

मीं त्यांना म्हटलें आपल्या येथें २१ वर्षें वयावरील प्रत्येकाला मताचा अधिकार आहे. तो प्रश्न तूर्त विसरून जा. परंतु आमच्या घटनेमध्यें प्रत्येकाला जो मताचा अधिकार दिला आहे तो कोणत्या आधारावर दिला आहे? शरीराच्या आधारावर दिला असता तर शरीरा-शरीरांत फरक आहे. एकाचें शरीर दुसऱ्याच्या शरीरापेक्षां अगदीं वेगळें असतें. एकाचा देह दुसऱ्याच्या देहाहून तिप्पट हि शक्तिशाली असूं शकतो. तेव्हां शरीर आधार मानून मताधिकार द्यायचा तर एकाला एक मत दिलें तर दुसऱ्याला दोन, तीन किंवा चार हि मतें द्यावीं लागतील. बरें, बुद्धीचा पाया धरला म्हणावें तर एकाची बुद्धि दुसऱ्याच्या बुद्धीपेक्षां हजारपट कमी अधिक असूं शकते. म्हणून तो हि आधार मानतां येत नाहीं. मग आधार कोणता? तर, प्रत्येकाच्या हृदयांत एक च आत्मा विराजमान आहे हा च तो आधार. नाहीं तर प्रत्येकाला एक च मत याला दुसरा कोणता आधार आहे? आत्मज्ञानाच्या पायाशिवाय दुसरा कोणता हि

आधार नाहीं. २१ वर्षांची वयोमर्यादा आणि मनुष्याला मताधिकार आहे पशूला नाहीं, या दोन गोष्टींच्या मात्र मर्यादा आहेत. मग 'सेक्युलर' चा काय अर्थ होतो ? आमचें ब्रीदवाक्य '**सत्यमेव जयते**' हें आहे आणि सर्व मानवांना समान मानलें गेलें आहे. या दोन्ही गोष्टी मिळून 'सेक्युलर स्टेट' म्हणजे आत्मज्ञानाच्या आधारावरील स्टेट असा याचा अर्थ होतो.

त्यांनीं विचारलें, "सरकार वेदान्ती आहे असें तुम्ही जाहीरपणें सांगू शकतां काय ?" मीं म्हटलें, जाहीरपणें मी हें सांगणार नाहीं. तुम्हांला समजावून देण्यासाठीं हा शब्दप्रयोग मीं केला. आमचें सरकार नास्तिक नाहीं. तें आध्यात्मिक मूल्यांना मानतें, आत्म्याला मानतें, आत्म्याची समानता कबूल करतें. तरी वेदान्त जितक्या खोलांत जाऊं शकतो तितक्या खोलांत तें जाऊं शकत नाहीं. आपल्याला 'सेक्युलर' शब्दाचें एका शब्दांत भाषांतर करतां येत नाहीं आणि भाव तर प्रकट करायचा आहे. तेव्हां आपण 'निःपक्ष-न्यायनिष्ठ-व्यावहारिक सरकार' असें म्हणूं शकतों. एका च परंतु जरा कठीण संस्कृत शब्दांत म्हणायचें झालें तर 'लोकयात्रिक' सरकार म्हणतां येईल. म्हणजे लोकयात्रेच्या बळावर जनतेला चालवूं इच्छिणारें सरकार. हा शब्द कठीण आहे. परंतु त्यानें च अडचण कांहींशी दूर होऊं शकते.

## गैरसमजाचें मूळ : इंग्रजी भाषा

हा सगळा घोटाळा कां उत्पन्न झाला ? तर आपल्या सरकारचें सर्व चिंतन इंग्रजींतून होतें म्हणून. आणि मग इंग्रजीचें भाषांतर करावें लागतें. कोणत्या हि भाषेचा अनुवाद दुसऱ्या भाषेंत नेमका होत नाहीं. आपण जर आपल्या भाषेंत विचार करीत असतों तर आज जे घोटाळे उत्पन्न झाले आणि त्यामुळें ज्या अडचणी निर्माण झाल्या, तें सर्व टळलें असतें.

इंग्रजी भाषेला पंधरा वर्षांचें जीवनदान दिलें गेलें आहे. याचा परिणाम हा होत आहे कीं आमच्या सरकारचा राज्यकारभार कसा चालला आहे याचें ज्ञान इंग्लंड-अमेरिकेंतल्या लोकांना जितकें होतें तितकें आमच्या येथल्या शिकल्यासवरलेल्या शेतकऱ्याला देखील होत नाहीं. आपल्या

देशांतील आम जनतेला असें अंधारांत ठेवणें चांगलें नाहीं. म्हणून आपण इंग्रजी भाषेंतून लवकरांत लवकर मुक्त होण्याची गरज आहे. आणि ही गरज मला पावलोपावलीं दिसून राहिली आहे. वेदान्ती शब्द इतका महान् आहे कीं तो भारतीय जनतेला आपल्या प्राणासारखा प्रिय आहे. परंतु आज तो शब्द टाळण्याची वृत्ति दिसून येते.

सेक्युलर शब्दामुळें मोठमोठ्या लोकांत हि गैरसमज होत आहेत एखाद्या शाळेंत जर वैदिक प्रार्थना होत असेल तर विचारतात कीं सेक्युलर स्टेटमध्यें सरकार वैदिक मंत्र कसें शिकवूं शकतें ? गेल्या आठवड्यांत मी अलीगढ विश्वविद्यालयांत गेलों होतों. तेथल्या विद्यार्थ्यांनीं आणि प्राध्यापकांनीं माझें मोठ्या प्रेमानें स्वागत केलें. मीं त्यांना ज्या गोष्टी सांगितल्या त्या साधारण नव्हत्या, गंभीर होत्या. सर्व धर्मांच्या शुद्धीची गोष्ट मीं त्यांना सांगितली आणि इस्लामच्या शुद्धीची हि व्याख्या केली. प्रारंभीं उभें राहून कुराणांतील ' आयत ' म्हणण्याचा त्यांचा रिवाज आहे. जाकिर हुसेन साहेबांनीं मला जेव्हां हें सांगितलें तेव्हां मी मोठ्या आनंदानें उभा राहिलों. सर्व कार्यक्रम मोठ्या प्रेमानें पार पडला. मला हि कुराणाचा कांहीं अभ्यास आहे; म्हणून ' आयत ' ऐकून मला आनंद वाटला. पण जर कोणी सेक्युलर स्टेटच्या विश्वविद्यालयांत कुराणांतील ' आयत ' कां म्हटली जाते असें विचारूं लागला तर तें चूक आहे. परदेशी शब्दामुळें हे सारे गैरसमज होत आहेत.

**राजघाट, दिल्ली**
ता. १५-११-'५१

## हिंसा कीं अहिंसा यांच्या निवडीचा समय : ४ :

आतां एक राज्य जाऊन दुसरें राज्य आलें आहे. आपल्याला कोणत्या प्रकारची समाजरचना हवी याविषयीं विचार करण्याची ही वेळ आहे. हा संधिकाल आहे, चिंतन करण्याची वेळ आहे. आज अनेक वाटा मोकळ्या आहेत. कोणत्या वाटेनें जायचें तें आपल्याला निश्चित करायचें आहे.

गांधीजींच्या वेळीं आम्हीं अहिंसेचा मार्ग अजमावला होता. परंतु त्यांत आमची कांहीं च विशेषता नव्हती. कारण तेव्हां आम्ही लाचार होतों. तो मार्ग आम्हीं स्वीकारला नसता तर मार च खाल्ला असता. दुसरा कोणता हिंसक मार्ग आमच्यासाठीं मोकळा नव्हता. म्हणून जो मार्ग आंम्हीं स्वीकारला होता तो अगतिक होऊन च स्वीकारला होता. तो अनाथांचा आश्रय होता. गांधीजींचें नेतृत्व आम्हांला लाभलें होतें. आम्हीं विचार केला कीं त्यांची पद्धत अजमावून पहावी. हिंसेच्या बाबतींत आमच्या शक्तीपेक्षां आमचा शत्रु पुष्कळ च बलवान होता. परंतु अहिंसेच्या बाबतींत आम्ही त्याच्याहून अधिक शक्तिशाली होतों. म्हणून स्वातंत्र्य-प्राप्तीची अभिलाषा सोडून निमूटपणें गुलामी स्वीकारायची कीं अहिंसक प्रतिकारासाठीं तयार व्हायचें हा एक च पर्याय आमच्यासमोर होता. त्यावेळीं आमच्यासमोर पसंतीचा प्रश्न च नव्हता. परंतु आज स्थिति निराळी आहे. आतां आम्ही निवड करूं शकतों. इच्छा असेल तर आम्ही हिंसक पद्धति स्वीकारूं शकतों अथवा अहिंसेचा मार्ग पसंत करूं शकतों. वाटल्यास सैन्य, नौकादल आणि वायुदल हि वाढवूं शकतों. देशाला खायला, प्यायला भलें हि न मिळो परंतु देशवासीयांना या सैन्यासाठीं त्याग करण्यास सांगूं शकतों ; आणि वाटल्यास अहिंसक मार्ग हि आक्रमूं

शकतों. निवड करण्याचा हा अधिकार आमच्या हातांत आहे. पूर्वीं जशी लाचारी होती, तशी आज नाहीं.

## हिंसेचा परिणाम : गुलामी किंवा जगाचा नाश

आतां गांधीजी निघून गेले आहेत. आपण स्वतंत्रपणें, मोकळेपणानें, कुणाचें हि दडपण न येतां निर्णय करूं शकतों. जणूं कांहीं यासाठीं च ईश्वरानें गांधीजींना आमच्यामधून उचलून नेलें. आतां त्यांचें दडपण आमच्यावर नाहीं. जर आम्ही हिंसक पद्धति पसंत करूं तर आम्हांला रशिया किंवा अमेरिकेला गुरु मानावें लागेल. कोण्या हि एका गुरूला मानून त्याची शागीर्दी पत्करून स्वेच्छेनें त्यांच्यापैकीं कुणाचे तरी गुलाम व्हावें लागेल. प्रश्न असा आहे कीं त्याचे ' कॅंप-फॉलोअर ' बनून त्यांच्या मागें मागें जाण्यानें आमची ताकद वाढेल काय? त्यांच्या बळावर बलशाली होण्याला कदाचित् आम्हांला पन्नास वर्षें लागतील आणि तरी हि कदाचित् आम्ही त्यांच्यापेक्षां अधिक बलशाही होऊं शकणार नाहीं. उलट परिणाम हा होईल कीं हिंदुस्थानला पुन्हां गुलाम होऊन रहावें लागेल. आणि समजा आम्ही रशिया आणि अमेरिका या दोघांपेक्षां हि बलशाली झालों च तर जगाला एक मोठें च धोकादायक बनूं. म्हणजे आमच्यापुढें प्रश्न असा आहे कीं स्वतंत्रतेच्या नांवावर इतर राष्ट्रांचे गुलाम बनायचें कीं जगाला धोकादायक बनायचें ? या बाबतींत आपल्याला खोल विचार करावा लागेल.

## हिंसेच्या मार्गानें भारताचे तुकडे होतील

आज हिंदुस्थान स्वतंत्र आहे तरी देखील आम्हांला धान्य आणि वस्त्र बाहेरून च मागवावें लागतें. बाहेरच्या विशेषज्ञांची आम्हांला गरज पडते. शस्त्रें आणि सेनापति बाहेरून आणावे लागतात. शिक्षणासाठीं हि आम्हांला इतर देशांवर अवलंबून रहावें लागतें. तेव्हां स्वातंत्र्य मिळून सुद्धां स्वेच्छेनें आपण गुलाम बनायचें कीं कसें हा आमच्यासमोर एक प्रश्न आहे. ईश्वरानें हिंदुस्थानच्या नशीबीं असें लिहिलें आहे कीं एक तर त्यानें अहिंसेच्या मार्गानें श्रद्धापूर्वक चालावें किंवा जे लोक हिंसेंत तरबेज आहेत, त्यांची गुलामी स्वीकारावी. कारण हिंदुस्थान म्हणजे एक पंचरंगी जग

असून खंडप्राय देश आहे. यांत अनेक धर्म, अनेक भाषा, अनेक प्रांत आणि त्यांचे अनेक रीतिरिवाज आहेत. त्याचा एकएक प्रांत युरोपांतील मोठ-मोठ्या देशांच्या तोडीचा आहे. अशा अनेकविध जमातींना हिंसक पद्धतीनें आम्ही एकरस ठेवूं शकूं काय ? नित्य नव्या समस्या आमच्यापुढें उभ्या च असतात. कांहीं जण स्वतंत्र प्रांत मागतात, आतां ती मागणी हिंसक पद्धतीनें पूर्ण होऊं शकेल काय ?

हिंसात्मक पद्धति योग्य आहे. असें आम्हीं मानत असलों तर गांधीजींचा खून करणारा पुण्यवान् होता असें मानावें लागेल. त्याचा विचार चुकीचा असला तरी तो प्रामाणिक मनुष्य होता. चांगल्या आणि खऱ्या विचारांच्या पद्धतीसाठीं हिंसात्मक साधनें वापरणें आपण योग्य समजत असूं तर गांधीजींची हत्या करणारानें फार मोठा त्याग केला होता असें आपल्याला मानावें लागेल. आपल्या प्रामाणिक विचारांच्या अंमलबजावणींत आपण हिंसक पद्धति अमलांत आणूं शकतों असें जर आपण मान्य केलें तर हिंदुस्थानचे पुन्हां तुकडे होतील यांत शंका नाहीं. हिंसेनें एक समस्या सुटलीशी दिसेल पण दुसरी समस्या उभी राहील. समस्या कमी होण्याऐवजीं नव नवीन समस्या निर्माण होतील. आज हि हरिजनांना मंदिरांत प्रवेश मिळत नाहीं. अस्पृश्यतेचा हा भेद न मिटला तर हरिजनांनीं हातांत शस्त्रें घ्यावीं काय ? चांगल्या कामासाठीं हिंसा मान्य असेल तर हरिजनांनीं शस्त्रें वापरणें हें हि मान्य करावें लागेल.

म्हणून या सगळ्या गोष्टी लक्षांत घेऊन आजचे आमच्यापुढील महत्त्वाचे प्रश्न सोडविण्यासाठीं कोणते उपाय योग्य आणि कोणते अयोग्य याचा निर्णय आपल्याला करावा लागेल. हिंसक साधनें उपयोगांत आणलीं तर हिंदुस्थानसमोर समस्या च निर्माण होत राहतील. परंतु अहिंसक पद्धतीनुसार जर आपले प्रश्न आपण सोडवूं तर समस्या उरणार च नाहींत. मी भूमि-समस्या शांतीच्या मार्गानें सोडवूं इच्छितों याचें हें च कारण आहे. भूमिसमस्या मामुली समस्या नव्हे. मी लोकांपासून जें भूमि-दान मागत आहें ती भीक नव्हे. मी ब्राम्हण या नात्यानें भीक मागण्याचा हि मला अधिकार आहे. परंतु ती भीक मी व्यक्तिगत नात्यानें मागूं शकेन.

दरिद्रनारायणाच्या प्रतिनिधीच्या नात्यानें जेव्हां मी मागतों तेव्हां भिक्षा मागत नसून दीक्षा देत आहें. मला तर असें वाटायला लागलें आहे कीं ईश्वर जें काम बुद्धाकडून करवून घेऊं इच्छीत होता तें च काम तो या दुर्बळाकडून करवून घेऊं इच्छीत आहे.

## देशाच्या मर्यादा विचारांना अडवूं शकत नाहींत

हें धर्मचक्र-प्रवर्तनाचें कार्य आहे असें मला वाटतें. जमीन तर माझ्या-जवळ केव्हां च येऊन पोंचली आहे. ही समस्या कशी सोडवायची तें ठरवा. तुपाच्या डब्यांना आग लावायची कीं वेद-मंत्रानें यज्ञांत त्याची आहुति द्यायची हें आपणांला निश्चित करावयाचें आहे. आपल्या देशांत बाहेरचे फक्त 'मान्सून' वारे च येतात अशा भ्रमांत तुम्ही राहूं नका; बाहेरून क्रांतिकारी विचार देखील येत असतात. हवा जशी बेधडक येते तसे क्रांतिकारी विचार सुद्धां बेधडक आणि कसल्या हि पासपोर्टशिवाय येत राहतात. जिथें भिंती नव्हत्या तिथें लोकांनीं त्या उभ्या केल्या. चीनमधील ती मोठी भिंत पाहून घ्या. ईश्वरानें जर्मनी आणि फ्रान्स यांच्यामध्यें कोणती हि भिंत उभारली नव्हती. परंतु त्यांनीं 'सीगफ्रिड' आणि 'मेजिनो' लाईनी बनवून क्षेत्रसंकोच केला. त्या भिंती लोकांच्या येण्याजाण्याला रोकूं शकल्या तरी विचारांच्या देवघेवीला रोकूं शकत नाहींत. त्या च प्रमाणें येथें सुद्धां जगांतील प्रत्येक देशाचे विचार येतील आणि येथून बाहेर हि जातील. यासाठीं जमिनीचा प्रश्न शांतीच्या मार्गानें सोडावावयाचा कीं हिंसेनें सोडावावयाचा याचा आम्हांला निर्णय करायला हवा. ही समस्या शांतीच्या मार्गानें सुटूं शकते ह्याविषयीं मला मुळीं च शंका नाहीं. त्याचें दर्शन माझ्या मनांत अगदीं स्पष्ट आहे. म्हणून मी निःसंशय होऊन सांगतों कीं बंधूंनो, उषःकाल झाला आहे, पांखरें किलबिलायला लागलीं आहेत, आतां जागे व्हा. तुलसीदासजी ईश्वराला जसे समजावीत होते त्या च प्रमाणें मी हि आपल्या ईश्वराला म्हणजे च तुम्हांला म्हणतों कीं जागे व्हा. तुम्हीं जर दान द्याल तर त्यानें तुमचा मान वाढेल.

## या युगाचे मार्कंडेय बना !

जशी बाहेरची हवा या देशांत येऊं शकते त्या च प्रमाणें येथील हवा सुद्धां बाहेर जाऊं शकते. आणि ज्याप्रमाणें बाहेरच्या विचाराचें आक्रमण येथें होऊं शकतें त्या च प्रमाणें आम्ही हि आपले विचार बाहेर पाठवूं शकतों. हा भूदान-यज्ञ एक छोटासा कार्यक्रम असला तरी दुनियेच्या नजरा त्याच्याकडे वळल्या आहेत. ते आश्चर्यानें म्हणतात: 'भारतांत एक अजब तमाशा होऊन राहिला आहे. आम्ही आतांपर्यंत समजत होतों कीं जमीन मारपिटीनें च मिळते. परंतु तेथें तर मागितल्यानें जमीन मिळत आहे.' आतांपर्यंत मागून लाखों एकर जमीन मिळाली. तेव्हां ही एक स्वतंत्र दृष्टीनें विचार करण्यासारखी गोष्ट आहे. जगांत चोहोंकडे लुबाडण्याच्या आणि हिसकण्याच्या गोष्टी चालल्या आहेत; त्या वेळीं या देशांत देण्याचा आरंभ होत आहे; याचा अर्थ, अंतर्यामीं भगवान् जागा होत आहे.

त्यासाठीं भगवान् बुद्धाच्या शिष्यांनीं ज्या निष्ठेनें प्रचार केला तशा निष्ठेची भूदान-यज्ञाचा संदेश चोहींकडे पसरविण्याची गरज आहे. ते बाहेरच्या देशांत गेले व त्यांनीं प्रेमानें आपल्या धर्माचा प्रचार केला. तितक्या च निष्ठेनें आणि प्रेमानें आम्हांला या नव्या धर्मचक्रप्रवर्तनाच्या कामाला लागलें पाहिजे. असें होईल तेव्हां तुम्ही सुद्धां दुनियेला एक नवा आकार देऊं शकाल. प्रलयाच्या वेळीं सारें जग जलमय होऊन जात असतांना एकटा मार्कंडेय ऋषि तरंगत राहिला आणि नंतर त्यानें च दुनियेला वांचविलें. आज हि जगांत विचारांत, बोलण्यांत, व्यापारांत, शस्त्रास्त्रांनीं सगळीकडे प्रलयात्मक प्रयत्न होत आहेत. त्या प्रलयाच्या सर्व प्रयत्नां-वर जो देश मार्कंडेयाप्रमाणें एकटा पोहेल, त्याच्या हातीं जगाचें नेतृत्व जाईल.

मी हें अभिमानानें नव्हे तर नम्रतापूर्वक सांगत आहें. आम्ही नम्र बनूं तेव्हां च उठूं शकूं. 'या देशांत जे महान् पुरुष निर्माण होतील त्यांच्या प्रभावानें सगळ्या दुनियेला आदर्श मिळेल' असें मनूनें भविष्य वर्तवून ठेवलें आहे.

एतद्देशप्रसूतस्य सकाशादग्रजन्मनः ।
स्वं स्वं चरित्रं शिक्षेरन् पृथिव्यां सर्वमानवाः ॥

मला वाटतें ती शक्ति, ती सत्ता आपल्या हातांत आहे. आपल्याला एक नेता लाभला होता. त्याच्या नेतृत्वामुळें आपला देश अहिंसक पद्धतीनें स्वतंत्र होऊं शकला. ज्यांच्या हृदयांत सद्भाव कायम आहे असे लोक आज हि या देशांत आहेत. आतां थोडी हिंमत आणि थोडी कल्पनाशक्ति राखाल तर दुनियेला आकार देण्याची शक्ति आपल्या हि हातांत आहे हें तुमच्या लक्षांत येईल. हें आक्रमण नसून दुनियेला वांचवणें आहे. ही एक योग्य महत्त्वाकांक्षा आहे. आम्ही जमिनीचा प्रश्न शांतीनें सोडवूं तर दुनियेला मार्ग दाखवूं शकूं.

लखनऊ, १-५-५२

## सरकार 'शून्य' आहे आणि जनता 'एक' आहे :५:

### विचार हाच मानव-जीवनाचा पाया

विचाराची प्रेरणा मनुष्याला उत्स्फूर्त करते. मनुष्याचें शारीरिक जीवन तर चाललेलें च असतें, परंतु त्याचें जें उत्थान होतें त्याच्या मागें विचार असतो. विचारामुळें चळवळी होतात, जोर निर्माण होतो व नवें जीवन बनतें. त्यानें समाज-रचना बदलते व जीवनाचा सांचा बदलतो. फ्रान्स देशांत राज्यक्रांति झाली ती सुद्धां एका विचारामुळें. मार्क्स निर्माण झाला व त्याच्या विचारानुसार रशियांत एक समाज बनला. अशा प्रकारें विचाराच्या शक्तीचा अनुभव आपल्याला येतो. विचार च मनुष्याला शक्ति देतो. मनुष्याचें खाणें-पिणें चालतें, पण त्याबरोबर ह्या सर्वांच्या मागें, त्याच्या पूर्तीसाठीं त्याचा मूलभूत पाया म्हणून विचार असतो. त्याला च आम्ही 'धर्म' किंवा नीति म्हणतों. पाया विचाराचा असतो आणि त्यावर जीवनाची इमारत उभारली जाते.

## हितांत विरोध नसतो

सर्वोदयाचा अर्थ प्रत्येकाच्या भल्यांत सर्वांचें भलें असा आहे. कोणा एकाचें हित दुसऱ्या कोणाच्या हिताच्या विरुद्ध असू शकत नाहीं. कोणता हि समाज, वर्ग किंवा देश ह्याच्या हिताविरुद्ध दुसरा समाज, वर्ग किंवा देश ह्यांचें हित असू शकत नाहीं. त्यांच्या हितांत विरोध आहे ही कल्पना हि चुकीची आहे. एकाच्या हितांत दुसऱ्याचें हि हित आहे. सारांश, दोघांच्या हितांत केव्हां हि विरोध नसतो पण अहिताला आम्हीं हित किंवा अकल्याणाला कल्याण मानून घेतलें तर तशा हितांत विरोध असू शकतो. मी बुद्धिमान् असेन किंवा माझी प्रकृति उत्तम असेल तर त्यामुळें तुमचें भलें च होणार आहे. तहानेलेला असतां मला पाणी पिण्यास मिळालें तर त्यांत माझें आणि तुमचें हि भलें आहे. हितांत विरोध मानला तर हिताबद्दलची मूळ कल्पना च मिथ्या ठरेल.

## क्रांतीचा पाया, विचार-प्रवर्तन

सरकारनें आपलें कर्तव्य केलें च पाहिजे. पण क्रांतिकारी विचाराच्या प्रचाराचें काम सरकार करूं शकत नाहीं. जेव्हां तो विचार जन-मान्य होईल, तेव्हां च सरकार हें काम करील, नव्हे त्याला तें करावें च लागेल. त्यानें तें न केलें तर जुनें सरकार जाऊन नवें सरकार येईल. लोकशाहींत सरकार नोकर असतें. तुम्ही एखादी गोष्ट कोणाला समजावून सांगतां, मालकाला कीं नोकराला ? मालकाला गोष्ट पटली तर तो नोकराला हुकुम देईल, दानपत्र तयार कर. म्हणून मी मालकाला-म्हणजे च तुम्हांला-ही गोष्ट समजावून सांगत आहें. कारण तुम्ही मालक आहांत. त्यामुळें तुम्हांला माझें म्हणणें पटलें तर तुम्हीं नोकराकडून तें काम करवून घ्याल. नोकर तें करणार नाहीं, तर त्याला काढून टाकून तुम्ही दुसरा नोकर ठेवाल. अशा प्रकारचे फेरबदल होणार च आहेत.

लोकसत्तेंत सरकारला 'शून्य' म्हटलें जातें. शून्याला स्वतःची अशी किंमत असत नाहीं. तें एकावर चढलें तर दहा, दोनावर चढलें तर वीस व तीनावर चढलें तर तीस अशी त्याची किंमत वाढते. पण १०,२०,३०

बनविण्याची शक्ति शून्यांत नसते. तुम्ही त्याला दहा, वीस, शंभर इ. बनवूं शकतां. त्याला स्वतंत्र मूल्य नाहीं. लोकशाहींत लोक च सर्व कांहीं असतात, सरकारची कांहीं च किंमत नसते. म्हणून सरकारमार्फत काम करवून घेण्याच्या गोष्टी जे लोक बोलतात, त्यांना समाजांत विचार-प्रवर्तन कसें होतें ह्याचें ज्ञान नसतें. भगवान् बुद्धानें राज्यावर लाथ मारून तें सोडलें व ज्ञान-प्राप्तीनंतर पहिली दीक्षा एका राजाला म्हणजे आपल्या पित्याला दिली. त्यानंतर सम्राट अशोक आला व हिंदुस्थानांत राज्यक्रांति झाली. ज्या राजांनीं तो विचार मान्य केला नाहीं, ते पदच्युत झाले.

सध्यां प्रत्येकाला फळ पाहिजे असतें. पण त्याच्यासाठीं पेरावें लागतें ही गोष्ट ते विसरतात. पेरल्याखेरीज फळ कसें मिळणार ? फ्रान्सच्या राज्यक्रांतीच्या मागें रूसो व वाल्टेयरचे विचार होते. म्हणून ती झाली. मार्क्सनें विचाराचा प्रचार केला, व लेनिननें त्याच्या आधारावर क्रांति केली. विचाराच्या प्रसारानंतर च क्रांति होत असते. समाजांत लोक ज्या विचाराला पसंत करतात त्याचा अंमल न करण्याइतकें आजचें सरकार विचारहीन नाहीं असा माझा विश्वास आहे. अंमल करणार नाहीं तर तें टिकणार नाहीं.

## दुनियेला आकार देणार कीं तिचा आकार घेणार ?

मीं जगाच्या इतिहासाचा हि अभ्यास केलेला आहे. देशादेशांत भिंती उभ्या राहूं शकणार नाहींत हें मी जाणतों. एका देशांतून दुसऱ्या देशांत सारखे विचार जात येत असतात. आम्हीं इष्ट विचारांचा प्रचार केला नाहीं, तर येथले प्रश्न सोडविण्यास बाहेरचे अनिष्ट विचार येथें येतील. त्या च प्रमाणें आम्हीं आमचे प्रश्न आमच्या पद्धतीनें सोडविले तर आमचा विचार हि येथल्यापुरता मर्यादित राहणार नाहीं. तो बाहेर जाईल. व जग त्याला मान्य करील च करील. कदाचित् विज्ञानानें इकडची हवा तिकडे जाण्याचे बंद होऊं शकेल, पण विचारांना कोणी च प्रतिबंध करूं शकणार नाहीं. म्हणून एक तर तुम्ही दुनियेला आकार द्याल किंवा दुनिया तुम्हांला आकार देईल. हे दोन च मार्ग आहेत,

तिसरा मार्ग नाहीं. एक तर आपल्या विचाराच्या जोरावर तुम्ही दुनियेला आकार देण्याची हिंमत करा किंवा दुनियेच्या हातांतली माती बना. मग दुनिया तुम्हांला जो आकार देईल तो तुम्हांला मान्य करावा लागेल.

डाल्टनगंज [ पलामू ]
१६-११-५२

## सरकार आपल्यापेक्षां हि दरिद्री

आमच्या जवळ नसलेली अशी कोणती शक्ति सरकारजवळ आहे? संपत्तीच्या सहाय्यानें, जोर जबरदस्तीनें अथवा सैन्याच्या बळावर सरकार कांहीं काम करूं शकतें परंतु सरकारजवळ संपत्ति तरी अशी कोणती लागून राहिली आहे? आमच्या च जवळचा एक हिस्सा कराच्या रूपानें त्याला मिळतो. स्वतंत्र एखादा उद्योग तर तें करीत च नाहीं. आम्ही जें देतों तें च त्याचें उत्पन्न. तेव्हां आम्ही दरिद्री, आमचें सरकार आमच्याहून दरिद्री. कारण कांहीं म्हटलें तरी आमच्या च जवळचा एक हिस्सा त्याच्या जवळ आहे. आम्ही विहीर आहोंत तर सरकार बादली आहे. आम्ही ३६ कोटि लोक आमच्या दोन हातांनीं जें निर्माण करूं तें जास्त असेल कीं सरकारला जो आम्ही कर देतों तो जास्त असेल? एवढी गोष्ट खरी कीं सरकारचा सर्व पैसा एकत्र असल्यामुळें दिसून पडतो आणि आमचा पैसा दिसत नाहीं. कारण आमचें धन, आमचा पैसा घरोघर वांटलेला आहे.

## माणसागणिक केवळ पांच पैसे!

सरकारची एक मोठी पंचवार्षिक योजना आहे; त्या योजनेसाठीं चार पांच हजार कोटि रुपये खर्च होणार आहेत. दरवर्षी १००० कोटि म्हणजे मासिक ८० कोटि रुपये खर्च होतील. आपल्या देशांत एकूण ३६ कोटि लोक आहेत. तेव्हां याचा अर्थ असा कीं प्रत्येक माणसामागें महिन्याला सव्वादोन रुपये म्हणजे रोजचे पांच पैसे सरकार खर्च करणार आहे. ही झाली सरकारची मोठी योजना! पण इथें तर एक मुलगा सुद्धां सूत कांतून तासाला पांच पैसे मिळवितो. तेव्हां त्या सरकारी योजनेपेक्षां

आमचा मुलगा अधिक निर्माण करतो. बरें! त्या पांच पैशांत सरकार करणार तरी काय काय? रेल्वे, शाळा वाढवील, शेतीला उत्तेजन देईल. व्यापारांत वृद्धि होईल, कारखान्याची वाढ होईल. विज्ञानाचे शोध लागतील; साहित्याचा प्रसार होईल आणि भाषेचा प्रचार होईल. आणि हें होईल कशांतून? तर त्या पांच पैशांतून! लोकांनीं मनावर घेतलें तर ते यापेक्षां जास्त करूं शकतील. संपत्ति निर्माण होते कशी? ती होते परिश्रमानें. आणि परिश्रम कोण करतात? परिश्रम करतात लोक. म्हणून सांगतों कीं जन-शक्तीबरोबर पैशाची शक्ति बरोबरी करूं शकणार नाहीं.

## कायद्याची शक्ति !

आतां कायद्याची गोष्ट घ्या. सरकारी कायदा आहे म्हणून चोऱ्या होत नाहींत, असें का तुम्हाला वाटते? दंडानें, शिक्षेनें, समाज बदलूं शकतो का? समाजांत जी सद्‌भावना दिसते, तो जो नीतिपंथावर चालतांना दिसतो, याचें कारण सरकारचा कायदा नसून संतांनीं समाजाला जो धर्म शिकविला त्याला उत्तमोत्तम विचार दिले हें आहे. समजा कीं समाज नसतां तर आम्ही सारे पशु बनलों असतों. आणि सरकारचा कायदा कोणी वाचला नसता. म्हणून माणसांत जी सज्जनता आहे ती त्याची संपत्ति आहे. समाजाला नीतीनें वागायला लावावयाची शक्ति सरकारमधें नाहीं. समाजाला सत्कर्माची प्रेरणा देईल अशी प्रेरणाशक्ति हि सरकार जवळ नाहीं. धर्मप्रेरक शक्ति सुद्धां जेवढी समाजांत आहे तेवढी सरकारमधें नाहीं. आणि भौतिक संपत्तीचा तर समाजाचा च एक अंश सरकारजवळ आहे. अशा परिस्थितींत सरकार सर्व कांहीं करील, असा जो आम्ही विचार करतों तो विचार बरोबर आहे का, याचा तुम्ही विचार करा. आम्ही जर पुरुषार्थहीन होऊं, सरकार च सर्व कांहीं करील असे मानूं तर आपल्या समाजाची उन्नत्ति होणार नाहीं. आपण आपल्यासाठीं च कांहीं करायला हवें. समाजासाठीं प्रत्येकानें त्याग केला तर च आपली प्रगति होईल. सर्वोदयातर्फे सर्व च आपल्या पायावर उभे होतात आणि उन्नतीसाठीं पुढाकार घेतात. गोवर्धनपर्वत उचलण्यासाठीं वृंदावनांतल्या तमाम

लोकांचा, म्हाताऱ्यांचा, मुलांचा, बायांचा, तरुणांचा हात लागला होता, मग च भगवंतानें आपल्या एका बोटाचा आधार दिला. ही च भगवंताची खुबी आहे. शेंवटीं जें काम होतें तें होतें भगवंताच्या च शक्तीनें. परंतु सर्वांना त्याचें सांगणें असतें कीं तुम्ही करा, माझी मदत शेंवटीं आहे च. आळसांत रहाल तर देव तुम्हांला कांहीं मदत करणार नाहीं. म्हणून कामाला सर्वांचा हात लागायला हवा. त्यांतून मुलांनीं सुद्धां सुटूं नये. त्यांना हि खायला लागतें च ना ? ते देशासाठीं कांहीं च देऊं शकणार नाहींत का ? परमेश्वरानें त्यांना हि दोन हात दिलेले आहेत. मुलांनीं सूत कांतलें, तर महिन्याला ते देशाला दोन गुंड्या सूत देऊं शकतील. आज पांच शिक्षकांनीं संपत्तिदान दिलें. शिक्षकांना स्वर्ग मिळाला तर त्यांच्या घरांतलीं माणसें त्यांच्या बरोबर जायला नकार देतील काय ? परंतु ते केव्हां जाऊं शकतील ? स्वतः पुण्यकर्म करतील तेव्हां च. म्हणून प्रत्येकानें देशाकरितां कांहीं ना कांहीं केलें च पाहिजे.

## दंड-निरपेक्ष लोक-शक्ति : ६ :

### श्रद्धा अहिंसेवर, क्रिया सेनावृद्धीची

कांहीं महिन्यांपूर्वींची गोष्ट. दिल्लींत कांहीं ज्ञानी व विद्वान् लोकांनीं एकत्र जमून अहिंसा-दर्शनासंबंधीं कांहीं चिंतन-मनन व चर्चा केली. हें सर्व वर्तमानपत्रांतून येत होतें व मी वाचीत होतों. त्यांत आपल्या पूज्य राजेंद्रबाबूंनीं असें म्हटलें होतें कीं, “ सैन्याशिवाय आपलें काम चालविण्याची आज एक हि देशांत हिंमत नाहीं. ” या गोष्टीसंबंधीं खेद प्रकट करतांना ते म्हणाले, “ खुद्द गांधीजींच्या मुखांतून त्यांची शिकवण आम्हीं ऐकली व त्यांच्याबरोबर थोडें कार्य हि केलें. तरी हि आज हिंदुस्थानांत हि अशी हिंमत करण्याची शक्ति नाहीं. ” आपले महान् नेते पं. नेहरू हे कितीदां तरी हें बोलून चुकले आहेत कीं जगांतली कोणती हि समस्या शस्त्र-बलानें सुटूं शकणार नाहीं. नेतृत्वाची जबाबदारी

ज्यांच्यावर देशानें सोंपविली आहे, अशा ह्या आमच्या नेत्यांची अहिंसेवर मनापासून श्रद्धा आहे. त्यांचा हिंसेवर विश्वास नाहीं. तरी हि आमची परिस्थिति अशी आहे कीं, सैन्य-शक्ति वाढविण्याची जबाबदारी स्वीकारणें त्यांना भाग पडत आहे. अशा विचित्र अवस्थेंत आज आपण येऊन पडलों आहोंत.

मला असें वाटतें कीं ही अवस्था अशी आहे कीं, श्रद्धा एका गोष्टीवर आहे, आणि क्रिया मात्र दुसऱ्या प्रकारची करावी लागत आहे. आपली अशी इच्छा आहे कीं हिंदुस्थानांत व साऱ्या जगांत अहिंसा च नांदावी; आम्ही एकमेकांची भीति बाळगतां कामा नये तर प्रेमानें च एकमेकांना जिंकावें. प्रेम च सफल होऊं शकतें व इतरांना जिंकू शकतें, अशा विश्वासानें आमचें हृदय भरलें आहे. पण 'बुद्धि' नांवाची दुसरी एक वस्तु आमच्यांत आहे. वस्तुतः बुद्धि ही हृदयाचा च एक भाग आहे व हृदय हें बुद्धीचा भाग आहे. दोन्ही एकत्रित च आहेत. पण हृदय सांगतें कीं, हिंसेनें कोणता हि प्रश्न सुटणार नाहीं. एक प्रश्न सुटलासा दिसला, तर त्याच्यांतून दुसरे अनेक प्रश्न उद्‌भवतील. बुद्धि ही मात्र तीन गुणांनीं युक्त आहे. तिच्यांत कांहींशी विचार-शक्ति तर कांहीसें आवरण आहे; थोडेंसें दर्शन आणि थोडेसें अदर्शन आहे. अशी आमची संमिश्र बुद्धि आम्हांला सांगते कीं, "आम्ही सैन्य कमी करूं शकत नाहीं. ज्या जनतेचे आम्ही प्रतिनिधि आहोंत, ती जनता इतकी बलवान् नाहीं. तिच्यांत तेवढी योग्यता नाहीं. तेव्हां तिचे प्रतिनिधि या नात्यानें सेना वाढविण्याची व ती शक्तिशाली करण्याची जबाबदारी आमच्यावर येऊन च पडते."--अशी आजची परिस्थिति आहे.

आज असें दिसत आहे कीं, रचनात्मक कार्य करावें ही केवळ हृदयाची इच्छा आहे. बुद्धि मात्र म्हणते कीं, "सेना तयार केली च पाहिजे. म्हणून सेना-बल सुसज्ज करण्यासाठीं जीं यंत्रें आवश्यक आहेत, त्यांना प्रथम स्थान दिलें पाहिजे." ज्यांची चरख्यावर विशेष श्रद्धा नाहीं त्यांची गोष्ट तर मी सोडून च देतों. पण ज्यांची चरख्यावर पूर्ण श्रद्धा आहे, त्यांना जेव्हां विचारलें जातें कीं "चरखा व ग्रामोद्योग

यांच्यावर आपण सुसज्ज युद्धयंत्र उभें करूं शकूं काय ? --तेव्हां त्यांची बुद्धि व माझी हि बुद्धि--कारण मी त्यांच्यांतील च एक आहें--उत्तर देते कीं, "छे, या लहान-लहान उद्योग-धंद्यांच्या आधारावर आपण सुसज्ज युद्ध-यंत्र उभें करूं शकणार नाहीं."

## सत्तेची खुर्ची जादूची खुर्ची आहे

हें सारें मी आत्मनिरीक्षणाच्या वृत्तीनें च बोलत आहें. जे आज त्या जबाबदारीच्या स्थानावर बसले आहेत, तेथें जर आज आम्ही बसलों असतों, तर ते जें कांहीं आज करीत आहेत, त्यापेक्षां आम्हीं कांहीं वेगळें केलें असतें असें नाहीं. तें स्थान च तसें आहे. ती जादूची खुर्ची आहे. तिच्यावर जो बसेल, त्याच्यावर संकुचित, सीमित, ठरविलेल्या व परावलंबी दृष्टिकोनांतून च विचार करण्याची जबाबदारी येऊन पडते. 'परावलंबी' असें जिला मीं विशेषण लावलें आहे त्या अवस्थेंत, अगतिकतेमुळें जगाचा ओघ ज्या दिशेनें वाहत असेल, त्या च दिशेनें विचार करण्याची जबाबदारी येऊन पडते. आज अमेरिका व रशिया यांच्यासारखीं बलवान् राष्ट्रें हि ऐकमेकांच्या भीतीनें ग्रस्त झालीं आहेत. आणि पाकिस्तान, हिंदुस्थान यांच्यासारखीं कमीं बलवान् राष्ट्रें हि अशीं च परस्परांच्या भीतीनें ग्रासलीं आहेत. अशा प्रकारें परस्परांविषयीं मनांत भीति बाळगीत असल्यामुळें, 'शस्त्रबळानें, सैन्य-बळानें कोणता हि प्रश्न सोडविणें शक्य नाहीं' असा विश्वास हृदयांत असतां हि आम्ही शस्त्रबल व सैन्यबल यांचा च आधार घेतों. तो आधार आम्ही सोडूं शकत नाहीं.

## दयनीय स्थिति

अशा विचित्र परिस्थितींत आज आम्ही आहोंत. यावर कोणी आम्हांला दांभिक किंवा ढोंगी म्हणेल, तर तसें म्हणण्याचा त्याला अर्थात् च हक्क आहे. पण त्याचें तें म्हणणें खरें मात्र नाहीं. आमच्या मनांत कांहीं दुसरी च गोष्ट असती आणि ती आम्हीं लपवली असती तर आम्ही समजून उमजून ढोंगी बनलों असतों. पण जेव्हां हृदय एक गोष्ट मानतें आणि परिस्थितिजन्य बुद्धि दुसरी च गोष्ट बोलते आणि अगतिक होऊन एखादी कृति करावी लागते,

तेव्हां ती दांभिकता नव्हे तर ती अनुकंपनीय अशी अवस्था म्हणावी लागेल. आज अशा च अनुकंपनीय अवस्थेप्रत आपण पोंचलों आहोंत.

## स्वतंत्र लोकशक्तीची निर्मिति

कधीं कधीं लोक मला विचारतात कीं, 'आपण बाहेर कां राहतां ? देशाच्या शासनाची जबाबदारी कां स्वीकारीत नाहीं ?' यावर मी असें उत्तर देतों कीं, गाडीला दोन बैल जुंपलेले असतां मी तिसरा बैल होऊन तेथें गेलों, तर त्यामुळें गाडी ओढण्याला मदत ती कसली मिळणार ? त्यापेक्षां गाडी रस्त्यानें योग्य दिशेनें जावी, यासाठीं मीं जर रस्ता नीट करण्याचें काम केलें, तर मात्र मी जास्तींत जास्त मदत देऊं शकेन. हें मात्र मला मान्य आहे कीं, मी जर बैल असेन तर मला बैलाचें च काम केलें पाहिजे. मी एका विशेष अर्थानें ही भाषा वापरीत आहें. आपण ती समजून घ्याल अशी मला आशा आहे. आपल्या संकृतींत बैलाविषयीं जितका आदर आहे, तितका मनुष्याबद्दल हि नाहीं. त्या च अर्थानें मी बोलत आहें. जो राज्याची धुरा वाहतो, त्याला आपण 'धुरंधर' म्हणतों. धुरंधर म्हणजे बैल. धुरंधर बनावें लागत असतें. पण जे लोक आज धुरंधर होऊन बसले आहेत, ते असें म्हणतात कीं, 'आम्ही करीत आहोंत, तें च काम आपण करूं नका. त्या कामाऐवजीं, आम्हांला आमच्या कार्यांत ज्या उणिवा जाणवतात, त्या दूर करण्याचें काम आपण कराल तर बरें.' या आशेनें ते लोक आमच्याकडे पाहत आहेत. तेव्हां हें आपणांस नीट समजून घेतलें पाहिजे व स्वतंत्र लोकशक्ति निर्माण करण्याच्या कामाला लागलें पाहिजे. तर च आपण आजच्या सरकारला खरेंखुरें साह्य देऊं शकूं व आपल्या देशाची योग्य सेवा करूं शकूं.

'आपणांस स्वतंत्र लोकशक्ति निर्माण केली पाहिजे' असें मीं म्हटलें. याचा अर्थ हा कीं, हिंसाशक्तीला विरोधी आणि दंडशक्तीहून वेगळी अशी लोकशक्ति आपणांस निर्माण केली पाहिजे. आज आपलें जें सरकार आहे, त्याच्या हातीं आपण दंडशक्ति सोंपविली आहे. त्या दंडशक्तींत हिंसेचा अंश आहे च. पण तिला मी हिंसा म्हणूं इच्छीत

नाहीं. हिंसेहून वेगळ्या वर्गांत तिची गणना करूं इच्छितों. तिला हिंसाशक्तीहून वेगळी अशी दंडशक्ति म्हणून लेखण्याची माझी इच्छा आहे. कारण ती शक्ति त्यांच्या हातीं सर्व लोकांनीं सोंपविली आहे. म्हणून ती हिंसाशक्ति नसून दंडशक्ति आहे. परंतु त्या हि दंडशक्तीचा वापर करण्याचा प्रसंग येऊं नये, अशी परिस्थिति देशांत निर्माण करण्याचें काम आपलें आहे. हें जर आपण केलें, तर आम्हीं स्वधर्म जाणला व त्याप्रमाणें वर्तन करणें हि जाणलें, असें मानलें जाईल. पण आम्ही जर याप्रमाणें वागलों नाहीं, व दंडशक्तीच्या साह्यानें च होणारी जनसेवा करण्याच्या मोहांत गुंतलों, तर ज्या विशेष कार्याची आपणांकडून अपेक्षा केली जात आहे, तें कार्य आपण पूर्ण करूं शकणार नाहीं. एवढें च नव्हे, तर आम्ही भाररूप च वाटूं लागूं.

## निष्ठुरतेच्या राज्यांत दया

मी थोडें अधिक स्पष्टीकरण करतों. दंडशक्तीच्या आधारानें जन-सेवेचें कार्य होऊं शकतें व तें करण्यासाठीं च आम्हीं राज्य-शासन हातीं घेतलें आहे, असें मीं म्हटलें. समाजाला जोंपर्यंत त्याची गरज आहे, तोंवर शासनाची जबाबदारी आम्ही सोडूं इच्छीत नाहीं. कारण त्यामुळें जनसेवा अवश्य होईल. पण दंडशक्तीचा वापर करण्याची परिस्थिति च निर्माण होणार नाहीं, अशा प्रकारची जनसेवा मात्र ती असणार नाहीं.

मी एक उदाहरण देतों. समजा, लढाई चालली आहे, शिपाई जखमी होत आहेत. या शिपायांची सेवा करणारे लोक भूतदयेनें परिपूर्ण असे च आहेत. ते शत्रुमित्र हा भेद हि ओळखीत नाहींत. आपले प्राण संकटांत घालून ते युद्धक्षेत्रांत जातात आणि आईनें आपल्या मुलांची करावी अशी सेवा जखमी लोकांची करतात. अर्थात् असे लोक हे दयाळू असतात, यांत शंका च नाहीं. त्यांची सेवा ही मोलाची आहे, हें सर्व जाणतात. पण युद्ध थांबविण्याचें काम मात्र ते करूं शकत नाहींत. त्यांची दया म्हणणे युद्ध मान्य असणाऱ्या समाजाचा च एक अंश आहे.

ज्याप्रमाणें एखाद्या यंत्राचे लहान मोठे भाग असले व ते वेगवेगळ्या प्रकारें कार्य करीत असले, तरी अखेरीस त्या एका च यंत्राचे ते सर्व भाग असतात; त्या च प्रमाणें एका च युद्धयंत्राचें एक अंग म्हणजे सैनिकांची हत्या करणें व त्याचें च दुसरें अंग म्हणजे जखमी झालेल्या सैनिकांची शुश्रूषा करणें. या दोन्ही कार्यांच्या परस्परविरोधी गति स्पष्ट च आहेत. त्यांपैकीं एक क्रूर कार्य आहे तर दुसरें दयाळू कार्य आहे हें प्रत्येकाला समजतें. पण त्या दयाळू हृदयाची दया आणि त्या क्रूर हृदयाची क्रूरता या दोन्ही मिळून च युद्ध होतें. युद्ध चालविण्याचे हे ोन विभाग आहेत. कठोर वैज्ञानिक भाषेंत सांगावयाचें तर असें म्हणतां येईल कीं, जोंपर्यंत आमची युद्धाला मान्यता आहे, तोंवर आम्ही जखमी शिपायांची सेवा करणारे असलों काय किंवा शिपाई असलों काय, आम्ही दोघे हि युद्धाचे गुन्हेगार च आहोंत.

मीं हें उदाहरण अशासाठीं घेतलें कीं, केवळ दयेचें कार्य करीत राहिल्यानें आपण दयेचें राज्य निर्माण करूं शकूं अशा भ्रमांत कोणी राहूं नये. राज्य हें निष्ठुरतेचें च आहे. पोळींत घातलेलें मीठ जसें पोळीला रुचि आणून देतें, त्याप्रमाणें दया या राज्याला रुचि आणून देते एवढें च. जखमी शिपायांच्या त्या शुश्रूषेमुळें हिंसेंत हि लज्जत निर्माण होते, युद्धांत रुचि निर्माण होते. पण त्या दयेनें युद्ध समाप्ति मात्र कधीं च होणार नाहीं. निष्ठुरतेच्या राज्यांत प्रजेप्रमाणें नांदणाऱ्या दयेचें कार्य आपण करूं लागलों, निर्दयतेच्या अंमलाखालीं असणाऱ्या दयेचें कार्य आपण केलें, तर आपण आपलें खरें कार्य केलें असें कधीं च होणार नाहीं. याप्रमाणें जें दयेचें किंवा रचनात्मक कार्य दिसतें, तें त्यांतील दयेच्या किंवा रचनात्मकतेच्या मोहानें व्यापक दृष्टि न ठेवतां च जर आपण स्वीकारलें, तर कांहीं तरी सेवा आपल्या हातून घडेल यांत शंका नाहीं. पण ज्या सेवेची जबाबदारी आम्हीं शिरावर घेतली आहे व जी सेवा हा आपण व जगानें आपला स्वधर्म मानला आहे, ती सेवा मात्र आपल्या हातून निश्चित घडणार नाहीं.

**प्रेमावर विश्वास**

मी दुसरें एक स्पष्ट उदाहरण देतों. प्रत्येक जण मला विचारतो कीं, 'सरकारवर आपलें वजन असल्याचें दिसतें. तर मग मोबदल्यावांचून जमिनी देण्याचा मार्ग मोकळा करण्याच्या दृष्टीनें कांहीं कायदा करण्यासाठीं आपण सरकारवर कांहीं दडपण कां आणीत नाहीं ? आपण आपलें वजन यासाठीं कां खर्च करीत नाहीं ?' यावर मी असें उत्तर देतों कीं, 'कायद्याचा मार्ग मीं मुळीं च रोकला नाहीं. शिवाय आपल्यास हव्या त्या दिशेनें मीं आणखी एक पाऊल टाकावें अशी आपली इच्छा असेल, तर मी इतकें च म्हणेन कीं, मीं जो मार्ग स्वीकारला आहे. त्यांत मला सोळा आणे यश मिळालें नाहीं, बारा किंवा आठ च आणें यश मिळालें, तरी त्यामुळें कायदा करण्याला साह्य च होईल. याप्रमाणें एकतर मी कायद्याच्या आड येत नाहीं व दुसरें म्हणजे मी त्या कायद्याचा मार्ग सुलभ करीत आहें. कायदा सुलभतेनें व्हावा या दृष्टीनें मी अनुकूल वातावरण तयार करीत आहें. पण याहून पुढें आपल्या दिशेनें पाऊल टाकूं लागलों, आणि कायद्यावांचून हें कार्य होणार नाहीं, हा च धोशा घेऊन बसलों, तर मात्र मी स्वधर्मापासून ढळलों असें च होईल. कारण तो माझा धर्म नव्हे. माझा धर्म तर हा आहे कीं, कायद्याच्या मदतीवांचून च केवळ लोकांच्या हृदयांत आम्हीं अशी भावना निर्माण करावी, कीं, कायदा कसा हि असला तरी लोकांनीं आपल्या जमिनीचें स्वेच्छेनें वांटप करावें. आई आपल्या लेकराला दूध पाजते ती काय कुठल्या कायद्याच्या सक्तीमुळें ?

मनुष्याची हृदयांत च अशी शक्ति आहे कीं, जिच्यामुळें त्याचें जीवन समृद्ध झालें आहे. मनुष्याची प्रेमावर श्रद्धा आहे. त्याचा जन्म प्रेमांत च होतो, प्रेमानें च त्याचें लालन-पालन होतें आणि या जगाला सोडून जातांना अखेरच्या क्षणीं तो प्रेमाची च दृष्टि चहूंकडे टाकतो. त्या क्षणीं जर त्याला आपलें प्रियजन दृष्टीस पडले, तर तो सुखानें हा देह व हें जग सोडून जातो. प्रेमाच्या शक्तीचा असा अनुभव आल्यावर हि, त्या शक्तीचें विकसन अधिक सामाजिक स्वरूपांत करण्याऐवजीं जर मी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.

कायद्याचा च मंत्र जपत राहिलों, तर जन-शक्ति निर्माण करण्याच्या रूपानें जी मदत सरकार आपल्याकडून अपेक्षिते, ती आपण दिली असें होणार नाहीं. यासाठीं दंडशक्तीहून वेगळी अशी जनशक्ति निर्माण करण्याची माझी आकांक्षा आहे. आपणांस ती च निर्माण केली पाहिजे. ही जी जनशक्ति आम्ही निर्माण करूं इच्छितों, ती दंडशक्तीच्या विरुद्ध राहील असें मात्र मी समजत नाहीं. ती हिंसेच्या विरुद्ध राहील. पण दंडशक्तीहून ती भिन्न राहील एवढें च माझें म्हणणें आहे.

## विचार-शासन

विचार-शासन म्हणजे विचार समजून घेणें; समजावून देणें; विचार समजल्याशिवाय कोणती हि गोष्ट क़बूल न करणें; विचार समजून घेतल्याशिवाय जर कोणी आपलें म्हणणें कबूल करूं लागला तर दुःखी होणें, आपली इच्छा दुसऱ्यावर न लादणें; आणि केवळ आपला विचार समजावून देण्यावर च संतुष्ट राहणें. सर्वोदय समाजाच्या योजनेची जी रचना आहे, तिला कांहीं लोक 'लूज ऑर्गनायझेशन' म्हणजे 'शिथिल रचना' असें म्हण-तात. वस्तुतः आपण रचना शिथिल करूं लागलों, तर कोणतें च कार्य पार पडणार नाहीं. तेव्हां रचना शिथिल होतां उपयोगी नाहीं. आपली कांहीं 'शिथिल रचना' नव्हे, तर ती 'अ-रचना' आहे. याचा अर्थ असा कीं, आपण केवळ विचाराच्या आधारावर च कार्य करूं इच्छितों. समजल्या-उमजल्याशिवाय लोकांनीं अंमलांत आणावे असे आदेश आम्ही कुणाला च देत नाहीं. त्या च प्रमाणें विचार केल्यावांचून आणि स्वेच्छेनें व स्वीकारल्या-वांचून अंमलांत आणावयाचे असे दुसऱ्या कुणाचे आदेश हि आम्ही मानीत नाहीं. आम्ही फक्त विचार-विनिमय करतों. कुराणांत भक्ताचें लक्षण म्हणून असें सांगितलें आहे कीं, त्यानें आपलें 'अम्र' म्हणजे काम परस्परांच्या विचार-विनिमयानें करावें. आम्ही हि विचार-विनिमय करूं. आणि आमचा विचार ऐकून घेणाऱ्यांना जोंपर्यंत तो मान्य होत नाहीं, तोंपर्यंत जर त्यांनीं तो अंमलांत आणला नाहीं, तर आम्हांला विशेष आनंद होईल. तो विचार अंमलांत न आणण्यानें च आम्हांला बरें वाटेल. समजल्याशिवाय व पटल्या-शिवाय जर कुणीं तो विचार अंमलांत आणला, तर च आम्हांला अतिशय

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें. स्थळप्रत.

दुःख होईल. या प्रकारच्या आमच्या ‘ रचने ’ मध्यें जें सामर्थ्य आहे, तसें तें मला कोणत्या हि अनुशासनबद्ध अशा स्पष्ट व कुशल रचनेमध्यें दिसत नाहीं. अनुशासन-बद्ध व दंडयुक्त अशा रचनेंत शक्ति नसते असें नाहीं. पण ती शक्ति म्हणजे आम्हांला जी निर्माण करायची आहे ती शिव-शक्ति नव्हे. आमच्या दृष्टीनें तर ती शक्ति च नव्हे. यासाठीं च विचार-शासन मान्य केलें जावें अशी आमची इच्छा आहे. ही गोष्ट जर आपण नीटपणें ध्यानांत ठेवली, तर विचाराचा निरंतर प्रचार करणें हा आमचा एक कार्यक्रम होऊन राहील. आज आम्हांला तो अंमलांत आणावयास पाहिजे.

## कर्तृत्व-विभाजन

आमचें दुसरें साधन आहे कर्तृत्व-विभाजन. सारें कर्तृत्व, सारी कार्यशक्ति ही एका ठिकाणीं केंद्रित होतां उपयोगी नाहीं. तर खेड्या-खेड्यांत ही कार्य-शक्ति ही कार्यसत्ता निर्माण झाली पाहिजे. यासाठीं आपल्या गांवांत कोणत्या वस्तु याव्या व कोणत्या येऊं नयेत हें ठरविण्याचा अधिकार त्या गांवाला मिळाला पाहिजे, ही आमची इच्छा आहे. आपल्या गांवांत तेलघाण्या चालाव्या, गिरणींतलें तेल गांवांत येऊं नये अशी जर एखाद्या गांवाची इच्छा असेल, म्हणजे गिरणीचें तेल थांबविण्याची इच्छा असेल, तर तसें करण्याचा त्या गांवाला अधिकार असला पाहिजे. जेव्हां आम्ही असें सुचवतों, तेव्हां अधिकारी सांगतात कीं, याप्रमाणें एका मोठ्या राज्यांत असें लहान राज्य चालूं देणें शक्य नाहीं. यावर मी असें उत्तर देतों कीं, जर आपणांस सत्तेचें व कर्तृत्वाचें विकेंद्रीकरण, विभाजन करावयाचें नसेल, तर सैन्य-शक्ति अपरिहार्य होऊन बसेल हें विसरतां उपयोगी नाहीं. मग सैन्यावांचून आज हि चालणार नाहीं आणि पुढें हि चालणार नाहीं. तेव्हां हें पक्कें ठरवून टाकावें कीं, सैन्यशक्तीनें च काम करावयाचें आहे, व सैन्य सुसज्ज ठेवावयाचें आहे कधींतरी सैन्यापासून आपली मुक्तता करून घेण्याची इच्छा आहे, असें मात्र मग म्हणतां कामा नये. केव्हां ना केव्हां तरी सैन्यापासून मुक्तता करून घेण्याची जर इच्छा असेल, तर आम्हांला परमेश्वराप्रमाणें च करावें लागेल. परमेश्वरानें अकलेचें विभाजन केलें आहे. प्रत्येकाला अक्कल दिली आहे, विंचवाला, सापाला, वाघाला, आणि मनुष्याला हि. कमी अधिक प्रमाणांत

कां असेना पण प्रत्येकाला देवानें अक्कल दिली, आणि आपल्या अकलेच्या भरंवशावर आपल्या जीवनाचा निर्वाह कर असें सांगितलें. यानंतर सारें जग इतक्या सुरळितपणें चालूं लागलें कीं, परमेश्वर आहे कीं नाहीं अशी लोकांना शंका येऊं लागली. आम्हीं हि राज्य असें च चालविलें पाहिजे कीं, कोणी राजसत्ता आहे कीं नाहीं अशीं शंका लोकांच्या मनांत निर्माण व्हावी. हिंदुस्थानांत बहुधा राज्यसत्ता नाहीं च असें हि लोक म्हणोत. पण असें झालें तर च आमचें राज्य-शासन खरोखर च अहिंसक होईल.

यासाठीं च आपण ग्राम-राज्याचा उद्घोष करतों व खेडयाला च नियंत्रणाचा अधिकार मिळावा अशी इच्छा करतों. अर्थात् ग्रामवासीयांनीं नियंत्रणाचा अधिकार आपल्या हातांत घेतला पाहिजे. या च अधिकाराचें प्रात्यक्षिक असें व्हावें कीं, ग्रामवासीयांनीं एकत्र येऊन असा निर्णय करावा कीं, अमुक वस्तू आम्ही खेडयांत निर्माण करणार आहोंत. सरकारला त्यांनीं अशी मागणी करावी कीं, ती वस्तू आमच्या खेडयांत येतां कामा नये, तिच्यावर निर्बंध घाला. पण असा निर्बंध घालण्याची इच्छा असून हि सरकार जर त्या वस्तूंची आयात थांबवूं शकलें नाहीं, तर या आयातीला विरोध करण्याची हिंमत ग्रामवासीयांनीं धरली पाहिजे. खेडयांतील जनतेच्या या अशा शक्तीमुळें सरकारला अतिशय मदत मिळेल. कारण यामुळें च सैन्यबलाचा छेद होऊं शकेल. त्यावांचून मात्र सैन्यबलाचा छेद कधीं हि होणार नाहीं. ब्रह्मदेवाप्रमाणें चार मस्तकें असणारी व चारी दिशांकडे सूक्ष्मतेनें पाहूं शकणारी अशी बुद्धिमान् व्यक्ति दिल्लीमध्यें असणें शक्यच नाहीं. किती हि मोठी बुद्धि असली तरी देशांतील प्रत्येक गांवच्या कारभाराचें नियंत्रण त्या गांवाला पूर्णपणें हितकर होईल अशा दृष्टीनें, आपल्या ठिकाणाहून करणें त्या बुद्धीला हि शक्य होणार नाहीं. या च कारणांसाठीं 'राष्ट्रीय नियोजन' करण्याऐवजीं 'ग्राम-नियोजन' होणें अवश्य आहे. मीं 'ऐवजीं' असा शब्द वापरला खरा, पण राष्ट्रीय-नियोजन म्हणजे च ग्राम-नियोजन असा वास्तविक अर्थ करायला हवा. या ग्रामनियोजनाच्या मदतीसाठीं जें जें अवश्य होईल तें तें दिल्लीत केलें जाईल. आपल्या कार्यक्रमाचा जो दुसरा विभाग आहे तो याप्रमाणें कर्तृत्व-विभाजन हा आहे. आपण जें कांहीं करीत आहोंत तें सारें

कर्तृत्व-विभाजनाच्या च दिशेनें. यासाठीं च खेड्यांतून जमिनीचें वांटप व्हावें अशी आमची इच्छा आहे.

## तिसरी शक्ति

हीं जीं दुसऱ्या संघटनांचीं नांवें आहेत, तीं चालू राहतील च. कारण त्या त्या विशिष्ट संघटनेच्या नांवावर ते लोक कार्य करूं इच्छितात आणि त्या संघटनांची उपयुक्तता त्यांना पटते. पण आपला मात्र कोणता च पक्ष नाहीं. जिला तिसरी शक्ति असें म्हणतात ती आम्ही आहोंत. आजच्या जगाच्या परिभाषेंत तिसरी शक्ति या शब्दाचा अर्थ असा आहे कीं, जी अमेरिकेच्या गटांत सामील नाहीं व जी रशियाच्या गटांत हि सामील नाहीं, ती तिसरी शक्ति म्हणून संबोधिली जाते. पण माझ्या परिभाषेंत तिसरी शक्ति म्हणजे जी हिंसेच्या शक्तीची विरोधी आहे, अर्थात् जी हिंसेची शक्ति नाहीं व जी दण्डशक्तीहून भिन्न आहे, अर्थात् जी दण्डशक्ति हि नाहीं. एक हिंसाशक्ति, दुसरी दण्ड-शक्ति आणि तिसरी आपली शक्ति आहे. ही च शक्ति अधिक व्यापक बनविण्याची आमची इच्छा आहे. आपला वेगळा असा संप्रदाय बनतां कामा नये, तर सर्व जनतेंत मिळून मिसळून केवळ मानव म्हणून च आपणांस रहावयाचें आहे.

चांडिल, ७-३-१९५३

## समाज-शास्त्रांत भारत युरोपच्या पुढें : ७ :

पाश्चात्यांची अशी धारणा आहे कीं ' समाजांत आमूलाग्र परिवर्तन सत्तेच्या द्वारां च होऊं शकतें. राजनीतींत एक पक्ष राज्य करतो तेव्हां दुसरा पक्ष विरोधांत असतो. याप्रमाणें ते दोघे एकमेकांना परिशुद्ध करीत राहतात त्यामुळें च सत्तेचें परिवर्तन होईल. '–आम्ही हि या च प्रकारची नक्कल करीत आहोंत. परंतु पाश्चात्यांचें समाजशात्र हें फार च मागासलेलें आहे हें तुम्हांला माहीत नाहीं. आज हिंदुस्थानांत महाराष्ट्र, बंगाल, गुजराथ, तमिळनाड, आदि प्रांत आहेत या च प्रमाणें युरोपांत हि भिन्न भिन्न भाषा-भाषी देश आहेत. आपल्या देशांत भाषावार प्रांतरचनेची मागणी केली जात असली, तरी आपला वेगळा देश करण्याची कोणाची इच्छा नाहीं. दिल्लीपासून फटकून राहण्याची कोणाची इच्छा नाहीं. याच्या उलट युरोपांत स्वित्झर्लंड, जर्मनी, बेल्जिअम्, फ्रान्स आदि लहान लहान देश आहेत. आज हि जाति-वाद त्यांच्यांत चालू च आहे. साऱ्या युरोपाचें राजकीय विभाजन जातिवादा-वर च आधारलेलें आहे. तेथील देशांच्या विभाजनाच्या नैसर्गिक अशा सीमा नाहींत. फ्रांस व जर्मनीमध्यें एखादा पर्वत नाहीं. तरी हि माणसांनीं ' सीग्ग-फ्रीड लाइन ' ' मॅजिनो लाइन ' अशा सारख्या कृत्रिम भिंती बांधून आप-आपले देश वेगळे करून टाकले आहेत. फ्रेंच व जर्मन भाषांत इतकें साम्य आहे कीं पंधरा दिवसांत त्या शिकतां येतात. पण ते तसें करणार नाहींत व एक मोठा देश हि बनविणार नाहींत. पण आपल्या येथें मात्र तशी स्थिति नाहीं. भाषावार प्रांतांची मागणी शेतकऱ्यांच्या सोयीसाठीं केली जात आहे. आपलें वेगळें राज्य किंवा वेगळें सैन्य असावें अशी कोणाची च येथें इच्छा नाहीं. यावरून हें स्पष्ट आहे कीं समाजशास्त्राच्या रचनेंत युरोप हिंदुस्थानपेक्षां पुष्कळ च मागें आहे.

दुसरें उदाहरण हें कीं, स्त्रियांना मताधिकार द्यावा कीं नाहीं याबद्दल येथें कोणाला शंका उत्पन्न होत नाहीं. आपल्याकडील स्त्रिया पुष्कळ मागास-

लेल्या आहेत हें मी मानतों. आम्हांला त्यांचें उत्थान व प्रगति केली पाहिजे. तरी आम्हीं त्यांना मताधिकार मात्र निःसंकोचपणें दिला आहे. याच्या उलट युरोपांतील कांहीं देशांत अजून हि स्त्रियांना मताधिकार मिळालेला नाहीं. चाळीस वर्षांपूर्वीं इंग्लंडांत पुरुषांविरुद्ध स्त्रियांचें आंदोलन झालें. विधान-सभेंत अंडीं फेकलीं गेलीं. तेव्हां कोठें कांहीं काळानंतर त्यांना मताधिकार प्राप्त झाला. आपल्या देशांत असा कांहीं संघर्ष झाला नाहीं. त्यामुळें हें स्पष्ट आहे कीं, जगांतील इतर देशांपेक्षां आम्ही समाजशास्त्रांत पुढें आहोंत.

## आजची निवडणुकीची सदोष पद्धति

असें असतां हि आम्ही लोक डोळे मिटून पाश्चात्यांची पद्धति च स्वीकारीत आहोंत ही आश्चर्याची गोष्ट आहे. याचा परिणाम काय होईल या गोष्टीचा आम्ही विचार च करीत नाहीं. जेव्हां आमच्याकडे 'पांचामुखीं परमेश्वर' या न्यायानें एकमतानें काम चालत असे, तेव्हां पश्चिमेकडे चार विरुद्ध एक, तीन विरुद्ध दोन अशा बहुमतानें ठराव पास होत असत. न्यायालयांत खुनाचा खटला चालू असला कीं, तेथें हि तीन-विरुद्ध दोन अशा बहुमतानें आरोपीला फांसावर लटकविलें जातें. फांशीच्या ऐवजीं एखादी कमी शिक्षा कां देऊं नये असा विचार हि केला जात नाहीं. बहुमताचा हा जो विचित्र विचार आम्हीं पाश्चात्यांकडून घेतला आहे, तो अतिशय अनिष्ट आहे.

सर्वोदय संमेलनांत नेहरूंनीं स्वतःच सांगितलें कीं, 'निवडणूक-पद्धतीचा आम्हीं जरी श्रद्धेनें स्वीकार केला असला, तरी तिच्यांत पुष्कळ दोष आहेत ते आम्हांला सुधारले पाहिजेत. तेव्हां पाश्चात्यांकडून आपण जें जें ग्रहण करतों, तें नीट विचार करून च ग्रहण केलें पाहिजे. जगांतील सगळ्या देशांच्या मानगुटीला हें निवडणुकीचें भूत बसलें आहे व त्यामुळें फार हानि झाली आहे. हिंदुस्थानावर तर याचा परिणाम फार च दुःखद झाला आहे. राजा राममोहन रॉय पासून महात्मा गांधीपर्यंत अनेकांनीं ज्या जाति-भेदावर प्रहार केले, त्यानें या निवडणुकींमुळें पुन्हां डोकें वर काढलें आहे.

## क्रांति पक्षातीत च असते

सत्तेच्या किंवा पक्ष-राजकारणाच्या द्वारां क्रांति कधीं होत नाहीं. ती जनमनांत च होत असते. म्हणून ती पक्षातीत च असली पाहिजे. म्हणून च

एकमेकांसमोर आपापलीं हृदयें उघडीं करून दाखविलीं पाहिजेत. पण आजकाल पहावें तर एका पक्षाचे लोक दुसऱ्या पक्षाचें वृत्तपत्र हि वाचीत नाहींत. ज्याप्रमाणें वैष्णवपंथी शैवपंथीयांची कोणती हि गोष्ट स्वीकारीत नाहींत, त्या च प्रमाणें हे पक्ष एकमेकांचा सतत विरोध करीत राहतात. आपल्या पक्षाचें पुस्तक हें च त्यांचें वेदवाक्य बनतें. ते दुसऱ्यांचें साहित्य वाचीत च नाहींत. त्यामुळें त्यांचे विचार संकुचित होतात. या वादांमुळें पक्ष-संकुचितता च नव्हे, तर हृदयसंकुचितता हि उत्पन्न होते, व ती तर अधिक अनिष्ट असते, आणि त्यामुळें क्रांति स्थगित होऊन जाते. हवा पसरण्यासाठीं अवकाश पाहिजे असतो याचें च लोकांना विस्मरण होतें. विचार-प्रचारासाठीं हृदयें मोकळीं असलीं पाहिजेत. पक्षांच्या सभेंत विशिष्ट जातीचे व संघाचे च लोक येतात व ते क्रांतीला रोकून धरतात. पण आतां भूदानाच्या या कार्यानें लोकांच्या मनांत आजवरच्या पक्षविशिष्ट राजकारणाबद्दल संशय निर्माण केला आहे. त्यामुळें यापुढें लोक क्रांतीचें स्वरूप समजूं शकतील, ही फार मोठी गोष्ट होणार आहे.

**मे १९५४**

## गणतंत्र नाहीं, गुणतंत्र : ८ :

आम्ही जर मनुष्यामनुष्यांत भेद करणार नाहीं तर हें 'गणतंत्र', 'गुणतंत्र', 'सद्‌गुणतंत्र' होईल. तेव्हां सद्‌गुणांची किंमत केली जाईल. आज ५१ विरुद्ध ४९ असे ठराव पास होत असतात. ह्या गणतंत्राला मी अवगुणतंत्र म्हणतों. ४९ आणि ५१ मिळून १०० होतात, आणि आमची इच्छा आहे कीं शंभरांनीं मिळून काम करावें. आमचेकडे पूर्वी ग्रामपंचायती असत. त्या या देशाला फार मोठी देणगी आहे. आज जगांत ज्या राजनीतीच्या परंपरा चालल्या आहेत, त्या सर्वांहून हिंदुस्थानची ग्रामपंचायत आपलें वैशिष्टय राखतें. यांत पांचांमुखी परमेश्वराची गोष्ट मान्य केली जात असे. त्या वेळीं सर्व हिंदुस्थान देशांत ही च तऱ्हा चालू होती. पांचांचा एक आवाज निघाला तर च ठराव पास होत असे. परंतु आतां पाहतों तर 'चारमुखीं परमेश्वर,' 'तीनमुखीं परमेश्वर' म्हणजे तीन विरुद्ध

दोन, ठराव पास ! आम्ही म्हणतों असा ठराव फेल आहे. पांच मिळून च ठराव पास झाला पाहिजे. ही च गोष्ट फिरून हिंदुस्थानांत आणायला हवी. प्रेम व सहकार्यानें च गणतंत्र चालेल. प्रेम व सहयोगानें च सर्व कारभार चालला पाहिजे. याशिवाय हिंदुस्थानांत आणि जगांत अहिंसा टिकणार नाहीं.

हिंदुस्थानांत चौदा भाषा आहेत. त्या सर्व मिळून एक देश झाला आहे. ज्यांनीं कन्याकुमारीपासून कैलासापर्यंत ह्या चौदा भाषांचा एक देश बनविला आहे, तेथल्या लोकांवर युरोपची नक्कल न करण्याची जबाबदारी येते. युरोप आमच्या मागें आहे, आम्ही त्यांचे पुढें आहों. युरोपमधला स्वित्झरलंड बांकुरा व मेदिनीपुर या दोन जिल्ह्यांएवढा भाग होतो. बेल्जियम म्हणजे आणखी दोन चार जिल्हे मिळवून द्या. तेथें असे लहान लहान भाग राष्ट्र समजले जातात. युरोपमध्यें एक लिपी व एक धर्म आहे. एका भाषेहून दुसऱ्या भाषेंत फार च थोडा फरक आहे. कोणी हि इटालियन फ्रेंच शिकतों म्हणेल तर १५ दिवसांत शिकूं शकतो. तेथें इतकें साम्य आहे, तरी निरनिराळीं राष्ट्रें निर्माण झालीं आहेत. आणि आपण आपला एक देश केला आहे. अशा रीतीनें सामाजिक विचारांत आम्ही पुढें आहोंत आणि युरोप मागें आहे. म्हणून च आम्हांला युरोपचें अनुकरण करावयाचें नाहीं. आम्हांला सर्वोदयवादी लोकशाही, सर्वगणतंत्र बनवावें लागेल, तेव्हां च अहिंसेची शक्ति वाढेल. सारांश मीं पहिली गोष्ट ही सांगितली कीं निर्भय झालें पाहिजे, व दुसरी गोष्ट ही कीं प्रेम व सहकाराचे आधारावर सरकारची स्थापना केली पाहिजे.

बांकुडा, ता. ७-१-५५

## आज शिक्षा करण्यांत हि सुधारणा

पूर्वीं कोणीं चोरी केली तर त्याचे हात तोडण्याची शिक्षा त्याला देत असत. परंतु आज अशी शिक्षा देणें कोणाचे मनांत हि येणार नाहीं आणि आवडणार हि नाहीं. आज तर याला निव्वळ मूर्खपणा आणि मानवतेविरुद्ध मोठा अपराध केला असें समजलें जाईल. मनुष्य हातानें सेवा करूं शकतो. हात

तोडणें म्हणजे त्याचें सेवेचें मोठें अवजार नाहीसें करणें आणि त्या मनुष्याचा जन्मभर सर्व भार समाजावर टाकणें असा अर्थ झाला. अशा तऱ्हेनें शिक्षा देणें म्हणजे निव्वळ मूर्खपणा आहे. आज मनुष्यसमाजाला ही गोष्ट पसंत नाहीं. शूर्पणखा राक्षसीनें राम लक्ष्मणासमोर येऊन आचरट गोष्टी केल्या म्हणून लक्ष्मणानें तिचें नाक व कान कापून टाकले अशी गोष्ट रामायणांत आली आहे. यावर आजचीं शिकणारीं मुलें विचारतात कीं लक्ष्मणानें जी ही गोष्ट केली ती कितपत योग्य होती? त्यांना मग समजून सांगावें लागतें कीं तें रूपक आहे, ती कोण्या मनुष्याची गोष्ट नाहीं. राक्षसी म्हणजे कामवासना. आणि तिला विद्रूप करणें म्हणजे कोणत्या हि तऱ्हेनें तिचें आकर्षण न राहूं देणें. असा या गोष्टीचा अर्थ आहे.

अलीकडे दुनियेंत फांशीची शिक्षा रद्द करण्याविषयीं विचार चालतो. अजूनपर्यंत जरी मानवानें त्याविषयीं अनुकूल निकाल दिला नसला तरी लवकर त्याचा निर्णय होईल आणि फांशीची शिक्षा मानवताहीन मानली जाईल.

## सत्ताविभाजनानें सत्ताभिलाषेवर नियंत्रण

पहिली गोष्ट जी समजावयास हवी ती ही कीं मनुष्य आपल्या वृत्तीचें हि नियंत्रण उत्तरोत्तर करीत आला आहे आणि करील. दुसरी गोष्ट ही कीं त्याच्यामध्यें जशी भोग-ऐश्वर्यवृत्ति आहे तशा च आणखी हि वृत्ति असतात. केवळ भोग च नाहीं तर धर्म-वासना आणि धर्म-प्रेरणा सुद्धां मनुष्यांत मोठ्या बलवत्तर असतात. धर्म-प्रेरणेला प्राधान्य देऊन वासनांना त्याच्या स्वाधीन ठेवण्याची बुद्धि मनुष्याला सुचली पाहिजे आणि त्याला ती उत्तरोत्तर सुचेल हि. मनुष्याची प्रेरणा च त्याला म्हणते कीं मानवामध्यें असलेल्या भोग-ऐश्वर्याच्या वृत्तीला प्राधान्य मिळतां कामा नये. तिचा विकास न होऊं देतां तिला कुंठित करण्याचा मार्ग शोधला पाहिजे. आज मनुष्याला धर्म-बुद्धीचा हा मार्ग सुचला आहे कीं सत्ता वांटून द्यावी आणि भोग सर्वांना समान प्रमाणांत मिळावा. तो असा प्रयत्न करील तर भोगवासना नियंत्रित व कुंठित होईल. मग त्याला सत्तेची आकांक्षा हि राहणार नाहीं. ह्या दोन्ही गोष्टी आजचें सरकार सुद्धां मानतें. म्हणून

च त्यानें प्रत्येकाला मतदानाचा अधिकार दिला आहे. याचा अर्थ इतका च कीं सत्ता सर्वांत विभागण्याचा आरंभ झाला. लोक ज्याला निवडून देतील तो नोकरी करील आणि लोकांची सेवा करील. भले स्वतःला तो सत्ताधारी म्हणवील, पण त्याचे हातांत सेवा करण्याचा च अधिकार राहील, असा विचार लोकशाहीला मान्य झाला आहे.

## स्वार्थाच्या नियंत्रणाकरितां सुखसाधनांचें विभाजन

सत्तेचें विभाजन आणि सत्तेचा एक अंश आपल्याजवळ च आहे असा दृढ विश्वास हा सत्तेची वासना नियंत्रण करण्याचा किंवा बंद करण्याचा एक मार्ग आहे. त्या च प्रमाणें मनुष्यांत असलेली स्वार्थबुद्धि नियंत्रित किंवा नाहींशीं करण्याचा उपाय मनुष्याचे सुखाचीं सामान्य साधनें सर्वांना समान प्रमाणांत उपलब्ध करण्याचा प्रयत्न करणें हा आहे. मनुष्याच्या सर्व स्वार्थाचा आधार जमीन च आहे. म्हणून च मीं जमिनीपासून सुरुवात केली आहे आणि म्हणतों आहें कीं प्रत्येक भूमिहीनाला जमीन मिळाली पाहिजे. त्याचा हक्क मान्य केला च पाहिजे. हा एक अगदीं मूळ विचार आहे, आणि तो समाजासमोर मीं ठेवला आहे.

**बालेश्वर,** ता. ६-२-५५

## सात्त्विक लोक निवडणुकींत पडत नाहींत

कांहीं लोकांनीं एक नवी पद्धत काढली आहे. ती हि विचार करण्यालायक आहे. असें म्हणतात कीं सात्त्विक लोकांना निवडणुकींत पडणें तितकेंसें पसंत नसतें. ही गोष्ट जर ध्यानांत आली तर सात्त्विक लोकांना निवडणुकींत भाग घेण्याची प्रेरणा होण्याकरितां निवडणुकीच्या पद्धतींत काय बदल केला पाहिजे याबद्दलचा विचार करण्याची स्फूर्ति त्यांना व्हायला हवी. हल्लींच्या निवडणुकांत सात्त्विक लोकांना रस नाहीं हें त्यांना माहीत झालें आहे, परंतु त्यांत बदल मात्र ते करूं शकत नाहींत. कारण ही पद्धति पाश्चात्यांकडून आपण घेतली आहे आणि जोंपर्यंत त्याच्या बदल्यांत दुसरी पद्धति सुचत नाहीं तोंपर्यंत हीच चालू राहणार

आहे. त्यांना एक गोष्ट मात्र सुचली आहे. ते मला विचारीत नाहींत पण आमच्या मित्रांना विचारतात कीं तुम्ही काँग्रेसमधें याल ? तुम्हांला सहन होणार नाहीं अशा तकलीफींत–निवडणुकींत पडून लोकांच्याकडे जाऊन मतें मागण्याच्या त्रासांत–आम्ही तुम्हांला घालणार नाहीं. पण तुम्ही काँग्रेसमधें दाखल होऊन तुमच्या सल्लामसलतीचा आम्हांला लाभ द्याल तर आम्हांस तो हवा आहे. पग जेव्हां आम्ही विचारतों कीं "त्याकरितां आम्हांला 'काँग्रेसमन' व्हावें लागणार नाहीं ना ? आम्ही येऊं सल्ला हि देऊं" तर ते म्हणतात तसें नाहीं चालायचें. काँग्रेसमन हि व्हावें लागेल आणि दहा रुपये वर दक्षिणा हि द्यावी लागेल.

## हें मोह चक्र आहे

असें सांगणारे ते आमचे मित्रच आहेत. तेव्हां मी त्यांना म्हणतों कीं यांत काय भलें होणार आहे ? कांहीं भलें होणार असेल तर तुमचें म्हणणें कबूल करायला मी राजी आहें. इथें तर अशी परिस्थिति आहे कीं लोक नेहमीं घाबरलेले च असतात. त्यांचा प्रतिपक्षी दुर्बल असला तरी हि भितात, तो बलवान् झाला तरी हि भितात. ते म्हणतात खरें, कीं लोकशाही चांगली चालायला एक विरोधी पक्ष असला पाहिजे पण तो पक्ष कमजोर झाला तरी भितात आणि बळकट झाला तरी हि भितात. या 'डेमॉक्रसीनें' आमची बुद्धि अगदीं कमजोर करून टाकली आहे. ती कांहीं नीट विचारच करूं शकत नाहीं; घोटाळ्यांत पडते. तुम्हांला जर असें भय वाटत आहे तर विरोधी पक्षाच्या लोकांनीं आपले विचार न बदलतां तुमच्याकडे यावें त्यांत च तुमचें किंवा समाजाचें कांहीं भलें होणार असें का तुम्हांला वाटतें ? याचा जरा विचार करा. ही पद्धतिच अशी आहे कीं त्यामुळें सात्त्विक लोक निःसत्त्व होऊन जातील असें मला वाटतें. सात्त्विक लोकांमधें अशी हिंमत पाहिजे कीं सत्त्वगुणाचा प्रभाव आम्ही इतका वाढवूं कीं त्यामुळें निवडणुकांवर त्याचा प्रभाव पडेल आणि त्यांचें रूपच पालटून जाईल. किंवा त्यांना अशी हिंमत असली पाहिजे कीं आम्ही निवडणुकाच खतम करून देऊं, आणि आम्हांला त्यांत पडावेंच लागणार नाहीं. किंवा जे जे निवडून येतील त्यांच्यावर आमचाच प्रभाव पडेल. यापैकीं कसलीच हिंमत नसेल आणि आम्हांला

"तुम्ही काँग्रेसमधें या आम्ही तुम्हांला घ्यायला तयार आहोंत" असें म्हटल्याबरोबर आम्हांला तेथें जाण्याची इच्छा झाली तर आपण कसल्यातरी मोहचक्रांत फसलों आहोंत असा च त्याचा अर्थ होईल.

## कोणताच पक्ष दुर्बल होऊं नये

आज मी माझे विचार अगदीं मोकळेपणानें तुमच्यासमोर मांडीत आहें. त्याबरोबच मला हें हि सांगायचें आहे कीं त्याविषयीं माझा आग्रह नाहीं. प्रजासोशालिस्ट पक्षामधें माझे मित्र आहेत, काँग्रेस व रचनात्मक संस्थांमधें हि माझे मित्र आहेत. त्यामुळें माझी स्थिति जास्तच मुष्किलीची होते. कारण जे माझ्याशीं दुष्मनी करूं इच्छितात तेहि माझे मित्रच आहेत. सर्व जगच मित्रांनीं भरलेलें आहे. त्यामुळें माझें काम अधिकच कठिण झालेलें आहे. परंतु तें एका दृष्टीनें सोपें हि आहे कारण मी अंतःकरण उघडें करून माझे विचार मांडतों आणि आग्रह मात्र कसला च राखीत नाहीं. त्यामुळें चर्चेकरितां खाद्य मिळून जातें.

मीं आरंभींच सांगितलें कीं लोकशाहीवर विश्वास असणारा कोणताहि पक्ष त्यांचा आपल्या मतावर विश्वास आहे तोंपर्यंत तो कमजोर होऊं नये. यांत च देशाचें भलें आहे परंतु समजा काँग्रेसचें परिवर्तन झालें कारण त्यांचे विचार चुकीचे आहेत असें त्यांना आढळून आल्यावरून त्या पक्षाचें विसर्जन झालें तर त्यांत देशाचें कांहीं हि नुकसान नाहीं. प्रजासमाजवादी पक्षाचें हि याच कारणानें विसर्जन झालें तरी हि देशाचें नुकसान नाहीं. परंतु हे दोन्ही पक्ष तसेच लोकशाहीवर विश्वास असणारे दुसरे हि पक्ष आपलें मतपरिवर्तन न होतां आपले विचार कायम राखून जर दुर्बल झाले तर त्यांत देशाचें हित आहे असें मला वाटत नाहीं.

## विनोबा काँग्रेसमन होण्यांत कोणाचें भलें नाहीं

तसेंच माझें काम हि कमजोर होण्यांत कोणाचें कांहीं भलें आहे काय? समजा कीं विनोबानें काँग्रेसमन व्हायचें कबूल केलें—कारण काँग्रेसमन होण्यांत कांहीं गमवायचें थोडें कांहीं आहे! पण प्रश्न एवढाच आहे कीं त्याचा ज्या मतावर विश्वास आहे त्या मतांना एका मर्यादेपर्यंत तेथें अवकाश राहील आणि एका मर्यादेपर्यंत नाहीं. ज्या मर्यादेपर्यंत अवकाश नाहीं,

त्याची उपेक्षा करून 'ठीक आहे इतकें पुरें.' असें समजून मी तिथें जाऊं शकतों. मला माहीत आहे कीं कॉंग्रेसमधें सज्जनांची संगति मला मिळेल. त्याच प्रमाणें प्रजासमाजवादी पक्षामधें हि पुष्कळ सज्जन आहेत. त्यांच्या मताचा कांहीं अंश मला मान्य आहे कांहीं नाहीं. जो अंश मान्य नाहीं त्याची उपेक्षा करून आणि जेवढा पटण्यासारखा आहे त्याकडे लक्ष देऊन व्यावहारिक बुद्धीनें, समजा मी कॉंग्रेसमन झालों तर त्यांत कॉंग्रेसचें भलें आहे काय, याचा विचार केला पाहिजे. मला वाटतें यांत कॉंग्रेसचें भलें नाहीं. कॉंग्रेसची गोष्ट सोडून द्या, त्यांत देशाचें हि भलें नाहीं. कोणाचें च भलें नाहीं. भिन्न भिन्न विचारांचे लोक अशा प्रकारें आपआपल्या विचारांत दुर्बल होण्यांत कोणाचें च भलें नाहीं. या मुख्य गोष्टीकडे ध्यान ठेवून च आपण विचार करावा.

## 'अभय' आणि 'करुणा' :९:

[ आंध्र विधान-सभेच्या सदस्य आणि मंत्रिगणासमोर ]

### आज भारताची विशेष जबाबदारी

स्वराज्यानंतर आम्हां लोकांची जबाबदारी सर्व प्रकारें वाढली आहे. आम्हांला स्वराज्य विशेष प्रकारानें मिळालेलें आहे. म्हणून हि आमची जबाबदारी कांहीं विशेष वाढली आहे. कारण त्याचमुळें जगांत आमच्याविषयीं कांहीं आशा निर्माण झाली आहे. याखेरीज भारताची स्वतःची एक नित्य नूतन संस्कृति आहे. याला च आम्ही 'पुराण-सभ्यता' म्हणतों. जो देश जुना असून हि नवीन आहे, त्याच्या संस्कृतीला आम्ही पुराण संस्कृति म्हणतों, आणि तिची तशी व्याख्या करतों. नित्य नूतनता पुराणतेचें लक्षण आहे. जी संस्कृति नित्य नवीन रूप धारण करूं शकते ती च 'प्राचीन' म्हटली जाऊं शकते. जिच्यांत ही शक्ति नाहीं ती छिन्नविच्छिन्न होईल. शिवाय भारताच्या संस्कृतींत एक विशेष दर्शन होतें. त्यांत भिन्न भिन्न प्रकारचे लोक

राहतात. त्या सर्वांच्या संस्कृतीला भारताच्या संस्कृतीनें पचविलें आहे. म्हणून भारतीय संस्कृति फार च परिपुष्ट आणि मधुर झाली आहे. सर्वांशीं अविरोध साधण्याची आणि सर्वांबरोबर प्रेमानें राहण्याची भारताची स्वतःची अशी एक विशेष संस्कृति असल्यामुळें आमच्यावर एक विशेष जबाबदारी येते.

याखेरीज आज जगाची अशी स्थिति आहे कीं जगांतील अनेक देश गोंधळांत पडले आहेत. अशा स्थितींत आम्हीं आमची बुद्धि कायम ठेवावी अशी जबाबदारी आमच्यावर येते असें मीं अनेक वेळां म्हटलें आहे. त्या लोकांची बुद्धि आज थकली आहे. त्यांनीं बुद्धि फार चालवून शस्त्रास्त्रांत बरीच वाढ केली, आतां जरा शांततेची त्यांना गरज वाटूं लागली आहे. आंतापर्यंत 'बॅलन्स ऑफ पॉवर' शक्तीच्या सन्तुलनानें शांतता स्थापन करण्याचा त्यांनीं अटोकाट प्रयत्न केला परंतु त्यांचा तो प्रयत्न सफल होऊं शकला नाहीं. त्या अवधींत दोन विश्वयुद्धें झालीं आणि तिसरें टाळण्याचा ते यत्न करीत आहेत. म्हणून पूर्वीं त्यांचा जसा हिंसेवर विश्वास होता तसा आज राहिला नाहीं, परंतु त्याऐवजीं त्यांचा अहिंसेवर हि अद्याप विश्वास बसला नाहीं. आज ते मधल्या अवस्थेंत आहेत. जेव्हां माणसाच्या मनांत अस्वस्थता आणि अनिश्चितता असते तेव्हां त्याची बुद्धि काम करीत नाहीं. ही कड अथवा ती कड अशी निश्चित दिशा मनुष्य घेतो तेव्हां च तो कर्मयोग करूं शकतो. परंतु जेथें व्यवसायात्मक बुद्धि आहे तेथें संशय आहे. अशा स्थितींत ते जरी चिंतन करण्याचा प्रयत्न करीत असतील तरी त्यांची बुद्धि च काम करूं शकणार नाहीं. सध्यां पश्चिमेकडे तत्त्वविचार पुष्कळ चालतांना दिसतो, परंतु कोणत्या हि प्रकारची श्रद्धा तिथें दिसून येत नाहीं. त्यांनीं आपल्या पुरुषार्थाची पराकाष्ठा केली असली तरी हि त्यांना अद्याप मार्ग दिसत नाहीं म्हणून त्यांची बुद्धि कुंठित झाली आहे. अशा स्थितींत हिंदुस्थानकडे सर्वांचे डोळे लागून रहावेत हें स्वाभाविक आहे.

**प्रजेंत अभय असावें**

अशा स्थितींत आमच्या राज्यकर्त्यांनीं गंभीर व खोल चिंतन करून च प्रत्येक पाऊल उचललें पाहिजे. उत्तम 'ॲडमिनिस्ट्रेशन' शासन चालविणें एक कर्तव्य मानण्यांत आलें आहे ज्यांच्या राज्यांत शांतता आणि व्यवस्था

राहते आणि साधारण राज्यकर्ते सुद्धां. फार परिवर्तन होऊं नये, जितकें होऊं शकेल तितकें च परिवर्तन करण्यांत यावें, असा विचार करतात ती च उत्तम राज्यव्यवस्था आहे. परंतु हिंदुस्थानसाठीं आतां इतकें च पुरेसें नाहीं असें माझें नम्र मत आहे. राज्यव्यवस्था ठीक आहे, लोकांना फार त्रास होत नाहीं इतक्यानें च आमचें समाधान होऊं नये. म्हणजे व्यवस्था आणि सामाजिक शांतता, इतका च आदर्श अपूर्ण आहे. ज्याला आज ‘समृद्धि’ म्हणजे जीवनमान वाढविणें म्हणतात ती हि पुरेशी नाहीं, येथवर माझें म्हणणें आहे. जीवनमान वाढविण्याचा प्रयत्न त्यांनीं अवश्य करावा, परंतु तें पुरेसें नाहीं. हिंदुस्थानचें जीवनमान फार घसरलें आहे. त्याला वर न्यावयाचें आहे हें योग्य आहे, परंतु आमच्या देशासमोर परमेश्वरानें जें कार्य ठेवलें आहे तें पाहिल्यास ही फार लहान वस्तु आहे असें वाटतें.

शेंवटीं आमच्यासाठीं मुख्य वस्तु कोणती असायला हवी? या प्रसंगीं मी जुना च शब्द उपयोगांत आणीन ‘**अभयम्.**’ आमच्या राज्यांत अभय असलें पाहिजे. हिंदुस्थानच्या राज्यशास्त्रांत हा एक फार च महत्त्वाचा शब्द आहे. प्रजेंत अभय असावयाला पाहिजे असें त्यांत लिहिलें आहे. हिंदुस्थानच्या पारमार्थिक भाषेंत हि ‘अभय’ शब्द महत्त्वाचा आहे ही विशेष गोष्ट आहे. गीतेमध्यें सर्वांत श्रेष्ठ असें स्थान अभयाला दिलें आहे हें आपणांस माहीत असेल. मनुष्य नेहमीं निर्भय असला पाहिजे, ही च पारमार्थिक दृष्टि येथें राहिली आणि येथील राज्यशास्त्राची हि दृष्टि ही च राहिली. साधारण शांततेनें कांहीं थोडासा सुखवृद्धीचा प्रयत्न होऊं लागला असला तरी हि जेथें निर्भयता नसेल तेथें आम्हीं आपलें काम केलें नाहीं असें च मी म्हणेन. आज जग जितकें भयभीत झालेलें आहे, तितकें पूर्वीं कदाचित् केव्हां हि तें नव्हतें. आज सर्व च राष्ट्रें भयभीत आहेत. अशा स्थितींत जो व्यक्तिगत आणि सामाजिक रीतीनें सुद्धां निर्भय असेल तो च जगाला वांचवील.

जर आम्ही सामाजिक अभय स्थापन करूं शकणार नसूं तर माझ्या दृष्टीनें राज्य आणि सरकार यांची कांहीं आवश्यकता नाहीं. मी कुणाला दोष देत नाहीं. स्वराज्यानंतर भारतांत किती वेळ गोळीबार झाला हें आपण पाहिलें. याहून हि अधिक गोळीबार होऊं शकला असता पण आम्हीं

तो कमी केला असें आपण म्हणूं शकतों, ही दुसरी बाब आहे. ज्यांनीं गोळ्या चालविल्या त्यांना मी दोष देत नाहीं. त्यांनीं कर्तव्यबुद्धीनें आणि पुष्कळ च तटस्थ बुद्धीनें काम केलें. परंतु गोळीबार झाला याचा अर्थ इतकाच कीं अद्याप समाजांत पूरें अभय आलेलें नाहीं. म्हणून भयनिराकरण करणें हें राज्यसंस्थेचें प्रथम कार्य आहे.

## देशांतील भयस्थानें नाहींशीं करावींत

आपल्या देशांत अधिक भयाचीं स्थानें कोणतीं आहेत ? (१) प्रजेंतील अत्यंत दारिद्र्य आणि (२) प्रजेंत एक-रसता नसणें. हीं दोन्ही फार मोठीं 'भयस्थानें' आहेत. म्हणून हीं दोन्ही भयस्थानें नाहींशीं करण्यांत यावीं अशी आशा राज्यसंस्थेकडून राखण्यांत येईल. त्यासाठीं च सर्वांत गरीब, सर्वांत खालील थरांतील मनुष्याला मदत मिळत आहे, असें दर्शन स्वराज्यप्राप्तीनंतर सर्वप्रथम व्हावयाला पाहिजे होतें. जसें पाणी कोठून हि धांव घेवो तें समुद्राला भरण्यासाठीं च धांवतें, समुद्राला भरण्यासाठीं च तें वाहतें, त्या प्रमाणें सरकार आणि जनतेच्या सर्व च संस्था दुःखी लोकांचीं दुःखें निवारण करीत आहेत, असें दिसावयाला पाहिजे होतें.

राष्ट्रांत जीं कांहीं चांगलीं कामें होत आहेत त्यांतील कितवा भाग गरिबांकडे पोंहचतो हें मला सांगा असा एक सहज प्रश्न मीं राज्यकर्त्यांपुढें ठेवला होता. देवाला 'विश्वनाथ' आणि 'जगन्नाथ' म्हणतात. कारण तो सर्वांचा पालनकर्ता आहे. तरी हि त्याचें विशेष नाम दीनानाथ – दीनांचा पालनकर्ता – हें आहे. आमची राज्यसंस्था दीनानाथ झाली पाहिजे. परंतु होतें मात्र त्याहून उलट. गांवांत वीज येते ती सर्वसामान्य लोकांसाठीं नसते– "बाबा गांधीजींचा चेला आहे, ग्रामोद्योग इत्यादि त्याला हवे, त्या अर्थीं त्याला वीज इत्यादि चालायची नाहीं" असें कांहीं लोकांचें मत आहे. मी त्यांना म्हणतों, मला तर ॲटमिक एनर्जी सुद्धां पाहिजे – ती वीज प्रथम कुणाकडे पोंचते याचा तर विचार करा. आधीं मोठ्या शहरांत जाते, नंतर ती खेड्यांत जाते. खेड्यांत हि जो ती वीज घेऊं शकतो, अर्थात् ज्याच्याजवळ पैसा आहे, त्याला ती आधीं मिळते. त्याचा परिणाम हा होतो कीं कांहीं लोकांचा तो धंदा होतो.

जीं खेडीं दूर आहेत तेथें तर वीज पोंचत च नाहीं. गरिबांकडे वीज गेली तरी ती निरुपद्रवी प्रकाशाच्या रूपानें जाणार, उत्पादनासाठीं जावयाची नाहीं. परंतु सूर्यनारायण याहून अगदीं उलट काम करतो. तो उगवतो तेव्हां त्याचा प्रकाश सर्वांत आधीं ज्या झोपडीला दरवाजे नाहींत त्या झोपडींत जातो. मग तो शहरांत प्रवेश करतो आणि सर्वांत शेवटीं मोठमोठ्या हवेल्यांत जातो. जे लोक आपलीं घरें सोडून मोकळ्या शेतांत जातात त्यांच्या साह्यासाठीं सूर्यनारायण तावडतोब तेथें पोंचतो सूर्यनारायण उघड्या नागड्यांची जितकी सेवा करतो तितकी कपडे घातलेल्यांची करीत नाहीं. सर्वांत आधीं त्याची ज्याला आवश्यकता आहे त्याला तो साह्य पोंचवितो ही त्याची खुबी आहे. अशा च रीतीनें आम्हांला वीज हवी आहे. परंतु ती त्या गरिबाजवळ केव्हां पोंचेल हा च प्रश्न आहे.

आतां तर मी गांवोगांव फिरत आहें आणि गरिबांचीं दुःखें पाहत आहें. जे कम्युनिटी प्रॉजेक्ट चालवितात ते हि मला भेटतात. नुकते च मला डे साहेब भेटले होते. ते हि सांगत होते कीं जे आपल्या बुद्धिशक्तीनें आमची मदत ओढून घेऊं शकतात त्यांच्या च कडे ती जाते. तसेंच जे 'सिक्युरिटी' देतात त्यांना च सरकार आणि कम्युनिटी प्रॉजेक्टकडून हि मदत मिळते. शंकराबरोबर विवाह करावयाला कोण तयार होणार ? तो तर सर्व प्रकारें दरिद्री आहे. त्याच्याबरोबर विवाह करायला पार्वती माता च तयार झाली. परंतु आज तर सर्व कन्यांचे वडील लक्ष्मीवंत वर पाहून च आपल्या कन्या त्यांच्या घरीं पोंचवितात. जो दरिद्री भगवान् आहे त्याच्या घरीं आपली कन्या पोंहचवायला कोण तयार आहे ? असा जो कोणी तयार होईल तो च भयाचें एक स्थान टाळूं शकेल. असें दर्शन मला आपल्या देशांत कोठेंच होत नाहीं. यांत मी कुणाला दोष देत नसून आमचें कर्तव्य काय आहे त्याकडे आपली दृष्टि खेंचूं इच्छितों.

'पंचवार्षिक योजने'ची एक प्रत माझ्याकडे आली आहे आणि त्यावर मीं माझा अभिप्राय द्यावा असें मला सांगण्यांत आलें आहे. मी म्हणालों, 'मी त्याची भाषाच समजूं शकत नाहीं. मी समजूं शकतों अशी त्याची भाषा असती तर कांहीं अभिप्राय देतां आला असता.' त्यावर त्यांनीं मला विचारलें, तुम्हांला काय समजलें नाहीं ? मीं म्हटलें, 'कस्तुरबा ट्रस्टचें कार्य, जेथें

लोकसंख्या दोन हजारांहून कमी असेल अशा गांवीं चालावें असें बापू म्हणाले होते. असें म्हणण्यांत शहरवासीयांचा बापूंना द्वेष होता काय ? जो सर्वांत दुःखी अवयव आहे त्याच्याकडे सर्वांत आधीं मदत पोंहचली पाहिजे, हा त्यांतला हेतु होता. त्या प्रमाणें इतकी सर्व रक्कम जी तुम्ही खर्च करून राहिला आहांत ती अशा लहान लहान गांवीं खर्च होत आहे, ही गोष्ट पंचवार्षिक योजनेंत असती तर ती भाषा मी समजूं शकलों असतों.' एक प्रसिद्ध कथा आहे. नदींत पाणी किती आहे असें विचारण्यांत आलें होतें. चार फूट कीं तीन फूट निर्णय कांहीं होऊं शकत नव्हता. म्हणजे तेथें भय आहे किंवा नाहीं हें कुणीं सांगूं शकत नव्हता.

आम्ही तुरुंगांत होतों. राजकीय कैद्यांचीं वजनें कमी झालीं. फार ओरड झाली. या प्रकारें वजनें कां उतरलीं अशी वरून विचारणा आली. मग जेलरनें सर्वांचीं वजनें घेतलीं. हिशेब करून असें लक्षांत आलें कीं तुरुंगांतील राजकीय कैद्यांचें वजन सरासरी एका पौंडानें वाढलें आहे. सरासरी एक पौंड वजन वाढलें हें उघड च होतें. परंतु त्यांत शेंकडों कैद्यांचें वजन उतरलें होतें. या प्रकारें भय आहे किंवा नाहीं याचा कसला हि निर्णय सरासरीनें होत नसतो.

सारांश, दुःखितांना कशा प्रकारें मदत पोंचविली जात आहे हें लक्षांत येईल तेव्हां च ठीक होईल. हें जोंवर होणार नाहीं तोंवर जनतेंत अभय येणार नाहीं. नुकते च मुंबईमध्यें दंगे झाले. मला त्यांचें मुळीं च आश्चर्य वाटलें नाहीं. उलट इतके कमी दंगे कसे झाले याचें च आश्चर्य वाटलें. मुंबईत लाखों लोक आपलें जीवन फुटपाथवर घालवितात. असें असून हि इतकी शांतता तेथें कशी आहे याचें च आश्चर्य वाटायला पाहिजे. आतां, कांहीं हि निमित्त झालें कीं दंगा होतो. त्यांत निमित्त मुख्य नसून दुःखितांना मदत मिळाली पाहिजे, ही मुख्य वस्तु आहे. या गोष्टीकडे आमचें ध्यान गेलें पाहिजे.

## एकरसतेसाठीं नई-तालीम हवी

आपल्या जनतेंत एकरसता नाहीं ही दुसरी बाब आहे. याचीं अनेक कारणें आहेत. हा देश अनेक मानववंशांचा बनलेला आहे त्यामुळें इतकी

एकरसता एकदम येऊं शकणार नाहीं. तरी हि तें देशाचें एक भयस्थान आहे, हें लक्षांत घेऊन हा सारा छिन्न विच्छिन्न समाज एकरस कसा करतां येईल याची राज्यकर्त्यांनीं चिंता केली पाहिजे. देशाचें शिक्षण बदलणें हा च त्यावर उपाय आहे. आमच्या देशांत राज्य बदललें परंतु शिक्षण बदललें नाहीं याचें च मला आश्चर्य वाटतें. मीं तर त्या च दिवशीं सांगितलें होतें कीं आज जुनें राज्य गेलें तेव्हां जसा जुना झेंडा एका क्षणासाठीं हि टिकूं शकत नाहीं, तसें जुनें शिक्षण सुद्धां एकदम बंद झालें पाहिजे. परंतु तें जुनें शिक्षण आजवर चालू आहे. इंग्रजांना राज्य चालविण्यासाठीं थोड्या लोकांची नोकर म्हणून आवश्यकता होती म्हणून त्यांनीं आपली विद्या येथें दिली हें स्पष्ट आहे. परंतु त्याचा परिणाम असा झाला कीं ज्यांना तें शिक्षण मिळालें ते जनतेपासून अगदीं दूर झाले आणि त्यांच्यांत व जनतेंत एक भिंत उभी राहिली. आज हि ती च विद्या चालू आहे. अशा स्थितींत समाजांत एकरसता कशी येईल ?

सारांश, आज जे अत्यंत दु:खी आहेत त्यांना प्रथम मदत मिळाली पाहिजे, सर्व प्रकारचे उच्चनीच भाव नाहींसे करण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत आणि शरीरश्रमावर चालणारें शिक्षण मिळालें पाहिजे. इतकें तुम्ही केलें तर हीं जीं दोन भयस्थानें आहेत तीं नाहींशीं होतील.

१०२५९

कर्नूल, ता. १२-३-५६

## करुणा कशी वाढेल ?

कोणत्या हि देशाचें सरकार आपला देश मजबूत कसा बनेल याचा विचार करीत असते, पण देशांत करुणा कशी वाढेल याची चिंता करीत नाहीं. देशाचें सैन्यबल वाढविण्याच्या गोष्टीचा सर्वजण विचार करतात, पण आपल्या देशांत जर कारुण्याची वाढ झाली तर त्यामुळें जगाला हि शांति लाभेल आणि जगांतली जनता या करुणागुणानें जिंकली जाईल याचा कोणी विचार करतांना दिसत नाहीं. करुणेचा प्रभाव मानवावर किती पडतो ही गोष्ट उघड आहे. येशूख्रिस्तांचें नांव कोट्यवधि लोक घेत आहेत. ते केवळ त्याच्या करुणा-गुणामुळें. बुद्ध भगवानांचा जयजयकार करणारे चाळीस कोटि लोक या जगांत आहेत, याचें हि कारण त्यांच्या करुणागुणामुळें च लोकांना त्यांची आठवण

येते. आज कोटयवधि लोकांच्या मनावर, त्यांच्या जीवनावर व मरणावर हि कोणत्या एका गोष्टीचा अधिकांत अधिक प्रभाव असेल तर तो करुणेचा आहे.

करुणेचा प्रभाव लपलेला नाहीं. तरी हि सर्व राष्ट्रांचीं सरकारें राष्ट्राच्या संमतीनें जें राष्ट्रीय नियोजन करतात आणि देशाला मजबूत करण्याच्या गोष्टी बोलतात तेव्हां ते करुणेचा प्रचार करीत नाहींत तर सैनिक शक्तीचाच प्रचार करतात. पाकिस्तान सरकारचा आपल्या उत्पन्नाचा शेंकडा ७०टके खर्च सैन्यावर होतो. त्यामुळें आपलें राज्य बळकट होईल असें त्यांना वाटतें. हिंदुस्थानचे लोक हि सरकाला विचारतात कीं तुम्ही आमच्या संरक्षणाकरितां आणि देश मजबूत करायला काय करीत आहां ? आमचे पुढारी हि सांगतात कीं 'आम्ही हि जागरूक आहोंत, या प्रश्नाबाबतींत स्वस्थ बसलेलों नाहीं. परंतु केवळ तात्कालिक दृष्टि ठेवून काम करणें उचित नाहीं. जरा दूर दृष्टि हि ठेवली पाहिजे. देशसेवेचीं दुसरीं हि कामें आहेत त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. सैन्याकडे हि लक्ष द्यावें लागतेंच.' आमच्या पुढाऱ्यांच्या मनांत करुणेविषयीं फार आदर आहे असें असून हि वरील प्रकारचें उत्तर त्यांना द्यावें लागत आहे.

## पाकिस्तानच्या वाढत्या सैन्यशक्तीला उत्तर : १० :

सांप्रत सर्व च देश एकमेकांशीं अति निकट अशा संपर्कांत आले आहेत. इकडील हवा तिकडे आणि तिकडील हवा इकडे ताबडतोब पसरते. मला यांत कांहीं भय वाटत नाहीं. कारण जसें विदेशांतील वारे इकडे येऊं शकतात तसे येथील वारे हि ताबडतोब विदेशांत जाऊं शकतात. हें तर आमच्या हातांत प्रचाराचें मोठें च साधन आहे. त्यामुळें आम्हीं आपल्या देशांत जर एक वातावरण तयार केलें तर साहजिक च त्याचा परिणाम सर्व जगावर होईल.

### आम्हीं स्वतंत्र बुद्धीनें विचार करावा

परंतु आम्हीं आपली बुद्धि स्वतंत्र ठेवली नाहीं तर विदेशी वातावरणाचा परिणाम हि तितका च लवकर आमच्यावर होईल. म्हणून आम्हीं आमची

बुद्धि स्वतंत्र आणि स्थिर ठेवली पाहिजे हा च सर्वांत मुख्य विचार आमच्या देशासमोर असावा. आम्हांला स्वराज्य मिळालें आहे, तेव्हां येथील प्रत्येक नागरिकानें स्वतंत्र बुद्धीनें विचार करण्यांत त्याचें सार्थक आहे. देशाची स्थिति, परंपरा इत्यादिकडे पाहून आपल्या देशासाठीं आपल्या च पद्धतीनें विचार केला पाहिजे परंतु जिथल्या लोकांनीं हिंसेला च अंतिम आधार मानलें असेल तिथें अभिक्रमणशक्ति ( इनिशियेटिव्ह ) कुणाच्या च हातीं राहू शकत नाहीं.

आज अमेरिका आणि रशिया यांना एकमेकांचें भय आहे. तसें सर्व जगांत च भय पसरलेलें आहे. लहान मोठे सर्व च देश भयानें व्याप्त आहेत. कोणता हि देश आपल्या मनासारखी योजना बनवूं शकत नाहीं. प्रत्येक जण दुसऱ्याला शस्त्रास्त्रें वाढवितांना पाहून स्वतः हि शस्त्रास्त्रें वाढविण्याच्या नादाला लागतो. पाकिस्ताननें अमेरिकेबरोबर मैत्री केली आहे. मैत्री तर सर्व जगाशीं केली पाहिजे. परंतु ही जी मैत्री आहे ती सैनिक मदत मिळविण्यासाठीं करण्यांत आली आहे. पाकिस्तान शस्त्र-बल वाढवीत आहे तर आतां हिंदुस्थानला आपण हि शस्त्रबल वाढविलें पाहिजे असें वाटत आहे. "आपण सावध आहां कीं नाहीं? आपणांला हि शस्त्रास्त्रांनीं सज्ज झालें पाहिजे. जर अमेरिकेकडून मदत मिळाली नाहीं तर रशियाकडून मदत घेतली पाहिजे" असे पार्लमेंटमध्यें प्रश्न विचारले जातात आणि सूचना करण्यांत येतात. यावर उत्तर देणारे उत्तर देतात, "बंधूंनो, आम्ही सावध आहों." त्यांना हें माहीत आहे कीं आपली शक्ति वाढवावी लागेल. तरी हि देशांत एक चांगली योजना चालली आहे तर तींत बाधा टाकण्याची जरूर नाहीं. कारण त्यानें बळ च मिळतें. त्यामुळें "शस्त्रास्त्रें वाढविण्याबाबतींत आम्ही सावध आहों आणि आमच्या जबाबदारीचें हि आम्हांला भान आहे" असें ते सांगतात.

### देशाच्या वाणींत शक्ति कशी येईल

'हिंदुस्थानशीं युद्ध करण्याची आमची मनीषा नाहीं. आम्ही कोणता हि प्रश्न वाटाघाटींनीं सोडवूं इच्छितों. तरी हि सैन्यबल वाढलें तर शक्तीसह बोलतां येतें आणि बोलण्यास बळ हि येतें' असें पाकिस्तान म्हणतें. परंतु

त्याला उत्तर म्हणून हिंदुस्थान हि शक्तीसह वाटाघाटी करण्यासाठीं शस्त्रास्त्र-बळ वाढवील तर याचा कांहीं अंत च लागणार नाहीं. 'आम्ही निर्भय आहों, आणि आम्हांला शस्त्रास्त्रांच्या बलाची कांहीं जरूरी नाहीं' असें स्वतः सांगण्याची शक्ति वास्तविक आपल्या देशांतील जनतेंत असायला पाहिजे. 'आम्ही पाकिस्तानबरोबर शक्तीसह वाटाघाटी जरूर करूं इच्छितों परंतु आमच्या वाणीची शक्ति वाढावी म्हणून आज जितकें सैन्य आहे त्याच्या अर्धें तें करून टाका. भीति म्हणून त्याच्यावर जितका खर्च करीत होतों तितका करूं नका. भीति सोडून द्या. कारण शेजारचा देश भिऊं लागला आहे, सैन्य वाढवूं लागला आहे. अशा देशाशीं सामना करण्यासाठीं आम्हांला आपली शक्ति वाढविली पाहिजे असें आम्हांला वाटतें. त्यासाठीं आम्ही आपलें सैन्यबळ आणि शस्त्रशक्ति कमी करूं म्हणजे आमच्या वाणींत जोर येईल.' असा सल्ला आपल्या प्रधानमंत्र्यांना देण्याची आमची तयारी आहे?

## पाकिस्तानशीं बोलणें करण्यासाठीं शस्त्रत्याग

'तुम्ही पाकिस्तानशीं वाटाघाटी करायला गेलां तर काय तयारी ठेवाल?' असें मला कुणीं विचारलें. मीं म्हटलें, 'जोंवर मी सैन्यबळ संपवीत नाहीं तोंवर त्यांच्याशीं बोलण्याची शक्ति च माझ्यांत येत नाहीं.' वास्तविक वाटाघाटींची शक्ति तर बुद्धीमध्यें असते आणि जोंवर आम्ही शस्त्रबळावर भरवंसा ठेवतों तोंवर ती बुद्धि येत नाहीं. अहिंसेच्या शक्तीवर माझा विश्वास नसेल तोंवर माझ्या भावाला जिंकण्याची शक्ति मला प्राप्त होऊं शकत नाहीं. परंतु मी हें जेव्हां, बोलतों तेव्हां हा माणूस एक तर फार जुना नमूना असेल अथवा चार हजार वर्षांच्या नंतरचा नमूना असेल असें लोकांना वाटतें.

परंतु आज जरी त्यांना हें वेडपटाचें बोलणें वाटत असलें तरी कोठें ना कोठें कोणत्या तरी देशांत दुसऱ्याकडे न पाहतां आपलें शस्त्रबळ कमी करण्याची शक्ति अवश्य आली पाहिजे. ती शक्ति आज नसेल तर उद्यां येईल, आणि उद्यां यावी यासाठीं योजना आज झाली पाहिजे. जर आम्ही पाकिस्तानच्या भयानें शस्त्रसेना वाढविण्याच्या गोष्टी करूं लागलों तर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें. स्थळप्रत.
वि:
क्रमांक नों. दि.

रशिया, अमेरिका यांना शस्त्रसेना कमी करण्याचें कोणत्या तोंडानें आम्ही सांगूं ? आज आमच्या देशांत ही शक्ति नाहीं हें स्पष्ट आहे. परंतु ती शक्ति यावयाला हवी. ही शक्ति ज्या कुणा देशांत येईल तो देश सर्व जगाचे प्रश्न सोडविण्याचा मार्ग दाखवील. स्वतः वांचेल, आणि जगाला वांचवील. एकूण इतिहास पाहतां ही शक्ति भारतांत येईल असें मला वाटतें. आतां त्या दिशेनें आमचें कर्तव्य काय याचा च विचार केला पाहिजे.

## आंतरिक शांततेसाठीं हिंसेचा प्रयोग होऊं नये

आज आपल्या देशांत कितीतरी घटना घडत आहेत. पाकिस्तान सैन्यबळ वाढवूं लागला आहे आणि आम्हांला शस्त्रास्त्रबळ वाढविण्याची आवश्यकता वाटूं लागली आहे, ही सर्वांत श्रेष्ठ घटना आहे. याचा उपाय जनतेमध्यें अहिंसक शक्ति वाढविणें हा च आहे. या विषयावर सर्व च राजकीय गटांनीं गंभीरतापूर्वक विचार केला पाहिजे. हिंदुस्थानांत जेवढें समाजसेवेचें काम चालतें त्यांत हिंसेचा प्रवेश असूं नये हें हि त्यांना ठरवावें लागेल, आणि तशी कार्यपद्धति आम्हांला शोधावी लागेल. सर्व संस्था आणि पक्ष यांच्यासमोर मी हा कार्यक्रम ठेवूं इच्छितों कीं आपल्या देशाच्या अंतर्गत रक्षणासाठीं आम्हाला पोलिसाची (सोल्जर) गरज नाहीं एवढें तरी त्यांनीं ठरवावें. जर तुमचे आंतरिक प्रश्न सोडविण्यासाठीं भरपूर पोलीस ठेवण्यांत आले तर परकीयांचा हल्ला तुमच्यावर लवकर होऊं शकतो.

नुकते च पाकिस्तानकडून छुपे हल्ले झाले आहेत. ते योजनापूर्वक झाले नसतील अशी आपण आशा करूं या. परंतु ते योजनापूर्वक झाले असले तरी ती आश्चर्याची गोष्ट नाहीं. कारण जो सैन्य वाढवील तो मधून मधून त्या सैन्याला कांहीं काम देण्याची योजना करील च कीं नाहीं? नॉर्मल स्कूलचें जसें प्रॅक्टिसिंग स्कूल असतें तसे ते प्रॅक्टिस करीत असतील ! हिंदुस्थान कितीसा जागृत आहे हें ते पाहत असतील!

मी त्यांच्यावर हेतूचा आरोप करीत नाहीं, कारण वस्तुस्थिति मला माहीत नाहीं. जर देशांतर्गत शांतता राखण्यासाठीं भरपूर सैन्य लागणार

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें, स्थळप्रत
२/९३२ दि. [illegible]

असेल तर आपल्या देशाला दुसऱ्या देशापासून वांचविण्याला आणखी जास्त सैन्याची आवश्यकता लागेल, इतकें च माझें म्हणणें आहे. म्हणजे देशाची अंतर्गत शांतता आणि परकीय हल्ल्यांपासून देशाला वांचविणें यासाठीं देश सैन्यावर आधार राखूं लागला तर तें सैनिकराज्य समजलें जाईल. जर आपल्या प्रजेला हि भ्यायचें आणि बाहेरच्या प्रजेला हि भ्यायचें, असेंच जर झालें तर मग भ्यायचें नाहीं कोणाला ? म्हणून आम्ही देशांतर्गत शांततेसाठीं हिंसेचा उपयोग करणार नाहीं असा सर्वांनीं निश्चय केला पाहिजे. अंतर्गत शांततेसाठीं हिंसेचा उपयोग करण्याचा प्रसंग आमच्यावर आला तर राज्यकर्ता या नात्यानें आम्ही नालायक आहों, असें च समजायला पाहिजे.

परंतु ही एकपक्षीय गोष्ट नाहीं, कारण सरकार जनतेचें प्रतिबिंब आहे. म्हणून कांहीं झालें तरी आपल्या देशाचे प्रश्न सोडविण्यासाठीं आम्ही कधीं हि सैन्यबळाचा उपयोग करणार नाहीं, त्यासाठीं पोलीस, सैन्य आम्ही उभे करणार नाहीं, असा जनतेचा हि निश्चय झाला पाहिजे. हा निश्चय सर्व च पक्षांकडून झाला पाहिजे. आज जितके भिन्न भिन्न पक्ष आहेत ते सर्व एक-मेकांशीं वाटाघाटी करायला कधीं हि एकत्र येत नाहींत. प्रत्येक प्रश्नावर हरेक पक्ष वेगळा वेगळा विचार करतात. विवाहादि प्रसंगामध्यें सुद्धां ते एकमेकांच्या घरीं जात नसावेत, असें मला वाटतें. असें कां ? सर्वांच्या च चित्तांत जर देशाचें हित हाच एक विचार आहे तर त्याच्या चर्चेसाठीं सर्वांनीं एकत्र कां जमूं नये ?

आजकाल विश्वशांतीची बाब सर्वमान्य झाली आहे. कम्युनिस्ट सुद्धां विश्वशांतीच्या गोष्टी बोलतात. तर ते हि या विषयावर चर्चा करण्यासाठीं एकत्र येऊं शकतात. ही गोष्ट आपल्या देशांत आजच्या स्थितींत अत्यंत आवश्यक आहे.

## लहान हिंसेंत श्रद्धा ठेवणें सर्वांत अधिक भयानक

कोणताहि प्रश्न सोडविण्यासाठीं आम्ही ' अशांततामय पद्धतीचा आवलंब करणार नाहीं ' इतकी च निषेध-प्रतिज्ञा करून चालावयाचें नाहीं, तर प्रश्न सोडविण्यासाठीं शांततामय पद्धति हि त्यांना शोधावी लागेल. जर हिंदुस्थानची सर्व प्रजा कांहीं मुलभूत प्रश्न शांततेच्या मार्गानें सोडवील तर च लोकांचा शांततेवर विश्वास आणि श्रद्धा बसेल. ही श्रद्धा आज निर्माण झालेली नाहीं.

नाहींतर एस्. आर. सी. (प्रांतपुनर्रचना) नंतर दंगे कां झाले असते ? ज्यांनीं ते केले त्यांचा अहिंसेवर विश्वास तर नाहीं, मग काय त्यांचा हिंसेवर विश्वास आहे ? हिंदुस्थान ॲटम बॉंब इत्यादींचा उपयोग करूं शकेल इतकी त्याची शक्ति वाढावी अशी त्यांची इच्छा आहे काय ? अशा मोठ्या हिंसेवर त्यांचा विश्वास नाहीं ही अगदीं उघड गोष्ट आहे. ॲटम बॉंबनें कधीं हि शांतता व्हावयाची नाहीं हें ते मानत असले तरी देखील त्यांचा लहान लहान हिंसेवर विश्वास आहे, ही फार च भयानक वस्तु आहे.

शिक्षकाला ॲटम बॉंब अत्यंत निरुपयोगी वस्तु वाटते. परंतु मुलाला चापट मारण्यावर त्याचा मोठा विश्वास आहे. जें कार्य अध्यापनकलेनें होणार नाहीं तें त्या चापट मारण्यानें होईल अशी त्याची श्रद्धा आहे. आईच्या हातीं एक निर्दोष मूल आलें. आईच्या उदरांतून कुणा बालकाचा जन्म झाला. आई बाळाला म्हणते, 'तो पहा चांदोबा' मूल पाहतें आणि तो चंद्र च आहे असा विश्वास ठेवतें. अशा विश्वास ठेवणाऱ्या मुलाला सुद्धां ठोकण्यांत आई-बापांना श्रद्धा आहे. ते लोक मोठ्या भयानक हिंसेला तर भितात आणि त्यांना त्यांत विश्वास हि नसतो, परंतु ही जी लहान हिंसेंत त्यांची श्रद्धा आहे, ती फार घातुक आहे.

### सैन्य वाढवायचें असेल तर लोकांना उपाशी मारावें लागेल

१९४२ च्या आंदोलनांत हिंदुस्थाननें घातपाती पद्धतीनें इंग्रजांना येथून घालविलें असें कांहीं लोक म्हणतात. उलट हिंसा आणि अहिंसा दोन्ही मिळून काम झालें असें कांहींजण म्हणतात. तूप-साखरेंत पीठ मिसळलें कीं लाडू होतो, तसें हिंसा, अहिंसा, आणि कांहीं युक्ति अशा तीन प्रकारांनीं काम होत असतें असें कांहींचें म्हणणें आहे. १९४२ च्या आंदोलनांत या च गोष्टींचा अभ्यास झाला होता. म्हणून च एस. आर. सी. नंतर असले प्रकार झाले. परंतु आम्हांला आतां लहान हिंसेवरील विश्वासांतून सर्व प्रकारें मुक्त व्हावयास पाहिजे.

आम्ही उपाशी मरायला तयार आहों परंतु देशाचें संरक्षण मजबूत करूं असें पाकिस्तानचे एक मुख्य मंत्री बोलले होते. ही तर बोलण्याची एक

भाषा झाली. देशाच्या संरक्षणासाठीं तो स्वत: उपाशी मरायला तयार होता असा का याचा अर्थ आहे? त्याचा अर्थ आम्ही आमच्या देशांतील गरिबांना उपाशी मारायला तयार आहों परंतु देशाच्या संरक्षणाची उपेक्षा करायला तयार नाहीं, हा च आहे. आज तेथें ७० टक्के खर्च सैन्यावर होत आहे. आमच्या येथें सुद्धां ५० टक्के होत च आहे. आतां सैन्यावर च इतका खर्च होतो तेव्हां गरिबांसाठीं काय शिल्लक राहणार? मग जेव्हां गरिबांत असंतोष पसरतो तेव्हां त्यांना समजविण्यांत येतें, 'मूर्खांनो कळत कसें नाहीं तुम्हांला! अरे, हिंदुस्थानपासून आपल्याला भय आहे, म्हणून आपल्या देशाची ही वाईट स्थिति आहे.' उपाशी लोकांना अन्न मिळत नाहीं तेव्हां हिंदुस्थानच्या द्वेषाचें अन्न त्यांना पुरविण्यांत येतें. मग सैनिक बनून ते कधीं कधीं हिंदुस्थानवर हल्ला करण्याचा विचार करतात. अशा प्रकारचा द्वेष आपल्या देशांत असावा कीं जेथें सैनिकराज्य आहे त्या देशांत तो असावा? म्हणून सैन्य-शक्ति आपण वाढविली तर आम्ही वाघ नव्हे तर मांजर बनूं. सैन्य वाढवावयाचें झालें कीं गरिबांना दडपावें लागेल, ग्रामोद्योगांना उत्तेजन न देण्याचें ठरवावें लागेल, यंत्रोद्योग वाढवावे लागतील, शिपायांच्या खुशामतीसाठीं सर्व गोष्टी कराव्या लागतील आणि रशियाचें गुरुत्व पतकरावें लागेल. मग आपल्या देशाचें स्वत्व च काय राहिलें?

## कर्तव्याच्या चार गोष्टी

त्यासाठीं आम्हांला या चार गोष्टी कराव्या लागतील. (१) सरकार किंवा जनतेकडून हिंसा होऊं नये हा निश्चय. (२) आम्हीं आमचे मुख्य मुख्य प्रश्न सरकार-निरपेक्ष जनशक्तीनें सोडवावे. (३) देशांत शिक्षण-स्वातंत्र्य असावें. आणि (४) आजची निवडणूकीची पद्धति बदलावी. आजच्या पद्धतीनें गरिबांचा उद्धार कधीं हि व्हावयाचा नाहीं. आज निवडणुकींत त्यांचें कांहीं स्थान च नाहीं. त्यामुळें जातिभेद च वाढत आहे. याखेरीज ज्या माणसाला पाहिलें नाहीं, ज्याची ओळख नाहीं, असा माणूस उभा राहतो आणि त्याला मत द्यावें लागतें. या प्रकारें या निवडणुकींत त्रिदोष आहेत. मनुष्याला त्रिदोष झाला म्हणजे त्याच्या वांचण्याची आशा राहत नाहीं. म्हणून ही निवडणुकीची पद्धति हि बदलली च पाहिजे. गांवांत

प्रत्यक्ष पद्धतीनें निवडणूक झाली पाहिजे आणि वरच्या निवडणुकी अप्रत्यक्ष पद्धतीनें व्हाव्या. तेव्हां च गरिबांचा उद्धार होईल.

**आडोणी**, (आंध्र) २४-३-५६

## नैतिक शक्तीनें च लढावयाचें आहे

हिंदुस्थानचें सैन्य शस्त्रास्त्रसज्जित अशा रशिया आणि अमेरिका यांच्याशीं सामना करील असें तुम्हांला वाटतें काय ? नाहीं, आम्हांला देशाचें संरक्षण शस्त्रानें नव्हे, निर्भयता, नीतिमत्ता आणि एक्य यांनीं करावें लागेल. भौतिक दृष्टीनें संपन्न होऊं शकेल इतका आमचा देश मोठा नाहीं. तो नीतिमत्तेनें च संपन्न होऊं शकतो. ज्या देशाजवळ माणसागणिक एक एकर हि जमीन नाहीं, असा देश भौतिक शक्तीनें दुसऱ्या देशांची बरोबरी कशी करणार ? परंतु आमची सेना ही देवसेना असणार तिचा एक एक वीर लाखों लोकांना भारी होईल. एकटा हनुमान लंकेंत गेला आणि त्या राक्षस-नगरीला भस्म करून आला. अंगद एकटा गेला परंतु रावणाचें आसन त्यानें डळमळविलें. ती शक्ति कोणती होती ? ती दुसरी कोणती हि शक्ति नव्हती, केवळ नैतिक शक्ति होती. हिंदुस्थानला यापुढील लढाया त्या च शक्तीनें लढाव्या लागतील.

### ऐक्याची आवश्यकता

त्यासाठीं हिंदुस्थानांत ऐक्य असावयाला पाहिजे. शिपायाच्या मनांत, मी जनसेवक आहें, भारतीय आहें, ही भावना असावयाला पाहिजे. मी अमुक धर्माचा आहें, मी अमुक जातीचा आहें, अमुक भाषेचा आहें अशी संकुचित भावना त्यांत असू नये. धर्मभेद, जातिभेद इत्यादींच्या लहान लहान कल्पना शिपायाच्या मनांत असल्या तर तो शिपाई संपला च. शिपाई तर भारतीयतेची मूर्ति असला पाहिजे. त्याचें या प्रकारचे गुण असावयाला पाहिजेत कारण यापुढें नैतिक लढाई लढावयाची आहे. नुकती च भारतीय सेना कोरियाला गेली होती. ती तेथें नैतिक शक्ति घेऊनच गेली होती. ही तर तुमच्या समोरची च घटना आहे. यापुढें हि जग हिंदुस्थानच्या मदतीची इच्छा करील, ती दुसऱ्या प्रकारच्या भौतिक मदतीची नव्हे तर नैतिक मदतीची च इच्छा करील. म्हणून आमचे सैनिक आदर्श नीतिमान् पुरुष असले पाहिजेत.

**आवडी,** (मद्रास), ता. १५-५-५६

## कायद्यानें जनशक्ति निर्माण होत नाहीं

जपानहून एक पत्र आलें आहे. त्यांत पांच माणसांच्या सह्या आहेत. त्यांत त्यांनीं जपानचें वर्णन लिहिलें आहे. दुरून जे जपानची प्रशंसा ऐकतात, त्यांना जवळ गेल्यावर तेथील खरें चित्र पहावयाला मिळतें. तेथें कायद्यानें जमीन वांटून देण्यांत आली आहे, परंतु मालक आणि मजूर यांच्यांत कटुता निर्माण झाल्यामुळें शक्ति निर्माण होत नाहीं. परंतु इथें आमचा उद्देश तर समाजांत शक्ति निर्माण व्हावी असा आहे. स्वराज्यानंतर लोक जास्त परतंत्र झाले. प्रत्येक गोष्टींत आम्ही सरकारवर च अवलंबून राहूं लागलों आहों. सामाजिक, धार्मिक किंवा कौटुंबिक, कसलीं हि कामें असोत तीं सरकारनें करावीं आणि आम्हीं कांहीं करूं नये, अशी स्थिति झाली आहे. जी जनता सरकारवर इतकी अवलंबून राहील ती शक्तिमान् कशी होईल ? कायद्यानें प्रश्न सुटेल परंतु शक्ति वाढणार नाहीं. वास्तविक लोकांना आत्मशक्तीचें भान झालें पाहिजे. लोक जेव्हां एखादा प्रश्न सोडवतील तेव्हां च त्यांना आत्मशक्तीचें भान होईल

## 'पॉवर' पॉलिटिक्स आणि 'स्ट्रेंग्थ' पॉलिटिक्स

तुमच्या भूदानांत जितके लोक आहेत त्यांची परीक्षा १९५७ च्या निवडणुकींत होईल असें कांहीं लोक मला म्हणतात. तेव्हां किती लोक टिकतील आणि किती निवडणुकींत जातील हें कळेल असें त्यांचें म्हणणें. निवडणुकींत जाणें पाप नाहीं. तें काम वाईट नाहीं. परंतु जे लोक या कामांतून तिकडे जातील ते जनशक्तीची बाजू गमावून बसतील यांत कांहीं शंका नाहीं. 'पॉवर पॉलिटिक्स' एक वस्तु आहे आणि 'स्ट्रेंग्थ पॉलिटिक्स' दुसरी, ही गोष्ट लक्षांत घ्यावयाला पाहिजे. हे लोक 'पॉवर पॉलिटिक्स'च्या मागें जातात परंतु 'पॉवर'मध्यें 'स्ट्रेंग्थ'चा क्षय होतो. 'स्ट्रेंग्थ' निष्काम-सेवेनें वाढते. जे उत्तमांतील उत्तम सेवक पॉवरमध्यें गेले आहेत, त्यांची शक्ति वाढली आहे कीं घटली आहे हें जरा चिंतनपूर्वक पहा. शास्त्रांत लिहिलें आहे, तपश्चर्या

केल्यानंतर इंद्रपद प्राप्त होतें, पण त्या च दिवसापासून त्याच्या क्षयाचा आरंभ होतो. '**क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति**' पुण्याचा क्षय झाल्यानंतर त्याला लाथ मारून मृत्युलोकांत धाडण्यांत येतें. म्हणून आम्ही जनतेंत राहून जर जनतेंत शक्ति निर्माण करूं तर तें वास्तविक 'स्ट्रेंग्थ पॉलिटिक्स' होईल.

रशियांत स्टॅलिनची लोक स्तुति करीत असा एक काळ होता. त्याच्या स्तुतीनें इतिहासाचीं पानें भरलेलीं असत. परंतु आज स्टॅलिनच्या मरणानंतर त्याच्या हाताखालीं काम करणारे लोक च त्याची निंदा करूं लागले आहेत. आतां ते म्हणतात, कांहीं दिवस इतिहास शिकविण्यांत येणार नाहीं कारण नवीन इतिहास लिहावयाचा आहे. पहिला इतिहास चूक होता असें आतां ते नवीन इतिहासांत लिहिणार. आतां या लोकांत कोणती शक्ति निर्माण झाली याचा विचार करा. जें सरकार करील तें च तेथें होणार. म्हणून त्या देशांत स्वातंत्र्य नाहीं, बुद्धीचें स्वातंत्र्य नाहीं, असें आम्हांला वाटतें. इंग्लंड, रशिया, अमेरिका ह्या देशांनीं आपल्या प्रजेचें कल्याण केलें, तरी तेथें जनशक्ति निर्माण होऊं शकणार नाहीं.

भूदानयज्ञ ही जनशक्ति वाढविणारी चळवळ आहे. त्यामुळें यांत राजकारणाचा अभाव नाहीं. तरी हि ही चळवळ आजच्या राजनीतीचें खंडन करणारी आहे. आम्ही आजच्या प्रचलित राजनीतीहून वेगळे राहून नवीन राजनीति निर्माण करूं इच्छितों. त्या नवीन राजनीतीला च आम्हीं 'लोकनीति' असें नांव दिलें आहे. आम्हांला राजनीतीचें खंडन करून लोकनीति निर्माण करावयाची आहे.

## समुद्राचा विरोध नदी करूं शकत नाहीं

'आपण लोकनीति स्थापन करण्याची गोष्ट बोलतां पण तिला हि विरोध करण्याची वृत्ति कोठें कोठें दिसून येते, अशा स्थितींत तुम्ही काय करणार ?' असें कांहींजण विचारतात. लोकनीति ही अशी व्यापक आहे कीं तिला विरोध करणारा च स्वतः पडेल असें यावर माझें उत्तर आहे. त्याची क्षति–हानि होईल. समुद्राचा विरोध नदी करूं शकत नाही. जी नदी असें करील ती स्वतः कोरडी होईल. म्हणून जें काम आम्ही करूं त्याच्या विरुद्ध

दुसरे लोक उभे राहतील ही भीति बाळगण्याचें कारण नाहीं. लोकनीतीची स्थापना अभावात्मक (निगेटिव) नाहीं. आजच्या राजनीतीचें खंडन करून त्याचे दोष दाखवावे असा त्याचा अर्थ नाहीं. आजची राजनीति लोकनीति नसली तरी ती लोकमान्य आहे ही गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे. म्हणून जेव्हां लोक तिला बदलतील, तेव्हां च ती बदलेल. म्हणून आम्ही राजनीतीचे दोष च दाखवीत राहिलों तर आपण आपली शक्ति व्यर्थ खर्च केली असें होईल.

समजा, आम्ही एखादी शाळा चालवीत आहों. ती शाळा आकर्षक झाली तर तेथें पालक आपलीं मुलें पाठवतील आणि त्या च गांवच्या सरकारी शाळेंत कमी मुलें जातील. अर्थात् सरकारी शाळा तेथें चालायची नाहीं. लोकांनीं आपलीं मुलें च पाठविलीं नाहींत तर सरकार काय करील? तें आपली शाळा तेथून काढून घेईल आणि माझ्यावर ताबा मिळविण्यासाठीं एक युक्ति योजील. 'आपली शाळा फार छान चालली आहे, आमच्याकडून आपण दहा हजार रुपयांची मदत घ्यावी' अशी एक चिठ्ठी तें मला लिहील. आणि मीं जर तो पैसा घेतला तर माझें अस्तित्व संपलें. म्हणून मी त्यांना पत्र लिहीन. म्हणेन, 'आमचें सरकार आमच्यावर प्रेम करतें याबद्दल आम्ही सरकारचें फार फार आभारी आहों. परंतु आम्ही जें काम करूं इच्छितों तें सरकारनिरपेक्ष आहे, त्यामुळें आपण जर आम्हांला मदत केली तर आमच्या कामाला धक्का बसेल, म्हणून आम्ही आपली 'ऑफर' स्वीकारूं शकत नाहीं. आवश्यकता असेल तर सल्ला अवश्य घेऊ." या प्रकारें आम्ही पत्र लिहूं तेव्हां च जनशक्ति वाढेल. नाहीं तर आम्ही आमची शक्ति गमावून बसूं.

**मद्रास,** १८-५-५६

## निवडणुकांचा खेळ : १२ :

### अप्रत्यक्ष निवडणूक

कांहीं राजकीय पक्ष माझे विचार कांहीं अंशीं ग्रहण करूं लागले आहेत. हल्लीं अप्रत्यक्ष निवडणुकीची गोष्ट चालू आहे. दोन तीन वर्षांपासून मी त्या-बाबत सांगत आलों आहें. आतां तो विचार कांहीं प्रमाणांत लोक मानूं लागले आहेत. पूर्वीं हि अगदीं च कोणी मानत नव्हते असें नाहीं, परंतु पूर्वीं त्यांना वाटत असे कीं अशा निवडणुकी करणें शक्य नाहीं. पण आतां तशा निवडणुकी होऊं शकतील असें त्यांना वाटत असावें हें हि एक परिवर्तन च होत आहे. तें माझ्या विचारामुळें होत आहे असें नाहीं. संभव आहे जगांत च अशा कांहीं घटना घडत असतील कीं ज्या आपण जाणत नसूं. हल्लीं तर मला अनुभव येत आहे कीं दुनियेमध्यें कांहीं अशी प्रक्रिया चालू आहे, जी मनुष्याला एका विशिष्ट बिंदूवर आणण्याचा प्रयत्न करीत आहे. याचा परिणाम आपण त्यांच्याकडे जात आहों आणि ते आपल्याकडे येत आहेत. म्हणून अमक्यामुळें अमक्याचें विचारपरिवर्तन झालें ही भाषा आणि हा विचार सुद्धां चुकीचा आहे. अप्रत्यक्ष निवडणुका झाल्या पाहिजेत असे विचार ज्यांनीं आज प्रकट केले त्यांचा पूर्वीं कांहीं वेगळा विचार होता असें कांहीं मी समजत नाहीं. संभव आहे कीं पूर्वीं हि त्यांच्या मनांत तो विचार असावा पण कांहीं कारणानें ते तो प्रकट करूं शकले नाहींत आणि आज ते प्रकट करीत आहेत. हें मीं एक उदाहरण दिलें.

धर्मपुरी–सर्वोदयपुरम्, ५-८-५६

### निवडणुकीचा खेळ खेळा

हल्लीं पुष्कळांना प्रत्येक गोष्टींत ‘फाईट’ करण्याची संवय झाली आहे. असें बोललें जातें कीं, पुढील वर्षीं १९५७ मधें निवडणुकींची ‘फाईट’ होईल. मीं कितीतरी वेळां सांगितलें आहे कीं, तुम्ही निवडणूक लढता काय ? निवडणूक खेळली पाहिजे. कुस्ती खेळतां कीं नाहीं ? दोन माण-

सांशिवाय कुस्ती होत नाहीं. तशी ही निवडणुकीची कुस्ती. परंतु काँग्रेसच्या लोकांना या वेळीं अडचण वाटूं लागली आहे. त्यांना वाटतें कीं समोर कुस्तीसाठीं मल्ल च दिसत नाहीं. विरोधी पक्षाशिवाय लोकशाहीचा कारभार चांगला चालणार नाहीं असा आम्हीं सिद्धांत च बनविला आहे. आपणांस जर विरोधी पक्ष हवा असेल तर निवडणुकीचा खेळ खेळला पाहिजे, ती लढतां कामा नये. कुस्तींत जो जिंकतो त्याला बक्षिस मिळतें च पण जो हरतो त्याला हि सन्मानानें नारळ देतात. कारण जर तो हरला नसता तर दुसऱ्याला ५०० रुपयांचें बक्षिस मिळालें नसतें. म्हणून निवडणूका एक खेळ समजून खेळल्या तर त्यांत ज्या वाईट गोष्टी घडतात त्या घडणार नाहींत. ज्यांनीं निवडणूक जिंकली त्यांना राज्यकारभार चालविण्याचें बक्षिस मिळालें व जे हरले त्यांना सार्वजनिक सेवा करण्याचा नारळ ! दोघांना दोन्हींकडून फायदा च आहे.

## पक्षभेदामुळें प्रेम कमी होऊं नये

निवडणुकींत आम्हांला खेळासारखी वृत्ति ठेवली पाहिजे. त्यांत असें झालें पाहिजे कीं आम्ही दोघे भाऊ भाऊ आहोंत. एका च आश्रमांत वा एका च घरांत राहतों, प्रेमानें मिळूनमिसळून काम करतों, बरोबर च खातों पितों. आपली मिळकत हि दोघे जण वांटून घेतों. त्यांत एक सोशॅलिस्ट पक्षाचा आहे तर दुसरा काँग्रेस पक्षाचा. तरी हि दोघे एकमेकांवर अत्यंत प्रेम करतात. निवडणुकींत दोघे हि सामील झाले तर एक सांगेल कीं त्या दुसऱ्याला मत देऊं नका कारण तो चांगला कारभार चालवूं शकणार नाहीं, कारण त्याच्या कल्पना चांगल्या नाहींत. दुसरा हि असें च सांगेल कीं तो चांगली लोकशाही चालवूं शकणार नाहीं कारण त्याचे विचार योग्य नाहींत. अशा प्रकारें ते एक दुसऱ्याविरुद्ध प्रचार करतील. कोणी हि जिंको व कोणी हि हरो पण घरीं जाऊन दोघे एकत्र खातील-पितील आणि प्रेमानें राहतील. अशा प्रकारच्या आनंदांत आणि मनोरंजनांत निवडणूक झाली पाहिजे. मग दोघांपैकीं कोणी हि हरला तर कांहीं हरकत नाहीं.

बिहारमध्यें मीं हें सर्व पाहिलें. बिहारमधील कितीतरी कुटुंबांतून एक काँग्रेसचा, तर दुसरा कम्युनिस्ट, तिसरा सोशॅलिस्ट तर चौथा सर्वोदयवादी असतो. बाप जर काँग्रेसचा असला तर मुलगा अवश्य कम्युनिस्ट असेल.

ते म्हणतात कीं कोणत्या का पक्षाचें राज्य असेना, आपल्या कुटुंबाचें नुकसान होणार नाहीं. कारण प्रत्येक कुटुंबांत हरेक पक्षाचा मनुष्य असतो. हा च आनंद प्राचीन काळीं हिंदुस्थानांत दिसत असे. बाप हिंदु असे तर मुलगा बौद्ध आणि त्याचा भाऊ जैन असे. सर्वजण एकाच परिवारांत प्रेमानें राहत असत आणि आपल्या वेगवेगळ्या धर्मावर विश्वास ठेवीत असत. धर्मविश्वास वेगळा आहे म्हणून प्रेम तोडून टाकण्याची गरज नाहीं. त्या च प्रमाणें राजनैतिक विचार वेगळे आहेत त्याकरितां प्रेमसंबंध तोडण्याची गरज नाहीं. म्हणून निवडणूक लढविण्याची वृत्ति, 'टु फाइट इलेक्शन' हा शब्दप्रयोग अत्यंत वाईट आहे. हा शब्दप्रयोग इंग्रजी भाषेंतून इथें आला आहे. आपल्या देशांत निवडणूक खेळ झाला पाहिजे.

## घर्षणस्थानीं तेल घाला

यंत्रांत 'घर्षण' होणार च. घर्षणाशिवायचीं यंत्रें बनविलीं तर तीं काम च करणार नाहींत. घर्षणाशिवाय यंत्र ढिलें पडेल. त्यांत गति येणार नाहीं. म्हणून किती हि हंसत हंसत निवडणूक खेळलांत तरी सुद्धां त्यांत थोडेंसें घर्षण हें होणार च. अशा वेळीं तुम्ही तेलाची डबी घेऊन तयार रहा. घर्षण होत आहे असें दिसतां च त्यांत तेल घाला. जर तुम्हांला ही कला साधली तर लोक अशी तक्रार करणार नाहींत कीं तुम्ही निवडणुकीपासून अलिप्त राहिलांत. उलट लोक असें च म्हणतील कीं, जर असे थोडे लोक अलिप्त राहिले नसते तर तेल कोणीं घातलें असतें !

## परीक्षक जनता

दुसरी गोष्ट तुम्हांला सांगायची ही होती कीं हिंदुस्थानांतील लोक मोठे परीक्षक आहेत. गाडीवान कसा आहे हें बैल बरोबर ओळखतो. त्याला गाडी चालविणारा जाणता आहे कीं नवशिक्या आहे, हें चटकन् कळतें. आम्ही म्हणतों कीं जनता मूर्ख आहे, पण ती फार बुद्धिवान आहे. ती आम्हां लोकांची अचूक परीक्षा करते. हिंदुस्थानांतील गरीब लोकांची सेवा संतांनीं केली आहे, म्हणून तिला जेव्हां समजतें कीं आम्ही सेवक आहोंत तेव्हां ती संतांच्या कसोटीस उतरेल अशी आमची परीक्षा घेते. लोकांचें जीवनमान खालावलें असलें तरी

विचारांची पातळी उंच च आहे. म्हणून च कार्यकर्ते आणि सेवक यांच्या लहान सहान गोष्टींकडे सुद्धां लोक बारकाईनें पाहतात. त्या करितां आमचें व्यक्तिगत आचरण जितकें निर्मळ आणि स्वच्छ असेल, तितकें च आमचें कार्य लवकर होईल.

गांधीनगर, १८-१०-'५६

## हायड्रोजन बॉम्ब व चाकू

: १३ :

मला विचारलें जातें कीं, " राज्य चालविण्यावर आपला विश्वास नाहीं, फौज, पोलिस इत्यादींची गरज नाहीं असे म्हणतां, अशा स्थितींत जर देशावर बाहेरचें आक्रमण झालें तर देशाचें रक्षण कसें करायचें ?" मी म्हणतों कीं, दुसरा देश आमच्यावर हल्ला करील च कां ? आमच्या देशांत जमीन पुष्कळ आहे व दुसऱ्या देशाजवळ ती कमी आहे, म्हणून जर कोणी हल्ला करील तर त्याला आम्ही प्रेमानें जमीन देऊं. ऑस्ट्रेलियांत जमीन पुष्कळ च जास्त आहे आणि दुसऱ्यांना ते लोक तेथें येऊं हि देत नाहींत, म्हणून झाला तर त्यांचेवर हल्ला होऊं शकतो; पण हिंदुस्थानवर हल्ला होणार नाहीं, कारण हिंदुस्थानजवळ जमीन नाहीं च मुळीं.

गोष्ट अशी आहे कीं, हिंदुस्थानवर अमेरिका किंवा रशिया कधीं हि चढाई करणार नाहींत. जर चढाई झाली च तर ती पाकिस्तानकडून होईल. म्हणजे हा केवळ भावांभावांच्या भांडणाचा प्रश्न झाला. जगांत जितकीं भांडणें होतात, तीं सर्व भावांभावांचीं च भांडणें असतात, शत्रूंचीं नव्हेत. भावांभावांत च एकमेकांवर खटले केले जातात, मित्रावर नाहीं. एखाद्या मित्रानें एखादे वेळीं उपकार केला तर त्याची आठवण आपण जन्मभर ठेवतों, परंतु भाऊ आपलें नेहमीं काम करतो आणि क्वचित एखादे वेळीं त्यानें आपलें ऐकलें नाहीं तर आपण तेवढी च आठवण ठेवतों. म्हणून हीं सर्व भांडणें बंधुभावनेनें च मिटतील, फौजेनें मिटणार नाहींत. जर आम्हीं

फौज वाढविली तर पाकिस्तान हि आपली फौज वाढवील आणि त्यांतून पुन्हां विश्वयुद्धाचा धोका निर्माण होईल. परंतु आज हिंदुस्थाननें हिंमत करून आपलें सैन्य कमी केलें तर त्यामुळें हिंदुस्थानची शक्ति वाढेल व पाकिस्तान हि सैन्यावर व्यर्थ खर्च करणार नाहीं.

परंतु यासाठीं हिंमत पाहिजे. हें भित्र्याचें काम नाहीं. आम्ही भित्रे आहोंत. भित्र्यांजवळ कल्पनाशक्ति नसते. विचार करण्याची गोष्ट आहे कीं आमच्यावर कोणाचा हल्ला होईल. तिकडे तर ॲटम व हायड्रोजनबॉम्ब तयार होत आहेत आणि ते कांहीं आपल्याजवळ नाहींत. तरी आम्ही आपलें म्हणतों कीं आमच्याजवळ निदान एक चाकू तरी पाहिजे च. मित्रांनो, माझा विश्वास आहे कीं, जर हिंदुस्तान आपलें सैन्य कमी करील तर तें जगांत सर्वांत शक्तिशाली राष्ट्र मानलें जाईल, त्यामुळें त्याची नैतिक प्रतिष्ठा वाढेल. मग हिंदुस्थान पाकिस्तानच्या जनतेचें हृदय जिंकील आणि यूनोंत हि त्याची मान उंचावेल.

तिरुपुर ( कोईम्बतुर )
१८-१०-'५६

## राजे नामशेष झालेले नाहींत : १४ :

आजचे मंत्री आणि पूर्वींचे राजे यांत विशेष कांहीं फरक नाहीं. एक जो फरक आहे तो एवढाच कीं पूर्वीं राजा मृत्यूपर्यंत राज्य चालवीत असे, आतां मंत्री पांच वर्षें राज्य चालवितो. पांच वर्षांनंतर तुम्हीं त्याला पुन्हां निवडून द्याल तर तो पुन्हां पांच वर्षें राज्य चालवील. तसा च दुसरा एक फरक असा कीं पूर्वीं राजाचा मुलगा त्याच्यानंतर गादीवर बसत असे परंतु आतां मंत्र्याचा मुलगा बापाचें मंत्रीपद पुढें चालवूं शकत नाहीं. बस्स्, एवढाच फरक आहे, बाकीच्या चौकटींत कांहींच फरक झालेला नाहीं. पांच वर्षेंपर्यंत मंत्र्याची सत्ता पूर्ण चालायची व तो जे कांहीं करील तें व्हायचें.

## आजच्या कालाची गति

या काळांतील पांच वर्षे जुन्या काळच्या पन्नास वर्षांबरोबरचीं आहेत. पूर्वींच्या काळीं राजाचा हुकूम झाल्यावर तो देशांत पोहोंचतां पोहोंचतां च दोन चार वर्षें निघून जात. या अवधींत परिस्थीति बदलल्यास राजा दुसरा हुकूम सोडत असे. पहिल्या हुकुमाचा अम्मल व्हायच्या आंत च दुसरा हुकूम निघे. तो ही गांवोगांव पोहचायला एक वर्ष निघून जाई. त्यामुळें राजे केवळ नाममात्रच होते. ते प्रजेच्या जीवनाचे फार मोठ्या प्रमाणावर नियमन करूं शकत नव्हते. लोकांना बरीच स्वतंत्रता होती. आजची परिस्थिति वेगळी आहे. आज दिल्लीहून हुकूम सुटल्यावर त्याच दिवशीं तो हिंदुस्थानभर पोहोंचतो. रेडीओ इत्यादिसारख्या साधनांनीं दोन तासांचे आंत सर्व हिंदुस्थानभर तो हुकूम अमलांत आणण्याची तयारी होऊन जाते. ही च स्थिति दुसऱ्या देशांची हि आहे. म्हणून हल्लींचा मुख्य मंत्री, जरी तो पांच वर्षांकरितां असला तरी, तो त्या पांच वर्षांत जेवढें काम करूं शकेल तेवढें काम करायला पूर्वींच्या राजाला पन्नास वर्षे हि अपुरींच वाटलीं असतीं. आजचीं पांच वर्षे म्हणजे पूर्वींच्या राजांनीं मरेपर्यंत राज्यकरण्यासारखेंच आहे. वीस वर्षांत पूर्वींचा बादशाहा जितके हुकूम अमलांत आणूं शकत होता तितके हुकूम आजचा मुख्य मंत्री आपल्या अल्प काळाच्या अधिकारांत आणूं शकतो. त्यामुळें त्याच्या मनांत प्रजेचें कल्याण करायचें असेल तर तो कल्याण करूं शकतो व अकल्याण करायचें असेल तर अकल्याण हि करूं शकतो. प्रजेच्या हातांत कांहीं च राहत नाहीं.

पाचं वर्षांनंतर राज्य आपल्या च हातांत आहे या भ्रमांत राहूं नका. पांच वर्षांत तर इकडचें जग तिकडे होऊन जाईल. आज प्रजेला विचारण्याचें नुसतें नाटक होतें. त्याचा च परिणाम म्हणजे राज्य करणारे म्हणतात कीं, आम्ही जें कांहीं करतों तें प्रजेच्या संमतीनेंच करीत आहोंत. सरकारकडून जे गोळीबार होतात त्या बाबतींत ते म्हणतात कीं लोकांच्या संमतीनें च आम्हीं तो केलेला आहे. लोकांनीं च आम्हांला राज्य चालविण्याची आज्ञा

दिली आहे त्यामुळें जर गोळीबार करावा लागला तर त्याला लोकांची मान्यता आहे असेंच म्हटलें जाईल.' पूर्वीच्या राजांचे सरदार असें म्हणूं शकत नव्हते. त्यामुळें ते जें पापपुण्य करीत त्याची जबाबदारी राजावर येऊन पडत असे आणि राजाहि तें ओझें सहन करी. परंतु आजचे मंत्री जें पापपुण्य करतील त्याची जबाबदारी आपणावर आहे, म्हणून गांवोगांवच्या लोकांनीं जागृत झालें पाहिजे. आपलें बरें वाईट करण्याची सत्ता आपण कोणाच्या हि हातीं देतां उपयोगी नाहीं. पांच वर्षें काय पण पांच दिवसांकरितां हि ती दुसऱ्याच्या हातीं नको.

## आजच्या समाजाचा अंतिम शब्द : 'लॉ अॅन्ड ऑर्डर'

आज लोकनेत्यांची पुष्कळशी शक्ति आणि बुद्धि हिंसेच्या विकासासाठीं खर्च होत आहे. सर्वचें सर्व विज्ञान हिंसेचे दास झालें आहे. वैज्ञानिकांना आज्ञा दिली जाते कीं त्यानें अशा अशा प्रकारें संशोधन करावें. भांडवलशाही समाजांत च नव्हे तर त्यापूर्वीच्या समाजांत हि विज्ञानानें संशोधनें केलीं आहेत. तुम्ही पहाल कीं साध्या तिरकमठ्यापासून तों अॅटम् व हायड्रोजनबॉम्बपर्यंत जितके शोध लागले त्यांच्यासाठीं किती बुद्धि लागली, किती प्रयोग झाले, आणि हिंसेचीं किती असंख्य साधनें तयार केलीं गेलीं. याशिवाय हिंसेसाठीं अनेक प्रकारचें तत्त्वज्ञान हि तयार केलें गेलें. पुंजीवाद, साम्यवाद इ० पुष्कळसे वाद काय दाखवतात ? विशिष्ट विचार समाजावर लादण्यासाठीं हीं सारीं तत्त्वज्ञानें निर्माण झालीं. अशा रीतीनें एका बाजूनें हिंसेच्या साधनांसाठीं पुष्कळ संशोधन केलें गेलें आणि दुसऱ्या बाजूनें हिंसेला उचलून धरणारें तत्त्वज्ञान हि तयार केलें गेलें.

याशिवाय पीनल कोड, लॉ, कोर्टकचेऱ्या, आणि सर्वच्या सर्व कायद्यांची चौकट, यांचा उद्देश काय आहे ? त्यांना अखेर साधायचें काय आहे ? शंकराचार्यांना विचारलें कीं, तुमचा अंतिम शब्द काय आहे ? तर ते म्हणाले, 'ब्रह्म.' तसेंच आधुनिक समाजाला, या सर्व कायदे करणारांना, विचारलें कीं, तुमचा निर्वाणीचा शब्द काय आहे ? तर ते सांगतील कीं, 'लॉ अॅण्ड ऑर्डर.' कायदा व व्यवस्था म्हणजे च आजच्या जमान्याचें 'ब्रह्म.' आजचा तो अंतिम शब्द. त्यांच्याजवळ यापेक्षां उच्च शब्द नाहीं. कायदा व व्यवस्था यांचा

अर्थ हा च आहे कीं आजपर्यंत जशी समाजरचना झाली असेल त्या समाजरचनेंत ज्यांचे ज्यांचे जे जे अधिकार असतील ते सर्व सुरक्षित ठेवणें.

**धारापुरम्,** (कोइम्बतूर) ८-११-५६

## वेल फेअर नव्हे, इल फेअर

जेथें सर्व सत्ता केन्द्रित होते तेथें लोकशाही नाहीं. तीमधें कांहीं थोडे लोक निवडले जातात आणि त्यांच्या हातांत सर्व कांहीं असतें. राजे-महाराजे यांच्या काळीं सुद्धां कोणी हि राजा एकटा राज्य करीत नसे. कांहीं थोडचा लोकांच्या सल्लामसलतीनें च तो राज्य करीत असे. राजाचे सरदार, मंत्री इत्यादि असत. राजा आणि त्याचे सल्लागार चांगले असतील तर देशाचें राज्य चांगलें चाले, अन्यथा राज्य वाईट होई.

आजची जरी लोकशाही म्हटली जाते तरी, परिस्थिति तीच आहे. ही परिस्थिति बदलण्याचा एकच उपाय आहे. तो म्हणजे त्या त्या ठिकाणच्या लोकांच्या हातीं त्यांचे कारभार देणें. आज ' वेल फेअर स्टेट ' (कल्याणकारी राज्य) च्या नांवानें पुष्कळशी सत्ता केन्द्राच्या हातांत असते. त्यामुळें जनतेला जरी कांहीं सुख मिळत असलें तरी त्याला मी ' वेल फेअर ' म्हणणार नाहीं, ' इल फेअर ' च म्हणेन. मूठभर लोकांच्या हातांत सत्ता असणें म्हणजे कांहीं ' वेल फेअर ' नव्हे. जेव्हां सत्ता गांवोगांव वांटली जाईल तेव्हां च अहिंसेचा विचार पसरेल. आणि तेव्हां च ' वेल फेअर ' म्हणतां येईल. यासाठीं गांवागांवाला अधिकार द्यावेत काय असें विचारलें जातें. मी म्हणतों, नाहीं. मीं मागें च सांगितलें आहे कीं अधिकार देऊन मिळत नसतात, ते घ्यावे लागतात. जेव्हां गांववाल्यांना आपल्या गांवाचा कारभार आपण स्वतः चालवावा असें वाटूं लागेल तेव्हां च त्यांच्या हातांत सत्ता जाईल. या दिशेनें टाकलेलें सर्वोत्तम पाऊल जर कोणतें असेल तर तें ग्रामदान च होय असें मला वाटतें.

**धारापूरम्** (कोईम्बतूर), ता. ११-११-५६

आज जगांत दोन प्रकारच्या संस्था पुष्कळ शक्तिशाली झाल्या आहेत. एक आहे धर्मसंस्था आणि दुसरी आहे शासनसंस्था. दोन्ही संस्था लोकसेवेच्या हेतूनें च निर्माण झाल्या आहेत. ज्यावेळीं त्या संस्था निर्माण झाल्या त्यावेळीं समाजाला त्या संस्थांची गरज होती, त्यामुळें समाजाला त्यांचा चांगलाच उपयोग झाला.

## धर्मसंस्था आणि शासन-संस्था यांपासून मुक्त होण्याची गरज आहे

परंतु आज अशी अवस्था आलेली आहे कीं, या दोन्हीपासून समाजानें मुक्त होणें अगत्याचें होऊन बसलें आहे. धर्मापासून सुटका करून घेण्याची गरज आहे असें मी म्हणत नाहीं,पण धर्मसंस्थेपासून सुटका करून घेण्याची गरज आहे असें म्हणतों. तसेंच लोकांची कांहीं व्यवस्था किंवा समाज-सेवेच्या योजना नसाव्यात असें हि मी म्हणत नाहीं, परंतु मी म्हणतों कीं, सेवेच्या नांवाखालीं जें राज्यशासन चालू आहे त्यापासून सुटका होण्याची गरज आहे. मी जसजसा विचार करतों तसतसा माझा विश्वास दृढ होतो कीं, या दोन्ही संस्था चांगल्या उद्देशानें सुरू झाल्या होत्या आणि आतां त्यांचा उद्देश पूर्ण हि झाला आहे अशा स्थितींत त्या पूर्ववत् तशाच चालू ठेवण्यांत लाभाऐवजीं नुकसान च होईल.

## धर्माचा जीवनावर कांहीं च प्रभाव नाहीं.

आज जगात धर्माची काय स्थिति आहे ? ख्रिश्चन धर्म, इस्लाम धर्म, हिंदु धर्म व बौद्ध धर्म हे सर्व धर्म काय करीत आहेत ? मीं चार मोठ्या धर्मांचीं नांवें घेतलीं. यांशिवाय दुसरे हि लहान लहान धर्म आहेत च. या सर्व धर्मवाल्यांनीं आपआपल्या संस्था बनविल्या आहेत. युरोपांत पोप काम करतो आणि तिथल्या चर्चेसची चांगली मजबूत रचना झालेली आहे. जसा जिल्ह्या-जिल्ह्याकरितां एक एक जिल्हाधिकारी असतो तसा च तिकडे प्रत्येक जिल्ह्याच्या चर्चेससाठीं एकेक अधिकारी आहे. अशा च प्रकारची रचना इस्लाममध्यें हि

आहे. ठिकठिकाणीं त्यांच्या मशिदी आहेत आणि तेथें मुल्ला नमलेले असतात. त्यांच्यामार्फत कांहीं धर्मप्रचाराच्या योजना होतात, आणि कांहीं उत्सव इत्यादि होतात. हिंदु धर्मांत हि असें च चालतें. मंदिरांमार्फत हें कार्य होतें. ही च स्थिति बौद्धांची आहे. हे सर्व धर्म जरी अहिंसा, शांति, प्रेम इ. मानणारे आहेत, तरी पण तुम्ही पहातां च कीं जगांत शांति स्थापण्याच्या कामीं या संस्थांचा कांहींच प्रभाव पडत नाहीं. एखादा देश जेव्हां दुसऱ्या एखाद्या देशावर स्वारी करतो तेव्हां, 'हें ठीक आहे किंवा नाहीं' असें पोपला तो विचारीत हि नाहीं. तो असेंच समजतो कीं पोपचा अधिकार वेगळा आणि आपला अधिकार वेगळा. आपल्या व्यवहारांत ते लोक धर्माला फारसें मानीत नाहींत. इतकें च नव्हे तर जेव्हां लढाया चालू असतात तेव्हां त्या त्या पक्षांच्या विजयासाठीं चर्चमधें प्रार्थना हि चालतात. समाजाच्या व्यवहारावर या संस्थांचा कांहीं हि परिणाम नाहीं. उलट समाजावर त्यांचा वाईट परिणाम मात्र होत आहे.

## श्रद्धावान लोकांनीं धर्म नाहींसा केला

श्रद्धावान् लोकांवर या धर्मसंस्थांचा मात्र वाईट परिणाम होत आहे. त्यांनीं असें मानलें आहे कीं धर्माचें जें कार्य आहे तें पूर्ण करण्याची जबाबदारी, आम्हीं ज्यांना या कार्यासाठीं निवडलें आहे त्या पुरोहितांची आहे, त्यामुळें त्यांत आतां आमचें कांहीं हि कर्तव्य राहिलेलें नाहीं. ते समजतात कीं गांवांत एक सुंदर मंदिर बांधून दिलें, त्यासाठीं थोडी जमीन संपत्ति इ. दिली, पूजा-अर्चेची व्यवस्था ठीक केली कीं मग आपलें धर्मकार्य संपलें. याशिवाय अधिक कांहीं करावें लागतें हा विचार श्रद्धावानांनीं सोडून दिला आहे. आणि जे श्रद्धावान् नाहींत त्यांची तर गोष्टच विचारायला नको. कारण ते पुरोहितांना हि विचारीत नाहींत व धर्माला हि विचारीत नाहींत. पण जे श्रद्धावान् आहेत ते धर्माची, धर्म-प्रचाराची, आचाराची व चिंतन-मननाची जबाबदारी गुरुजन व पुरोहित यांचेवर सोंपवितात आणि आपल्याला त्यापासून मुक्त समजतात. मग त्या गुरूंनीं भस्म लावायला सांगितलें तर त्यांची आज्ञा शिरसावंद्य समजून भस्म लावतात आणि आपलें धर्मकार्य समाप्त झालें असें समजतात.

जे श्रद्धावान् नाहींत त्यांचा प्रश्न च नांहीं; पण ज्यांची श्रद्धा आहे त्यांची ती श्रद्धा हि निर्वीर्य झाली आहे. त्यांनीं धर्मकार्य पुजाऱ्यांवर सोंपवून त्यांतून स्वत: मुक्त झाले आणि धर्माचा अंत केला.

## श्रद्धाळूंची 'गोपाल-बिडी'

आज सकाळीं आम्ही पलनीस्वामींच्या दर्शनार्थ डोंगरावर गेलों होतों. तेथें लोकांनीं रस्त्यांत पायऱ्या व मंडप बांधले आहेत. एवढ्यानें आपलें च कर्तव्य पूर्ण झालें असें त्यांना वाटतें. डोंगरावर एका गिरणीवाल्यानें एक मंडप उभारला आहे व मोठ्या अक्षरांत त्यावर गिरणीचें नांव लिहिलें आहे. तसें च ठिकठिकाणीं जशीं धर्मवचनें आणि पलनीस्वामींचें नांव लिहिलें होतें त्या प्रमाणें पायऱ्या इत्यादि बनविणारांचीं हि तेथें नांवें लिहिलीं आहेत. लोक समजतात कीं आम्हीं मंदिर बांधलें आणि परमेश्वराच्या सेवेंत आपलें नांव हि अर्पण करून टाकलें. त्यामुळें धर्माच्या बाबतींतलें आपलें कर्तव्य संपलें. किती धर्महीन कल्पना ही !

आमच्या पदयात्रेंत आम्हीं धारापुरम्‌ला गेलों असतां एका घरावर एक तमिळ जाहिरात पाहिली. त्यांत बाळकृष्ण मुरली वाजवत असल्याचें एक सुंदर चित्र होतें आणि खालीं लिहिलें होतें, 'गोपाल-बिडी'. हें सर्व कोण थांबविणार? हें काय धर्मकार्य म्हणायचें ? पण कोणी हि श्रद्धावान् हिंदु यावर विचार करणार नाहीं. तो या बाबतींत आपली जबाबदारी नाहीं असें च समजतो. इतक्या मोठ्या अक्षरांत परमेश्वराच्या नांवाबरोबर बिडीची जाहिरात दिली जावी आणि कोणाला थोडें हि दु:ख होऊं नये ! गिरणीवाल्यांनीं डोंगरावर मंडप बनविला हें चांगलें केलें पण त्यासाठीं गिरणीचें नांव मोठ्या अक्षरांत लिहिण्याची काय गरज होती ? तेथें जाऊन आम्ही पलनीस्वामींचें स्मरण करायचें कीं गिरणीवाल्याचें ? अशा तऱ्हेनें श्रद्धावान् लोकांनीं धर्माची सर्व हानि केली आहे.

## सेवेची जबाबदारी थोड्या प्रतिनिधींवर

जी स्थिति धर्मसंस्थेची आहे, ती च स्थिति राज्य आणि समाजसेवेचे बाबतींत आहे. आम्ही थोड्या लोकांना निवडून देतों आणि ते आमचे

प्रतिनिधि या नात्यानें समाजसेवेचीं सर्व कामें करतात. त्यांच्या हाताखालीं कांहीं नोकरवर्ग असतो. अशा त्या निवडून दिलेल्या लोकांवर आणि त्यांच्या नोकरांवर आम्हीं राज्य आणि सेवेची जबाबदारी सोंपविली आहे. अशा-रीतीनें जर आम्हीं धर्म-कार्य पुजारी लोकांवर आणि समाजसेवेचें कार्य निवडलेल्या प्रतिनिधींवर सोंपविलें तर मग आमच्या वांटयाला कोणती जबाबदारी उरली ? तुम्ही म्हणाल कीं खाणें-पिणें व झोंपणें एवढी जबाब-दारी आम्हीं घेतली आहे. परंतु हेंहि खरें नाहीं. कारण तुम्हीं अशा कांहीं गोष्टींची जबाबदारी दुसऱ्यांवर सोंपविली आहे त्यामुळें तुम्ही चांगल्या प्रकारें खाऊं पिऊं हि शकत नाहीं. तुम्ही ज्यांच्यावर काम सोंपविलें ते लोक चांगल्या तऱ्हेनें काम करीत नाहींत म्हणून तक्रार होते. पण समजा त्यांनीं चांगल्या प्रकारें काम केलें तरी सुद्धां माझा त्यावर आक्षेप आहे. जे लोक आपलें राज्य आणि सेवेची जबाबदारी थोडयाशा प्रतिनीधींवर सोंपवितील, ते आगदीं निःसार होतील, त्यांच्या जीवनामध्यें कांहीं प्राण-तत्त्व च राहणार नाहीं. लोकांच्या अजून हें लक्षांत च येत नाहीं. उलट बाबाला ते विचा-रतात कीं तुम्ही गांवोगांव कां हिंडतां ? जमीन मिळविण्याचा आणि वांटण्याचा त्रास कां घेतां ? सरकारमार्फत हें काम कां करून घेत नाहीं ? लोकांचा हा प्रश्न हि योग्य च आहे. कारण त्यांना वाटतें कीं आम्ही सेवा करण्यासाठीं नोकर ठेवले आहेत मग आम्ही हा त्रास कां घ्यावा ? ते म्हणतात तुम्हांस जमीन पाहिजे असेल तर आम्ही १-२ एकर जमीन देऊं, त्यांत शेती करा आणि मजेनें खा प्या. लाखो एकर जमीन मिळविण्यासाठीं पायपिटी कां करतां ? म्हणजे पहा, लोक स्वतः सार्वजनिक काम करण्याची आपली जबाबदारी समजत नाहींत, आणि बाबा काम करतो आहे, तर त्याला विचारतात कीं हें निष्कारण काम कां करतां ?

## इंग्लंडचें उदाहरण

इंग्लंड व त्याचें पार्लमेंट लोकशाहीचा उत्तम नमुना म्हणून मानलें जातें. तिथल्या लोकांनीं ज्यांच्या हातांत अधिकार दिले आहेत त्यांनीं नुकताच इजिप्तवर हल्ला केला. आतां इंग्लंडच्या जनतेनें त्या आक्रमणा-विरुद्ध जोरदार विरोध दर्शविला हें चांगलें झालें पण त्या विरोधानें

युद्ध कांहीं थांवूं शकलें नाहीं. इतकी उत्तम लोकशाही चालविणारे हि कमजोर ठरले. आतां पुढें जेव्हां निवडणुका होतील तेव्हां तिथली जनता काय प्रभाव दाखवील ती दाखवो; पण या घटकेला जें वाईट काम झालें, होत आहे व होईल, तें थांबवण्यासाठीं जोरदार विरोध दर्शवून हि कांहीं उपयोग झाला नाहीं. पुढें सर्व जगानें या आक्रमणाविरुद्ध ओरड केली, 'यूनों' त हि चर्चा झाली, तेव्हां कुठें शेंवटीं त्यांना आक्रमण थांबवावें लागलें.

## सुशासनांतच अधिक धोका

राज्यसंस्था कधीं कधीं चांगलीं कामें करते. पण त्या चांगल्या कामांचा समाजाच्या मनावर वेगळा च परिणाम होतो, ही च माझी मुख्य तक्रार आहे. पुढें जेव्हां निवडणुका होतील तेव्हां हे लोक आपल्यापाशीं मतें मागण्यासाठीं येतील आणि म्हणतील कीं, 'आम्हीं इतकीं इतकीं चांगलीं कामें केलीं आहेत, तेव्हां तुम्ही आम्हांलाच निवडून द्या. जर त्यांनीं खरोखरी च चांगलीं कामें केलीं असतील तर लोक त्यांच्या उपकाराच्या ओझ्याखालीं दबून जातील, याचें च मला दुःख आहे. कांहीं लोकांनीं उपकार करावेत आणि बाकी सर्व लोकांनीं त्यांच्या उपकाराखालीं दबून जावें हें चुकीचें आहे. लहान मुलांची जबाबदारी मातापित्यांवर असावी हें ठीक च आहे. परंतु दहा दहा हजार वर्षांच्या अनुभवानंतर हि आम्ही मुलांसारखें च रहावें काय ? आम्हीं समजलें पहिजे कीं विज्ञान खूप वाढलें आहे आणि हजारों वर्षांची ज्ञानपरंपरा आमच्या मागें आहे, अशा स्थितींत प्रत्येक मनुष्यानें आपआपल्या ज्ञानाचा आणि आपआपल्या धर्मांचा कारभार आपल्या च हातीं घ्यावा हें चांगलें.

लोक मला विचारतात कीं सरकार चुकीचीं कामें करते तेव्हां तुम्ही त्याचा जोरानें निषेध कां करीत नाहीं ? मी त्याविरुद्ध जोरानें बोलत नसलों तरी, कधीं कधीं प्रसंग पाहून त्याचा उल्लेख केल्याशिवाय राहत नाहीं. पण मला भीति दुसरीच वाटते. सरकार कांहीं चांगलीं कामें करीत आहे असें जेव्हां मला दिसतें तेव्हां च मला त्यांत धोका वाटतो व त्यावेळीं मी सरकारविरुद्ध बोलतों. सरकारच्या चुकीच्या कामा-

विरुद्ध ओरड करायला माझी गरज नाहीं. परंतु त्यांच्या चांगल्या कामाविरुद्ध च जनतेला जागृत राखण्यासाठीं माझी गरज आहे. मला तेव्हां लोकांना हें सांगावेसें वाटतें कीं तुम्हीं शेळ्या बनत आहांत. तुम्ही शेळ्या होऊन 'मेंढपाळानें छान व्यवस्था केली' असें बोलूं लागलांत तर ती आनंद मानण्याची गोष्ट होईल कां ? म्हणून च माझी वाणी सुशासनच्या विरुद्ध उठते. दुःशासनाच्या विरुद्ध व्यासांनीं एवढें मोठें महाभारत लिहिलें. वाईट राज्य-व्यवस्था नसावी हें सर्वांना च कळतें. वाईट राज्यव्यवस्थेविरुद्ध लोक-निंदा होते. आणि तें काम जगभर चाललेलें च आहे. पण मात्र दुसऱ्या कोणी चांगलें राज्य चालवावें आणि मी शासित बनून रहावें यांचे च वाईट वाटतें.

**पळणी** ( मदुरा ) ता. १७-११-५८

## लोकनीतीची निष्ठा

आजच्या परिस्थितीवर मीं तीन गोष्टी तुमच्यासमोर ठेवल्या. पहिली गोष्ट अहिंसा, सत्य, अस्तेय. दुसरी गोष्ट निष्कामसेवा आणि सकाम वृत्ति सहन करणें आणि तिसरी गोष्ट लोकनीतीची निष्ठा.

या वेळीं सर्व-सेवा-संघानें जो ठराव केला तो फार च चांगला आहे. असे ठराव जेव्हां होतात तेव्हां माझ्यासारख्याला फार उत्साह वाटतो., वाटतें कीं, चर्चेसाठीं कांहीं मसाला मिळाला. तो ठराव असा आहे कीं याबर खूप चर्चा होऊं शकते, म्हणजे च चर्चेला उत्तेजन देणारा तो ठराव आहे. 'जर आम्हीं मत दिलें नाहीं तर नागरिक-कर्तव्याची हानि होणार नाहीं काय ? जर पुष्कळ लोकांनीं आमचें म्हणणें मान्य केलें तर अयोग्य लोकांच्या हातीं राज्यकारभार जाणार नाहीं काय ? इत्यादि अनेक प्रश्न उद्भवतात. हें सर्व असून हि तो ठराव मोठा कल्याणकारी आहे असें मला वाटतें. लोकनीतीच्या बाबतींत मी जितका विचार करतों, तेव्हां त्यांतून हें च निघतें कीं, आजची राजनीति नष्ट करण्यासाठीं कां होईना जे तिला मान्य करतील व त्यांत दाखल होतील, त्यांच्याकडून ती नष्ट केली जाणार नाहीं. कारण नष्टकरण्यासाठीं त्याच्या बाहेर च रहावें लागतें. आपण वृक्षाच्या बाहेर राहून च त्याला तोडूं शकतों. त्यावर चढून जर तोडण्याची

इच्छा करूं तर तोडूं शकणार नाहीं. म्हणून तोडण्याच्या विचारानें कां होईना ज्याच्याशीं संबंध जोडण्याची इच्छा असते, तो सुद्धां एक सूक्ष्मतम मोह च आहे.

काल एका ऑस्ट्रियाच्या मित्राशीं बोलत होतों त्यांच्या मनांत एक शंका होती. त्यांचे म्हणणें असें कीं 'तुम्ही सांगतां तें सर्व ठीक. परंतु सर्व समाजाच्या परिवर्तनाच्या उद्देशासाठीं सत्ताकेंद्रावर आमचा अंकुश राहिला नाहीं तर कसें चालेल ?' ही अंकुशाची गोष्ट मी योग्य समजतों. परंतु आमच्या मनांत हें स्पष्ट असलें पाहिजे कीं जेव्हां आम्ही त्यापासून दूर होऊं तेव्हां च त्याच्यावर जास्त अंकुश ठेवूं शकूं.

पलनी, (मदुराई)
२०-११-५६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 21732 वि: निबंध
क्रमांक 9216 नों: दि: 1925

## जग सरकाररूपी रोगानें पिडलें आहे

माझ्या मनांत आणखी एक गोष्ट आहे ती मी तुमच्यापुढें मांडूं सर्व इच्छितों. जगाला च सरकारपासून मुक्ति मिळावी हा माझा मुख्य विचार आहे. म्हणून आपण जर सरकारी मदतीवर च अवलंबून राहिलों तर ती गोष्ट साधणार नाहीं. आज सर्व जग जर कोणत्या एका रोगानें पिडलेलें असेल तर तें या सरकाररूपी रोगानें पिडलेलें आहे. आज रामनामाची जागा 'सरकार' नांवानें घेतली आहे. १९४७ पासून आम्ही अधिक गुलाम बनलों आहोंत. पूर्वीं सरकारकडून आपल्याला कांहीं मदत मिळणार नाहीं हें लोकांना ठाऊक होतें. जें कांहीं करायचें असेल तें आपण च केलें पाहिजे अशी त्यांची भावना होती. पण स्वराज्यप्राप्तीनंतर हे लोक आपणांला मदत मिळणार च असें समजूं लागले आहेत. परंतु तसें समजून ते जर पूर्वींच्या दसपट काम करते तर हिंदुस्थानची खूप प्रगति झाली असती. परंतु लोक हल्लीं उलटें च समजतात. आपल्याला कांहीं करावयाचें नाहीं. जें काय करायचें तें सरकार करील असें त्यांना वाटतें.

## आरशांत आपलें च प्रतिबिंब दिसतें

सरकारमुळें च आम्ही वांचलों आहोंत, सरकार नसतें तर आमचें संरक्षण झालें नसतें असा एक भ्रम आज सर्व जगांत उत्पन्न झाला आहे. आज च मीं ऐकलें कीं, जपान सेना ठेवण्याचा विचार करीत आहे, पण तेथल्या जनतेला ती गोष्ट पसंत नाहीं. तसेंच पाकिस्तान सरकारनें केलेला 'सैनिक समझौता' तेथल्या जनतेला पसंत नाहीं. ही गोष्ट पाकिस्तानमधले आमचे मित्र मला भेटले तेव्हां त्यांनीं सांगितली. तिकडे फ्रान्समधलें सरकार फ्रेंच लोकांना २–४ महिन्यांपेक्षां जास्त टिकलेलें पसंत पडत नाहीं, वर्षांत ३–४ वेळां सरकार बदलतें. असें असून हि सरकारशिवाय आमचें चालणार नाहीं हा लोकांचा भ्रम कायम च आहे ! लोकांचें शेतीशिवाय चालणार नाहीं, उद्योगाशिवाय चालणार नाहीं, प्रेमभावनेशिवाय किंवा धर्माशिवाय चालणार नाहीं, हें मी समजूं शकतों. तसेंच लग्नाच्या विधीशिवाय, कुटुंबव्यवस्थेशिवाय लोकांचें चालणार नाहीं हें हि मला समजतें; परंतु सरकारशिवाय चालणार नाहीं, ही गोष्ट कांहीं माझ्या लक्षांत येत नाहीं.

वस्तुतः जनतेला सरकारची कांहीं च गरज नाहीं. सरकारमुळें च समाजामध्यें एकरसता निर्माण करण्यांत आम्हांला यश मिळालें नाहीं, समाजांत अनेक प्रकारचे भेद पडले, आणि अविरोधानें काम करणें आम्हांला माहीत च नाहीं. लोकांना शिक्षित करून जें काम होऊं शकतें तें आम्ही दंडशक्तीनें करूं पाहत आहोंत. प्रत्येक सरकार शिक्षणाकरितां जेवढा खर्च करते त्यापेक्षां किती तरी पट सैन्यावर करते. पाकिस्तानचे सरकार म्हणतें कीं, हिंदुस्थानकडून आपल्याला भय आहे, म्हणून आम्हांला शस्त्रास्त्रें वाढवावीं लागतात, त्यावर खर्च करावा लागतो. हिंदुस्थानचे सरकार म्हणते कीं, पाकिस्तानचें लक्षण चांगलें दिसत नाहीं, म्हणून आम्हांला सैन्यावर जोर द्यावा लागतो.

तिकडे रशिया म्हणतो कीं, अमेरिकेचें लक्षण ठीक दिसत नाहीं, म्हणून आम्हांला शस्त्रास्त्रें वाढवावीं लागत आहेत. अमेरिका हि रशियासंबंधीं असें च म्हणते. आपलें प्रतिबिंब च आरशामध्यें दिसतें. तिथें तो तलवार घेऊन उभा आहे त्याचें आम्हांला भय वाटतें. म्हणून आम्ही आमची

तलवार घट्ट पकडून धरतों. त्या आरशांतलें प्रतिबिंब हि असें च करतें समोर जें चित्र आहे तें आपलें च प्रतिबिंब आहे हें आपण ओळखलें पाहिजे. हिंदुस्थान जर कमींत कमी सैन्य ठेवण्याची हिंमत करील तर मला वाटतें कीं, सर्व दुनियेमध्यें त्याच्या नैतिक शक्तीचा प्रभाव पडेल.

सारांश, जगांतलें सर्व लोक जोंपर्यंत आपआपल्या सरकारांना डोक्यावर घेऊन बसतील तोंपर्यंत हें काम होणार नाहीं. कारण आज कांहीं थोड्या मूठभर लोकांना असें वाटत असतें कीं, कोटचवधि लोकांची जबाबदारी आमच्यावर आहे, आणि ते कोटचवधि लोक हि समजतात कीं हे थोडे लोक आमचें रक्षण करीत आहेत.

## सरकारमुळें च आम्ही सर्व असुरक्षित

लोकशाहीचा सर्वांत मोठा दोष हा आहे कीं, आमचा सर्व आधार मूठभर लोकांच्यावर च राहतो. कांहीं लोकांच्या हातीं सत्ता दिली जाते आणि ते लोक आमचें संरक्षण करतील अशी आशा राखली जाते. यांत लोकमताचा कांहीं विचार च होत नाहीं. प्रमुख व्यक्तीच्या अकलेनुसार काम चालतें, ही अत्यंत शोचनीय गोष्ट आहे. आज काँग्रेसचें सरकार आहे, उद्यां दुसऱ्या पक्षाचें होईल. दुसऱ्या देशांत हि असेंच चालतें. या सरकारां-विषयीं माझ्या मनांत कांहीं हि आकर्षण नाहीं. एखाद्या विशिष्ट सरकारविषयीं च नव्हे तर एकूण एक सरकारांविषयीं माझा विरोध आहे. ही सरकारची सत्ता जोंपर्यंत आपल्या डोक्यावर वाहत राहूं आणि त्यामुळें च आपण सुरक्षित आहों असें मानूं तोंपर्यंत आपण अत्यंक असुरक्षित आहों हे निश्चित समाज.

**पेरियुर,** (मदुरा)
२४-१२-५६

## भारतीय राजचिह्नाचा संकेतार्थ : १६ :

आपल्या राजचिह्नांत चार सिंह आहेत. समोरून ते तसे दिसतात तीन च पण आहेत चार. हें जें आपण भारतीय लोकशाहीसाठीं राजचिह्न घेतलें आहे तें च अशोकाचें राजचिह्न होतें. या चिह्नाचा भावार्थ असा कीं गाई, मेंढ्या कळपानें राहतात कारण त्या भित्र्या आहेत. त्यांच्या एकत्र राहण्यांत अहिंसा नाहीं, बहादुरी नाहीं, केवळ भय आहे. मेंढ्यांनीं कळपानें राहण्यांत बहादुरी कसली ? पण तो सिंह बहादुर आहे. तो कळपानें कधीं रहायचा नाहीं. तो जंगलाचा राजा म्हणविला जातो, परंतु प्रजेचें भक्षण करायचें हें आहे त्याचें लक्षण. प्रजेला खाण्यांत च त्याची बहादुरी आहे. जंगलांतल्या सर्व प्राण्यांना जो खाऊन टाकतो त्याला म्हणायचें राजा ! म्हणून सिंह वीर खरा पण आहे हिंसक, म्हणून च ते एकएकटे राहतात. तेव्हां अशोकानें एक युक्ति केली. त्यानें चार सिंहांना एकत्र आणलें. म्हणजे हिंसक असून सुद्धां प्रेमानें एकत्र राहणारे ते सिंह झाले. मेंढ्या एकत्र राहतात पण त्यांच्यांत बहादुरी नाहीं. सिंह बहादुर आहे पण त्यांच्यात प्रेम नाहीं. जिथें प्रेम आणि बहादुरी असते तिथेंच अहिंसा असते. जेव्हां शौर्य आणि प्रेम यांची हात मिळवणी होते तिथें च अहिंसेची शक्ति प्रगट होते. म्हणून अशोकानें चार सिंहांना एकत्र आणून अहिंसेचें प्रतीक असें आपल्या राज्याचें राजचिह्न बनविलें, कारण तो स्वतः च चंड अशोकाचा धर्म अशोक झाला होता.

आमची अशी इच्छा आहे कीं प्रत्येक भारतीय सिंहासारखा बहादुर असावा, पण सिंहाप्रमाणें एकएकटे न राहतां त्यांनीं एकत्र यावें. असें जर हिंदुस्थानांत घडलें तर खऱ्या अर्थानें क्रांति होईल. ग्रामदानानें तें च होत आहे.

**नत्तम** (मदुरा), २५-२-५८

## कायद्यानें कामें होत नाहींत



जगांत काम करण्याचे तीन मार्ग आहेत: (१) खून (२) कायदा आणि (३) करुणा. पहिला प्रकार खुनाचा. या मार्गानें एखादें कार्य करण्यांत कुणाचें कांहीं भलें झालें आहे काय? कुणाचें हि नाहीं. दुसरा प्रकार कायद्याचा. मला हि कायदा हवा आहे, पण तो सर्वसामान्य लोक मानतील असा हवा. कायदा करून जबरदस्तीनें कोणतें हि काम करविलें जात नाहीं. जो विचार जनतेला मान्य नाहीं तो कायद्यानें अमलांत येऊं शकत नाहीं. कायदा करण्याचा हेतु हा कीं लोकांनीं तो आनंदानें मानावा आणि त्यामुळें सुख-समृद्धि व्हावी.

शेंवटीं कायद्याला मानणें न मानणें तुमच्या च हातांत असतें. समजा, सरकारनें एक कायदा केला आणि तुम्ही तो मानला नाहीं, तर त्या कायद्याला अर्थच काय राहिला? सरकारनें एक कायदा केला आहे कीं चौदा वर्षांखालील मुलींचीं लग्नें करूं नयेत. परंतु आम्ही वीस-वीस वर्षांच्या वयांत मुलींचीं लग्नें व्हावीं असें म्हणतों; म्हणजे कायदा अधिक नव्हे पण कमी च बोलत असतो. सरकारला कायद्याच्या साह्यानें लोकांची सेवा करायची असते. सरकार कायदा करील तर तो देशाच्या कानाकोपऱ्यांत लागू करील. ही च तर कायद्याची खुबी आहे. परंतु कोणी हि अशा कायद्याच्या साह्यानें क्रांति करूं शकत नाहीं. बुद्धाच्या वेळीं काय झालें? तो राज्य करून क्रांति करूं शकला असता तर राज्य कशाला सोडलें असतें? क्रांतिकारी कार्य कायद्यानें होत नसतें.

**चिरगांव** ( झांशी ) ता. १६-१०-५१

## काय ही च खरी स्वतंत्रता आहे?

"आज कोणता देश स्वतंत्र आहे? अमेरिकेला स्वतंत्र देश म्हणून म्हणतां येईल? तसें च इंग्लंड, भारत, पाकिस्तान, चीन, जपान हे देश

स्वतंत्र आहेत ? जे देश आपल्या देशाचें नियोजन स्वतंत्रपणें करतात त्या च देशांना स्वतंत्र देश म्हणून म्हणतां येईल. आतां कोणता देश आपलें नियोजन स्वतंत्रपणें करून राहिलेला दिसतो ? या सर्व गोष्टी समजण्यासाठीं जरा अभ्यास करण्याची गरज आहे. अमेरिकेपाशीं सैन्य कमी आहे असें म्हणतां येईल काय ? पण त्यांना तें कमी वाटतें. ते म्हणतात कीं रशियाच्या मानानें आमचें सैन्य कमी आहे, आणि त्यासाठीं ते काँग्रेससमोर सेनेच्या वृद्धीकरतां बजेट वाढवायला पाहिजे म्हणून बिल आणतात. या सर्व गोष्टींवरून अमेरिका आपल्या देशाचें नियोजन स्वतंत्रपणें करीत आहे असें म्हणतां येईल काय? त्यांचें नियोजन रशिया करून राहिला आहे. हें कसलें स्वातंत्र्य ! तसें च रशिया आपलें नियोजन स्वतंत्रपणें करतांना दिसतो काय ? तो म्हणतो आमच्या चारी बाजूला अमेरिकेनें तळ उभारले आहेत, अशा स्थितींत आमच्या देशाच्या रक्षणासाठीं आम्हांला नवनवीन प्रभावी शस्त्रास्त्रें वाढवावीं लागत आहेत. म्हणजे रशियाचें नियोजन अमेरिका करीत आहे."

धावपागेरे (मैसूर)
२९-११-५७

# खंड तिसरा

## सत्ता-निरपेक्ष समाजाचें रूप

: १८ :

### पंचविध कार्यक्रम

देशाच्या सध्यांच्या स्थितीची मीमांसा करतांना मीं असें म्हटलें होतें कीं, लोकांच्या वतीनें बहुसंख्येच्या आधारावर राजकारणाची जबाबदारी अंगावर घेईल असा एक अधिकारारूढ पक्ष राहील, आणि दुसरा त्यांच्या कार्यामध्यें प्रतिसहकार करील असा विरोधी पक्ष असेल. म्हणजे जेथें सहकाराची गरज वाटेल तेथें सहकार करील आणि जेथें विरोध करण्याची आवश्यकता वाटेल तेथें विरोध करील. हे दोन्ही पक्ष राजनैतिक क्षेत्रांत काम करतील. याशिवाय तिसरा एक निःपक्ष समाज असायला पाहिजे. त्याची गणना अधिकारारूढ पक्षांत होणार नाहीं, तशी च विरोधी पक्षांत हि होणार नाहीं. हा एक अगदीं स्वतंत्र समाज असेल, त्याची एक विशेषता असेल; आणि तो समाजसेवाकार्यांत लागलेला असेल. अशा तऱ्हेचा समाज जेवढा विशाल आणि शक्तिशाली होईल त्या प्रमाणांत राज्यतंत्र आणि लोकतंत्र दोन्ही हि तितकीं च शुद्ध आणि मर्यादित राहतील. त्या तिसऱ्या निःपक्ष समाजाचा एक मोठा देशव्यापी कार्यक्रम असेल. त्या कार्यक्रमाचीं कांहीं अंगें दिशासूचक म्हणून सांगतों.

### जीवन-शोधन

त्या समाजाचीं जीं कार्यें असतील त्यांतलें मुख्य आणि पहिलें काम हें असेल कीं, त्यांतील लोक जीवन-शुद्धीचें काम करतील. आपल्या स्वतःच्या जीवनाची शुद्धि त्या च प्रमाणें आपल्या कुटुंबियांची, मित्रांची, सहकाऱ्यांची

सर्वांची जीवन-शुद्धि नित्यनिरंतर पारखत राहतील. जर कोठें असत्य आपल्यांत लपलेलें आढळून आलें तर त्याचा बारकाईनें शोध घेतील, आणि तें असत्य दूर करतील. त्या च प्रमाणें अंतःकरणाच्या एखाद्या कोपऱ्यांत जर कांहीं भीतीचा अंश राहिला असेल तर तो कोणत्या प्रकारचा आहे हें हि ते पाहतील. भयाचे अनेक प्रकार संभवतात. त्यापैकीं कोणकोणतीं भयें त्यांच्या अंतःकरणावर सत्ता चालवीत आहेत, त्या सर्व भयांचा शोध घेऊन त्यांतून मुक्त होण्याचा प्रयत्न करतील. अर्थात् सदासर्वदा निर्भय बनण्याचा त्यांचा प्रयत्न राहील. त्यांची प्रत्येक कृति नेहमीं संयम-युक्त असेल––वाक्-संयम, देह-संयम, मन-संयम ही त्यांची नित्य साधना राहील. आपल्या उपजिविकेचा मुख्य भाग शक्यतोंवर उत्पादक शरीरश्रमावर च चालविण्याचा ते प्रयत्न करतील. स्वतःचा, आपल्या कुटुंबाचा आणि समाजाचा निर्वाह या दृष्टीनें कसा होईल याचे ते प्रयोग करतील. हें सारें जीवनशुद्धीचें काम त्यांचें मुख्य काम असेल.

### अध्ययनशीलता

दुसरी गोष्ट जी त्यांनीं करायची ती म्हणजे त्यांनीं नित्य निरंतर अध्ययनशील राहिलें पाहिजे. लोकजीवनाच्या ज्या शाखा-उपशाखा आहेत, त्या सर्वांचा ते अभ्यास करतील. हर प्रकारची उपयुक्त माहिती त्यांच्या-पाशीं असेल. याचा अर्थ असा नव्हे कीं व्यर्थ निरुपयोगी माहितीचा ते संग्रह करतील. परंतु समाजजीवन आणि व्यक्तिजीवन, तसेंच आंतर आणि बाह्य दोहोंसाठीं उपयुक्त असेल अशी माहिती ते गोळा करतील. अशा तऱ्हेनें अध्ययन होत राहिलें तर च स्वराज्य प्रगतिपथावर राहतें. स्वराज्यांत अशा अभ्यासू लोकांची फार च गरज असते. अभ्यासावांचून कोठला हि समाज महत्त्वाचें खोल काम करूं शकत नाहीं. या दृष्टीनें विशेष काम होत नसल्याचें मला दिसून येत आहे. मी या कामाला अगदीं मुळांतलें काम म्हणणार नाहीं परंतु आवश्यक आणि महत्त्वाचें म्हणेन.

### निष्काम समाजसेवा

तिसरी गोष्ट ही करावी लागेल कीं समाजसेवेचीं जीं क्षेत्रें आहेत, विशेषतः उपेक्षित क्षेत्रें,–ज्यांना पुढें नेण्यासाठीं समाजाचें किंवा सरकारचें,

दोषांचें हि लक्ष नाहीं—त्यांकडे लक्ष द्यायचें. सर्व प्रकारच्या सेवेंत रात्रंदिवस निष्कामबुद्धीनें लागायचें. त्याचें फळ दीर्घकाळानें कां होईना, मिळेल च अशी निष्ठा ठेवून त्यांत ढिलाई कधीं होऊं द्यायची नाहीं, आणि चारी बाजूंला अंधार पसरला तरी दिव्याप्रमाणें त्या अंधःकाराचें भान हि न ठेवतां जोमानें सेवा करीत रहायचें, हें त्यांचें काम असेल.

## वाणीनें निर्देश, कृतीनें सत्याग्रह

चौथें काम हें कीं समाज-जीवनामध्यें किंवा सरकारी कामांत जेथें कांहीं चुका आढळतील तेथें त्यांचा निर्देश करायचा. असा निर्देश जाहीरपणें च झाला पाहिजे असें नाहीं. परंतु ज्या ठिकाणीं जाहीरपणें निर्देश करण्याची गरज असेल तेथें ती गोष्ट रागद्वेषरहित होऊन पण स्पष्ट शब्दांत लोकांपुढें मांडणें आणि त्यांत आपली प्रतिभा प्रकट करणें हें त्यांचें काम राहील. अशा प्रकारें सामाजिक आणि सरकारी कामांबाबत चिंतन करीत असतांना त्यांत कुठें दोष आढळला तर तो प्रकट करणें त्यांचें कर्तव्य असेल.

केव्हां केव्हां त्या दोषांचा प्रत्यक्ष प्रतिकार करण्याचा हि प्रसंग येईल, पण तो प्रतिकार इतका सहज असेल कीं ज्यांच्याविरुद्ध तो केला जाईल, त्यांना हि तो प्रिय वाटेल. कारण तो प्रतिकार त्यांच्या सेवेकरतां च असणार. त्याला 'प्रतिकार' म्हणण्यापेक्षां 'शस्त्रक्रिया' च म्हणणें ठीक होईल. कारण ज्याच्यावर शस्त्रक्रिया केली जाते त्याला हि ती प्रिय च असते. त्याला 'सत्याग्रह' हि म्हणतां येईल. परंतु आज सत्याग्रहाचा अर्थ अवनत झाला आहे. उत्तमांतलें उत्तम शब्द हि नालायक माणसांच्या हातांत कसे बिघडतात आणि सामान्य शब्द हि मोठ्या माणसांच्या हातांत कसे उंचावतात याचें हें एक उदाहरण आहे. अशा प्रकारें सत्याग्रह शब्दाचा आज धमकीच्या अर्थानें, शस्त्र म्हणून, आणि शस्त्राच्या अभावी शस्त्रवत् हिंसेच्या अर्थानें, उपयोग केला जात आहे. अशा प्रकारें हा शब्द बिघडून गेला असला तरी त्यांत शब्दाचा कांहीं दोष नाहीं. शब्दाचा अर्थ स्वच्छ आहे म्हणून तो शब्द वापरण्याला कांहीं हरकत नाहीं आणि मी तो वापरीन हि. अशा प्रकारें वाणीनें दोषांचा निर्देश आणि कृतीनें सत्याग्रह हें हि त्या कार्यकर्त्यांचें काम असेल.

## प्रश्नांचे अहिंसक उपाय शोधणें

याशिवाय समाजजीवनांत जे मोठमोठे प्रश्न निर्माण होतात ते अहिंसक पद्धतीनें कसे सोडवायचे याचा शोध करणें; हें त्यांचें पांचवें काम असेल. तसें च नैतिक मार्गानें मोठमोठे प्रश्न सुटूं शकतात हें ते सिद्ध करून दाखवितील. त्यांनीं असें सिद्ध करून दाखविलें तर नैतिक आणि अहिंसक मार्गावर लोकांची श्रद्धा बसेल. लोकांना नैतिक मार्ग प्रिय तर असतात च परंतु प्रत्यक्ष परिणाम पाहिल्याशिवाय त्यांची निष्ठा स्थिर होऊं शकत नाहीं. प्रत्यक्ष प्रयोगानें लोकांची निष्ठा दृढ करणें हें या निःपक्ष समाजाचें पांचवें काम होय.

राजघाट, दिल्ली १६-११-५१

## भौतिक सत्ता गांवांत, नैतिक सत्ता केन्द्रांत

खेडोंपाडीं आम्ही स्वराज्य आणूं इच्छितों. गांवाच्या हातांत सर्व सत्ता असावी अशी आमची इच्छा आहे. प्रांतीय सरकारचें काम गांवावर सत्ता चालविण्याचें न राहतां गांवा-गांवांत परस्पर संबंध दृढ करण्याचें राहील. ह्या च न्यायानें दिल्लीच्या सरकारचें काम प्रांतांवर हुकूमत चालविण्याचें न राहतां प्रांता-प्रांतांत संबंध राखण्याचें राहील. वरच्या वरच्या सरकारांचें काम खालच्या सरकारांच्या तुलनेनें व्यापक म्हणजे जोडण्याचें राहील, पण त्यांच्या हातांत सत्ता त्या मानानें कमी राहील. सत्ता तर गांवांत राहील. सर्व भौतिक सत्ता गांवांत असेल, आणि केन्द्रांत नीतिमान्, चारित्र्य-शील लोक जातील त्यांची नैतिक सत्ता चालेल.

पण आज सर्व भौतिक सत्ता न्यूयॉर्क किंवा दिल्लीला असावी असें मानलें जातें. 'एक दुनिया' बनविणारे तर म्हणतात कीं सारी सत्ता यु. एन्. ओ. (राष्ट्र-संघ) किंवा अशा च कोणा सरकारच्या हातांत रहावी. पण भौतिक सत्ता गांवांत च रहावी हें मला पाहिजे आहे. गांधीजी आणि बुद्ध ह्यांची नैतिक सत्ता चालली, कारण ती सत्ता चालविण्याची लायकी त्यांच्या ठिकाणीं होती. नैतिक सत्ता कोणाच्या देण्यानें दिली जात नाहीं. ती स्वतः-

प्राप्त असते. म्हणून जे नीतिमान् पुरुष असतील; ते आपोआप च वरच्या सरकारांत जाण्याला लायक बनतील. जंगलांत सिंहाची जशी स्वतःसिद्ध सत्ता चालते, तशी त्यांची स्वतःसिद्ध सत्ता तेथें चालेल. अशा प्रकारें सिंहासारखे कांहीं निडक लोक दिल्लीच्या सरकारांत राहतील आणि त्यांची सत्ता प्रेमानें लोक मानतील. पण खरी भौतिक सत्ता गांवांत च राहील.

लोहारदगा (रांची) ता. २४-११-५२

## शक्तीचा झरा आमच्या हृदयांत, दिल्लींत नव्हे

स्वराज्य मिळाल्याला आतां जवळपास सहा वर्षें झालीं आहेत. तरी हि अजून लोक म्हणतात कीं,' सरकारनें अमुक केलें नाहीं व तमुक केलें नाहीं.' मी त्यांना विचारतों कीं, तुम्ही स्वतंत्र आहांत कीं गुलाम आहांत? स्वतंत्र असाल, तर तुमच्या गांवच्या शिक्षणाची व्यवस्था, गांवच्या साफ-सफाईची व्यवस्था त्याच प्रमाणें इतर आपल्या गांवचीं सगळीं कामें सरकारनें च करावीं असें तुम्हांला कां वाटतें? आपल्या गांवची सगळीं कामें काय सरकारनें च करायचीं आहेत? शेंवटीं सरकार सरकार म्हणजे आहे तरी काय? जें काम देव हि करूं शकत नाहीं, तें काम काय सरकार करूं शकेल? ईश्वर पाऊस पाडतो. पण नुसत्या पावसानें कांहीं पिकें येत नाहींत, फक्त गवत मात्र उगवतें. शेतकरी जेव्हां कष्ट करतो, जमिनीवर आपला घाम गाळतो, तेव्हां पिकें येतात. जेथें परमेश्वर देखील माणसानें कष्ट केल्या-शिवाय पिकें पिकवूं शकत नाहीं, तेथें सरकार कसें पिकवूं शकेल?

म्हणून सरकारच्या शक्तीनें आपण शक्तिवान् बनूं हें समजणें च चूक आहे. वस्तुतः आपल्या शक्तीच्या जोरावर च सरकार बलवान् बनत असतें. शक्तीचा मूळ झरा दिल्लींत नाहीं, तर तो तुमच्या आमच्या हृदयांत आहे. कोणत्या हि कामाला जोर लागायचा असेल, तर तो येथून च लागूं शकतो. लोक मला विचारतात कीं, हा भूमीचा प्रश्न तुम्ही सोडवूं शकाल काय? मी म्हणतों कीं तुम्हीं मनावर घेतलें तर तुम्हीं सुद्धां हा प्रश्न सोडवूं शकाल. आपल्या मुलीसाठीं योग्य वर शोधून त्याच्याकडे तिला

पोंचतें करावें असें जर तुम्हीं ठरविलें, तर तुम्हांला कोण अडवूं शकेल ? त्या च प्रमाणें जेव्हां तुम्हांला असें वाटूं लागेल कीं आपलें धन व आपली जमीन ही दुसऱ्याला देण्यांत च आपलें कल्याण सांठलें आहे, तेव्हां तें दान देण्यासाठीं तुमचा मार्ग कोण अडवून धरूं शकेल ? अखेर ही सारी पटवून घेण्याची गोष्ट आहे.

**बेलो** (हजारीबाग) ता. २९-३-५३

## सर्वोदयाचा राजकीय विचार : १९ :

अलीकडे जीवनापासून अगदीं वेगळा असा कांहीं राजकरण हा विषय राहिलेला नाहीं. पूर्वीच्या काळीं राजांची सत्ता असे पण ती फार च कमी होती. सर्वसामान्य जनतेवर त्यांचा फारसा प्रभाव नसे. कारण त्यावेळचें सरकार हें जनतेनें निवडलेलें नसे व आजच्यासारखीं दळणवळणाचीं जलद साधनें हि तेव्हां नव्हतीं. अशा प्रकारें त्यावेळची परिस्थिति वेगळी च होती. त्यावेळीं सरकारची सत्ता हि फार मर्यादित होती. सरकारचें लोक-जीवनावर नियंत्रण मोठ्या प्रमाणांत कधीं च नसे. फक्त परदेशी आक्रमणांचा प्रतिकार करण्यासाठीं सैन्य ठेवणें व त्या सैन्याच्या हालचालींसाठीं दोन चार रस्ते तयार करणें, अशा प्रकारचीं मोजकीं च कामें तें सरकार करीत असे. जे राजे लोक-हित-दक्ष असत, ते प्रजेसाठीं आणखी कांहीं करीत पण ते त्यांचे व्यक्तिगत उपकार च मानले जात. लोकांच्या जीवनाचें नियंत्रण ते करीत नसत.

पण आजचें राजकारण मात्र फार व्यापक होऊन बसलें आहे. संपूर्ण जीवनावर च त्याचें नियंत्रण असतें. आजच्या सरकारनें पापी कायदे बनविले तर, 'मी मात्र निष्पाप जीवन व्यतीत करीन' असें कांहीं आजची व्यक्ति म्हणूं शकणार नाहीं, कारण जीवनाच्या सर्व अंगोपांगांवर च आज सरकारचें नियंत्रण आहे. शिक्षणावर देखील सरकारचें नियंत्रण आहे. पूर्वीं असें नव्हतें. ज्ञानी माणसें ज्ञानदानाचें कार्य स्वतंत्र रीतीनें करीत असत. आज मात्र सरकार एखाद्या पाठ्य पुस्तकाला मान्यता देतें आणि मग तें च

सगळ्या शाळांतून शिकविलें जातें. त्या पाठ्य पुस्तकांत काय असावें या गोष्टीचें हि नियंत्रण सरकार च करतें. याप्रमाणें शिक्षणासारखा संपूर्णपणें स्वतंत्र असावयास हवा असलेला विषय हि आज राज्यसरकारच्या नियंत्रणाखालीं आहे. मग जर सरकार कम्युनिस्ट असेल तर त्यांचें तत्त्वज्ञान शाळांतून शिकविलें जाईल, फॅसिस्ट सरकार असेल तर त्यांच्या विचारसरणीप्रमाणें शिक्षण दिलें जाईल. सारांश, ज्या विचारसरणीचें सरकार असेल, त्याप्रमाणें मुलांचीं मनें बनविलीं जातील. अशी आमची स्थिति असल्यामुळें राजकारणाचा विचार करण्याची जबाबदारी प्रत्येक व्यक्तीवर आली आहे.

आजकाल देशांत बहुसंख्यक व अल्पसंख्यक असे दोन पक्ष निर्माण झाले आहेत. हा एक नव्या प्रकारचा जातिभेद च आहे. या नव्या जातिभेदाच्या जोडीला जुने हि जातिभेद इथें आहेत च. एक पक्ष ज्या जातीचा उमेदवार म्हणून निवडील तर त्याच्याविरुद्ध बाजूचा पक्ष हि आपला उमेदवार निवडतात त्याच जातीचा उमेदवार निवडण्याचा विचार करील. मतें मिळविण्यासाठीं हें सारें केलें जातें. विचार समजाविणें व तो विचार पटेपर्यंत धीर धरणें, ही गोष्ट आजकाल राहिली च नाहीं. पूर्वीं ज्याप्रमाणें तलवारीच्या जोरावर निर्णय लादले जात, त्याप्रमाणें च आतां तलवारीच्या ऐवजीं बहुमताच्या जोरावर ते लादले जातात. तलवारीसंबंधीं म्हणतात कीं, तिच्यांत बुद्धीचा अंश नसतो म्हणून आम्हीं तिचा त्याग केला आहे. पण बहुमतांत तरी बुद्धीचा भाग कोठें असतो ? हात मोजून निर्णय घेणें हें अगदीं चुकीचें आहे. याचा परिणाम असंतोष उत्पन्न करण्यांत होतो. प्रत्येकजण एकमेकाला पाडण्याचा यत्न करीत राहतो. यावर च आज सगळी उभारणी झाली आहे. आज सगळ्या देशांत हें च चाललें आहे. त्या हातांमागें कांहीं बुद्धि आहे कीं नाहीं हें पाहिलें जात नाहीं. एवढी च मेहेरबानी म्हणावयाची कीं वेड्याला मताचा हक्क दिला गेला नाहीं. आतां या सर्वांवर उपाय काय ? तो उपाय जर आम्हीं शोधला नाहीं व पक्ष-भेद, सरकारी पक्ष, विरोधी पक्ष, दोघांचा अखंड विरोध ही पाश्चात्यांची सगळी पद्धति जर हिंदुस्थानांत आगली, तर येथें कोणतें हि काम होऊं शकणार नाहीं. एक पक्ष दुसऱ्या पक्षाच्या कार्यांत सतत मोडता घालीत राहील.

## पांचांमुखीं परमेश्वर

यासाठीं एक च उपाय आहे. आपल्याकडे एक धार्मिक प्रथा आहे. आपल्याकडे 'पांचांमुखीं परमेश्वर' असें म्हटलें जातें. लोकांना याचा खरा अर्थ समजत नाहीं. ग्रामपंचायत स्थापन करा, एवढा च कांहीं याचा अर्थ नाहीं. परंतु पांचांच्या एकमतानें जो निर्णय होईल तो मानला जावा, असा याचा अर्थ आहे. पण आज मात्र चार विरुद्ध एक, तीन विरुद्ध दोन अशा प्रकारच्या बहुमतानें काम चालतें. 'तिघांमुखीं परमेश्वर' असा वस्तुतः याचा अर्थ झाला. पण हें अनिष्ट आहे. 'पांचांमुखीं परमेश्वर' या न्यायानें एकमतानें काम चाललें तर च तें योग्य होईल. आज हि 'क्वेकर्स' या नांवाचा जो पंथ आहे, त्यांत ही प्रथा चालू आहे. ते एकमतानें च निर्णय घेतात.

## केंद्रीकरणाचे दोष

कांहीं लोक यावर असें म्हणतात कीं, अशा प्रथेमध्यें एखादा हि अडून बसला, तरी सारें च काम स्थगित होईल. तेव्हां आजची ही बहुमतानें निर्णय घेण्याची पद्धत च ठीक आहे. पण आज तर एक माणूस निवडून देण्यासाठीं लाखों लोकांचीं मतें घेतलीं जातात. एवढ्या व्यापक प्रमाणावर हा सामुदायिक प्रयोग केला जातो, त्यामुळें त्यांत कितीतरी अनिष्ट गोष्टी उत्पन्न होतात. यावर उपाय म्हणून मीं जी गोष्ट सुचविली आहे ती म्हणजे राज्याचें विकेंद्रीकरण. बरीचशी सत्ता गांवांत च राहिली पाहिजे. मग त्या गांवागांवांचा परस्पर संबंध जो येईल, त्याचें नियंत्रण जिल्हा करील, दोन जिल्ह्यांच्या संबंधांचें नियंत्रण प्रांत करील आणि दोन प्रांतांमधील संबंधाचें नियंत्रण केंद्रसरकार करील.

पण आज मात्र हिंदुस्थानांतील प्रत्येक खेड्यापाड्यांच्या सर्व व्यवहारांचें नियंत्रण करण्याचा अधिकार प्रांतिक किंवा केन्द्रीय सरकारकडे च आहे. खेड्यांतील लोकांना कोणता हि निर्णय करण्याचा अधिकार नाहीं. खेड्यांत बाहेरच्या डॉक्टरांना येऊं द्यावें किंवा नाहीं हें ठरविण्याचा अधिकार खेड्यां-

तल्या लोकांना नाहीं. याचा परिणाम असा झाला आहे कीं, खेड्यांतील सगळे धंदे नष्ट केले गेले आहेत. आणि आतां हे धंदे पुन्हां सुरू करावयाचे कीं, कायमचे नष्ट होऊं द्यावयाचे हें ठरविण्याचा सारा अधिकार केंद्रीय सरकारला च आहे, खेडेगांवाला नाहीं. याचा परिणाम असा होतो कीं, स्वराज्य फक्त केंद्रांत च राहतें, खेड्यांत राहत नाहीं. खेड्यांना कांहीं किरकोळ गोष्टींचें स्वराज्य मिळालें असेल पण महत्त्वाच्या गोष्टींत त्यांना कसलाहि अधिकार नाहीं.

आज सबंध भारतांत एकच राज्यसत्ता आहे. जुन्या राजामहाराजांचीं अनेक राज्यें संपुष्टांत आलीं हें चांगलें च झालें. परंतु जेव्हां वेगवेगळीं अनेक राज्यें होतीं, तेव्हां प्रजेला कांहीं संरक्षण हि मिळत असे. पण आतां तें सारें नष्ट झालें आहे. जेथें केंद्रांत सारी सत्ता एकत्रित होते, तेथें महत्त्वाकांक्षी लोकांना सत्ता आपल्या हातांत ठेवण्याची इच्छा होते. ते जर बुद्धिमान् असतील, तर कारभार ठीक चालतो, पण ते जर निर्बुद्ध निघाले, तर सगळा कारभार बिघडून जातो. अशा रीतीनें कांहीं लोकांच्या च बुद्धीनें राज्यकारभार चालावा व बाकीच्यांची बुद्धि वाळींत पडावी असें यापुढें चालणार नाहीं.

## विकेंद्रीकरणाची आवश्यकता

आजकाल खेड्यांतील लोकांना सांगतात कीं, रस्ते करा झाडू मारा. याचा अर्थ इतकाच कीं त्यांच्या फक्त हातांचा उपयोग व्हावा, बुद्धीचा नाहीं. अशा परिस्थितींत त्यांना काम करायचा उत्साह कसा वाटावा ? आणि त्यांनीं काम केलें नाहीं कीं, जनता आळशी आहे असें सरकार म्हणतें. इंग्रजींत मजुरांना 'हँड्स्' (हात) म्हणून म्हटलें जातें, आणि त्यांच्यावर देखरेख करणाऱ्या कांहीं थोड्या लोकांना 'हेड्स्' (डोकीं) म्हणतात. अशा प्रकारें समाजाचे दोन तुकडे करून राहू-केतु निर्माण केले गेले आहेत. जर एखाद्याचे हात तोडून बाजूला ठेवले आणि त्या हातांना काम करा म्हणून सांगितलें, तर ते काम कसें करूं शकतील ? हातांच्या बरोबर डोकें असलें तर च हात काम करूं शकणार. झाडू मारण्याचें व रस्ते बनविण्याचें च स्वराज्य जर गांव-

वाल्यांना दिलें, तर त्यांना त्यामध्यें गोडी वाटणार नाहीं. आपल्या जीवनाच्या मुख्य गोष्टीचें नियंत्रण करण्याची सत्ता त्यांना मिळाली पाहिजे.

ज्याला फेडरेशन किंवा संघ म्हणतात तसें चार लाख खेड्यांचें एक संघ-सरकार निर्माण झालें पाहिजे. यांत प्रत्येक खेडें आपापल्या बुद्धीप्रमाणें कारभार करील व केंद्र-सरकार फक्त सल्ला देईल. तो सल्ला मानणें न मानणें हें गांवकऱ्यांच्या इच्छेवर अवलंबून राहील. यांत कांहीं गांवकऱ्यांनीं आपला कारभार ठीक केला नाहीं, तर केवळ दोन चार गांवांचा च कारभार बिघडेल, पण आज कारभार बिघडला कीं साऱ्या राज्याचा च बिघडतो. ज्याप्रमाणें घरच्या स्वयंपाकांत कांहीं भाकरी बिघडल्या, तरी बाकीच्या चांगल्या असतात परंतु बेकरीमध्यें थोडें हि बिघडलें, तरी त्याचा परिणाम सर्वच्या सर्व रोट्या बिघडण्यांत होतो, त्याप्रमाणें आतां पांच वर्षांनंतर निवडणूकी होऊन नवें सरकार येऊं शकतें हें खरें पण जुन्या सरकारनें जें केलें तें च नव्या सरकारला चालू ठेवावें लागतें. नवें सरकार जुन्या सरकारच्या वचनांनीं बद्ध झालेंलें असतें. आजच्या सरकारनें जर परदेशी लोकांशीं कांहीं व्यापारी करार केलेले असले, तर पुढें येणाऱ्या सरकारला ते पाळावे च लागतात. त्यांतून मुक्त होण्यासाठीं रक्तरंजित क्रांति च करावी लागतें. पण अशी क्रांति वारंवार होऊं शकत नाहीं. तेव्हां आज सरकारच्या हातीं सारी सत्ता अशा प्रकारें केंद्रित झाली आहे, कीं, कारभार सुधारला तर साराच्यासारा च सुधारेल आणि बिघडला तर सगळाच्या सगळा च बिघडेल. यासाठीं च सत्तेच्या विकेंद्रीकरणाची गरज आहे.

## सर्वोदय-रचनेचे दोन सिद्धांत

सर्वोदय-रचनेमध्यें प्रत्येक खेड्यांत ग्रामपंचायत राहील आणि प्रांतासाठीं प्रतिनिधि निवडण्याचा अधिकार पंचायतीला राहील. ग्राम-पंचायतीच्या च हातीं सारी सत्ता राहील आणि वरच्या सरकारच्या हातीं नाममात्र च सत्ता राहील. वरचें सरकार फक्त सल्ला देईल आणि रेल्वे, रस्ते तसें च परदेशांशीं व्यवहार यांच्यावर त्याचें नियंत्रण राहील. अशामुळें महत्त्वाकांक्षी लोकांना सत्ता हस्तगत करण्यांत आज जेवढा उत्साह वाटतो,

तेवढा मग वाटणार नाहीं. कारण मग प्रांताच्या किंवा केंद्राच्या हातीं कांहीं अधिकार च राहणार नाहीं. सारा अधिकार गांवकऱ्यांच्या च हातीं राहील आणि ग्राम-पंचायतीचें काम 'पांचांमुखीं परमेश्वर' या नियमानें चालेल.

यावर अशी शंका विचारली जाईल कीं, या योजनेंत एका हि माणसानें अडवलें तरी, कोणता च निर्णय होऊं शकणार नाहीं. पण याप्रमाणें जर एखादी ग्रामपंचायत कांहीं निर्णय घेऊं शकली नाहीं, तर ती समाप्त होईल व दुसऱ्या ग्रामपंचायतीची निवड केली जाईल. अशा परिस्थितींत सर्वांना आपसांत विचार-विनिमय करून एकमतानें निर्णय घेण्याची प्रेरणा होईल. आज 'क्वेकर्स' पंथामध्यें ज्या प्रकारें एकमतानें निर्णय घेतले जातात, त्याप्रमाणें च पूर्वीच्या काळचे लोक निर्णय घेत असत. असें जर आपण केलें, तर सारी व्यवस्था अहिंसात्मक होईल. कुणाला हि असंतुष्ट होण्याची संधि मिळणार नाहीं. देशांतील सर्वांच्या बुद्धीचा उपयोग होईल व काम करतांना कांहीं बिघडलें, तरी दोन चार गांवांचें च बिघडेल, सगळयांचें बिघडणार नाहीं.

आज एखाद्याच्या तांत्रिक चुकीसाठीं 'बाय-इलेक्शन' उपनिर्वाचन करावें लागतें. पुन्हां त्या निवडणुकीसाठीं हजारों माणसें कामाला लागतात व हजारों रुपयांचा चुराडा होतो. वेळेचा तर अपव्यय होतो च, शिवाय वर लोकांत केवढे भेद-भाव निर्माण होतात ! गांवागांवांत कलह व वैर निर्माण होतें. हें सारें जर आम्हांला नाहीसें करायचें असेल, तर आम्हांला, जिच्यांत महत्त्वाकांक्षी लोकांच्या हातीं सत्ता राहणार नाहीं व पक्ष-भेद मिटतील, अशी व्यवस्था करावी लागेल. विशिष्ट एका किंवा कांहीं थोडया लोकांच्या हातीं सत्ता राहिली, तर ते जगाला आकार तरी देऊं शकतील किंवा बिघडवूं हि शकतील. यावर एक च उपाय आहे. ( १ ) गांवांच्या हातीं सगळी सत्ता असली पाहिजे व ( २ ) ग्रामपंचायतीचें काम 'पांचामुखीं परमेश्वर' या नियमानें चाललें पाहिजे. ह्यालाच सर्वोदय म्हणतात. आणि असें जिथें असेल तें च खरें व अहिंसक स्वराज्य.

## कुठें एकमतानें तर कुठें बहुमतानें निर्णय

बहुमत व अल्पमत हा प्रश्न कृत्रिम आहे. आज जी लोकशाही चाललेली दिसते तिनें हे प्रश्न उत्पन्न केले आहेत. यांच्यापासून मुक्त

व्हायचें असेल, तर सत्तेचें विकेंद्रीकरण करून गांवांत 'पांचामुखीं परमेश्वर' या न्यायानें काम चालविलें पाहिजे. यावर असा प्रश्न विचारला जाईल कीं, 'खेड्यांच्या बाबतींत तर ही व्यवस्था ठीक होईल. पण खेड्याच्या तर्फे जे प्रतिनिधि प्रांतांच्या कारभारासाठीं निवडले जातील, ते तर बहुमतानें च निर्णय करतील कीं नाहीं?' मध्यंतरीच्या काळासाठीं ही व्यवस्था चालेल, पण त्या प्रतिनिधींची निवड अशा तऱ्हेनें केली जाईल कीं, विधानसभेचे महत्त्वाचे निर्णय हे एकमतानें च घेतले जावेत अशी त्यांना संवय च पडेल. जीवनांतील ज्या मुख्य गोष्टी आहेत—अन्न, वस्त्र, शिक्षण,—त्यांच्याबद्दलची सत्ता खेड्यांत च राहील. या शिवाय इतर ज्या साधारण बाबी राहतील त्यांच्याबद्दलचे निर्णय जर बहुमतानें घेतले गेले, तर त्यांत कोणाचें कांहीं बिघडणार नाहीं. अल्पमतवाल्यांच्या मनांत असंतोष उत्पन्न होण्यासारखी अशी कोणती च गोष्ट त्यांत राहणार नाहीं. पण अन्न, वस्त्र, शिक्षण इत्यादि महत्त्वाच्या गोष्टीबद्दल जर मतभेद झाला आणि बहुमतवाल्यांच्या च निर्णयानुसार काम चाललें, तर मात्र अल्पमतवाल्यांना दुःख होईल. अशा च वेळीं एकमेकांवर आघात-प्रत्याघात चालू होतात. पण जेथें प्रांतिक सरकारकडे गौण विषय सोंपविलेले असतात, तेथें बहुमतानें निर्णय झाले, तरी कांहीं बिघडत नाहीं. तेथें हि कांहीं विषयांसाठीं शेंकडा ७० किंवा ८० मतें असलीं च पाहिजेत, असे नियम करतां येतील. पण शेंवटीं मात्र एकमतानें च निर्णय करण्याची संवय समाजाला लागली पाहिजे.

केंद्राचा निर्णय मात्र एकमतानें च झाला पाहिजे. आज हि तसा च होतो. मंत्रिमंडळांत महत्त्वाच्या प्रश्नांवर एकमतानें च निर्णय घेतला जातो. मतभेद असेल, तर नुसती चर्चा होते, निर्णय घेतले जात नाहींत. यासाठीं केंद्राच्या बाबतींत काळजी करण्यासारखें कांहीं च नाहीं.

## विचार भिन्न असोत, पण आचार मात्र एक असावा

याप्रमाणें गांवांच्या व केंद्राच्या कारभाराबद्दल चिंता करण्याचें कारण च नाहीं. आणि प्रांतिक सरकारांत जे लोक निवडून येतील, त्यांना हि एकमतानें निर्णय करण्याची संवय होईल. या सर्वांमागें सार्वजनिक हिताच

व आधारभूत असा विचार हा आहे कीं, आज देशांत वेगवेगळे पक्ष आहेत, अशा परिस्थितींत देशाची प्रगति करण्यासाठीं सर्व पक्षांना मान्य असणारा असा च कार्यक्रम स्वीकारला पाहिजे. विचारांत त्यांचे भेद असोत, पण आचाराच्या बाबतींत सर्वांचें एकमत झालें पाहिजे. सर्वांना मान्य असा जर कार्यक्रम ठरवला तर देशाची निश्चित प्रगति होईल. पण कार्यक्रमांत च जर मत-भेद राहिले, तर हिंदुस्थानची प्रगति होऊं शकणार नाहीं. कारण आपल्या देशांतील लोक हे प्रवृत्तिशील नाहींत. इथें आळस भरपूर आहे.

## विचार-मंथन अवश्य व्हावें

प्रत्येकाला विचार-प्रचार करण्याचा पूर्ण हक्क असला पाहिजे. मंथनांतून लोणी निघतें. पण हल्लीं तर कार्यक्रमाचें च मंथन चालतें, आणि त्यामुळें जनता निष्क्रिय व हताश बनते. आपल्याला राज्यकारभाराचा जसजसा अधिक अनुभव येईल, तसतसें हें कळूं लागेल कीं जनतेंत बुद्धिभेद करतां उपयोगी नाहीं. सर्वांचें एकमत असेल, असा लहानसा कार्यक्रम हातांत घेऊन तो अमलांत आणण्यास आरंभ केला पाहिजे. भूदान-यज्ञाच्या बाबतींत सर्व पक्षांचें एक मत आहे ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. तेव्हां एवढा च कार्यक्रम लोकांपुढें ठेवावा व तेवढा पूर्ण करवून घ्यावा. याप्रमाणें एकेक सर्वमान्य कार्यक्रम हातीं घेत घेत व तो पार पाडीत पाडीत आपण आपली प्रगति करूं शकूं. नाहीं तर भिन्नभिन्न मतांबरोबर भिन्नभिन्न कार्यक्रम जर आंखले गेले आणि त्या कार्यक्रमांमध्यें विरोध उत्पन्न होत गेला तर देशाचें पाऊल पुढें पडूं शकणार नाहीं.

नेतरहा, ता. १३-६-१९५३

## अहिंसक राज्याची स्थापना

: २० :

आपण रोज पाहतों कीं पक्षी आपल्या जीविकेच्या शोधार्थ आकाशांत इतस्ततः फिरतात, उडतात आणि शेंवटीं श्रांत होऊन विश्रांतीसाठीं आपल्या घरट्यांत परत येतात. वेद म्हणतो, त्याच प्रमाणें सर्व जीव जगांतील विविध कर्में करून अनेक प्रयोग करून, आणि कर्म-फलाचा उपभोग घेऊन थकल्यानंतर शांतीसाठीं, नव्या उत्साहाच्या प्राप्तीसाठीं आणि कांहींसें आत्म-परिक्षण करण्यासाठीं एके ठिकाणीं येतात. ' **यत्र विश्वं भवति एकनीडम्** ' असें एक स्थान असतें.

महात्मा गांधींच्या निर्याणानंतर अहिंसेचा विचार मानणाऱ्या, त्या आकाशांत संचार करणाऱ्या, पक्षांना सर्वोदय-समाज एक विश्राम-स्थान बनलें आहे. जर असें स्थान नसतें, वर्षांतून आम्ही लोकांनीं एकत्र जमण्याची योजना जर नसती, तर यथाशक्ति आम्ही आकाशांत संचार जरूर केला असता, परंतु कळत न कळत आमच्या शक्ति परस्परांवर थडकल्या असत्या आणि आम्ही तोंडानें अहिंसेचा जप करीत करीत हिंसेच्या मार्गाकडे खेंचलों गेलों असतों.

तरीपण आपले परस्परविरोधी कांहीं विचार बनले असतील तर ते सर्व आपण तेथें मांडू शकतों. जशी एखादी नदी पूर्वेकडे जाते तर दुसरी पश्चिमेकडे जाते. त्या जशा परस्पर विरुद्ध दिशांना जात असून हि शेंवटीं समुद्रांत एकरूप होतात, त्याच प्रमाणें भिन्न भिन्न विचार-प्रवाह आणि कधीं कधीं परस्परविरोधी विचार-प्रवाह सुद्धां, जे परस्पर विरुद्ध दिशेनें वाहतांना दिसतात ते सर्व चर्चेंत लीन होऊं शकतात आणि व्हायला पाहिजेत. म्हणून आतां जो मी विचार तुमच्या समोर मांडणार आहें, त्या विचाराबाबत माझी व्यक्तिगत केवढी हि निष्ठा असली तरी त्याविषयीं माझा आग्रह राहणार नाहीं. चर्चेसाठीं, विचारासाठीं ज्या गोष्टी सुचल्या, ज्यांचा अभ्यास होत गेला अशा गोष्टी मी तुमच्या समोर ठेवतों.

## साम्यवाद्यांचा विचार

दंड-शक्तीच्या आधाराशिवाय राज्यकारभार चालू शकेल, अशी समाजाच्या विकासांत एक वेळ आली पाहिजे, असें आमच्यापैकीं पुष्कळ लोक मानतात. हें च अंतिम ध्येय साम्यवादी हि मानतात. परंतु तें ध्येय साधण्यासाठीं चालू क्षणाला जास्तींत जास्त मजबूत केन्द्रिय सत्ता असली पाहिजे आणि अशा सत्तेच्या मार्फत च इतर सर्व अन्यायी सत्ता खंडित करतां येतील, असा त्यांचा विश्वास आहे. त्यानंतर ज्याप्रमाणें ज्वलंत अग्नि सर्व काष्ठें जाळून टाकून स्वतः हि नष्ट होऊन जातो, त्याप्रमाणें लोकांनीं च उभी केलेली ही केन्द्रिय सत्ता, दुसऱ्या तशाच सर्व सत्तांचा हिंसेनें -- अर्थात गरज वाटल्यास-- नाश करून मग स्वतः हि नष्ट होईल. हा एक विचार, मीं अगदीं थोडक्यांत सांगितला. ज्यांचा असा विचार आहे त्यांनीं याचाच फार मोठा विस्तार केलेला आहे आणि त्याचें एक खासें शास्त्र हि त्यांनीं बनविलेलें आहे. त्याचें हि चिंतन मनन आम्हीं केलें पाहिजे.

## अहिंसक समाज-रचनेला काँग्रेस बाधक तर नाहीं ?

याशिवाय, कोणत्या हि परिस्थितींत शासन कांहीं ना कांहीं राहील च असे मानणारे हि कांहीं लोक आहेत. शासन म्हणजे दंडयुक्त राज्यकारभार. जोंपर्यंत सत्त्व, रज, तम हे तीन्ही गुण आहेत तोंपर्यंत समाजांत दंडशक्ति लागेल च असें त्यांचें म्हणणें आहे. रजतमांचा पूर्णपणें लोप झाला आहे अशी अवस्था कधीं येणें शक्य नाहीं, म्हणून कोणत्या हि हालतींत, सौम्य का असेना, पण दंडशक्तीची आवश्यकता राहील असें त्यांना वाटतें. अशा तऱ्हेचे वेगवेगळे विचार त्या अंतिम साध्यासंबंधीं चालतात. हिंसक समाज-रचनेंत दंडशक्ति तर कायम च राहील आणि तिचा आधार हि तो समाज च असेल, परंतु अहिंसक समाजांत हि आजच्या परिस्थितींत दंडशक्ति राहील असें आज आम्हांला मानावें लागत आहे. परिस्थितीकडे पाहतां दंडशक्तीला एक स्थान आहे हें कबूल करावें लागेल. तरी पण अहिंसक समाजांत सर्वांत मोठी संस्था सेवेची असेल, आणि तींत दंड व सत्ता यांना जरी स्थान असलें तरी तें गौण असेल.

या दृष्टिकोनांतून जेव्हां मी विचार करतों तेव्हां वाटतें कीं हिंदुस्थानांत अहिंसक रचना करण्याच्या मार्गांत सर्वांत अधिक अडचणींत टाकणारी आजची कॉंग्रेस तर होणार नाहीं ना ? कारण कॉंग्रेस आज आपल्या देशांतली सर्वांत मोठी आणि निवडणूक-प्रधान अशी संस्था आहे, व तिचा कार्यक्रम निवडणुकीमार्फत सत्ता, सत्तेमार्फत सेवा, असा आहे.

अशा स्थितींत ज्या देशाची सर्वांत मोठी संस्था निवडणूक-प्रधान आहे, त्या देशांत अहिंसेच्या प्रगतींत एक बाधक यंत्र उभें आहे असा आभास होतो. या सर्व गोष्टी मी चर्चेसाठीं, विचारासाठीं, तुमच्यासमोर ठेवीत आहें. या संबंधीं मीं माझ्या मनांत कोणता च असा निर्णय घेतलेला नाहीं. तुम्ही यावर विचार करा. आमच्या राष्ट्रपित्यानें यावर उपाय सुचविलेला आहे. ते द्रष्टे होते आणि उपद्रष्टे हि होते. दूरचें आणि जवळचें, दोन्ही प्रकारचें दर्शन त्यांना होतें. त्यांना असें वाटत होतें कीं, देशाची सर्वांत प्रबल संस्था कॉंग्रेस, जिनें या देशावरचा सर्वांत मोठा बोझा, ज्या खालीं देश दबला गेला होता, दूर सारला, तिचें तें कार्य संपल्यानंतर तिनें ' लोक-सेवक-संघ ' म्हणून रहावें. मी विचार करतों तेव्हां त्यांत किती कुशल बुद्धिमत्ता होती याचें मला दर्शन होतें. जर तसें घडलें असतें तर देशांतली सर्वांत मोठी संस्था ' सेवक-संस्था ' झाली असती. परंतु तसें घडलें नसल्यामुळें आतां सेवेसाठीं म्हणून ' भारत-सेवक-समाज ' बनवावा असा विचार केला जात आहे. भारत-सेवक-समाज सेवा करील, परंतु देशांतली सर्वांत मोठी ताकत सत्ताभिमुख आहे, निवडणूक-प्रधान आहे, अशा स्थितींत भारत-सेवक-समाजाला विशेष बळ मिळूं शकत नाहीं. तो समाज गौण च राहील. अशा सेवा करणाऱ्या गौण-संस्था हिंसक समाजांत हि असतात. कारण समाज म्हटला कीं, मग तो हिंसाश्रित असो किंवा अहिंसाश्रित असो, सेवेची गरज तेथें प्रत्यक्षतः असणार च, त्यामुळें त्या समाजांत सेवा असते आणि सेवा करणाऱ्या संस्था हि असतात. परंतु अहिंसक समाजांत सर्वांत मोठी संस्था ' सेवामय ' च असली पाहिजे. ' नुसतें सेवा-प्रधान ' म्हणण्यानें हि माझें समाधान होत नाहीं म्हणून मी ' सेवामय ' असें म्हणतों.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 26132 वि: निबंध
क्रमांक 7216 नों: दि: 30.12.2014

## लोक-सेवक-संघ

दुसरी गोष्ट म्हणजे, लोक-सेवक-संघाच्या कल्पनेमागें सत्तेवर अंकुश ठेवण्याची गोष्ट गृहीत होती. आजच्या आवश्यक्तेनुसार एक सत्ता राज्य-शासन करणारी राहिली असती आणि तिच्या हातीं दंड सोपवून बाकीचा सारा समाज दंड-रहित बनला असता. आणि ज्या अर्थी समाजानें त्या संस्थेच्या हातीं दंड-शक्ति सोपविली आहे त्या अर्थी तिच्यावर अंकुश ठेवणारी सत्ता समाजाची राहिली असती. म्हणजे च सेवा सार्वभौम झाली असती आणि सत्ता सेविका बनली असती. अशा त्या सार्वभौम सेवक-संघाच्या आशीर्वादानें लोक निवडणुकींत उभे राहिले असते आणि त्यांची सेवा पाहून च समाजानें त्यांना निवडून दिलें असतें. अशा रीतीनें सर्व कांहीं सुरळित झालें असतें, परंतु अनेक कारणांनीं तसें घडू शकलें नाहीं; व कांग्रेस प्रामुख्यानें 'इलेक्शनियरिंग बॉडी' निवडणूक खेळणारी संस्था झाली. परिणाम असा झाला कीं, मी विनोदानें म्हणतों त्या प्रमाणें, सर्व समाजांत भूत, भविष्य आणि वर्तमान या तीन्ही काळांचें परिवर्तन ' इलेक्शन पीरियड ' ' प्री-इलेक्शन पीरीयड ' आणि ' पोस्ट इलेक्शन पीरीयड ' मध्यें होऊं लागलें. म्हणजे सर्व कालात्मा या तीन काळांत च खतम झाला. आतां ज्या कारणांमुळें हें झालें त्याची मी चर्चा करूं इच्छीत नाहीं. ज्या पद्धतीनें आमच्या नेत्यांनीं विचार केला त्याला कांहीं आधार नव्हता असें हि मी म्हणत नाहीं. मी एवढें च म्हणतों कीं, त्यामुळें आपल्या देशांत अहिंसेच्या मार्गांत अनेक अडचणी उभ्या झाल्या आहेत एवढें आपण समजून घेतलें पाहिजे.

## नव्या सेवा-संघाची जबाबदारी

त्यामुळें आमच्यावर एक नवीन संस्था निर्माण करण्याची एक निष्कारण जबाबदारी येत आहे, जी गांधीजींच्यानंतर यायला नको होती. या देशांत आम्हीं एक सेवामय आणि सर्वांत मोठी संस्था बनविणें म्हणजे फार च मोठी कठिण समस्या आहे. ५०-६० वर्षांपासून काम करणारी एक संस्था, जिनें इतिहासांत अंकित होण्यासारखें असें एक फार मोठें काम केलें, जिला आम्ही सर्वांनीं भक्तिपूर्वक साथ दिला; तिला नगण्य समजून

बाजूला सारून कोणीं पुढें यावें हें असंभवनीय आहे. तरी हि ही जबाबदारी, ज्यांच्या खांद्यांत तो भार पेलण्याची ताकत नाहीं, बुद्धींत तेवढें बळ नाहीं, आणि ज्यांचा एक महान नेता गेल्यामुळें जे हवालदिल आहेत, अशा लहान लहान सेवकांवर येऊन पडली आहे.

सेवेच्या लहान लहान संस्था आम्ही अवश्य उभारूं शकतों. तें काम आमच्या लायक हि आहे. तशा संस्था उभारतांना, मग वाटल्यास कॉंग्रेस अथवा महा कॉंग्रेस का त्याविरुद्ध उभी ठाकेना, आम्हांला त्याचें भय नाहीं. कारण इंग्रज सरकारच्या आमदनींत हि जियें आम्हीं सेवेच्या संस्था उभ्या केल्या तर आजचें सरकार तर आमचें आहे. आम्हांला मदत करणारें आहे. म्हणून केवळ लहान लहान सेवा-संस्था बनविणें आम्हांला कठिण नाहीं. परंतु आमच्याबद्दलची अपेक्षा एवढी च नाहीं. आपल्यावर जी जबाबदारी येऊं पाहत आहे तिचें स्वरूप, आम्ही केवळ सेवा-संस्था न बनवितां, जी संस्था सेवा हि करील आणि सेवेमार्फत राज्यतंत्रावर अंकुश हि ठेवील अशी शक्ति जिच्यांत असेल, अशी सेवा-संस्था आपल्याला निर्माण करण्याची आहे. खरोखर च ही फार मोठी आणि कठिण जबाबदारी आमच्यावर टाकलेली आहे. परमेश्वराच्या मनांत असेल तर तो आमच्या सारख्या कमजोर लोकांकडून हि कार्य करवून तें पार पाडील. ती त्याच्या मर्जीची गोष्ट आहे. बाकी आपल्या दृष्टीनें काम महा कठिण आहे.

## खरी ताकत कोठें ?

अशा स्थितींत भिन्न भिन्न राजकीय संस्थांतून आमचे जे मित्र आहेत, त्या सर्वांनीं आम्हांला कांहीं मदत द्यावी अशी त्यांच्यावर स्वाभाविक च जबाबदारी येते. त्यांनीं आम्हांला एवढी च मदत द्यावी कीं ज्या क्षेत्रांत ज्या स्थानीं ते असतील तेथें सेवा कशी वाढीला लागेल याविषयीं प्रयत्न करावा. मग ते प्रजा-समाजवादी पक्षाचे असोत, अथवा कॉंग्रेस पक्षाचे असोत वा अन्य कोणत्या हि राजकीय पक्षाचे असोत, जेथें ते असतील तेथें त्यांनीं निवडणुकांच्या जंजाळांतून मुक्त असणारी संस्था उभी करण्याचा पूर्ण प्रयत्न करावा. एका राजकीय संस्थेंत अनेक ग्रूप निर्माण झाले तर राजकीय क्षेत्रांत ती एक फार मोठी धोक्याची अवस्था मानली जाते. त्यामुळें

९०२५९

त्यांच्या राजकीय क्षेत्रांत अलग अलग ग्रूप करा अशा प्रकारची कसली हि सूचना मी त्यांना करीत नाहीं. ते ज्याला ताकत समजतात ती त्यांची ताकत तुटून पडावी, अशी माझी मुळींच इच्छा नाहीं. जेव्हां त्यांच्याच लक्षांत येईल कीं ज्याला ते ताकत म्हणून समजत होते ती मुळांत ताकत च नाहीं तेव्हां ते स्वतःच त्याचा त्याग करतील. परंतु जोंपर्यंत त्यांत ताकत असल्याचें त्यांना वाटतें तोंपर्यंत त्यांची ताकत कोणत्या कां कारणानें तुटून पडावी अशी इच्छा मी करणार नाहीं. माझें म्हणणें एवढेंच आहे कीं ज्या अलग अलग संस्थांतून आमची जी मित्रमंडळी आहेत, त्यांना अहिंसात्मक, रचनात्मक अशीं जीं कामें वाटतात तीं कामें त्या संस्थांमधून मुख्य असावींत आणि अन्य कामें गौण व्हावींत.

निवडणुकांना किती जरी महत्त्व दिलें तरी शेंवटीं ती अशी वस्तु नाहीं कीं तिनें समाजाच्या उत्थानाला कांहीं मदत मिळेल. तें 'डेमॉक्रसी' साठीं उभें केलेलें एक तंत्र आहे. एक 'फॉर्मल डेमॉक्रसी' (औपचारिक लोकसत्ता) इथें आलेली आहे. राज्य-कार्यांत प्रत्येकाचा हिस्सा असला पाहिजे आणि त्यासाठीं प्रत्येकाचें मत विचारलें पाहिजे व मतांची मोजणी केली पाहिजे असें ती म्हणते. प्रत्येकजण हें जाणतो कीं परमेश्वरानें अशी कांहीं समानता निर्माण केलेली नाहीं कीं जिच्या आधारावर एका मनुष्याला एक मत असल्यास दुसऱ्यास हि एक च मत असलें पाहिजे, या गोष्टीचें आम्ही समर्थन करूं शकूं. परंतु हें अगदीं स्पष्ट आहे कीं पं. नेहरूंना एक मत आहे व त्यांच्या चपराशाला हि एक च मत आहे. यांत कोणती अक्कल आहे मला माहीत नाहीं आणि हें समजावून सांगेल असा कोणी मला भेटला नाहीं. परंतु मी आपल्या मनांत जेव्हां याचें समर्थन करतों त्यावेळीं मला खूप आनंद होतो. तें समर्थन असें कीं, त्यांत आत्म्याची समानता मानलेली आहे आणि त्यानें माझ्या वेदान्ताचा च प्रचार होत आहे. प्रत्येकाची बुद्धि वेगवेगळी आहे, कमी अधिक आहे; शारीरिक शक्तीच्या बाबतींत हि तसें च आहे. या शिवाय अन्य दुसऱ्या शक्ति देखील कमी जास्त असतात तरी हि आम्हीं प्रत्येकाला एक च मत मान्य केलें आहे. याचें समर्थन असें च होऊं शकेल कीं प्रत्येकाला एक मत मानणारे लोक वेदान्त च मान्य करतात. ही फार छान गोष्ट आहे. आणि ज्या विचारानें आम्ही

साम्ययोगी-समाजाची स्थापना करूं इच्छितों त्यासाठीं आमचा विचार पुढें सरकविण्याला आम्हांला एक फाचर मिळाली, फार मोठा आधार मिळाला म्हणून आम्हांला फार आनंद वाटतो.

## मूल्य-परिवर्तन प्रमुख आणि निवडणुकी गौण

परंतु विचार करण्यासारखी गोष्ट आहे कीं, व्यावहारिक बाजूनें पहातां मतांची मोजणी करून आम्ही जिथें राज्य चालवितों तिथें त्याला फारसें महत्त्व नसतें. त्यानें समाज-परिवर्तन होईल असें त्याचें महत्त्व नाहीं. आज समाजाला काय हवें तें जाणून घेण्यानें पुढच्या परिवर्तनासाठीं दिशासूचन म्हणून त्याची कांहीं मदत मिळू शकेल, परंतु केवळ तेवढ्यानें च समाज-परिवर्तन होईल असें नाहीं. म्हणून व्यावहारिक क्षेत्रांत निवडणुकांना किती हि जरी महत्त्व असलें तरी जेव्हां मूल्य-परिवर्तनाचा प्रश्न येतो–आणि मूल्य-परिवर्तना-शिवाय समाज पुढें जात नाहीं–तेव्हां ती वस्तु गौण च ठरते. एवढें लक्षांत घेऊन आमची मित्रमंडळी जिथें आहेत तिथें त्यांनीं बसल्या बसल्या रचनात्मक कार्यावर जोर देण्याचा विशेष प्रयत्न करावा आणि तसें करतांना त्यांच्या लक्षांत आलें कीं आपण विशेष कांहीं करूं शकत नाहीं, उलट आपण जें काहीं करतों त्याला शून्यवत वा निष्फल करण्याचाच तेथें एकूण मसाला भरलेला आहे तर त्यांनीं तेथून बाहेर पडावें. ते जर असें करतील तर, जो फार मोठा बोझा उचलण्याला आमच्यासारख्या दुर्बल लोकांना भाग पाडलें आहे, त्यांत त्यांना काहीं मदत च मिळेल.

## अहिंसेची धोकेबाज व्याख्या

दुसरी एक विचार करण्यासारखी गोष्ट म्हणजे गांधीजींनीं प्रत्येक बाबतींत अहिंसेचें नांव घेतलें त्यामुळें आम्हां सर्वांच्या डोक्यावर अहिंसेचा वरद-हस्त च आहे. परंतु आमच्यापैकीं कांहीं लोक सरकारमधें गेलें, कांहीं बाहेर आहेत. अहिंसेचा सरकारी अर्थ म्हणजे समाजाला कमींत कमी त्रास देणें व आज जी एक व्यवस्था आहे त्यांत समाजाला पीडा वाटेल अशा प्रकारचा मोठा बदल न करणें असा झाला आहे. आणि याचें च नांव अहिंसा ! आज जेव्हां समाजवादी रचना ‘ सोशॅलिस्टिक पॅटर्न ’ बनवायची असें म्हटलें

जातें तेव्हां त्याच बरोबर असें हि म्हटलें जातें कीं त्यासाठीं आमचा मार्ग अहिंसेचा च राहील. जेव्हां हे दोन्ही शब्द एका च वेळीं मी ऐकतों तेव्हां माझ्या मनांत सत्याग्रहाशिवाय, सर्वोदयाशिवाय दुसरा अर्थ च निघत नाहीं. परंतु पुष्कळ लोक त्याचा अर्थ इतका च करतात कीं, आम्हांला समाजवादी रचनेसाठीं जें परिवर्तन करावें लागेल तें अगदीं आस्ते कदम करावें लागेल. तळहातावर फोड व्हावा आणि त्याला जसें मुळींच त्रास न होतां वागविलें जावें तसें फार नाजुकतेनें–समाज-रचनेमुळें त्रास न व्हावा, एकदम फार मोठा फरक नसावा अशा पद्धतीनें–काम करणें यालाच अलीकडे सामान्यतः अहिंसा म्हणून समजलें जातें. याचा अर्थ अहिंसा म्हणजे अगदींच एक निरुपद्रवी वस्तु झाली. अहिंसेची ही अशी व्याख्या अहिंसेच्या बाजूनें अत्यंत धोक्याची आणि हिंसेला पूर्ण मदत करणारी आहे. बुद्धानें ही वस्तु आम्हांला अगदीं स्पष्ट शब्दांत सांगितली कीं '**मन्दं पुण्यं कुर्वतः पापे हि रमते मनः**' जर आम्ही पुण्याचरण आळसानें हळू हळू करूं लागलों, तर पाप शीघ्र, त्वरित गतीनें वाढतें.

## अहिंसेंत तीव्र संवेगाची आवश्यकता

अहिंसेचा अर्थ 'कमींत कमी वेगानें, समाजाला फार त्रास न होतां पुढें जाणें' असा केला जाईल तर तो अर्थ अहिंसेच्या ऐवजीं हिंसेला च मदतनीस होईल, त्यांतून हिंसा जोरानें फोफावेल. दारू-बंदीच्या कार्यक्रमाला 'गो स्लो' म्हणणें म्हणजे दारू अधिक जोरानें वाढविणें होय. दुर्जनता बलवान् असते. म्हणून कृपा करून अहिंसेसाठीं 'गो स्लो' चा विचार लागू करूं नका. तो विचार हिंसेसाठीं लागू करा. त्या ठिकाणीं 'गो स्लो' ठीक आहे; परंतु अहिंसेंत तीव्र संवेगच हवा. शास्त्र-वाक्य आहे '**तीव्र संवेगानाम् आसन्नः**' जर आपल्याला चांगुलपणा लवकरांत लवकर आणि अगदीं निकट आणायचा असेल तर त्यांत तीव्र संवेग च असला पाहिजे. अहिंसेचा अर्थ जर अगदीं मृदु, लुसलुशीत, निर्वीय असा केला जाईल तर त्यांतून आम्हांला नको असलेल्या विरोधी शक्ति वाढतील. या गोष्टीचें भान गांधीजींच्या सर्व अनुयायांना होवो अशी आमची परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.

## राजाजींची सूचना

सर्व जगासमोर राजाजींनीं दोन तीन वेळां एक महान विचार मांडला. तो विचार मांडायला तेच एक समर्थ आहेत. कारण ते तत्त्वज्ञानी आहेत आणि त्याच बरोबर ते राजकारणकुशल हि आहेत. ज्या पुरुषांत तत्त्वज्ञान आणि राजकारणकुशलता या दोन्हींचा संयोग होतो आणि शिवाय जो शब्द-शक्तीचा हि ज्ञाता आहे– शब्दांचा उपयोग कसा करावा यांत जो प्रवीण आहे– तो च मनुष्य असें सांगण्याला अधिकारी असतो. ते म्हणाले 'युनिलिटरल ॲक्शन' म्हणजे एकपक्षीय सज्जनता प्रकट झाली पाहिजे. तूं इतका सज्जन बनलास तर मी इतका सज्जन होईन अशा तऱ्हेनें समोरच्या माणसावर शर्त टाकून कोणी सज्जन होणार असेल तर त्यामुळें सज्जनता वाढत नसते. ती स्वयमेव स्वतःच्याच विचारानें वाढते. असा त्यांनीं अमेरिकेला एक विचार सुचविला.

आतां अमेरिकेसमोर मोठा च कठिण प्रसंग आला. अमेरिकेची एकूण जनता विद्वान आहे, कारण हिंदुस्थानपेक्षां प्रति व्यक्ति १६० पट कागद तेथें खपतो ! तेव्हां तिथल्या विद्वान जनतेनें एका लष्करांत प्रविण असलेल्या मनुष्याच्या हातांत सर्व सत्ता सोंपविली आणि त्याला सांगितलें कीं 'फार्मोसाच्या बाबतींत सर्व कांहीं करण्याचा पुरेपूर अधिकार आम्हीं तुला दिला आहे, तुला सर्वाधिकारी बनविलें आहे. तुला गरज वाटली तर तुझ्या हातांत असलेलें ब्रह्मास्त्र आणि पाशुपतास्त्र यांचा सुद्धां तूं उपयोग करूं शकतोस.' अशा प्रकारें सर्व विद्वानांचा ज्याच्यावर इतका विश्वास, तो जर राजाजींची सल्ला मान्य करील तर लोक त्याला म्हणतील कीं 'मग आम्हीं निवडणुकींत राजाजींना च कां निवडूं नये ?' बिचाऱ्यापुढें मोठा अवघड प्रश्न पडला आहे ! काय करणार तो ! त्याला सर्व जनतेकडून 'मेंडेट' आहे कीं 'त्यानें ती च अक्कल चालवावी कीं त्याच्या ज्या अकलेकडे पाहून आम्ही त्याला निवडून दिलें होतें.' तो आपली अक्कल खिशांत ठेवून राजाजींच्या अकलेप्रमाणें वागेल तर त्या प्रजेचा केवढा विश्वासघात होईल ! ती म्हणेल, "अरे बाबा ! तुला आम्ही काय तुझी अक्कल राजाजींना अर्पण करण्यासाठीं निवडला होता ? तुझी निवड

आम्हीं एवढ्यासाठीं च केली होती कीं तूं आम्हांला मागच्या लढाईंतून वाचविलेंस, त्यावेळीं तूं बहादुरी दाखविलीस. तूं आमचें रक्षण करणारा असें समजून आम्हीं सर्व दंड-शक्ति तुझ्या हातीं सोंपविली, आणि तूं, भल्या माणसा, एका तत्त्वज्ञाच्या गोष्टी ऐकतोस ! "

## सैन्य काढून टाकण्याची शक्ति देशांत कशी निर्माण होईल ?

परंतु मी माझ्या मनांत विचार करतों कीं दुसऱ्यांना असा सल्ला देण्याला आपण लायक आहोंत काय ? मीं आतांच सांगितलें कीं राजाजींच्यांत त्रिविध शक्ति एकवटल्या असल्यानें अशा प्रकारचे उद्‌गार प्रकट करण्याचा त्यांचा सर्वतोपरी अधिकार आहे. सर्व जगाला ते ज्ञान-दान देऊं शकतात. परंतु ते ज्या देशाचे समजले जातात तो देश तरी त्यांच्या पाठीशीं कांहीं शक्ति उभी करतो काय? आमच्या देशांत आमची अशी भूमिका आहे काय कीं, पाकिस्तान कसें का वागेना, तो आमचा वैरी देश नाहीं असें आम्ही म्हणूं ! पाकिस्तान भीतिमुळें आपलें सैन्य वाढवीत आहे तर आपण आपलें सैन्य कमी करूं या असें आपल्याला वाटतें काय ? तिकडे गडद अंधार पसरला आहे, एका लहानशा कंदिलानें त्यांचें काम भागणारें नाहीं म्हणून आम्ही आमची अहिंसा जरा जोरदार बनवावी, आपलें सैन्य कमी करून त्यांना प्रकाश द्यावा अशी गरज आपल्याला वाटते काय ?

पाकिस्ताननें अमेरिकेकडून जी मदत मागितली त्यावरून मला हा विचार सुचला. कारण आमचा शेजारी इतका भयभीत झालेला असतांना आम्ही सर्व जगाला आणि विशेषतः आमच्या शेजाऱ्याला निर्भय केलें पाहिजे. त्या करतां असा ठराव करण्याची आमची ताकत आहे का कीं, आतांपर्यंत सैन्यावर जो आम्ही ६० करोड रुपये खर्च करीत होतों त्या ऐवजीं पुढच्या वर्षी फक्त १० कोट रुपये च खर्च करूं आणि ५० कोट रुपये त्यांतले वाचवूं ! स्पष्ट आहे कीं आमच्यांत तशी ताकत नाहीं. शेंवटीं ही ताकत येणार तरी केव्हां ? आणि यायला हवी कीं नको ? जर यायला हवी असेल तर ती लवकरांत लवकर यावी. या कामांत उशीर कामाचा नाहीं. भारताला लवकरांत लवकर अहिंसेंत पुढें गेलें पाहिजे. म्हणून

'हळू हळू जी चालते ती अहिंसा' अशी अहिंसेची व्याख्या करणे अत्यंत भयावह आहे. त्यामुळें अहिंसा जवळ जवळ स्थिति-स्थापक होऊन जाते, 'स्टेटस्को' चा बचाव करणारी होते. थोडी थोडी प्रगति तर तुम्ही कांहीं न करतां हि होणार च आहे. पण हें विज्ञानाचें युग आहे. या युगांत मंद गति कामाची नाहीं. आज अहिंसेची व्याख्या धोक्यांत आली आहे यामुळे आपल्या देशापुढें तो एक विचारणीय विषय आहे.

## अहिंसा हेंच अंतिम शरणस्थान : २१ :

**प्रश्न**: (१) सोशालिझमला गंगा व कॉम्युनिझमला यमुना असें आपण कोठेंतरी म्हटलें आहे. त्याच प्रमाणें लक्ष्याप्रमाणें मार्ग हि शुद्ध पाहिजे असा आपला आग्रह आहे. मग ह्या दोन गोष्टींचा मेळ आपण कसा घालू शकतां ?

### सर्व पक्षांना सर्वोदयांत यावें च लागेल

**विनोबा**:– गंगा कोण व यमुना कोण हें मला माहीत नाहीं. मी एवढेंच जाणतों कीं सर्वोदय हा समुद्र असून सर्व नद्या त्यांत येऊन मिळणार आहेत. आणि मीं हें च म्हटलें आहे. वर्तमानपत्रांतील रिपोर्ट चुकीचे असावेत. मीं हें हि सांगितलें होतें कीं गंगा-यमुनेप्रमाणें आधीं परस्परांना मिळून ह्या नद्या समुद्रांत येतील किंवा कृष्णा-गोदावरीप्रमाणें स्वतंत्र येऊन मिळतील. पण त्यांना समुद्रांत येऊन मिळावयाचें आहे ही गोष्ट निश्चित आहे. हिंदुस्थानांत जितके पक्ष आहेत त्यांत कांहीं चांगले लोक व कांहीं चांगले विचार आहेत, त्याचप्रमाणें कांहीं वाईट लोक व कांहीं वाईट विचार हि आहेत. नाल्यांत पाणी असतें व चिखल हि असतो. राजकीय पक्ष ह्या सारखे च आहेत. त्यांत कांहीं चांगले विचार आहेत व कांहीं चुकीचे. पण त्याची चिंता मी करीत नाहीं. मी एवढेंच जाणतों कीं त्यांत पाणी आहे, व आम्ही समुद्र आहोंत, तुम्ही नदी आहांत तर या, तुम्ही नाले आहांत तर येऊं

नका असें समुद्र कोणाला म्हणत नाहीं. सर्वांना समुद्रांत येऊन मिळावयाचें आहे. सर्वांचीच इच्छा भारताचें भलें व्हावें अशी आहे. आणि भारताचें भलें सर्वोदयाशिवाय होणार नाहीं अशी माझी श्रद्धा आहे. म्हणून सर्व पक्षांना सर्वोदयांत आल्याखेरीज सुटका नाहीं.

आम्ही सर्वांना खाण्यास बसलों आहोंत. मंत्रीं खातों तेव्हां सार खातों चोथा थुंकून टाकतों. ह्याच न्यायानें मी सर्वांतलें सार ग्रहण करतों, आणि त्यांतलें जें सार आहे, तें सर्वोदय च आहे. सर्वोदयांत सर्वांचें भलें आहे असें आम्ही मानतों. त्या दृष्टीनें काम्युनिझम् (साम्यवाद) व काम्युनॅलिझम् (जातिवाद) ह्यांत फरक नाहीं. मुसलमान मुसलमानांचें व हिंदु हिंदूंचें हित चाहतात. पण त्या मूढांना कळत नाहीं कीं हिंदु-मुसलमानांच्या हितांचा परस्परांशीं विरोध नाहीं. त्याचप्रमाणें साम्यवादी गरीब व श्रीमंत लोकांच्या हितांत विरोध मानतात. आम्हांला दोन हात आहेत, हातांना बोटें आहेत. ह्या पैकीं कोणा एकाचें हित दुसऱ्याच्या विरोधी आहे काय ? परस्परांतील सहकार्याशिवाय कोणाचें च काम होत नाहीं. म्हणून सर्वांना एका प्लॅटफॉर्मवर आणलें पाहिजे, सर्वांचा मिळून एक आवाज उठला पाहिजे. घराला आग लागली तर सर्वच धांवून जातात मग ते कोणत्या हि धर्माचे किंवा पक्षाचे असोत. तसें च सर्वोदयाचें हें काम आहे, हें सर्वांना करावें लागेल. मग तो कोणत्या हि धर्माचा किंवा पक्षाचा असो. तो गंगा असो, यमुना असो वा नाला असो. सर्वांना सर्वोदयांत येऊन लीन व्हावयाचें च आहे. हें च मीं त्या दिवशीं सांगितलें होतें.

**प्रश्न** (२) आपल्या पक्षरहित, शासनमुक्त समाजरचनेचें साम्य स्वर्गीय एम्.एन्.रॉय ह्यांच्या विचाराशीं दिसतें. त्यांच्या रॅडिकल कॉम्युनिस्ट चळवळीशीं तुमचा कांहीं संबंध आहे काय ? १९४८ सालीं त्यांनीं आपल्या राष्ट्रीय पक्षाला तोडण्याचें धैर्य दाखविलें. तुम्ही हि आपल्या प्रभावानें कॉंग्रेस, पी. एस्. पी वगैरे पक्ष मोडण्याचा प्रयत्न कराल काय ?

## सर्वोदय समुद्र आहे

**विनोबा** :—मला सत्तेचें विकेन्द्रीकरण हवें आहे, शासनमुक्त समाज बनवावयाचा आहे. एम्. एन्. रॉय ह्यांचे हि विचार तसे असतील तर फार

आनंदाची गोष्ट आहे. राजनीतीला समाप्त करून त्या ठिकाणीं लोकनीति मी आणूं इच्छितों. ही लोकनीति प्रेम, करुणा, समत्व ह्यांच्या आधारावर बनलेली असेल. रॉय ह्यांचे हि निर्णय असे च असतील, तर त्यांच्या आदर्शानुसार चालणाऱ्या लोकांनीं भूदानांत अवश्य आलें पाहिजे.

राजकीय पक्ष तोडण्याचा प्रयत्न आम्हीं हि केला आहे. पण त्यांच्यांत व आमच्या प्रयत्नांत फरक आहे. त्यांनीं पहिल्यानें एक राजकीय पक्ष बनविला व मग तो तोडला. त्यांच्या मतांत परिवर्तन झालें. आम्हीं पक्ष बनविलाच नाहीं तेव्हां तोडण्याचा प्रश्नच निर्माण होत नाहीं. आम्ही कोणत्या हि पक्षाला तोडण्याचा प्रयत्न करीत नाहीं. पण आम्ही काय करतों हें सर्वांना प्रत्यक्ष दिसतच आहे. आमचे विचार स्पष्ट आहेत. ते लोक आमच्या जवळ आले तर आम्हांला खुषीच आहे. त्यांना हळूं हळूं आमच्याजवळ यावेंच लागेल. वाळूच्या घड्याळांतला एक एक कण खालीं पडत असतो. खालचा वर जात नाहीं. वरचा खालीं येत असतो. हा समुद्र सर्वांना खुला आहे. तो सर्वांना म्हणतो माझ्यांत या. त्यासाठीं प्रयत्न काय करावयाचा आहे ? ते खालीं येणारच आहेत. समुद्राला पाणी ओढून घेण्याचा प्रयत्न करावा लागतो काय? तो अत्यंत नम्र आहे. म्हणून त्याच्याकडे सर्वांना यावेंच लागणार आहे. नम्र माणूस काय करतो? सर्वांच्या खालीं बसतो. कांहीं उन्मत्त वृत्तीचें पाणी पर्वतावर असतें, कांहीं त्याहून खालीं असतें. पण समुद्र कोठें असतो ? तो परम नम्र आहे. त्यामुळें तो सर्वांच्या खालीं आहे. म्हणून मी म्हणतों कीं कॉंग्रेस, पी. एस्. पी. सर्वांना समुद्रांत लीन व्हावयाचें आहे. पं. नेहरूंनीं पार्लमेंटांत काय म्हटलें ? "आम्ही सोशालिस्ट राज्य बनवूं इच्छितों. सोशालिस्ट शब्दापेक्षां सर्वोदय शब्द चांगला आहे, तो आपल्या देशांतला शब्द आहे व त्याचा जन्म ह्या भूमींत झालेला आहे. पण तें नांव आम्हीं घेत नाहीं. कारण त्या नांवाप्रमाणें आम्ही काम करूं शकूं कीं नाहीं ह्याची शंका आहे. म्हणून आम्ही 'सोशालिस्ट' म्हणतों. आमचें उद्दिष्ट सर्वोदय नाहीं." हें सर्व काय दाखवितें ? सर्वोदयांत लीन होण्याची तयारी चालली आहे. हळूं हळूं उतरत आहेत. जरासा धक्का मिळाला तर समुद्रांत लवकर येऊन मिळतील. पण हा धक्का कोण देणार ? तुम्हीं ग्रामदान लवकर

यशस्वी केलें तर हा धक्का मिळेल. त्याला वेळ लावला तर त्यांना येण्याला हि वेळ लागेल.

प्रश्न ( ३ ) तुमची अहिंसा हळू हळू जमिनीवर चालत आहे व हिंसा अस्मानांत उड्डाण करीत आहे. मोठमोठ्या आचार्यांच्या प्रयत्नाला हि न जुमानतां हिंसेची विलक्षण अभिवृद्धि झालेली आहे. अशा स्थितींत अहिंसेचा काळ केव्हां तरी येणार आहे काय ?

## मूढ हिंसा कोठपर्यंत चालेल ?

**विनोबाः**–फार सुंदर प्रश्न आहे. अहिंसा म्हणजे जमिनीवर हळू हळू चालणारी मुंगी व हिंसा म्हणजे विहंगम पक्षी–अॅटम-हायड्रोजन बांब. आतां प्रश्न असा आहे कीं गरुडाला मुंगी कशी कब्जयांत घेणार ? हें केव्हां होणार ? कधीं तरी शक्य होईल काय ? मी इतकेंच म्हणतों कीं ती वेळ आजच आलेली आहे. आणि हेंच माझें ह्या प्रश्नाला उत्तर आहे. आज विहंगम खालीं पडत आहे, व मग मुंग्या त्याचा कबजा घेतील. रुळावरून एक गाडी मोठ्या वेगानें जात आहे समजा. त्या रुळावर एक मुंगी आहे. ती काय करते ? थोडी खालीं सरकून जाते व सुरक्षित राहते. एवढ्या मोठ्या आगगाडींत रुळाच्या थोडें बाहेर जाऊन मुंगीला चिरडण्याचें सामर्थ्य नाहीं. आज हिंसा इतकी वाढली आहे कीं दुनियेचे प्रश्न सोडविण्याची शक्ति तिच्यांत उरलेली नाहीं. मोठमोठे समृद्ध, संपन्न व सर्व साधनांनीं परिपूर्ण देश हि परस्परांच्या भीतीनें कांपत आहेत. ते एकीकडे एका टेबलाशीं बसून प्रेमाच्या गोष्टी बोलत आहेत, पण दुसरीकडे लष्कराचा शस्त्रास्त्रांचा कडे-कोट बंदोबस्त करीत आहेत. परिणामीं दुनियेची प्रगति होत नाहीं. अब्जावधि रुपये लष्कर व शस्त्रास्त्र याप्रीत्यर्थ खर्च होत आहेत. जगभर सर्व भीतीची छाया पसरलेली आहे. म्हणून एक हि प्रश्न सुटत नाहीं. शेंवटीं अहिंसेला शरण यावेंच लागणार आहे. मी म्हणतों हिंसा जितकी वाढेल तितकें चांगलेंच आहे. उत्तरायण वाढू लागलें तर दक्षिणायन लवकर येण्याचें चिह्न आहे.

जुन्या काळीं काय होत असे ? कोणचा हि वाद उपस्थित झाला कीं कुस्ती व्हायची. जो जिंकेल त्याचा जय समजला जाई. उदाहरणार्थ

जरासंध व भीमाची कुस्ती. आज तसें होत असतें तर आम्ही किती सुखी असतों ! समजा स्टॅलिन व हिटलरची कुस्ती झाली असती, तर करोडों लोकांना मरावें लागलें नसतें. आज काय होत आहे ? एक हरतो व दुसरा जिकतो. हरणारा आपलें सैन्य आणखी वाढवितो. तो जिंकतो व दुसरा हरतो. हा हि पुन्हां आपलें सैन्य वाढवितो. एका जवळ बंदुक असली तर दुसरा तोफ बनवितो. एकानें तोफ बनविली तर दुसरा बॉंब शोधून काढतो. अशा प्रकारें वाढतां वाढतां अशी परिस्थिति येईल कीं मनुष्यजाति च नष्ट होऊन जाईल. म्हणून च आज सर्वांना विश्व-शांति पाहिजे आहे.

इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी कमी ज्ञानप्रिय नाहींत. लंडन, बर्लिन, येथें मोठ्यांतलीं मोठीं ग्रंथालयें आहेत. त्यांत सर्व जगांतलीं पुस्तकें एकत्र केलेलीं आहेत. आपल्या देशांत जें प्राचीन पुस्तक सांपडणार नाहीं, तें तेथें सांपडेल. पण संधि आल्याबरोबर हे लोक एकमेकांच्या ग्रंथालयावर बांब टाकण्यास तयार होतात. अशी मूढ हिंसा कोठपर्यंत चालेल ? ही हिंसा इतका जोर करीत आहे, पण ती मरणार आहे. दिवा विझण्याच्या बेतांत मोठा होतो व एकदम विझून जातो. त्या प्रमाणें हिंसेचा हि जोर कमी होत आहे. मानवाला शांतीची भूक व शांतीची च तहान लागलेली आहे. समाजापुढचे सर्व प्रश्न शांति, प्रेम, करुणा ह्यांच्या बळावर सुटावे अशी वासना सर्वांच्या मनांत आहे.

## लोकतंत्र व सत्याग्रह



ह्या देशांत 'सत्याग्रह' शब्दाची पुष्कळांना भीति वाटूं लागली आहे. हा आमच्या चिंतेचा विषय झालेला आहे. कारण आम्ही हा नवा मंत्र शिकलों व त्याला आम्ही दुनियेचा तारक मंत्र मानतों. आजपर्यंतच्या मानवी इतिहासाच्या अनुभवाचें सार म्हणजे हा सामुदायिक सत्याग्रहाचा मंत्र आहे असें हि आमचें म्हणणें आहे. ह्यामुळें अहिंसा सामर्थ्यवान् बनेल. पण सध्यां तर ह्या सत्याग्रह शब्दानें भीति वाटूं लागली आहे. लोक येथ-पर्यंत बोलतात कीं लोकशाहींत (डेमाक्रसींत) सत्याग्रहाला स्थान नाहीं. पण वास्तविक अशा सत्तेंत त्याला स्थान राहणार नाहीं ज्या ठिकाणीं प्रत्येक निर्णय यूनानिमस (म्हणजे सर्वसंमतीनें) केला जाईल. ज्या समाजरचनेंत सर्व निर्णय सर्वसंमतीनें केले जात असतील, त्या ठिकाणीं स्वतंत्र अशा सामूहिक सत्याग्रहाची आवश्यकता राहणार नाहीं. त्याहि समाजांत आईच्या विरुद्ध मुलाचा व मुलाच्या विरुद्ध आईचा सत्याग्रह राहूं शकेल. एका शेजाऱ्याच्या विरुद्ध दुसऱ्याचा सत्याग्रह राहूं शकेल. त्या ठिकाणीं विरुद्ध शब्दाचा अर्थ हिंसेच्या परिभाषेंतला 'विरुद्ध' असा नाहीं, तर समोरच्या पक्षाला मदत करणारा किंवा हितावह असा त्याचा अर्थ आहे. समोरच्या माण-साच्या शुद्धीसाठीं प्रेमपूर्वक व त्यागपूर्वक जें कांहीं करावें लागेल, त्याचा अर्थ व्यक्त करण्यासाठीं 'विरुद्ध' शब्द वापरला गेला आहे. सारांश शेजाऱ्यावर विशेष प्रेम प्रगट करण्यासाठीं त्याच्याशीं व्यक्तिगत सत्याग्रह होईल. पण ज्या ठिकाणीं प्रत्येक सामुदायिक निर्णय सर्वसंमतीनें होत असेल अशा समाजांत सामुदायिक सत्याग्रहाला अवकाश राहणार नाहीं ही गोष्ट लक्षांत येण्यासारखी आहे. म्हणूनच मी वारंवार म्हणत असतों कीं ही 'डेमॉक्रसी' (लोकशाही) अंशतः दोषमय आहे. त्यांत अहिंसा अमुक मर्यादेपर्यंतच येऊं शकते, पुढें तिला अवकाश नाहीं. म्हणून सर्वच निर्णय सर्वसंमतीनें करण्याला आपण सिद्ध असलें पाहिजे.

ह्या बाबतींत आमचे साथी हि आम्हांला म्हणतात, काय अव्यावहारिक गोष्ट तुम्ही सांगत आहांत, ह्यानें व्यवहार कसा चालेल ? ही वस्तु नव्या सारखी आहे, म्हणून ती विषयीं पुष्कळ विचार करावा लागेल. पण आपलें जीवन व बुद्धि आपण अशी बनविली पाहिजे कीं सर्वसंमतीनें कामें करून हि त्यांत प्रगति होईल. समाज सुद्धां ह्याच दृष्टीनें विचार करूं लागेल, कार्यहानि होऊं न देतां सर्वसंमतीनें कामें कशीं करतां येतील हें समाज शिकेल, हें सर्व करावें लागेल. पण ह्यांत अडचणी आहेत, म्हणन त्याचा विचारच जर आपण करणार नाहीं तर, माझ्या मतें 'डेमॉक्रसीं'त सत्याग्रहाला स्थान नाहीं. हा नवा विचार अहिंसेच्या दृष्टीनें घातक आहे. ह्या बाबतींत आपण निर्णय केलाच पाहिजे.

## गांधीजींच्या काळचा सत्याग्रह

सत्याग्रहाविषयीं भीति वाटण्याचें दुसरें हि एक कारण आहे. व तें हि अहिंसेला घातक आहे. सत्याग्रहाची एक अभावात्मक ( नेगेटिव्ह ) व्याख्या आमच्या मनांत पक्की झालेली आहे. सत्याग्रह म्हणजे अडंगा आणण्याचा, किंवा दाब आणण्याचा असा एक प्रकार कीं जो फारसा अयोग्य समजला जाणार नाहीं. लोकांच्या मनांत सत्याग्रहाचा सध्यां हा अर्थ आहे व त्याच कारणानें त्यांचें त्याच्याकडे आकर्षण हि फार अधिक आहे. सत्याग्रहाविषयीं जशी भीति तसें च हें आकर्षण हि आज दिसत आहे. लोक मला म्हणतात बाबा, जमीन मागत कोठपर्यंत तुम्ही फिराल ? कधीं तरी शेवटीं वैष्णवास्त्र काढाल कीं नाहीं ? ब्रह्मास्त्र, पाशुपतास्त्रादि अस्त्रें हिंसेचीं आहेत म्हणून सोडून द्या. पण विष्णूचें वैष्णवास्त्र तर अहिंसेचें रामबाण अस्त्र आहे. तें केव्हां तरी काढाल कीं नाहीं ? लोक ही गोष्ट मला वारंवार विचारतात. तेव्हां त्यांना समजावून द्यावें लागतें कीं जें कांहीं चाललें आहे, तें हि सत्याग्रहाचें च एक रूप आहे. म्हणून आपल्या कर्तव्याचरणाचा मार्ग सोपा होण्यासाठीं आपणांला ह्या गोष्टीचा विचार केला पाहिजे. मी ह्याचा विचार करतों, तेव्हां मला असें दिसतें कीं गांधीजींच्या काळच्या सत्याग्रहाला जर आम्ही आज आदर्श सत्याग्रह समजून चालूं तर ती आमची चूक होईल. त्यांचा काळ त्या वेळची परिस्थिति वेगळी.

त्या परिस्थितींत आम्हांला कार्यच अभावात्मक (नेगेटिव्ह) करावयाचें होतें. तरीहि त्या कार्याला त्यांनीं पुष्कळशा रचनात्मक व विधायक कामाची जोड दिली होती. त्यांच्या प्रतिभाशाली बुद्धीला दिसत होतें कीं, निषेधक कार्य करतांना जर आम्ही विधायक वृत्ति राखली नाहीं तर तें निषेधक कार्य सिद्ध झाल्याबरोबर दुसरे धोके त्यांतून निर्माण होतील.

चरखा कां चालवायचा, इंग्रजांना घालविण्यासाठीं चरख्याचा संबंध कसा येतो हें आमच्या लक्षांत येत नाहीं, हें आम्हांला समजावून द्या असें लोक त्यांना वारंवार म्हणत. तरी पण स्वराज्यासाठीं गांधीजींचें नेतृत्व त्यांना पाहिजे होतें म्हणून ते ती गोष्ट कबूल करीत. त्यांना उत्तर मिळे कीं, " जनतेंत जागृति झाल्याखेरीज, तिच्यांत स्वराज्याची भावना निर्माण झाल्याखेरीज कसें चालेल ? त्याचा इंग्रजांवर परिणाम कसा होईल ? केवळ आमच्या शब्दानें ? म्हणून रचनात्मक कार्यद्वारा आमच्या विचारांचा प्रचार करून आम्हीं जनसंपर्क वाढविला पाहिजे. विधायक कार्यानें त्याची उत्तम संधि मिळते. लोकांना थोडी मदत मिळते, त्यांचें थोडेंबहुत दुःख निवारण होतें. आमची त्यांच्याविषयीं सहानुभूति आहे त्याचें दर्शन त्यांना होतें व त्यांची सहानुभूति आम्हांला प्राप्त होते. अशा प्रकारें आमच्या राजनैतिक कार्याच्या पाठीशीं नैतिक बळ उभें राहतें. " अशा प्रकारें गांधीजींना लोकांची समजूत काढावी लागे.

## विधायक सत्याग्रह

पण त्यावेळचा काळ असा होता कीं लोकांना अभावात्मक कार्य करावयाचें होतें. म्हणून त्यावेळीं जे सत्याग्रह झाले ते सत्याग्रहतत्त्वाच्या दृष्टीनें अंतिम आदर्शरूप झाले असें समजूं नये. लोकसत्ता आल्यानंतर हि जर सत्याग्रहाचें अस्तित्व कायम राहूं शकतें असें आपण मानलें तर त्या सत्याग्रहाचें स्वरूप पूर्वींहून कांहीं निराळें च राहील असें आपण समजलें पाहिजे. 'डेमॉक्रसी' किंवा लोकशाहींत सत्याग्रहाला स्थानच नाहीं असें मानणें तर अगदीं चुकीचें आहे. त्याच प्रमाणें त्यावेळच्या अभावात्मक सत्याग्रहाला सध्यांच्या लोकशाहींत खूप स्कोप (अवकाश) आहे किंवा

तशा प्रकारचा सत्याग्रह लोकसत्तेच्या काळांत अधिक प्रभावशाली होईल असें मानणें हि चूक आहे. लोक सत्तेंत सत्याग्रहाचा अधिक प्रभाव पडावयाचा असेल तर तो अधिक प्रभावशाली पाहिजे. म्हणजे च तो विधायक स्वरूपाचा असला पाहिजे. ह्याच दृष्टीनें आपण आपल्या ह्या चळवळीकडे पाहिलें पाहिजे. भूदान-यज्ञाचें कार्य आम्ही ज्या पद्धतीनें करीत आहों तो अहिंसेचा च एक प्रकार आहे. पण अहिंसेचा तो च प्रकार असूं शकतो असें नाहीं. दुसरे हि प्रकार आहेत. ह्याहून हि शक्तिशाली दुसरे प्रकार आम्ही शोधूं शकतों व त्यांचा उपयोग करूं शकतों. पण आपण आधीं आपल्या ह्या प्रकाराचा पूर्ण उपयोग करून त्याचा परिणाम काय येतो हें पाहिल्यानंतर ह्या दुसऱ्या प्रकाराबद्दल विचार करण्यास आपणांस संधि मिळेल.

'सत्याग्रह' शब्दाच्या उच्चारानेंच सर्वांना आकर्षण झालें पाहिजे, पण उलट होतें विकर्षण. समजा कोणी उपवास सुरू केला असें मीं ऐकलें, तर माझ्या मनांत सहानुभूति उत्पन्न होण्याऐवजीं प्रथमदर्शनीं हा मनुष्य कांहीं तरी भलतेंच करीत आहे असा भास होतो. वस्तुत: असें व्हावयास नको,पण होतें मात्र असें. त्यानंतर अधिक माहिती मिळाल्यावर तो उपवास योग्य असेल तर योग्य आहे असें आम्ही म्हणतों. पण पहिली प्रतिक्रिया 'हें ह्यानें काय सुरू केलें ?' अशी होते. माझ्या मनावर जर अशी प्रतिक्रिया होते, तर ज्यांना सध्यांच्या समाज-व्यवस्थेस जरा सुद्धां धक्का लागलेला नको आहे, त्यांच्या मनावर तर ती तशी होईल ह्यांत नवल नाहीं. अॅडमिनिस्ट्रेटर्स-(राज्य चालविणारे कारभारी)ना पहिली वस्तु लॉ अँड आर्डर (कायदा व सुव्यवस्था) हवी असते. दुसरे सर्व गुण मागाहून. आधीं राज्यांत हा गुण हवा. त्या शिवाय त्यांचें एक पाऊल हि पुढें पडत नाहीं. म्हणून राज्याचा कारभार व्यवस्थित राखण्याची ज्यांच्यावर जबाबदारी आहे त्यांच्या मनावर अशा उपवासाची साहजिक च विपरीत प्रतिक्रिया व्हावी ह्यांत आश्चर्य काय ?

### सत्याग्रहाचा अर्थ

सत्याग्रहांत एक शक्ति आहे असें आम्ही मानतों. ती शक्ति कोणाती ? त्या शक्तीचें स्वरूप हें कीं ती समोरच्या माणसास डिसआर्म ( निःशस्त्र )

करून टाकते. सूर्य आल्याबरोबर जसा अंधःकार नाहींसा होतो, त्याप्रमाणेंच सत्याग्रहांत अशी शक्ति आहे कीं जो समोरचा माणूस विचार करण्यास हि तयार नव्हता किंबहुना विपरीत विचार करीत होता, तो सत्याग्रहाच्या दर्शनानें विचार करूं लागतो एवढें च नव्हे तर त्याचा विचार निर्मळ बनतो. त्याच्या बुद्धीचें पडदे दूर होतात, मोहाचें आवरण नष्ट होतें व त्याच्या मनांत आमच्याविषयीं अनुकूल भाव निर्माण होतो. ज्या ठिकाणीं असें घडतें तो सत्याग्रह. जेथें असें होत नाहीं व येनकेन प्रकारेण समोरच्या माणसावर दाब येतो तेथें सत्याग्रहाची शक्ति क्षीण होते. आतां च मीं सांगितलें कीं ग्रामदानांत थोडासा 'कोअर्शन' ( दाबा ) चा अंश आला तरी सुरक्षा योजना म्हणून मी तेवढें मान्य करण्यास तयार होईन. पण ज्या ठिकाणीं सत्याग्रहाचा प्रश्न येतो, त्या ठिकाणीं लोकांजवळ जाऊन ग्रामदानाची गोष्ट समजावून सांगावी लागते. हा हि सत्याग्रहाचा च अंश आहे, म्हणून त्या बाबतींत गुंजभर सुद्धां कोअर्शन् ( दाब ) आम्ही सहन करूं शकणार नाहीं. किंबहुना त्यांत जितका दाबाचा अंश असेल तितकी त्याची शक्ति क्षीण होईल. मी एक उदाहरण देतों. हें फार मोठें उदाहरण आहे व त्या बाबतींत माझी बापूंशीं पुष्कळशी चर्चा झालेली आहे. बापूंनीं काम्युनल अवॉर्ड विरुद्ध उपवास केले. त्यावेळीं अंबेडकरांबरोबर त्यांची चर्चा चालली होती. सर्वांची इच्छा त्यांचा उपवास लवकर सुटावा अशी होती. रवीन्द्रनाथ ठाकूर त्यावेळीं तेथें येऊन पोहोंचले. बापूंच्या उपवासाचा त्यांच्या मनावर अयोग्य दाब पडला व त्यांनीं 'पूना पॅक्टला' मनांत तो पसंत नसून हि मान्यता दिली. पाठीमागून जें कांहीं घडलें त्यावरून असें म्हणावें लागतें. कारण त्यानें बंगालचें नुकसान झालें, असें वाटून ते नंतर दुःखी झाले होते. ह्या गोष्टीच्या तपशिलींत मी शिरत नाहीं, व खरोखर बंगालचें नुकसान झालें कीं नाहीं ह्याची चर्चा हि मी करीत नाहीं. पण त्या उपवासाचा दाब रवीन्द्रनाथांसारख्या महान् व्यक्तीच्या मनावर पडला, म्हणून त्या सत्याग्रहांत कांहीं न्यूनता राहून गेली असें समजलें पाहिजे तुम्ही म्हाणाल "बापूंच्या सत्याग्रहांत न्यूनता राहून गेली असें हा म्हणतो व आमच्यापासून परिपूर्णतेची अपेक्षा राखतो, मोठी आश्चर्याची गोष्ट आहे ! एकीकडे अपूर्णतेचें उदाहरण म्हणून बापूंचें उदाहरण देतो व दुसरीकडें

आम्हां सामान्य मानवांच्या सत्याग्रहांत अपूर्णता राहतां कामा नये अशी अपेक्षा राखतो." आमचे कांहीं मित्र हि आम्हांला म्हणतात "काय म्हणतां ? बापूंच्या सत्याग्रहांत हि न्यूनता राहून गेली व आमच्यापासून मात्र तुम्ही पूर्णतेची अपेक्षा राखतां ? असा पूर्ण सत्याग्रह होणें तर शक्यच नाहीं. तुमची ही चर्चा बेकार आहे. तुमची ही आशा केव्हांच फलद्रूप होऊं शकणार नाहीं. आमच्या सत्याग्रहाला पाहिजे तर अभावात्मक (नेगेटिव्ह) म्हणा किंवा पाहिजे तर त्याला निःशस्त्र प्रतिकार 'पॅसिव्ह रेझिस्टन्स' नांव द्या. त्यांत दाब येतो असें म्हणा कीं तो अपूर्ण आहे असें म्हणा. आमच्या योग्यतेनुसार तो सत्याग्रह योग्य च सत्याग्रह आहे, असा आम्ही तुमच्या म्हणण्याचा अर्थ करतों व तुम्ही आमचा बचावच करीत आहां असें मानतों." पण आज काळ बदलला आहे. रात्रींचा घनदाट अंधःकार दूर होतांना सूर्य हि सौम्य होतो. म्हणजे तो प्रखर नसतो, त्याचें तेज कमी असतें व तो चंद्रासारखा फिका दिसतो. येथें 'सौम्य' शब्दाचा मी दुसऱ्या अर्थीं उपयोग करीत आहें. पण काळ बदलला कीं तोच सूर्य प्रखर रूप धारण करतो.

### गांधीजींचा काळ

गांधीजींच्या काळांत सत्याग्रहरूपी सूर्याचा नुकताच उदय झालेला होता. त्यामुळें तो फिका वाटे. आतां काळ बदलला आहे. म्हणून स्वाभाविक प्रश्न निर्माण झाला कीं लोकशाहींत सत्याग्रहाला स्थान आहे काय? हा प्रश्न टाळतां येण्यासारखा नाहीं.

विचाराचा प्रश्न असा आहे कीं घरोघर जाऊन आपले जे कांहीं विचार असतील ते समजावून देण्याचें स्वातंत्र्य ज्या ठिकाणीं आहे त्या ठिकाणीं सत्याग्रहाला अवकाश आहे काय ? कोणी म्हणतात नाहीं, कोणी कमी अवकाश आहे असें मानतात. अशा मानणारांची आज मोठी संख्या आहे. पूर्वीं असें ते मानू शकत नव्हते. पण आज परिस्थिति बदलली आहे, देश स्वतंत्र झाला आहे. लोकसत्ता आलेली आहे, प्रचाराचीं साधनें मोकळीं आहेत. अशा परिस्थितींत पूर्वींसारखाच नेगेटिव्ह (अभावात्मक) सत्याग्रह कोणी आज करील व म्हणेल कीं गांधीजींच्या सत्याग्रहांत हि

उणेपणा होता, आमच्या छोटया लोकांच्या सत्याग्रहांत तर तो राहणारच आहे तर मी त्याचा बचाव करणार नाहीं.

## ह्या युगाची किमया

मी असें सांगूं इच्छितों कीं ह्या युगांतला छोटा सत्याग्रही हि गांधीजीहून मोठा आहे. ह्याचा अर्थ काळानें त्याला मोठेपणा दिला आहे, उच्च स्थानावर नेऊन बसविलें आहे. आज स्वातंत्र्य, मतप्रचाराची सोय आदि ज्या कांहीं गोष्टी आहेत त्या गांधीजींच्या काळीं मुळींच नव्हत्या. म्हणून गांधीजी सर्वोत्तम सत्याग्रही असून हि त्यांच्या सत्याग्रहाला असें उपाधींचें ग्रहण लागलें व त्या उपाधीनें ग्रासला गेल्यामुळें तो फिका दिसूं लागला. म्हणून आम्ही छोटे आहोंत या सबबीवर आम्ही आमचा बचाव करूं शकत नाहीं. तुम्ही छोटे आहांत, पण तुमचा वारसा फार मोठा आहे. व त्या दृष्टीनें तुमची जबाबदारी हि मोठी आहे.

सत्याग्रहाच्या सुधारणेच्या दृष्टीनें विचार केला तर आमची उपाधि किंवा दुर्बलता ह्यांच्या मानानें आमचा सत्याग्रह ठीकच आहे असें आम्ही म्हणूं शकत नाहीं. तुम्ही स्वतःला दुर्बल मानीत असाल तर सत्याग्रहाचा आपणाला कांहीं अधिकार नाहीं, असें समजून स्वस्थ व शांत बसा. आज जर तुम्हांला सत्याग्रहाचा अधिकार पाहिजे असेल तर त्या सत्याग्रहावर आलेली जबाबदारी हि तुम्हीं स्वीकारली पाहिजे. सत्याग्रहीवर तर ती जबाबदारी आहे च. पण प्रत्यक्ष सत्याग्रहावर जी जबाबदारी आलेली आहे कीं, आपल्या नांवाच्या उच्चारानें लोकांत भय निर्माण होऊं नये ती हि सांभाळली गेली पाहिजे. वस्तुस्थिति अशी पाहिजे कीं, 'मी उद्यांपासून सत्याग्रह करणार आहें' असें म्हणतां च केवळ तेवढ्यानें माझ्याविषयींची लोकांच्या मनांतली सहानुभूति हजारपट वाढली पाहिजे व त्यांच्या मनांत विरोध असला तर तो कमी झाला पाहिजे. सत्याग्रह शब्दाच्या श्रवणमात्रानें असा परिणाम घडला पाहिजे, त्यानंतरच्या त्याच्या कृतीचें मोठे परिणाम तर घडणार च आहेत. सत्याग्रह शब्द कानानें ऐकतां च 'हें फार सुंदर काम होत आहे' असा भाव मनांत निर्माण झाला पाहिजे. कोणी प्रेम केलें, करुणा दाखविली असें ऐकतां क्षणींच आमच्या

कानाला अमृताचा स्पर्श झाल्यासारखें वाटतें. प्रथमक्षणींच हें प्रेमाचें, दयेचें, करुणेचें काम होत आहे असें वाटून चित्ताला आनंद होतो. त्या कार्याचें मूल्य मागाहून ठरतें. त्याचप्रमाणें सत्याग्रह शब्द ऐकतांक्षणींच कानाला अमृतासारखा मधुर वाटला पाहिजे. खून झाला असें ऐकतांच पहिल्या झटक्यांत मनांत खेदाची व तिरस्काराची भावना निर्माण होते. त्यानंतर त्याची योग्यायोग्यता ठरते, किंवा त्याबाबत विचारभेद किंवा मतभेद होतात. म्हणजे जें झालें तें चुकीचें झालें ह्या विषयीं प्रथम च सर्वांचें मतैक्य होतें. त्या च प्रमाणें सत्याग्रहाच्या बाबतींत जें घडत आहे तें उत्तम आहे अशी प्रतिक्रिया आधीं झाली पाहिजे व सर्व दुनियेच्या मनावर त्याचा चांगला परिणाम झाला पाहिजे. ज्या सत्याग्रहांत अशी शक्ति असेल तोच खरा सत्याग्रह आणि तोच 'डेमॉक्रसींत' (लोकशाहींत) चालेल. सत्याग्रहाच्या जुन्या रूपाला लोकशाहींत अवकाश नाहीं. परिस्थितीच्या बदलानें इतका फरक पडला.

गांधीजींनीं राजकारण केलें असें जे लोक समजतात त्यांना गांधी समजलेच नाहींत. गांधीजींनीं जेवढें व जें कांहीं केलें तें शंभर टक्के लोककारण होतें असें मी मानतों. गांधीजींची पकड राजकारणावर होती असा कांहींना भास होतो, पण वस्तुतः ती लोक-कारणावर होती. त्यांचीं यच्चयावत् सर्व कामें (राऊंडटेबल कॉन्फरन्समध्यें हिस्सा घेण्यापासून सत्याग्रह चालविण्यापर्यंतचीं राजकारणाच्या क्षेत्रांतलीं सर्व कामें) लोकनीतीच्या स्थापनेप्रीत्यर्थ व लोकनीतीची जाणीव मनांत ठेवून केलेली होतीं. इकडे स्वराज्य मिळालें, तर तिकडे गांधीजी नोआखलीकडे निघाले. एकाच दिवशीं आम्हांला हीं दोन दृश्यें पहावयास मिळालीं. स्वराज्य मिळालेंच होतें. तें घ्यावयाचें नाहीं असा प्रश्नच नव्हता. सत्तेच्या आसक्तीनें चुका हि घडतील, पण सत्ता माणसाला बिघडविते असें म्हणून आलेलें स्वराज्य न घेण्याचा प्रश्नच नव्हता. तें घ्यावयाचें होतेंच.

पण बापू स्वतः त्यावेळीं नोआखलींत होते. त्यांनीं आपलें स्थान निवडून घेतलें होतें. ह्यांत मोठें रहस्य आहे. त्यांच्या सबंध जीवनाचा तो परिपाक आहे. त्यांच्या जीवनाचा प्रवाह स्वाभाविकच त्या बाजूला जात

होता, दिल्लीकडे जात नव्हता. दिल्लींत जें बनलें तें त्यांच्या कारखान्यांतली 'बाय प्रॉडक्ट' म्हणजे दुय्यम वस्तु होती. त्यांच्या कार्याचें मुख्य दर्शन नोआखलींत घडलें. क्रमानें ते त्या स्थळीं गेले. गुलामगिरीच्या त्या काळांत, दु:खी जनतेला गुलामींतून सोडविण्यासाठीं त्यांनीं जें कांहीं केलें, तें सत्ता प्राप्त्यर्थ केलें असा आभास होत होता. पण तें कार्य सत्ता प्राप्तीचें नव्हतें, सत्य-शोधनाचें, लोकनीतीच्या स्थापनेचें होतें. तसें नसतें तर कॉंग्रेसनें आपलें रूपांतर लोक-सेवक-संघांत करावें असा सल्ला त्यांनीं कधींच दिला नसता.

राजकारणाचें थोडेसें ज्ञान असणाऱ्या माणसाला हि हा सल्ला अजब वाटण्यासारखा होता. कॉंग्रेसचें लोकसेवक.-संघांत रूपांतर होण्यानें सर्व शक्ति विखरून गेल्या असत्या हें कोणाला हि समजण्यासारखें होतें. त्यांतून काय निघेल कोणाला हि सांगतां येण्यासारखें नव्हतें. प्रतिगामी शक्तींचा जोर वाढूं शकला असता, दिल्लीवर कोणाचा कब्जा राहील ह्याचा नियम राहिला नसता. सामान्य माणसाच्या हि जी गोष्ट लक्षांत आली असती तेवढी हि गांधीजींना समजत नव्हती काय ?

ह्यावरून त्यांचा विचार करण्याचा व जीवनाचा दृष्टिकोणच वेगळ्या प्रकारचा म्हणजे च लोकनीतीचा होता ही गोष्ट आमच्या लक्षांत आली पाहिजे.

स्वराज्य मिळाल्यानंतर खेड्यांतील लोकांची स्थिति सुधारेल, अशी जनतेला आशा होती. अशी आशा राखणें चूक नव्हतें. स्वराज्यांत जर जनतेची स्थिति सुधारली नाहीं तर त्या स्वराज्याची काय किंमत? पण स्वराज्यानंतर आमची स्थिति सुधारणें आमच्या च हातांत आहे हें लोकांच्या लक्षांत आलें नाहीं. पूर्वीं जसें मुसलमानांचें अथवा इंग्रजांचें राज्य होतें तसें आतां काँग्रेसचें राज्य आहे, असें लोकांना वाटतें. पण मुसलमानांच्या, इंग्रजांच्या किंवा आणखी कोण्या राजाच्या राज्यांत मत मागायला कोणी येत नव्हतें. तशा प्रकारचीं राज्यें आतां इतिहासजमा झालीं. आतांचें आमचें राज्य हें स्वराज्य आहे म्हणजे लोकांचें राज्य आहे. यांत जे लोक राज्य चालवितात, ते लोकांनीं निवडलेले नोकर असतात. तुमचें राज्य तुम्हांला जसें चालवायचें असेल तसें चालवा आणि त्यासाठीं कोणते नोकर ठेवायचे तें तुमचें तुम्ही च ठरवा अशी तुम्हांला सत्ता स्वराज्यामुळें देण्यांत आली आहे. मत देणें म्हणजे ही सत्ता वापरणें. एकदां तुम्हीं मत दिलें म्हणजे पांच वर्षांसाठीं तुम्हीं आपल्या नोकरांची नेमणूक केली असें होतें. ज्याप्रमाणें शेतकरी शेताच्या कामासाठीं गडी ठेवतो, त्यानें चांगलें काम केलें तर त्याला पुन्हां नोकरीवर ठेवतो आणि चांगलें न केलें तर त्याच्या ऐवजीं दुसऱ्याला नोकरीवर ठेवतो. त्याप्रमाणें पांच वर्षांसाठीं तुम्ही जे नोकर निवडले त्यांचें काम ठीक चाललें आहे असें तुम्हांला वाटलें तर तुम्ही त्यांना पुन्हां दुसऱ्यांदा निवडाल. नाहीं तर त्यांच्या जागीं दुसऱ्यांना निवडूं शकाल.

## स्वराज्य कुणाच्या देण्यानें मिळत नाहीं

येथें तुम्ही जे सर्वजण बसलां आहांत, ते सारे बादशाह आहांत, राज्याधिपति आहांत, असा याचा अर्थ होतो. परंतु तुमच्यांतील प्रत्येक

व्यक्ति मात्र राज्याधिपति नाहीं. तुम्ही सर्व मिळन राज्याधिपति आहां. परंतु आपण च खरे अधिपति आहोंत आणि आपल्या हातीं सत्ता आहे, याचें मात्र तुम्हांला भान नाहीं. ही एवढी निवडणूक झाली, पण जणूं एक नाटक झालें. समजा, एखाद्या घरांत चार पांच वर्षांचीं अजाण व मूर्ख मुलें आहेत, त्यांना जर विचारलें कीं " मुलांनो, घरचा कारभार आपण कसा चालवावा यावर मत द्या. " तर ते म्हणतील, " तुम्ही विचारण्याचें हें काय नाटक चालविलें आहे ? आमचें मत कसलें विचारता ? आम्ही काय मत देणार ? तुम्ही च आमचे मायबाप आहांत. आमची चिंता तुम्हीं च करायला पाहिजे. " याप्रमाणें च लोकांनीं काँग्रेसच्या पुढाऱ्यांना सांगितलें कीं " तुम्ही थोर आहां, तुम्हीं आमची सेवा केली आहे, तुम्ही आमचे मायबाप आहां, तुम्ही च राज्य चालवा. " परंतु मतें मागणारे म्हणतात, " आम्ही तुमचे नोकर होऊं इच्छितों, तुम्ही आम्हांला नोकरीवर ठेवूं इच्छीत असाल तर आम्ही तुमची चाकरी करूं. " पण हे मतें देणारे म्हणतात, " तुम्ही च आमचे मायबाप आहां, तुम्ही च आमची काळजी घ्या. "

सत्ता कुणीं दिल्यानें मिळत नसते. सत्ता किंवा अधिकार आंतून प्राप्त व्हावा लागतो. तसें पाहिलें तर हिंदुस्थानचे लोक अजाण नाहींत. फार विचारी आहेत. नुकती च जी निवडणूक झाली, ती किती उत्तम प्रकारें झाली ! एवढ्या मोठ्या निवडणुकींत काय काय होईल, किती भांडणें होतील, असें लोकांना वाटत होतें. पण तसें कांहीं हि झालें नाहीं. हिंदुस्थानांतील लोक अशिक्षित असून हि येथील निवडणुका इतक्या चांगल्या प्रकारें कशा होऊं शकल्या याचें बाहेरच्या देशांतील लोकांना आश्चर्य वाटलें. पण यांत नवल कांहीं च नाहीं. हिंदुस्थानांतील लोक दहा हजार वर्षांचे अनुभवी लोक आहेत. ते अशिक्षित असले तरी अनुभवी आहेत. म्हणन च ते ज्ञानी आहेत.

हिंदुस्थानांतील लोक समजदार खरे, पण त्यांना अनेक वर्षांपासून गुलामगिरीची संवय जडली आहे. सरकार आईबापासारखी आपली काळजी घेईल, असें त्यांना वाटतें. आज त्यांच्या हातांत सत्ता आली असली तरी त्या सत्तेचें भान आणि प्रतीति त्यांना आली पाहिजे. आईचा अधिकार

आईला कोणी देत असतो काय ? तिचा तो स्वयंसिद्ध अधिकार आहे. तसेंच सिंहाला कुणी अरण्याचा राजा केलें आहे काय ? तो स्वतःच आपला अधिकार मानतो. त्याच प्रमाणें स्वराज्याच्या शक्तीचें जनतेला आंतून भान असायला पाहिजे. तें कसें होईल ? गांवोगांवचे लोक दिल्लीचें राज्य चालविणार आहेत काय ? नाहीं. गांवोगांवचे लोक आपआपल्या गांवचें च राज्य चालवितील. व त्यामुळें त्यांना राज्य चालविण्याचा अनुभव येईल.

**गांवागांवांत ' मातृ-राज्य दिसावें '**

आजच्या काळांत राज्य हें प्राज्य असतें. कारण तें प्रजेचें, लोकांचें, असतें. पूर्वींच्या काळीं जो लोकांना कह्यांत ठेवी, दडपशाही करी, तो च राजा होई. अरण्याचा राजा सिंह असतो, असें म्हटलें जातें. जंगलांतील प्राण्यांना जो खातो, तो त्यांचा राजा, असा याचा अर्थ झाला. जनावरांचा राजा जो सिंह, त्याला संस्कृतांत "मृगराज" म्हणतात. त्या राजाचें दर्शन झाल्याबरोबर सारे मृग थरथर कांपतात. या प्रकारची राज्यसत्ता आतां चालायची नाहीं. आतां राज्यसत्ता ही सेवेची सत्ता असेल. आईला घरांत काय अधिकार असतो ? तिला कोणते हक्क असतात ? मुलाला भूक लागली कीं त्याला दूध पाजणें, हा आईचा पहिला हक्क. मुलाला झोंपवून नंतर झोंपणें, हा हक्क नंबर दोन. मुलगा आजारी पडला तर रात्रीं जागणें हा हक्क नंबर तीन, आणि घरांत खाण्याच्या वस्तु कमी असल्या तर पहिल्यांदा मुलाला खाऊं घालून जें थोडेसें उरेल तें खाणें अथवा न उरलें तर उपाशी राहणें हा नंबर चारचा हक्क. मातेचे हक्क असे असतात. आज आमचें मातृराज्य आहे ना ? मग त्याचे नमुने गांवोगांव दाखवावयाला पाहिजेत.

गांवोगाव जे बुद्धिमान्, संपत्तिमान, आणि विचारवान्, लोक असतील त्यांनीं गांवचे माय-बाप व्हावें आणि गांवची सेवा करून गांवचें राज्य चालवावें. आपल्यापेक्षां आपलीं मुलें अधिक बुद्धिमान् व्हावींत, अशी च बुद्धिमान् पित्याची इच्छा असते. मुलगा जेव्हां बापाहून अधिक श्रेष्ठ ठरतो किंवा शिष्य जेव्हां जगांत इतकी कीर्ति मिळवितो कीं लोक गुरूचें नांव हि

विसरतात, तेव्हां त्या बापाला आणि त्या गुरूला अत्यानंद होतो. आपलें नांव लोक विसरले आहेत आणि आपल्या शिष्याच्या नांवाची मात्र वाहवा करीत आहेत हें पाहून तो खुष होतो. मीं शिष्याला ज्ञान दिल्यानंतर हि माझें च नांव जगांत शिल्लक राहिलें तर मग मीं शिष्याला ज्ञान च काय दिलें ? असें गुरूला वाटत असतें. माझें नांव नाहीसें व्हावें आणि शिष्याचें नांव चालावें असें मला वाटलें तर च मी खरा गुरु, असा-विचार तो सतत करीत असतो. तसें गांवांतील शाहणे लोक जेव्हां इतर लोक आपल्यापेक्षां जास्त शाहणे व्हावे अशा दृष्टीनें कामें करतील तेव्हां च त्या ग्रामराज्याचें रामराज्य होईल.

## ग्रामराज्य आणि रामराज्य

स्वराज्य म्हणजे साऱ्या देशाचें राज्य. परक्या देशाची सत्ता आपल्या देशावर नसते तेव्हां त्याला स्वराज्य म्हणतात. आणि जेव्हां प्रत्येक गांवांत स्वराज्य होतें, तेव्हां त्याला ग्रामराज्य म्हणतात. गांवांत सर्व लोक शाहणे, विचारी, झाले आहेत; कुणावर सत्ता चालविण्याची आवश्यकता पडत नाहीं, असें झालें म्हणजे त्याला म्हणतात 'रामराज्य.' गांवांतील भाडणें शहरांतील कोर्टांत जातात आणि शहरांतील लोक त्याचा निवाडा करतात तेव्हां त्याला गुलामगिरी, दास्य, पारतंत्र्य, असें म्हणतात. गांवांतील भांडणें गांवांत च मिटविण्याचें नांव आहे स्वातंत्र्य, स्वराज्य. आणि गांवांत भांडणें च होत नाहींत, अशी स्थिति झाली तर त्याला म्हणायचें 'रामराज्य.' आपण आधीं ग्रामराज्य करूं या आणि मग रामराज्य करूं या. देशांत स्वराज्य झालें, आतां आपण ग्रामराज्य करूं या. त्याच साठीं भूदान यज्ञ चालला आहे.

म्हणून मित्रांनो, तुमच्या गांवाचें भलें कशांत आहे याचा विचार तुम्ही स्वत: करा. आपल्या गांवाला एक राष्ट्र समजा. आज तुम्ही जसें 'भारत-माता की जय' म्हणतां, तसा आपल्या गांवाचा जयजयकार करा; हें आम्ही गांवोगांवीं जाऊन लोकांना समजावून सांगत असतों. प्रत्येक गांवाचा जयजयकार कसा होईल ? आपला प्रत्येक अवयव काम करील तर सर्व शरीर काम करील. एखाद्या माणसाचें सर्व शरीर चांगलें काम करीत असलें पण डोळा मात्र काम करीत नसला तर त्या माणसाला आंधळा म्हणतात. सारें शरीर काम करतें, पण कान नीट काम करीत नाहीं, तेव्हां त्याला बहिरा

म्हणतात. त्याप्रमाणें सर्व गांवें आपलीं कामें चांगल्या प्रकारें करीत असतील तर आपलें स्वराज्य चांगलें ठरेल. प्रत्येक गांवांत आम्हीं राज्य चालविलें पाहिजे. देशांत राज्याचीं जितकीं खातीं असतात, तितकीं सर्व गांवांत असलीं पाहिजेत. तेथें आरोग्य-खातें असतें गांवांत हि आरोग्य-खातें असावयाला हवें. तेथें उद्योग खातें, शेतकी-खातें, शिक्षण-खातें, न्याय-खातें असतें. तशीं गांवांत हीं सारीं खातीं असलीं पाहिजेत. तेथें परराष्ट्रांशीं संबंध येतो तसा गांवाचा परगांवांशीं संबंध येतो.

## ग्रामे-ग्रामे विश्व-विद्यापीठम्

प्रत्येक खेड्यांत विद्यापीठ असायला हवें. 'ग्रामे-ग्रामे विश्व-विद्यापीठम्.' हें आहे खरें ग्रामराज्य! कुणी मला म्हणाले "प्रत्येक खेड्यांत प्राथमिक शाळा असाव्यात मोठ्या गांवांत हायस्कुलें असावींत आणि मोठ्या शहरांत कॉलेजें असावीं." मीं म्हटलें "ईश्वराची योजना अशी असती तर खेड्यांत दहा वर्षें वयापर्यंतचे लोक राहत असते, पंधरा वीस वर्षांपर्यंतचे लोक मोठ्या गांवांत राहते आणि त्याहून अधिक वयाचे लोक मोठमोठ्या शहरांत राहते, पण जन्मापासून मरेपर्यंतचा लोकांचा सर्व व्यवहार जर गांवांत च चालतो, तर पुरें शिक्षण, गांवांत च कां होऊं नये? एका एका प्रांतांत एक एक युनिव्हर्सिटी स्थापन करण्याची योजना हे लोक करीत आहेत. किती दरिद्री आहेत हे लोक! परंतु माझ्या योजनेप्रमाणें प्रत्येक गांवांत एक युनिव्हर्सिटी असेल. जरा विचार करा कीं तुम्ही गांवांना काय तुकड्यांच्या स्वरूपांत ठेवणार आहांत? फक्त चार वर्षांची प्राथमिक शाळा म्हणजे एक तुकडा आहे. तेवढा च तुम्हीं गांवांत ठेवाल तर पुढचें शिक्षण घेण्यासाठीं त्यांना गांव सोडून शहरांत जावें लागेल. याला कांहीं अर्थ आहे काय? माझ्या खेड्यांत च मला पूर्ण शिक्षण मिळालें पाहिजे. माझें हें गांव तुकडा नाहीं. तें पूर्ण आहे. "पूर्ण-मदः पूर्णमिदं" तें पूर्ण आहे, हें पूर्ण आहे. परंतु हे लोक म्हणतात, तो हि तुकडा आहे व हा हि तुकडा आहे. आणि सर्व मिळून पूर्ण होतें. परंतु अशा प्रकारें तुकडे तुकडे जोडून पूर्ण बनविण्याची गोष्ट आमच्या योजनेंत नाहीं. प्रत्येक गांवांत राज्याच्या सर्व खात्यानिशीं एक परिपूर्ण राज्य तयार व्हावें' असें आम्ही इच्छितों.

## प्रत्येक गांव राज्य-कार्य-धुरंधर

याप्रमाणें प्रत्येक लहान लहान गांवीं राज्य असेल तर त्या त्या गांवांत राज्य-कार्य-धुरंधरांचा समूह असेल. गांवोगांव अनुभवी लोक असतील. दिल्लीवाल्यांना राज्य चालवितांना कधीं कांहीं अडचण उपस्थित झाली तर चार दोन खेड्यांत जाऊन तिथले लोक राज्य कसें चालवितात, हें पाहण्याचा ते विचार करतील. कारण प्रत्येक गांवांतून राज्य-शास्त्र-प्रवीण लोक राहतात यासाठीं खेड्याखेड्यांतून विद्यापीठें हि हवींत. आज खेडेगांवांत कुणी हि राज्यशास्त्रज्ञ नाहीं, जिल्ह्यांत हि नाहीं, इतकें च काय साऱ्या प्रदेशांत सुद्धां दोन तीन च राज्यशास्त्रज्ञ असतील, असें म्हटलें जातें. स्वराज्य चालवावयाचें आहे तिथें इतके कमी राज्यशास्त्रज्ञ राहून कसें चालेल? म्हणून गांवोगांव असे ज्ञाते असले पाहिजेत.

'मला मुख्यप्रधानाच्या पदांतून जरा मोकळें करा' असें एकदां पंडित नेहरू म्हणाले मात्र. सर्व लोक घाबरले. 'आपणांशिवाय आमचें कसें चालेल ?' असें ते म्हणूं लागले. हें स्वराज्य नव्हे. पंडित नेहरूंनीं मोकळें होण्याची इच्छा व्यक्त केली तर लोकांनीं त्यांना म्हणायला पाहिजे 'बरोबर आहे, आपण अवश्य मुक्त व्हावें. आपण आजवर खूप सेवा केली आहे, आतां मुक्त होण्याचा आपणांस हक्क आहे.' लोक असें म्हणतील तेव्हां च तें खरें स्वराज्य आहे, असें म्हणतां येईल.

## अकलेचें वितरण

जी राज्यसत्ता दिल्लींत एका जागीं गोळा झाली आहे, तिला गांवोगांव वांटावयाची आहे. परमेश्वराचे आपण भक्त आहोंत. म्हणून त्याचें च उदाहरण समोर ठेवूं या. देवानें जर सर्व अक्कल वैकुंठांत ठेवली असती आणि कुणा हि प्राण्याला अक्कल दिली नसती, तर हें जग कसें चालतें ? मग कुणाला अकलेची जरूर पडली असती तर त्याला वैकुंठाला तार पाठवून थोडीशी अक्कल मागवून घ्यावी लागली असती आणि मग त्याच्या मंत्र्यांना विमानांतून धावावें लागलें असतें. पण परमेश्वरानें सर्वांना अक्कल वांटून देऊन किती सुंदर योजना केली आहे ! माणसाला बुद्धि दिली आहे,

तशीच घोडयाला गाढवाला,सांपाला, विंचवाला, किडयाला सर्वांना बुद्धि दिली आहे. त्यानें एका च जागीं अकलेचें कोठार ठेवलें नाहीं, म्हणून च भगवान् निश्चिंतपणें क्षीरसागरांत निद्रा घेत आहेत. आमचे मंत्री अशी झोंप घेऊं शकतात काय? जगांत देवाची व्यवस्था इतकी चोख आहे कीं जगांत देव आहे कीं नाहीं अशी च शंका कित्येकांना येते. कारण तो आपली सत्ता चालवीत नाहीं. परंतु त्याला कोणी मानो अगर न मानो तो निश्चिंत होऊन निद्रा घेतो, इतका तो क्षमाशील आहे. असे जेव्हां दिल्लीचे राज्यकर्ते झोंपू शकतील तेव्हां खरें स्वराज्य होईल. दिल्लीच्या क्षीरसागरांत आमचे मुख्य प्रधान झोंपत आहेत, असें जेव्हां होईल तेव्हां खरें स्वराज्य आलें असें आम्ही समजूं. आज आमचे मुख्य मंत्री १८-१८ घंटे जागतात; हें काय स्वराज्य झालें ?

## शासन-विभाजन

पूर्वीं सत्ता लंडनमध्यें होती. तेथून पार्सल होऊन ती आतां दिल्लीला आली आहे. ही मोठी च कृपा झाली आहे. पण तें पार्सल दिल्लीला अडकून पडलें आहे. तें आतां गांवोगांव पोहोंचवावयाचें आहे. लोकांना स्वराज्याचें शिक्षण द्यावयाचें आहे, हें सर्व काम आपल्याला करावयाचें आहे. याला म्हणतात ' शासन-विभाजन.' आज शासनाचें म्हणजे सत्तेचें केंद्रीकरण झालें आहे. त्या ऐवजीं सत्तेचें विकेंद्रीकरण केलें पाहिजे. प्रत्येक गांवांत सत्ता वाटली पाहिजे. मग जेव्हां गांवोगांवचे लोक राज्यशास्त्रांत प्रवीण होतील आणि भांडणें करणार च नाहींत, तेव्हां शासन-मुक्ति होईल. रामराज्य होईल.

## ग्राम-संकल्प

हें सर्व करावयाचें आहे. यासाठीं च भूदान-यज्ञ सुरू झाला आहे. आपल्या गांवची स्थिति सुधारण्यासाठीं तुम्हांला कंबर कसून तयार झालें पाहिजे, असें आम्हीं गांवांतील जनतेला सांगत असतों. तुमच्या गांवांत भूमिहीन असतील तर त्यांना जमीन दिली गेली पाहिजे. जमीन कोठून द्याल ? दुसऱ्या गांवाहून जमीन आणाल ? नाहीं. तर आपल्या च गांवांतील

जमीनीचा एक भाग त्यांना द्यायाला पाहिजे. नंतर गांवोगांव धंदे उभे केले पाहिजेत. 'आम्ही बाहेरचें कापड विकत घेणार नाहीं. आपल्या गांवांत कापड तयार करून तें च वापरूं,' असा निश्चय आपण केला पाहिजे. जे लोक बाहेरचें कापड वापरतात, ते नागवे आहेत, असें मला वाटतें. आतां माझ्यासमोर जे लोक बसले आहेत, त्या सर्वांनीं बाहेरचें कापड वापरलेलें आहे. 'अर्थात् ही नागव्यांची सभा आहे. जर या लोकांना बाहेरून कापड मिळालें नाहीं, तर हे फाटके कपडे घालतील, नंतर लंगोटी वापरतील आणि शेंवटीं नागवे राहतील. कां? तर कापड तयार करण्याची कला येत नाहीं म्हणून!

## गांवा-गांवांत आयोजन

"तुम्हांला हें भूदानाचें काम कां करावें लागतें? सरकार जमीन कां वाटीत नाहीं?" असें कांहीं लोक आम्हांला विचारतात, सरकारनें जर जमीन वाटली तर त्यानें ग्रामराज्य व्हावयाचें नाहीं. दिल्लीराज्य होईल. लंडन-राज्याऐवजीं आतां दिल्ली-राज्य आलें आहे. आतां दिल्ली-राज्याऐवजीं गांवचें राज्य यावें अशी आमची इच्छा आहे. आमची भूक शमविण्यासाठीं जसें आम्हीं च खाल्लें पाहिजे, दुसऱ्यानें खाऊन भागत नाहीं, तसें आमच्या रामराज्यासाठीं आम्हांला च भूमिदान करावें लागेल, दुसरे कोणी करून चालणार नाहीं. या खेरीज आपल्या राज्यांत कोणता माल बाहेरून यावा आणि कोणता माल आपल्या देशांतून बाहेर जावा, याचा विचार आज जसे दिल्लीचे राज्यकर्ते दिल्लीला बसून करीत असतात, तसें गांवोगांवच्या लोकांनीं आपल्या गांवांत बाहेरून कोणता माल यावा आणि आपल्या गांवांतून कोणता माल बाहेर जावा, याचा विचार केला पाहिजे. आज प्रत्येक जण त्याच्या मर्जीला येईल तो माल बाहेरून विकत घेतो. पण यानंतर असें चालावयाचें नाहीं. सर्व गांवकरी मिळून चर्चा करतील. आणि योग्य तो निर्णय घेतील. गांवाला गुळाची जरूर असली आणि यावर्षीं आपल्या गांवीं गूळ तयार होऊ शकत नाहीं, असें असलें तर या एका वर्षासाठीं गूळ बाहेरून विकत घेऊं या, असा ते निर्णय घेतील; पण गांवचे लोक स्वतः बाजारांत जाऊन गूळ विकत

घेणार नाहींत; गांवच्या दुकानांतून विकत घेतील. अशा प्रकारें गांवचे लोक बाहेरचा गूळ गांवांतील दुकानांतून वर्षभर विकत घेतील आणि नंतर गांवांत ऊंस पेरून पुढील वर्षासाठीं गूळ आपल्या गांवीं तयार करतील. गांवच्या दुकानांत तो गूळ ठेवला जाईल आणि लोक तो च गूळ घेतील.

## डोकीं अनेक पण हृदय एक

अशा रीतीनें सर्व गांव एका मनानें विचार करील. गांवांत पांचशें लोक असले तर तिथें एक हजार हात असतील, एक हजार पाय असतील, पांचशें डोकीं असतील, पण हृदय, मन, एक असेल. गीतेंत अकराव्या अध्यायांत विश्वरूप-दर्शनाचा प्रसंग आलेला आहे. विश्वरूप-दर्शनांत हजारो हात, हजारो पाय कान डोळे आहेत. पण हृदयें हजारो आहेत, असें म्हटलेलें त्यांत तुम्हांला आढळावयाचें नाहीं. विश्वरूपाचें हृदय एक च असणार. तसें गांवाचें हृदय एक असेल. पांचशें डोकीं चर्चा करतील व चर्चा करून निर्णय घेतील. अशी आमच्या सर्वोदयाची योजना आहे.

## त्रैराशिकाचें काम नाहीं

हें सर्व करण्याला वेळ लागेल हें आम्हीं जाणतों. पण फार लागावयाचा नाहीं. एका गांवास एक वर्ष लागलें तर पांच लक्ष गांवांना किती वेळ लागेल ? असें त्रैराशिक मांडून हा विचार करावयाचा नसतो. तुमच्या गांवीं आंबे पिकूं लागले कीं हिंदुस्थानच्या पांच लक्ष गांवीं आंबे पिकायला लागतात. म्हणून तुमच्या गांवीं ग्रामराज्य होण्याला जेवढा वेळ लागेल तेवढ्या वेळांत सर्व हिंदुस्थानच्या पांच लक्ष खेड्यांत रामराज्य स्थापन होईल.

## ‘रामराज्य’ कां ‘अराज्य’ नांव स्वेच्छाधीन

आज मीं तुमच्यासमोर सूत्ररूपांत विचार मांडला आहे. पहिला विचार केंद्रीय स्वराज्य ; दुसरा विचार विभाजित स्वराज्य ; आणि तिसरा विचार राज्य-मुक्ति अथवा रामराज्य. त्याला रामराज्य म्हणायचें कीं अराज्य म्हणायचें, ही प्रत्येकाच्या मर्जीची गोष्ट आहे. ईश्वर नाहीं, असें हि तुम्ही

म्हणूं शकतां आणि ईश्वर क्षीरसागरांत झोंपलेला आहे, असें हि म्हणूं शकतां. पण ईश्वर घामोघाम होऊन काम करीत आहे हें तुम्ही म्हणूं शकत नाहीं. ईश्वर नाहीं अथवा तो अकर्ता झाला आहे, असें बोलूं शकतां. ईश्वर कर्म करीत आहे आणि सर्वांवर आपली सत्ता चालवीत आहे, असें तुम्हांला म्हणतां येणार नाहीं. हें तत्त्वज्ञान, ही ब्रह्मविद्या, या देशांत आपल्याला आणावयाची आहे.

## समर्थांचें परावलंबन हि ग्राह्य

तुम्हीं सर्वांनीं भावाभावासारखें उत्साहानें कामाला लागावें, अशी माझी इच्छा आहे. "विनोबाची योजना परस्परावलंबनाची नाहीं; स्वावलंबनाची आहे," असें कांहीं लोक म्हणतात. विनोबाची योजना परावलंबनाची नाहीं इतकें मात्र ते मान्य करतात. पण परस्परावलंबन असलें पाहिजे, असें त्यांचें म्हणणें आहे. परस्परावलंबन आम्हांला हि हवें आहे. आज विनोबा गाईचें दूध प्याला, हें दूध काय त्यानें काढलें होतें ? विनोबासाठीं लोकांनीं ही सारी व्यवस्था केली होती. विनोबाकडून होते ती सेवा विनोबा करतो व लोकांनीं करावयाची ती व्यवस्था लोक करतात. असें हें परस्परावलंबन च आहे. पण परस्परावलंबन दोन प्रकारचें असतें. आंधळ्याचें आणि लंगड्याचें हि एक परस्परावलंबन असतें. आंधळा पाहूं शकत नाहीं, पण चालूं शकतो. लंगडा चालूं शकत नाहीं, पण पाहूं शकतो, म्हणून दोघे परस्परावलंबन अथवा सहकार करतात. लंगडा आंधळ्याच्या खांद्यावर बसतो. तो पाहण्याचें काम करतो आणि आंधळा चालण्याचें काम करतो. अशा प्रकारें समाजांतील कांहीं लोकांना आंधळे आणि कांहीं लोकांना लंगडे ठेवून त्या दोघांचें परस्परावलंबन हे लोक साधूं पाहत आहेत काय ? विनोबाला हि परस्परावलंबन हवें आहे. पण दोघांना डोळे असावेत, दोघांना हि पाय असावेत आणि मग त्या दोघांनीं हातांत हात घालून एकमेकांबरोबर चालावें, अशी त्याची इच्छा आहे. विनोबाला समर्थांचें परस्परावलंबन हवें आहे. आणि हे लोक, व्यंगयुक्त अथवा अक्षम लोकांचें परस्परावलंबन इच्छीत आहेत.

## गांवांतला कच्चा माल गांवांतच पक्का व्हावा

सर्व च वस्तु एका गांवांत तयार होऊं शकत नाहींत, हें मला माहीत आहे. एका गांवानें दुसऱ्या गांवाशीं, आणि गांवांनीं शहरांशीं, सहकार करावयाचा असतो. परंतु गांवामध्यें शहरांतून पीठ दळून यावें, तांदूळ कुटून यावा आणि साखर तयार आणली जावी हें आम्ही इच्छीत नाहीं. गांवांत च या वस्तु तयार व्हाव्यात, असें आम्ही इच्छितों. गांवांत थर्मामिटर, लाऊडस्पीकर, यांसारख्या वस्तूंची आवश्यकता पडली तर त्या वस्तु शहरांतून आणाव्या. आज शहरांतील लोक गांवांतील लोकांचे उद्योग-धंदे स्वतः च करतात. गांवांत कच्चा माल असतो त्याचा पक्का माल गांवांत च तयार होऊं शकतो असें असून हि आज शहरांत यंत्रांच्या साहाय्यानें त्याचा पक्का माल तयार करतात. तिकडून परदेशांतून जो माल शहरांत येतो, त्याला हे शहरवाले थोपवीत नाहींत. खेड्यांचे उद्योग-धंदे खेड्यांत चालावे आणि परदेशांतून जो माल येथें येतो, त्याला थोपविण्यासाठीं तो माल शहरांत तयार व्हावा अशी आमची इच्छा आहे. गांवांतील उद्योगधंदे जर नष्ट झाले तर फक्त खेड्यांवर च संकट येईल असें नसून शहरांवर हि येईल. गांवांतील बेकारांचा शहरावर हल्ला होईल आणि तिकडून परदेशी मालाचा हल्ला हि होत च राहील. अशा प्रकारें दोहोंच्या हल्ल्यांत शहरांतील लोक भरडले जातील. म्हणून खेड्यांतील लोक आपले धंदे खेड्यांत चालवितील आणि शहरांतील लोक परदेशांतून येणारा माल शहरांत तयार करतील, अशा प्रकारचा खेड्या-शहरांतील सहकार आमच्या योजनेंत आहे. यामुळें प्रत्येक गांव पूर्ण होईल आणि पूर्णांचा सहकार होईल.

**कोटिपाम** (आंध्र), ९-८-५५

## ग्राम-स्वराज्याची स्थापना : २४ :

आज सर्व दुनियेंत काय चाललें आहे? पुष्कळशा देशांत थोडचा लोकांची हुकूमत चालते, पण ती लोकशाहीच्या नांवावर. ही लोकशाही केवळ नांवाची प्रातिनिधिक आहे. लोक स्वतः राज्य चालवीत नाहींत, आपल्या प्रतिनिधींमार्फत राज्य करतात. ज्यांच्या हातांत त्यांनीं सत्ता दिलेली असते ते पांच वर्षेंपर्यंत राजाहून हि जास्त अधिकार चालवितात व अशीं कामें करून बसतात कीं पुढच्या सरकारांना तीं बंद करतां येत नाहींत. समजा आमच्या सरकारनें कांहीं देशांशीं व्यापारी करार केलेले आहेत, तर हे करार पांच वर्षें होऊन सरकार बदललें तरी चालू च राहतात. ते बदलणें शक्य होत नाहीं. अशा प्रकारें पूर्वींच्या सरकारचीं पुष्कळशीं कामें नाइलाजानें नव्या सरकारला चालू ठेवावीं लागतात. सध्यांच्या विज्ञान-युगांत अशीं सरकारें पुष्कळशा गोष्टी करून ठेवूं शकतात अशा स्थितींत त्यांच्या हातीं एवढी मोठी सत्ता देणें मोठें भयावह आहे.

समजा पं. नेहरूंनीं जाहीर केलें कीं "भारताला धोका निर्माण झालेला आहे, तेव्हां सर्वांनीं सेनेंत भरती होण्यास तयार झालें पाहिजे. आणि एवढचासाठीं आम्ही सर्व योजना बंद ठेवणार आहोंत. खादीसाठीं वगैरे आम्हीं पैसा देऊं केला आहे खरा पण देशावर संकट आलें असल्यामुळें हा खर्च आम्हांला परवडत नाहीं. आम्हाला सर्व पैसा लष्करावर खर्च केला पाहिजे" असें म्हटल्यावर पार्लमेंटांत विरोधी पक्षाचे सभासद तरी काय बोलणार? कॉंग्रेसवाले जें बोलतील तेंच ते बोलणार. दुसऱ्या बाबींत ते विरोध करतील पण लष्करावरचा खर्च कमी करा असें एक हि माणूस बोलणार नाहीं. ह्याला स्वातंत्र्य म्हणत नाहींत.

### पक्षभेदाचें विष

खरें पाहिलें तर आज दुनियेंत कोणी च खऱ्या अर्थानें स्वतंत्र नाहीं. जोंपर्यंत ही प्रातिनिधिक लोकशाही चालेल व गांवचा कारभार गांवें

स्वतःच्या हातांत घेणार नाहींत तोंपर्यंत खरें स्वातंत्र्य मिळणार नाहीं. येथल्या गांवांबद्दलच्या योजना आम्हींच आमच्या बुद्धि व शक्त्यनुसार करूं असा विचार तरी कोणी करतो काय ? त्यासाठीं ऐक्य पाहिजे. पण आज अगदीं त्याच्या उलट गोष्टी चालल्या आहेत. आम्ही आमचा कारभार स्वतः करणार नाहीं, आमचे प्रतिनिधी तो करतील. आम्ही प्रतिनिधींना निवडून देऊं. ह्या सर्वांचा अर्थ काय आहे ? तुमच्यांत अनेक पक्ष असतील. दिल्लीवाल्यांच्या हातांत सत्ता देण्यासाठीं ते परस्परांचें वैर करून परस्परांना मारतील. दिल्ली-वाल्यांच्या हातीं सत्ता देऊन तुम्ही स्वस्थ बसलां असें हि नाहीं तर तुम्ही पक्षापक्षांतला विरोध निर्माण करून परस्परांत वैर उत्पन्न केलें, म्हणजे येथली शक्ति कधीं वाढूं च नये अशी व्यवस्था करून ठेवली. हा काँग्रेस-वाला, हा पी. एस्. पी, हा कम्युनिस्ट, हा जनसंघी, हा ब्राह्मण, हा ब्राह्मणेतर, हा हिंदु, हा मुसलमान, हा वक्कालिक हा लिंगायत असे भेद वाढवून वैर निर्माण केलें. म्हणजे दिल्लीच्या स्वराज्यासाठीं तुम्हीं तुमचें स्वराज्य मारलें. ह्या सर्वांत काय तथ्य आहे, त्याचा विचार तुम्ही च करा. तुमच्यांत ऐक्य असतें व सर्वांचा एकोपा असता आणि मग प्रतिनिधींच्या मार्फत कारभार चालविला असता तरी हरकत नव्हती, निदान आपआपसांत तरी वैर नको होतें. गांवोगांवीं स्वराज्य होईल तेव्हांच खरें स्वराज्य आलें असें जरी असलें तरी कमींत कमी आपल्या गांवच्या ऐक्यांत बिघाड येणार नाहीं एवढें तरी करा. निवडणुकींत मतें कोणाला हि द्या, पण आमच्या सर्वांचा एक च पक्ष आहे व तो म्हणजे ग्राम-पक्ष असें तरी ठरवून टाका. असें कराल तेव्हां च गांवाची ताकद वाढेल. दिल्लीच्या निवडणुकीच्या नांवानें आपल्या गांवांत च निरनिराळे पक्ष निर्माण कराल तर तुमची सर्व शक्ति क्षीण होऊन जाईल व तुमची शक्ति क्षीण झाली कीं दिल्लीवाल्यांची शक्ति हि क्षीण होईल. प्रत्येक गांव जर आपल्या पायावर उभा राहिला नाहीं तर दिल्लीवाले तरी काय करतील ?

### गांवांनीं स्वतःच्या पायावर उभे रहावें

नुकतेंच कांहीं दिवसांपूर्वीं पं. नेहरूंनीं एका व्याख्यानांत सांगितलें कीं, " केंद्रीय सरकार, प्रांतीय सरकार, राष्ट्रीय-विकासखंड, समाज-विकास-

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.

खंड, प्लॅनिंग कमिशन त्यांच्यावर भरवंसा ठेवून चालणें गांवाच्या दृष्टीनें मोठें धोक्याचें आहे. गांववाल्यांनीं स्वत:च्या पायावर उभें राहिलें पाहिजे" ह्याहून कोणी झाला तरी अधिक काय सांगू शकणार? आणि तुम्ही तर इतके श्रद्धावान् आहांत कीं तुम्हांला व्याख्यान वाचण्याची हि गरज वाटत नाहीं. उत्तमांतल्या उत्तम पुढाऱ्याचें व्याख्यान गांवापर्यंत पोंचत च नाहीं. पण आम्ही मात्र त्यांच्यावर पूर्ण विश्वास टाकून स्वस्थ बसतों. बस, आम्हीं प्रतिनिधींना पाठविलें आहे, ते सर्व कांहीं पाहून घेतील. ह्या स्वराज्याला काय म्हणावें? परमेश्वरावर विश्वास टाकून तुम्ही कांहीं स्वस्थ बसत नाहीं. स्वत: शेतावर काम करतां, तेव्हां पीक हातीं येतें. ह्याचा अर्थ हा कीं देवावर हि जितका विश्वास तुमचा नाहीं तितका सरकारवर आहे. कारण जशास तसें असा ईश्वराचा नियम तुम्हांला माहीत आहे. स्वत: आळशी बनून स्वस्थ बसलों तर ईश्वर थोडाच पीक देणार आहे? 'श्रान्तस्य सख्याय देव:' आपण स्वत: थकल्याखेरीज देव मदत करीत नाहीं. मग परमेश्वर जर तुमच्यापासून कामाची अपेक्षा राखतो तर सरकार राखीत नसेल काय?

## लोकशाहीचें नाटक

पण ह्यांत तुमचा दोष नाहीं. ही लोकशाही च अशा पद्धतीनें बनलेली आहे. एक उमेदवार लोकांना सांगतो कीं, 'मला निवडून द्या, मी तुम्हांला स्वर्ग प्राप्त करून देईन.' दुसरा म्हणतो, 'मला च निवडून द्या, त्याला निवडून दिलें तर तो तुम्हांला पाताळांत पोंचवील, मी तुम्हांला स्वर्गाचें दर्शन करवून देईन.' कोणी हि असें सांगत नाहीं कीं, "बाबांनो तुमचें नशीब तुमच्या च हातीं आहे" जोंपर्यंत हें असें चालेल तोंपर्यंत दुनियेंत शांति, समाधान किंवा स्वराज्य प्राप्त होणार नाहीं.

काल मीं अंबर चरखा पाहिला. शें-दीडशें बाया सूत कांतीत होत्या. त्यांना रोज एक रुपया मिळतो. लोक खादी तर वापरीत नाहींत. हें सर्व सरकारच्या भरवंशावर चाललें आहे. ही योजना सरकार चालवील तोंपर्यंत चालेल. आज च मीं वाचलें कीं साडेसोळा कोटि रुपये आधीं खादीसाठीं मंजूर झाले होते, पण आतां ते साडेचार कोट च करण्यांत आले आहेत.

आतां वैकुंठभाई म्हणतात कीं ज्या ज्या प्रांतांत ही योजना चालली होती, त्या त्या प्रांतांत आतां तिच्यांत काट करावा लागेल. सरकार काम करील तर त्याची स्तुति, न करील तर त्याची निंदा करूं. जनता अशी पराधीन राहिली तर तें स्वराज्य काय राहिलें ?

## ग्राम-स्वराज्य स्थापन करा

आज सर्वत्र भय पसरलेलें आहे. स्वराज्याचें एक हि लक्षण प्रगट झालेलें मला दिसत नाहीं. लोक अगदीं च अनाथ दिसतात. शहाणे लोक आहेत ते पक्ष व तुकडे करण्याखेरीज दुसरें कांहीं करीत नाहींत. कोणत्या हि कामांत एक होऊन जनतेच्या कल्याणाचें काम करीत नाहींत. बाबाच्या स्वागतासाठीं तुम्ही सर्व एक झालां आहांत. पण उद्यां बाबा गेल्याबरोबर ही एकी नाहींशी होणार काय ? ह्या प्रदेशांत स्वराज्य प्राप्त होईपर्यंत ही समिति कायम ठेवा. प्रत्येक गांवांत आम्हांला ग्राम-स्वराज्याची स्थापना करावयाची आहे. गांवोगांव ग्रामदान व्हावें, लोकांनीं आपली मालकी सोडावी, ग्रामोद्योग वाढावे. गांवांत झगडे असले तर त्याचा न्याय गांवांत च व्हावा. गांवाचा झगडा वकिलाकडे जाऊं नये. सर्वांनीं एक होऊन काम करावें व ग्राम-स्वराज्याची स्थापना करावी. गांवांत पक्षभेद मुळीं च राहूं नये. सर्वांनीं मिळून गांवासाठीं योजना बनवावी.

ह्या सर्व पक्षांत मत-भिन्नता कां आहे ह्याचा विचार तुम्हीं केला पाहिजे. सर्वांना शांतिपूर्ण साधनानें समाजवाद पाहिजे आहे. पी. एस्. पी, कम्युनिस्ट, सोशलिस्ट सर्वांचें हेंच एक ध्येय आहे. मग हे सर्व खेडेगांवांच्या उद्धाराच्या कामास कां लागत नाहींत ? ह्या सर्वांचा तुम्ही विचार कराल तर काम यशस्वी होईल व खऱ्या स्वराज्याची स्थापना होईल.

## स्वशासनाची स्थापना :२५:

(नव-जीवन मंडळ प्रशिक्षणार्थी शिबिरांत दिलेलें प्रवचन)

आजची दुनिया केन्द्रित-शासनाच्या पकडींत सांपडलेली आहे. तिला त्यांतून सोडविणें हा आमच्या सेवेचा मुख्य हेतु आहे. आज दुनिया केन्द्रित शासन कायम ठेवून, हिंसेपासून स्वतःचा बचाव करावयाचा विचार करीत आहे. कारण हिंसेचे चांगले परिणाम थोडे असून वाईट फार होत आहेत. ज्यावेळीं विज्ञान वाढलें नव्हतें तेव्हां हिंसेपासून नुकसान होत असलें तरी कांहीं फायदा हि होत होता. पण आज विज्ञान वाढलें असल्यामुळें हिंसक शस्त्रास्त्रें अत्याचारी बनलीं आहेत. तीं मनुष्याच्या स्वाधीन राहिलेलीं नाहींत. म्हणून जगभरचे राजकारणी लोक लढाया बंद करण्याच्या युक्तीच्या फिकीरींत आहेत. मध्यंतरीं 'जगांत शांतता स्थापन कशी होईल' ह्याचा विचार करण्यासाठीं चार मोठ्या राष्ट्रांचे प्रतिनिधि एकत्र जमले होते. हीं राष्ट्रें परस्परांना परस्परांचा शत्रु मानणारीं होतीं व आजहि त्यांची वृत्ति बदलली आहे असें नाहीं. ह्या लोकांनीं पुष्कळ प्रयत्न केल्यानंतर त्यांच्यांत विश्वास उत्पन्न झाला कीं ज्याअर्थीं उभयपक्षी शांति स्थापनेची पुष्कळ इच्छा आहे, त्याअर्थीं शांतीची स्थापना होऊं शकते. पूर्वीं असा विश्वासच नव्हता. अशा प्रकारचें वातावरण निर्माण करण्यांत आपल्या देशाचा हि हात होता हें आम्हांला व जगाला हि माहीत आहे. हा हात अल्प होता, मुख्य हात विज्ञानाचा होता. विज्ञानामुळेंच ह्या लोकांसमोर हा प्रश्न निर्माण झाला. त्यामुळें ह्या बाबतींत आतां चर्चा चालूच राहील व परिस्थिति सुधारत जाईल व शांतीचा मार्ग सांपडेल, अशी आशा वाटत आहे.

### अशांततेचें कारण केन्द्रित सत्ता

जगाचा इतिहास पाहिला तर तो लढायांनीं भरलेला दिसतो, पण त्यांत अधिक काल शांततेचाच दिसून येतो. असें असून हि त्यांत लढायाच

लढाया दिसतात ह्याचें कारण शांतता मनुष्याला स्वाभाविक असल्यामुळें तिचा फारसा बोलबाला होत नाहीं. आज जरी परस्पर विचारविनिमयानें शांति स्थापनेचा मार्ग सांपडेल असें असलें तरी १० वर्षांनतर शांति राहीलच असा विश्वास वाटत नाहीं. वस्तुत: जोंपर्यंत केन्द्रित सत्ता कायम आहे व प्रत्येक राष्ट्रांत शासन केन्द्रित आहे तोंपर्यंत शांतता स्थापन होऊं शकणार नाहीं. पण केन्द्रित सत्तेचा अर्थ जर असा असेल कीं केन्द्राच्या ठिकाणीं नीतिमान् लोक असून, लोक मागतील तेव्हां ते सल्ला देतात, व आपल्या सल्ल्या-प्रमाणें झालें पाहिजे असा आग्रह धरीत नाहींत, आणि लोक आपला कार-भार स्वत: चालवितात व ह्या वरच्या लोकांचा सल्ला त्यांना ज्ञानयुक्त व नीतीला अनुकूल वाटला तर ग्रहण करतात, नाहींतर ग्रहण करीत नाहींत. अशा स्थितींत तें शासन केन्द्रित शासन राहत नाहीं, तें एका प्रकारें विकेन्द्रित शासन बनून जातें.

## लोक-राज्य अजून आलेलें नाहीं

आजची परिस्थिति अशी आहे कीं सध्यांची स्थिति व प्राचीन राज्य-परंपरा ह्यांत मला फारसें अंतर दिसत नाहीं. अकबराचें राज्य झालें, हिंदुस्थान सुखी झाला. औरंगजेबाचें राज्य आलें तो दु:खी झाला. आज सुद्धां जवळ जवळ अशीच स्थिति आहे. मतदानाचें एक नाटक चालू आहे एवढेंच. समजा, पाकिस्ताननें अमेरिकेची लष्करी मदत घेण्याचें ठरविलें त्यावेळीं पं. नेहरूंनीं जर म्हटलें असतें कीं आम्ही बाहेरची मदत तर घेणार नाहीं, पण आमची लष्करी तयारी कमी आहे त्या अर्थीं शस्त्रास्त्रें मात्र वाढवूं, तर हिंदुस्थानांतील पुष्कळशा लोकांना तें पटलें असतें व हिंदुस्थानांत भरमसाट शस्त्रास्त्रें वाढलीं असतीं. पण त्यांनीं म्हटलें कीं पाकिस्ताननें कांहीं हि ठरविलें असो आमचें त्यामुळें कांहीं बिघडत नाहीं, आमचें पूर्वीचेंच धोरण कायम राहील. आम्ही शांत व स्वत:वरच अवलंबून राहूं, तर लोक हि शांत व आत्मविश्वासपूर्ण राहतील. त्याच प्रमाणें आज जर पं. नेहरू म्हणाले कीं गोव्यावर हल्ला केला पाहिजे, तर पुष्कळ लोक त्यांना पाठिंबा देतील व सर्वत्र युद्धाचीच चर्चा चालेल. आमच्यासारखे कांहीं लोक हें

धोरण ठीक नाहीं असें म्हणत राहतील. लोक त्यांचें म्हणणें ऐकून हि घेतील. पण त्यामुळें स्थितींत फरक पडणार नाहीं.

आज पं. नेहरूंसारखें विवेकी पुढारी आम्हांला लाभले आहेत ही भाग्याची गोष्ट आहे. अशाच प्रकारें अकबराच्या काळांत लोक स्वतःला भाग्यवान् समजत होते. पण औरंगजेबाची कारकीर्द येतांच हे भाग्यवान् लोक, फुटक्या नशीबाचे ठरले. अशीच स्थिति नेहरू-शिवाय दुसऱ्या कोणाच्या हातीं पुढारीपण गेलें तर होऊं शकते. म्हणून सत्ता केन्द्रित असणें, तिच्या हातीं सैन्य असणें व तिनेंच सर्व योजना बनविणें ही गोष्टच चूक आहे. देशाला शांततेंत ठेवणें किंवा त्याला अशांततेंत ढकलणें ही गोष्ट सत्ता केन्द्रित असली तर तिच्या हातीं राहते व लोक पूर्ववत् मूर्ख च राहतात. आणि त्यांचे पुढारी वर म्हणतात कीं आम्हीं केलें त्याला लोकांचा पाठिंबा होता! आम्ही हिटलरला हुकूमशाह म्हणतों. पण आपण लोकांतर्फे व लोकांच्या पुष्कळच अधिक मतानें निवडून आलेलों आहोंत असा त्याचा दावा होता. आजच्या दुनियेची स्थिति च अशी आहे कीं बड्या बड्या लोकांच्या हातांत सत्ता आणि सेना राहतात व ते लोकांवर शासन चालवितात. अमेरिकेचा अध्यक्ष रुझवेल्ट हा चार वेळ निवडून आला. अशा प्रकारें पूर्वीं राजांच्या काळीं असे; तसा आज हि लोक आणि सरकार ह्यांच्या दरम्यान पाल्य-पालक संबंध आहे. हिंदुस्थानांतील भिन्न भिन्न प्रदेशांत भिन्न भिन्न कायदे बनतात. मुंबई-मद्रास प्रदेशांत मद्य-पान बंदी आहे तर बिहार-बंगालमध्यें दारूला सरसहा मोकळीक आहे. अशा स्थितींत असें म्हणतां येईल काय कीं मुंबई-मद्रासचें लोकमत दारूबंदीला अनुकूल व बंगाल-काशीचें लोकमत तिला प्रतिकूल आहे? काशी नगरी तर नशांत बुडालेली आहे. गंगास्नान व नशाबाजी हा तेथचा कार्यक्रम आहे. ह्यावरून ही गोष्ट स्पष्ट आहे कीं, लोकमताचा ह्या बाबतींत सवालच नाहीं. कांहीं प्रदेशांना भाग्यवान् शासक लाभले आहेत व कांहींना नाहींत एवढेंच.

**स्वयंशासनाच्या दोन बाजू**

लोकांना केवळ 'सुशासना' साठीं नव्हे तर स्वयंशासनासाठीं तयार करावयाचें आहे हें आधीं लक्षांत घेतलें पाहिजे. स्वयंशासनाच्या दोन बाजू

आहेत. (१) विकेन्द्रित सत्ता, म्हणजे सारी सत्ता गांवोगांव वांटली गेली पाहिजे व लोकांनीं गांवाचा कारभार स्वतः चालविला पाहिजे. (२) हिंसेच्या शक्तीवर आमचा मुळींच विश्वास नाहीं, प्रेम व अहिंसा ह्यावरच आमचा विश्वास आहे अशा प्रकारचें शिक्षण, मानसशास्त्र व तत्त्वज्ञान लोकांत पसरविणें. स्वतःचा कारभार स्वतःच चालवावयाचा ह्या पहिल्या सदराचा अर्थ गांवाचें राज्य एकमतानें चालवावयाचें, त्यांत पक्षभेद नसावयाचे, असा आहे. गांवांतल्या एकवीस वर्षांवरील सर्व लोकांची एक सर्वसामान्य सभा (जनरल बॉडी) राहील त्याच्यातर्फे एक पांच, सात किंवा दहा माणसांचें कार्यकारी मंडळ (एक्झीक्यूटिव्ह कमिटी) सर्व संमतीनें निवडलें जाईल. हें मंडळ गांवाचा कारभार चालवील. त्याचें सर्व ठराव सर्व संमतीनें होतील, त्या शिवाय त्यांचा अंमल होणार नाहीं. एका स्टेटच्या (राज्याच्या) हातांत जेवढी सत्ता असते तितकी सर्व गांवसभेच्या हातीं राहील. गांवांतून कोणत्या वस्तु बाहेर पाठवायच्या, कोणत्या गांवांत आणायच्या, कोणत्या वस्तूंवर किती बंदी लावावयाची हे सर्व अधिकार गांवाच्या हातीं राहतील. स्वयं-शासनाचें हें पहिलें अंग आहे. दुसरें अंग हें कीं गांवाच्या सर्व लोकांनीं स्वतःच्या गरजांबाबतींत शक्य तितके स्वावलंबी होऊं असें ठरविणें. समजा, कीं गांवाची एक गांव-सभा व कार्यकारिणी बनली व सर्वांनीं ठरविलें कीं आम्ही फक्त शेतीच करूं, बाकीच्या सर्व वस्तु आम्ही बाहेरून मागवूं तर तें 'ग्राम-स्वराज्य' होणार नाहीं. अशाप्रकारें अनुशासन व स्वावलंबन मिळून ग्राम-सत्ता बनते. हीं दोन्ही मिळून स्वयंशासनाचा एक विभाग होतो.

## अहिंसाधिष्ठित तत्त्वज्ञान, शिक्षण-शास्त्र व मानस-शास्त्र

लोकांच्या तत्त्वज्ञानांत, शिक्षण-शास्त्रांत व मानस-शास्त्रांत अहिंसेचा सिद्धांत दाखल करणें हा स्वयंशासनाचा दुसरा विभाग आहे. "आत्म्याहून देह भिन्न आहे व देहाहून आत्मा, आम्ही देहस्वरूप नाहीं आत्म-स्वरूप आहोंत. म्हणून त्या देहावर कोणी हल्ला केला तरी आम्हांला त्याची पर्वा नाहीं. कोणी देहाला त्रास देतो म्हणून आम्ही त्याला वश होणार नाहीं," हें आमचें तत्त्वज्ञान राहील. आमच्या मानस-शास्त्रांत परस्परांशीं व्यवहार करण्याचे कांहीं नियम असतील. त्यांतला एक नियम हा

असेल कीं आम्ही व्यक्तिगत मनाला गौण समजूं व सामुदायिक बुद्धीला प्राधान्य देऊं. हें लक्षांत घेतलें पाहिजे कीं मन हें व्यक्तिगत असतें, पण बुद्धि सामूहिक असते. कारण एकाच्या बुद्धीला योग्य म्हणून जी वस्तु वाटते, ती दुसऱ्याच्या बुद्धीला हि तशीच वाटते. म्हणून व्यक्तिगत असणाऱ्या मनाला स्थान न देतां सामूहिक अशा बुद्धीला आम्ही प्रमाण मानूं. आमच्या शिक्षण-शास्त्रांत, नीति-शास्त्रांत व व्यवहारांत 'कोणी कोणाला मारूं नये, पिटूं नये व धमकावूं नये' अशी व्यवस्था राहील. पण केवळ मारपीट किंवा धमकावण्यानेंच हिंसा बळावते असें नाहीं. लालूच दाखविणें ही गोष्ट हि हिंसेंत च येते. म्हणून आईबाप मुलांना मारणार नाहींत एवढेंच नव्हे तर लोभ हि दाखविणार नाहींत. शिक्षक हि शाळेंत अशाच प्रकारचा व्यवहार करील. सध्यां शाळांत ज्या बक्षीसादि गोष्टी चालतात त्या बंद होतील. उलट त्याच्या उलट गोष्टी चालतील. आज भौतिक बक्षीसाचा लोभ ठेवलेला असतो. पण आमच्या शिक्षण-शास्त्रांत नीति-शास्त्रांत व व्यवहारांत शारिरिक किंवा भौतिक दंड, आणि शारिरिक किंवा भौतिक लोभ ह्या दोन्ही गोष्टी राहणार नाहींत. तुम्ही कोणाच्या शिक्षेला भिऊं नका व लोभाला वश होऊं नका असें प्रत्येक मुलाला समजावून सांगावें लागेल. आई-बाप व शिक्षक जर मुलांना अशा प्रकारचें शिक्षण देतील तर हीं मुलें पुढें अहिंसक समाज-रचनेचे स्तंभ बनतील.

**कुजेंन्द्री**, २४-९-५५

## सरकारचा अंत करा : २६ :

सध्यांच्या सरकारांपासून जोंपर्यंत सुटका होत नाहीं तोंपर्यंत दुनियेंत शांतता नांदणार नाहीं असें मी म्हणतों. कम्युनिस्ट म्हणतात कीं सरकारचा अखेर क्षय झाला पाहिजे. पण आज मात्र त्यांच्या मतें तें पुष्ट ( मजबूत ) झालें पाहिजे. म्हणजे क्षय उधार, पुढें होणारा व पुष्टि रोकड, आज होणारी. पण सध्यांच्या स्थितींत सरकार मजबूत करावयाचें म्हणजे त्याची गुलामी स्वीकारावयाची ह्याशिवाय दुसरें कांहीं नाहीं, म्हणून आजपासूनच सरकारचा क्षय झाला पाहिजे असें सर्वोदय-विचार म्हणतो.

सारांश, व्यक्तिपुरतें म्हणावयाचें, तर प्रत्येकाला आपल्या मनावर व इंद्रियांवर नियंत्रण ठेवण्याचें ज्ञान पाहिजे. समाजांत परस्परांच्या हितांत विरोध असत नाहीं ह्या तत्त्वावर समाज-रचना झाली पाहिजे. सरकारची मुळींच गरज नाहीं अशी जाणीव ठेवून आजपासून त्याच्या क्षयाला आरंभ करून दिला पाहिजे.

**विजयवाडा**, १६-१८ डिसेंबर ५५

## आमचा झगडा सर्वच सरकारांशीं

एका गृहस्थानें एक मजेदार प्रश्न विचारला आहे. तो म्हणतो कीं ग्रामराज्य व विकेन्द्रीकरण ह्यांच्या तुमच्या गोष्टी चालल्या आहेत. ह्या बाबतींत तुमचें सरकारशीं भांडण होऊं शकतें कीं नाहीं ? ह्याचें उत्तर मी असें देतों कीं, भांडण होऊं शकतें हि व होऊं शकत नाहीं हि. झगडा न झाला तरी तो प्रेमामुळेंच होणार नाहीं व झाला तरी तो सुद्धां प्रेमाचाच होईल. सरकारच्या योजना जर चुकीच्या असतील व आमचें त्यांचें जुळलें नाहीं तर गांवोगांवीं जाऊन सरकारचें चुकत आहे असें सांगण्याचा प्रसंग येणार व झगडा अवश्य होणार. पण हा झगडा प्रेमाचा असेल. आम्ही सरकारचें मतपरिवर्तन करूं इच्छितों.

भूदानाच्या कामांत सुरवातीला पुष्कळ प्रकारच्या शंका निघाल्या. भूदानानें नैतिक भावना निर्माण होते ही गोष्ट ठीक आहे. पण त्यांत मिळणाऱ्या छोटचा छोटचा दानांमुळें पुष्कळ प्रश्न निर्माण होतात, असें सरकारला व लोकांना हि वाटे. पण भूदानाचा विकास ग्रामदानांत झाल्या-पासून, दिल्लीवर सुद्धां त्याचा इष्ट परिणाम झालेला आहे. भूदानाचा ग्रामदानाच्या दिशेकडे जर चांगला जोर वाढला तर आम्ही सरकारचें मतपरिवर्तन लवकर करण्यास समर्थ होऊं व सरकारशीं भांडण टळेल. परंतु तसें न घडलें व भांडणाचा प्रसंग आलाच तरी मला भीति वाटत नाहीं. कारण आमचा मार्ग प्रेमाचा आहे. त्यामुळें आमच्या समोर असा प्रश्न उपस्थित होत नाहीं.

पण सरकारचा आमच्याशीं झगडा नसला तरी आमचा त्याच्याशीं झगडा आहे च. कारण आम्हांला सध्यांसारखें केन्द्रित सरकार नको आहे. पण जनतेंत अशा प्रकारची शक्ति निर्माण करण्यावर हें सर्व अवलंबून आहे. आम्ही जर ही शक्ति निर्माण करूं शकूं तर सरकारला त्या दिशेनें जाणें भागच आहे. कारण हें सरकार अखेर लोकमतानें चालणारें सरकार आहे. पण तत्त्वतः पाहिलें तर आमचें ज्याअर्थीं सर्वच सरकारांशीं भांडण आहे, त्याअर्थीं आमच्या सरकारशीं हि तें आहे च.

**कंचिक चर्ला,** ता. २६-१२-५५

## राष्ट्राला धारण करणारे = धृतराष्ट्र

हे जे धृतराष्ट्र म्हणजे राष्ट्राला धारण करणारे असतात ते आंधळे असतात. त्यांचें एक ठराविक वर्तुळ असतें, आणि त्यांतच त्यांचे विचार घुटमळतात. ते म्हणतात कीं 'जमीन वांटली गेली तर सर्वांनाच अपुरी जमीन राहील व हिंदुस्थानांत अशांतता निर्माण होईल.' कांहीं लोक म्हणतात 'बाबा फार भयानक काम करीत आहे. लोक जागृत होतील व त्यांना जमीन न मिळाली तर असंतोष निर्माण होईल, आज राज्यापासून लोकांना जो संतोष आहे, तो राहणार नाहीं.' हा आक्षेप मला मान्य आहे. मी अवश्य असंतोष निर्माण करण्याचें काम करीत आहें. व्यास भगवानानें म्हटलें

आहे– 'असंतोष: श्रिया मूलम्।' दशरथाकडून असंतोष निर्माणाचें काम होऊं शकत नाहीं, त्यासाठीं राम-लक्ष्मण लागतात. म्हणून मुलांवर रामाचें काम करण्याची जबाबदारी आलेली आहे. सर्वांना जमीन मिळाली पाहिजे असें सर्व मुलें एकमुखानें सांगत आहेत हा माझा अनुभव आहे.

**सरूनगर**, ४-२-५६

## शासनमुक्तीचा विचार : २७ :

आज आमच्यासमोर तीन प्रकारचे विचार आहेत.

(१) अंतिम स्थितींत सरकार क्षीण होऊन शासनमुक्त व्यवस्था च होईल, परंतु तसें होण्याला आज हातांत अधिकतम सत्ता असली पाहिजे. या विचाराचे लोक आरंभीं अधिराज्यवादी आणि अंतीं राज्यविलयवादी म्हटले जातात.

(२) राज्य-शासन पूर्वीं होतें, आज आहे आणि पुढें हि राहील. शासन-मुक्त समाज असूं च शकत नाहीं. म्हणून सर्वांचें भलें होईल अशी च व्यवस्था समाजांत असायला हवी. राज्य-सत्ता थोडीफार सगळीकडे वांटलेली असावी परंतु महत्त्वाची व्यवस्था केन्द्राच्या ताब्यांत च असावी. अशा विचाराच्या लोकांना वाटतें कीं राज्य-सत्ता नेहमीं असली पाहिजे; आणि सर्वांचें नियमन करण्याची शक्ति समाजानें नियुक्त केलेल्या सरकारच्या हातांत असली पाहिजे.

(३) तिसरा विचार आमचा आहे. आम्ही हि मानतों कीं अंतिम स्थितींत समाज शासन-मुक्त होईल. सुरवातीला कांहीं मर्यादेपर्यंत राज्य-व्यवस्थेची च गरज आम्ही मानतों परंतु अंतिम स्थितींत राज्यव्यवस्थेची गरज मानीत नाहीं अशा प्रकारें व्यवस्थाशून्य समाजाकडे जाण्यासाठीं त्याला अधिराज्याची हि गरज वाटत नाहीं. उलट व्यवस्था आणि सत्ता यांच्या विकेन्द्रीकरणाच्या साह्यानें त्या दिशेकडे आम्ही पाऊल टाकूं इच्छितों. अंतिम स्थितींत कसलें च शासन असणार नाहीं, केवळ नैतिक नियमन राहील. असा आत्मनिर्भर समाज निर्माण करण्यासाठीं सगळीकडे स्वयंपूर्णता असली पाहिजे. उत्पादन

विभाजन, रक्षण, शिक्षण जेथलें तेथें च पाहिजे. केन्द्रस्थानीं कमींत कमी सत्ता असावी. अशा रीतीनें आम्ही प्रादेशिक स्वयंपूर्णतेंतून विकेन्द्रीकरण साधूं शकूं.

## सरकारी दृष्टीमधील मौलिक भेद

सरकारचें प्लॅनिंग कमिशन आणि आमची दृष्टि ह्यांत हा च मूलभूत फरक आहे. कमिशनच्या एका सभासदाला मीं विचारलें कीं तुमच्या प्लॅनिंग-कमिशनपुढें आम्ही म्हणतों तो आदर्श आहे का ? तेव्हां ते म्हणाले " आमच्या मनांत प्रत्येक गांवानें आपल्या मुख्य मुख्य गरजेच्या बाबतींत थोडेंफार स्वावलंबी बनावें, कांहीं गांवांनीं मिळून आपली व्यवस्था हि करावी; असें असलें तरी शेंवटीं शासन-शून्य स्थितीची आमची कल्पना नाहीं. " मी म्हणालों, आमच्या अहिंसक योजनेप्रमाणें असें आहे कीं अर्थविषयक केन्द्रित व्यवस्था हळू हळू कमी होत शेंवटीं मुळीं च राहूं नये. कम्युनिस्टांना देखील शेंवटीं शासन-मुक्त समाज च हवा असला तरी आज मात्र त्यांना आपलें अधिराज्य हवें आहे. त्यांचें म्हणणें आज जास्तींत जास्त सत्ता हातांत असावी, शेंवटीं ती शून्य होऊन जाईल. दुसरे जे लोक आहेत त्यांचें म्हणणें असें कीं शासन-व्यवस्था आज आहे आणि पुढें हि राहणारच आहे. पैकीं पुष्कळशी केन्द्रांत राहील आणि कांहीं थोडी वांटली हि जाईल. आमचें म्हणणें पुष्कळशी किंवा सर्व च शासनव्यवस्था केन्द्रित राहिली तर पुढें जाऊन तिचें विलीनीकरण कठिण होतें, म्हणून आजपासून च त्या सत्तेला विकेन्द्रीकरणाकडे घेऊन जायला हवें. आमच्या सगळ्या नियोजनांचा हा च पाया आहे. प्रत्येक गांवानें आपल्या गरजेच्या साऱ्या वस्तु आज च बनवाव्यात असा माझा आग्रह नाहीं. अनेक गांवांचे समूह बनवून स्वयंपूर्णता आणतां येईल. सारांश, प्रादेशिक स्वावलंबनामधून सामाजिक व्यवस्था-शून्यतेकडे आमचीं पावलें पडण्याच्या दृष्टीनें च आमचें सारें नियोजन राहील.

## जास्तींत जास्त स्वावलंबन

प्रत्येकानें जास्तींत जास्त स्वावलंबी बनावें हें आमचें ध्येय असावें. ईश्वराची हि तशी च योजना आहे. म्हणून त्यानें प्रत्येकाला केवळ मन, बुद्धि

आदि आंतरिक साधनें च दिलीं नाहींत तर डोळे, कान, नाक यांसारखीं बाह्य साधनें हि दिलीं आहेत. त्यानें कुणाला दशकर्ण, कुणाला दशाक्ष, कुणाला दशहस्त तर कुणाला दशपाद नाहीं बनविलें. त्याची अशी योजना नाहीं कीं दशकर्णाला पाहण्याची गरज पडली तर त्यानें दशनेत्राकडे जावें आणि दशनेत्राला ऐकण्याची गरज पडली तर त्यानें दशकर्णाकडे जावें ! ईश्वरानें एवढें विकेन्द्रीकरण केलें आहे कीं त्यांत आतां नियमनाची गरज च राहिली नाहीं. त्यामुळें ईश्वर आहे किंवा नाहीं इथून च लोक शंका घेतात. तो जर अशी व्यवस्था न करता तर आजच्या मंत्र्यांप्रमाणें त्याला इकडून तिकडे धावपळ करावी लागली असती. असली धावपळीची व्यवस्था आम्हांला कधीं हि शासन-मुक्त समाजाकडे नेऊं शकणार नाहीं.

## संकुलसत्तावाद आणि लोकशाही

"आम्हांला लोकतंत्राच्या साह्यानें काम करावें लागतें म्हणून काम लवकर होत नाहीं. आम्ही जर संकुलसत्तावादी असतों तर काम शीघ्र झालें असतें," असें अनेक वेळां आम्ही ऐकतों. परंतु हा विचार तुम्ही तुमच्या डोक्यांतून काढून टाका. 'इंजेक्शननें तावडतोब आरोग्य लाभतें म्हणून इतर औषधांपेक्षां तें शीघ्र फलदायी आहे' असें अदूरदृष्टिवाले लोक म्हणतात. परंतु जर विषाचें इंजेक्शन दिलें तर चार तासांत रोगाबरोबर रोगी हि खतम व्हायचा. पण लोक म्हणतील कीं 'हें विषाचें इंजेक्शन नाहीं. रोग ताबडतोब नाहींसा होतो आणि रोगी हि मरत नाहीं; मग आम्हीं संकुलसत्तावाद च कां स्वीकारूं नये?' ऐकायला हें म्हणणें बरोबर वाटतें; परंतु वस्तुत: ती वस्तु शीघ्र परिणामदायी नसून शीघ्र कुपरिणामदायी च आहे. त्या मार्गानें केवळ शीघ्र मदत च नाहीं मिळत तर शीघ्र अनेक रोग हि निर्माण होतात. या उलट निसर्गोपचारानें थोडा वेळ लागेल पण नेहमींसाठीं रोगमुक्ति होते. इतर औषधांनीं लवकर लाभ होत असल्याचा आभास होतो, परंतु त्यानें शरीर पडल्यानंतर च डॉक्टरच्या पंजांतून सुटका होते.

## 'मुख में राम, बगल में छूरी!'

ही पद्धत आमच्या उपयोगाची नाहीं. लोकतंत्राचा आम्ही ठीक ठीक अर्थ समजूं तर त्यांत हि शीघ्र फळ देण्याचें सामर्थ्य आहे. लोकतंत्राचा ठीक

अर्थ आम्हीं ध्यानीं घेतला तर आमचें नियोजन आजपासून च असें बनूं लागेल कीं ज्यांत जनता स्वतःच्या रक्षणाचा भार स्वतः उचलील आणि लष्कराची कमींत कमी गरज राहील. म्हणजे जनतेंत इतकी निर्भयता आणि निर्वैरता असेल कीं त्यांना लष्कराची गरज च भासणार नाहीं. असें आयोजन आम्हीं केलें तर च तें खरें लोकतंत्र म्हटलें जाईल आणि शीघ्र फलदायी हि तें होईल. आज आपण एकीकडे लोकतंत्राच्या गोष्टी बोलतों आणि उलट दुसरीकडे भांडवलशाही अर्थ-व्यवस्था आणि लष्कर राखतों. ज्या वस्तूचें आम्ही नांव घेतों तिच्या च उलट काम करतों. म्हणून च त्याचें अल्प फळ मिळतें. परंतु एक दिवस असा उजाडेल कीं जेव्हां लोकतंत्रांतून मुळीं च फळ मिळणार नाहीं. आज थोडेंसें फळ दिसतें हें च आश्चर्य आहे. 'मुख में राम और बगल में छरी' या म्हणीप्रमाणें आमची विसंगत नीति आहे. तोंडांत लोकतंत्राचा जप आहे आणि बगलेंत केन्द्रीकरण व लष्कर आहे. जो सूत कांततो आणि तें कांतलेलें सूत तोडत जातो अशा मूर्खाला तुम्ही काय म्हणाल ? लोकतंत्राबरोबर आम्ही त्याच्या नाशाचीं तत्त्वें हि घेत राहूं तर त्यांतून निष्पन्न काय होईल ?

## लोकतंत्राचा खरा अर्थ लक्षांत घ्या

आम्ही विचारक आहोंत आणि त्या नात्यानें च आम्ही आमचें काम करीत राहतों. समन्वययुक्त अहिंसा ही आमची नीति आहे. दुसऱ्याचा विचार आमच्या विचाराशीं थोडा हि जुळता असेल तर त्याच्याशीं सहानुभूति राखून सहकार करायला आम्ही तयार असतों. 'पिण्डे पिण्डे मतिर्भिन्ना' – प्रत्येकाच्या विचारांत थोडाफार भेद असायचा च. परंतु सामग्र्यानें आमची मूलभूत विचारसरणी एक च असली पाहिजे. संकुल-सत्ता आपल्या हातीं नाहीं म्हणून आमचें काम लवकर होत नाहीं, अशी शंका आपल्या मनांत मुळीं च नसावी. लोकतंत्राचा आम्ही खरा अर्थ समजूं आणि त्याप्रमाणें त्याचा अंमल करूं तर आमचें कार्य अतिशीघ्र होईल यांत शंका नाहीं.

**सेवापुरी** (बनारस), १५-४-'५२

## स्वातंत्र्याच्या लढ्याची विशेषता

आपल्या देशाला बऱ्या च प्रयत्नानंतर स्वातंत्र्य मिळालें आहे. स्वातंत्र्याचे संग्राम दुसऱ्या देशांत हि झाले. त्यांत फार त्याग करावा लागतो, हें हि सर्व जाणतात. म्हणून या बाबतींत आमच्या देशाचें कांहीं वैशिष्टय नाहीं. तरी हि आपल्या देशाचा स्वातंत्र्यसंग्राम एका विशेष पद्धतीनें झाला, ही गोष्ट जगाच्या इतिहासांत गौरवानें लिहिली जाईल. स्वातंत्र्यसंपादनासाठीं शांतिमय साधनांचा आग्रह ठेवण्यांत आला असा हा च देश आहे. आम्हीं परिपूर्ण शांति पाळली असा दावा आम्ही करूं शकत नाहीं. तरी हि शांतीच्या मार्गानें च संग्राम व्हावा, असा आमच्या नेत्यांचा आग्रह राहिला आणि सर्व देशानें मोडकातोडका कां असेना पण शांतीचा प्रयत्न केला. त्याचा परिणाम म्हणून आपल्या देशाला स्वतंत्र्य मिळालें. तें स्वातंत्र्य आमच्या च प्रयत्नांनीं आम्हांला मिळालें, असा मी दावा करीत नाहीं. तसा अहंकार ठेवायला वाव हि नाहीं आणि मी त्याला लाभदायी हि समजत नाहीं. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यप्राप्तींत जगाच्या शक्तीची जोड आहे, हें मी जाणतों. इंग्रजांना हा देश अधिक काळ हातांत ठेवणें कठीण होतें अशी जगांत एक परिस्थिति होती. परंतु त्या बरोबर च येथें हि कांहीं प्रयत्न करण्यांत आला आणि त्याचा फार च सुंदर परिणाम या देशाच्या इतिहासावर झाला, ही गोष्ट मानावी च लागेल. ज्या देशाबरोबर आमचा लढा होता त्याच्याबरोबर आमचा स्नेहसंबंध टिकला, हें हि येथें पहावयाला मिळालें. यांत जितका भारताचा गौरव आहे तितका च इंग्लंडचा हि आहे हें आम्ही जाणतों. तेव्हां अशा एका विशेष प्रकारानें येथील स्वातंत्र्य-संग्राम लढविला गेला असल्यानें आपल्या या देशाकडून बाहेरची जनता कांहीं अपेक्षा करते आणि या देशाचा आवाज हि आज जगांत श्रेष्ठ झाला आहे. आमच्याजवळ विशेष सेनाशक्ति नाहीं, संपत्ति हि जास्त नाहीं. तरी हि या देशाचा जगावर जो काय परिणाम होतो, त्याचें कारण आमची स्वातंत्र्यसंग्रामाचीं साधनें आहेत. म्हणून आमच्यावर एक जबाबदारी येते. त्या जबाबदारीच्या गंभीरतेचें आम्हांला भान असलें पाहिजे.

## आत्मज्ञान आणि विज्ञान

आमचा देश एक बालक नसून दहा हजार वर्षांचा अनुभवी जुना देश आहे, हें आपण विसरतां कामा नये. मी जेव्हां आत्म्याचें वर्णन वाचतों तेव्हां मला त्यांत या देशाचें वर्णन दिसतें. "**नित्यः शाश्वतः अयं पुराणः**" नित्य, शाश्वत, पुराण, हें आत्म्याचें वर्णन आहे आणि हें च भारताला लागू होतें. भारताच्या इतिहासांत हि अशी कांहीं विशेषता आहे कीं ज्यामुळें जगाची दृष्टि या देशाकडे लागली आहे. दोन हजार वर्षांपासून जी संधि भारताला मिळाली नाहीं ती आज मिळाली आहे, हें निःसंशय आहे. आत्मज्ञानाची परंपरा या देशांत प्राचीन काळापासून होती.

आतां विज्ञानाची शक्ति हि जगांत प्रकट झाली आहे. भारताची प्राचीन आत्मज्ञानशक्ति आणि विश्वाची अर्वाचीन विज्ञानशक्ति यांचा मिलाफ होत आहे. असा मिलाफ जेथें होतो तेथें सर्व प्रकारचें कल्याण वसतें. परंतु तें कल्याण त्या ज्ञानविज्ञानाचा आमच्या जीवनांत जेव्हां प्रवेश होतो, तेव्हां च होतें.

## भारताचें व्यापक चिंतन

'मानवता एक आहे' असा घोष हिंदुस्थाननें केला आहे. मानवतेचा स्वीकार करा, असें आम्ही वेदांत वाचतों. "**प्रतिगृहीत मानवः सुमेधसः**" हे मेधावी जन हो, मानवता ग्रहण करा. या प्रकारें मानवतेचें महात्म्य या देशानें गायिलें आहे. मानवतेपेक्षां लहान अशी कोणती हि वस्तु या देशाच्या संस्कृतीला मंजूर नाहीं. मानवतेहून हि अधिक व्यापक आपण व्हावें, यासाठीं येथील ज्ञान्यांनीं प्रयत्न केला आहे. म्हणून आम्हीं येथील समाजांत गायींना हि स्थान दिलें आहे. हिंदुस्थानांत आपला स्वतःचा समाजवाद चालत आहे, असें मी अनेक वेळां समजावतों. आजकाल पश्चिमेकडे समाजवाद निर्माण झाला आहे. त्याला 'सोशॅलिझम' म्हणतात. ते म्हणतात कीं सर्व च माणसांना समान अधिकार आहे. परंतु मानवसमाजांत आम्ही गोवंश हि सामील करतां आणि जें संरक्षण आम्ही मानवांना देतों तें च गायींना हि देऊं, असें हिंदुस्थानचा समाजवाद सांगत आहे. ही लहान प्रतिज्ञा नाहीं, फार विशाल समाजवाद आहे. यासाठीं आम्ही लायक झालों आहों, असें

नव्हे. त्या मानानें तर आम्ही फार च नालायक आहों. जेथें आम्हांला गायी व बैल यांना संरक्षण द्यावयाचें आहे आणि मानवासमान त्यांना हि समजावयाचें आहे, तेथें आम्हांला आणखी हि व्यापक झालें पाहिजे. गायींचें रक्षणशास्त्र हि आम्हांला शिकावें लागेल.

आज युरोपांत गायींची स्थिति आमच्या देशापेक्षां कितीतरी अधिक उत्तम आहे हें खरें आहे. परंतु तरी हि आमच्या समाजशास्त्रांत जी खुबी, जें वैशिष्टय आहे तें पश्चिमेच्या समाजशास्त्रांत नाहीं, ही गोष्ट कबूल करावी च लागेल. तेथें जो सर्वांत श्रेष्ठ शब्द आहे, तो 'ह्युमॅनिटी' म्हणजे मानवता आहे. परंतु आमच्या येथें जो सर्वांत श्रेष्ठ शब्द आहे, तो 'भूतदया' आहे. जेथें आम्ही '**सर्वभूतहिते रताः**' म्हणतों तेथें च ते 'ग्रेटेस्ट गुड ऑफ दि ग्रेटेस्ट नंबर' म्हणजे मानवसमाजाच्या अधिकांतील अधिक भागाचें भलें, असें म्हणतात. ते 'सर्वमानवोदय' हि इच्छीत नाहींत. जेथें आम्ही मानवतेहून हि व्यापक वस्तु मानतों तेथें ते 'अधिकतम मानवोदय' झाला पाहिजे, असें म्हणतात. सारांश, आज आमचें आचरण खालीं आलें आहे, हें खरें आहे. पश्चिमेच्या तुलनेनें आम्ही कमी ठरूं, हें हि शक्य आहे; परंतु चिंतनाच्या दृष्टीनें विचार केला तर येथील चिंतन फार व्यापक झालें आहे. मानवतेपेक्षां कमी विचार आम्ही कधीं हि करीत नाहीं.

## आजची दयनीय दशा

पण आज या देशांत एक विचित्र दशा पाहण्यांत येते. येथील लोक आपल्याला विशिष्ट प्रांताचे समजतात. कुणी आपल्याला आंध्रचा समजतो, कुणी कर्नाटकचा तर कोणी बंगालचा. ज्या देशांतील लोक आपल्याला 'सोऽहम्' म्हणत असत; अर्थात् ते जें व्यापक तत्त्व तें मी आहें, असें समजत असत, त्या देशांतील लोक आपल्याला एका जातीपुरते मर्यादित मानीत आहेत. जे स्वतःला मानवतेपेक्षां हि अधिक व्यापक समजत असत, ते आज भारतीय या स्थितीपेक्षां हि स्वतःला कमी मानूं लागले आहेत. एस्. आर्. सी.– राज्यपुनर्रचनासमितीनें कांहीं गोष्टी जाहीर केल्या तर एक प्रांत खुष झाला आणि दुसरा नाखूष झाला, ही गंमत पहायला मिळत आहे. एका गोष्टींत एकाला आनंद आहे, तर त्यांत च दुसऱ्याला दुःख. जर

अशी योजना असेल तर ती सर्वोदययोजना नाहीं. ती मानवता नाहीं. ती पशुता आहे.

जेथें भाषेला अनुसरून प्रांतरचना होते तेथें जनतेची सोय होते, ही गोष्ट मी मान्य करतों. जोंवर शेतकऱ्याच्या भाषेंत राज्यकारभार चालत नाहीं तोंवर स्वराज्याची प्रचीति येऊं शकत नाहीं. म्हणून भाषेनुसार प्रांत-रचना होणें मी फार महत्त्वाचें मानतों. परंतु यांत जो अधिक अभिनिवेश घुसला आहे, त्याचें कारण आमच्या देशाकडून पश्चिमेचें अनुकरण होत आहे, हें आहे. आणि हि स्थिति अत्यंत भयावह आहे.

## सत्तेचें विभाजन व्हावें

स्वराज्यानंतर या देशांत 'वेलफेअर स्टेट' सुरू करण्यांत आलें. जास्तींत जास्त सत्ता थोडया लोकांच्या हातीं राहील आणि ते लोक सर्व लोकांचें जीवन नियंत्रित करतील, असा या 'वेलफेअर स्टेट' चा अर्थ आहे. सर्व देशांतील पांच लाख खेडयांची योजना दिल्लींत तयार होणार. जीवनाचीं जितकीं अंग-प्रत्यंगें आहेत, त्या सर्व च विषयांबाबत दिल्लींत सर्व गोष्टी ठरतील. समाजांत काय सुधारणा व्हाव्यात, लग्नें कोणत्या पद्धतीनें व्हावींत, भारतांत स्पृश्यास्पृश्यभेद कसा निवारण व्हावा, देशांत कोणतें वैद्यक लागू करावें, हिंदुस्थानांत कोणत्या भाषेचा शिक्का चालावा, सिनेमा आदि कोणत्या प्रकारें चालावेत इत्यादि सर्व विषयांची योजना दिल्लीला ठरणार. पण इतकी अधिक सत्ता जर आम्हीं केंद्राकडे सोंपविली तर सर्व जनसमुदाय पराधीन होतो, अनाथ बनतो. म्हणून दिल्लीची सत्ता च कमी व्हायला हवी.

सत्तेची सार्वत्रिक विभागणी होणें हें सर्वोत्तम सत्तेचें लक्षण आहे. कोणी सत्ता चालवीत आहे किंवा नाहीं याची शंका यावी, अशी स्थिति ज्या सत्तेंत आहे, ती च सत्ता सर्वोत्तम असते. दिल्लींत कोणी राज्य चालवीत आहे किंवा नाहीं याची आम्हांला हि शंका यावी. केंद्रिय सत्ता परमेश्वरी सत्तेचें अनुकरण करणारी असली पाहिजे. त्याऐवजीं सर्व च सत्ता आम्ही केंद्राच्या हातीं सोंपवितों. म्हणून सर्वांना च वाटतें कीं केंद्रावर आमचा प्रभाव पडावा.

## आजच्या निवडणूकपद्धतीचे दोष

आम्हीं पाश्चिमात्यांकडून निवडणुकीची जी पद्धति घेतली आहे, तिचा हि विचार करणें आवश्यक आहे. आज देशांत जातिभेद जितका तीव्रपणें पसरलेला आहे तितका पूर्वी कधीं हि नव्हता, हें आम्ही पाहत आहों. भूमिहार ब्राह्मण आणि राजपूत हा भेद बिहारांत, कम्मा आणि रेड्डी हा भेद आंध्रांत आणि ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद मद्रासेंत आम्हांला पहायला सांपडतात. या प्रकारें प्रत्येक प्रांतांत अनेक प्रकारचे भेद वाढलेले आहेत. ज्या जातिभेदावर राजा राममोहन रायपासून महात्मा गांधींपर्यंत सर्वांनीं प्रहार केले आणि जो जातिभेद मोडकळीला हि आला होता, तो आज इतका कां वाढत आहे, ही बाब विचारणीय आहे. या निवडणुकींनीं जातिभेदाला प्रोत्साहन दिलें आहे, हें याचें कारण आहे. निवडणुकांचा जर इतका भयानक परिणाम होत असेल तर त्यांच्या पद्धतींत बदल करणें अत्यंत आवश्यक आहे.

जातिभेदाची वाढ हा निवडणुकीचा पहिला परिणाम आहे. ज्याच्याजवळ पैसा जास्त तो च या निवडणुकींत भाग घेऊं शकतो. ज्याच्याजवळ जास्त संपत्ति आहे तो च निवडणुकीला उभा राहूं शकतो, असा आज चालू असलेल्या निवडणुकींचा दुसरा दुष्परिणाम आहे. अशा स्थितींत गरीब आणि मूक अशा जनतेच्या शब्दांचा काय परिणाम होणार ?

यांत आणखी हि एक दोष आहे. निवडणुका होतात तेव्हां निवडणुकीसाठीं जे लोक उभे राहतात, त्यांचीं तोंडें हि जनतेनें त्यापूर्वी पाहिलेलीं नसतात. लाखों मतदारांकडून ज्यांची निवडणूक व्हावयाची आहे, अशा उमेदवारांचे गुण जाणण्याचा प्रश्न तर सोडा च पण तत्पूर्वी चेहरा हि दृष्टीस पडलेला नसतो. या प्रकारच्या निवडणुकांनीं खर्च वाढूं लागला आहे, जातिभेद वाढूं लागला आहे आणि चांगलीं च माणसें निवडून येतील याचा हि भरवंसा राहिलेला नाहीं.

## आरोग्याचें कार्य जनतेनें उचलावें

आमचा समाज अहिंसेवर अधिष्ठित असावा असें आम्हांला वाटत असेल तर आमची विचार करण्याची पद्धत च बदलली पाहिजे, ही हि

एक गोष्ट येथें लक्षांत घेणें जरूर आहे. त्यासाठीं आम्हांला समाजाची रचना आमच्या विचारांना अनुसरून केली पाहिजे. आम्हांला पाश्चिमात्यांचें अनुकरण करून चालावयाचें नाहीं. आज जगांतील सर्व च देशांतील लोकांना शांतीची तहान लागली आहे. अॅटम आणि हैड्रोजनच्या शक्तींनीं सर्व च भयभीत आहेत. यांनीं जगाचा निश्चित नाश च होईल आणखी कांहीं हि साधणार नाहीं हें सर्व लोकांना कळलें आहे. परंतु जर आम्हांला शांति हवी असेल तर तिला अनुकूल अशी रचना आम्हांला करावी लागेल. सरकारचें एक एक कार्य जनतेनें आपल्या हातीं घ्यावें, अशी व्यवथा करावी लागेल. सरकारचें कार्य कमी होत होत शेंवटीं सरकार च क्षीण होईल, अशी योजना करायला हवी.

हें च एक उदाहरण घ्या. येथें 'प्रेम-समाजाची' माणसें रोग्यांची व दु:खितांची सेवा करतात. या प्रकारें हिंदुस्थानांतील सर्व रोग्यांची सेवा करण्याचा भार जनतेनें घेतला तर सरकारचें आरोग्य-खातें संपुष्टांत येईल. आणि असें घडलें तर फार मोठी गोष्ट झाली असें होईल. मग जनतेचा ज्या चिकित्सा-पद्धतीवर-विश्वास असेल ती पद्धत च चालेल. बी. सी. जी. चा जो वाद चालला आहे तो मग चालायचा नाहीं. सरकारची इच्छा झाली तर सर्व मुलांना बी. सी. जी. चीं इंजेक्शनें सरकार देववील, अशी आज स्थिति आहे. याबाबत राजाजींनीं आपलीं मतें अनेक वेळां प्रकट केलीं आहेत. या देशानें सर्व सत्ता केंद्राच्या हातीं सोंपविली आहे, म्हणून हें सर्व होत आहे. परंतु आमच्या मुलांना कोणतें औषध द्यावें, हें आम्ही च ठरवूं लागलों तर सरकारचें हें एक काम कमी होऊन त्याची सत्ता क्षीण होईल आणि देशाला आणखी एक स्वातंत्र्य मिळेल. पण आज आमच्या आरोग्यासाठीं वैद्यकाची कोणती पद्धति चालावी याचा विचार सरकार करतें. आणि नंतर "हा तर मोठा जुलूम आहे!" म्हणून आम्ही ओरडतों.

### शिक्षण सरकारच्या हातीं नसावें

दुसरें उदाहरण घेऊं या. आज शिक्षणावर राजसत्तेचें नियंत्रण आहे. सरकार जें टेक्स्ट बुक नेमतें, तें च त्या त्या प्रांतांतील मुलांना वाचावें

लागतें. विद्यार्थींच्या मेंदूंत आपले विचार कोंबण्याची सत्ता सरकारच्या हातीं यावी, असा याचा अर्थ होतो. सरकार जर कम्युनिस्ट असेल तर तें विद्यार्थ्यांना कम्युनिझम शिकवील, फॅसिस्ट असेल तर फॅसिझम शिकवील. सरकार सोशॅलिस्ट असेल तर विद्यार्थ्यांना सोशॅलिझम शिकावा लागेल आणि भांडवलशाही सरकार असेल तर तें भांडवलशाहीचा गौरव सर्व मुलांना शिकवील. सरकार प्लॅनिंगवालें असेल तर विद्यार्थ्यांच्या डोक्यांत प्लॅनिंगचा महिमा कोंबण्यांत येईल. मुलांच्या बुद्धीला स्वातंत्र्य राहणार नाहीं, हें याचें तात्पर्य आहे. म्हणून शिक्षणावर राज्याची सत्ता असतां च कामा नये, असें आपल्या देशांत पूर्वीं मानण्यांत आलें होतें. सांदीपनीवर वसुदेवाची सत्ता चालूं शकत नव्हती. वसुदेवाचा मुलगा श्रीकृष्ण सेवक होऊन सांदीपनीकडे गेला होता. सांदीपनी कृष्णाला सुदाम्याबरोबर लांकडें तोडायला, सरपण आणायला पाठवीत असे. तेथें टेक्स्ट बुक कोणतें असावें हें वसुदेव पाहत नव्हता. क्षत्रियसत्ता किंवा राजसत्ता शिक्षणावर मुळीं च चालूं शकत नसे. संस्कृत भाषेंत आज जितकें विचारस्वातंत्र्य आहे, तितकें अन्य कोणत्या हि भाषेंत नाहीं, हा त्याचा परिणाम आहे. हिंदुधर्मामध्य सहा सहा दर्शनें निघालीं. तीं परस्परांचा विरोध करीत, इतकें विचारस्वातंत्र्य येथें चालतें. राज्यसत्तेचें कसलें हि वर्चस्व शिक्षणावर नव्हतें, हें च याचें कारण आहे.

सारांश, आज हि हिंदुस्थानांत लोकांच्या मार्फत शिक्षणाची योजना चालली आणि सरकारचें शिक्षणखातें संपलें तर देशाला आणखी एक स्वातंत्र्य मिळेल. या प्रकारें सरकारचें एक एक कार्य जनतेच्या हातीं येईल आणि सरकारची सत्ता क्षीण होत जाईल, तर जगांत अहिंसा आणि शांति टिकूं शकेल. नाहीं तर केंद्रीय सत्तेच्या हातांत जनता राहिली तर जग संकटांत आहे, असें निश्चित समजावें.

## लोकशाहीचें ढोंग

तुम्ही निवडून आलांत म्हणून तुमच्या हातीं खरोखर च सत्ता आली असें तुम्ही समजतां काय? कलकत्त्यांत गाईच्या रक्ताच्या नद्या वाहतात, तर काय तेथील लोक त्या गोष्टीला अनुकूल आहेत, असें तुम्हांला वाटतें? उत्तर प्रदेशांत गोहत्येची बंदी झाली आहे. उत्तर

प्रदेशाचें लोकमत बंगालच्या लोकमतापेक्षां निराळें आहे काय? लोकमताचा प्रश्न च नाहीं, ही खरी गोष्ट आहे. बंगालचा मुख्य मंत्री ज्या प्रकारें विचार करतो, त्या प्रकारें च तेथलें काम चालतें. उत्तरप्रदेश आणि बिहारमध्यें दारूच्या नद्या वाहतात. काशींत जितकी विशाल गंगा नदी वाहते तितकी च विशाल दारूची नदी हि वाहत आहे. तिकडे मद्रास आणि मुंबई राज्यांत दारूबंदी आहे. तर काय मुंबई आणि मद्रासचें लोकमत दारूच्या विरुद्ध आणि बिहार व उत्तरप्रदेशांत तें अनुकूल नाहीं असें समजायचें? मुख्य मंत्री चांगला आला तर राज्य चांगलें आणि वाईट आला तर राज्य वाईट, हें स्पष्ट आहे. मोंगलांच्या राज्यांत हि हें च होत नव्हतें काय? अकबर राज्यावर आला, राज्य चांगलें चाललें. औरंगजेब आला, राज्य वाईट चाललें. ज्याप्रमाणें त्या वेळीं लोकमताचा प्रश्न नव्हता त्याप्रमाणें या वेळीं हि लोकमताचा प्रश्न नाहीं. व्होटिंगचें ढोंग मात्र अवश्य चाललें आहे.

हे सर्व तुमचे 'नोकर' आहेत असे म्हणण्यांत येतें. पांच वर्षांसाठीं तुम्ही या नोकरांना निवडलें आहे. परंतु आम्ही मालक जर जागृत राहिलों नाहीं तर हे नोकर च 'पक्के मालक' होतील. तुमच्या कल्याणासाठीं आमच्या हातीं अधिकांत अधिक सत्ता आसली पाहिजे, असें हि ते म्हणतात. याचें नांव आहे 'कल्याणकारी राज्य.' परंतु ज्या दिवशीं आम्हीं ही कल्पना अंगिकारली त्या दिवसापासून च हिंदुस्थान पराधीन झाला. कधीं कधीं वाटतें, १५ ऑगस्ट १९४७ हा दिवस आमचा स्वातंत्र्य-दिन आहे कीं पारतंत्र्य-दिन आहे? कारण त्याच्या पूर्वीं आम्ही कांहीं ना कांहीं करीत असूं. बिहारमधें भूकंप झाला तेव्हां जमनालालजी तेथें धावून गेले. जनतेनें कामाला सुरुवात केली. गुजरातमध्यें पूर आला, वल्लभभाई धावले. तेथील पूरग्रस्त भागांत लोकांनीं खूप कामें केलीं. ती कामें पाहून इंग्रज सरकारला हि लाज वाटली आणि तें कामाला लागलें. पण आज पूर आला तर कोणी एकमेकांना साहाय्य करीत नाहीं; 'सरकार साहाय्य करील' असें म्हणत बसतात. गेल्या वर्षीं पावसाळ्यांत बिहार प्रदेशांतील पूरग्रस्त भागांत माझी यात्रा चालली होती. मुझफ्फरपूर आणि दरभंगा जिल्ह्यांत मोठा पूर आला होता. आणि सीतामढीचीं अनेक गांवें पाण्यांत बुडालीं होतीं. तरी हि सीतामढी

शहरांतील सिनेमा बंद झाला नव्हता. मी तेथील सभेंत बोललों होतों-लोक दुःखांत आहेत. त्यांच्या मदतीसाठीं कमींत कमी १५ दिवस सिनेमा बंद करा. इतकी निष्ठुरता कां आहे ? कारण स्पष्ट आहे. "सरकार करील, त्यांत आम्हांला काय कर्तव्य आहे ?" असा विचार डोक्यांत घर करून बसला आहे. प्रत्येक बाबींत सरकारवर अवलंबून राहणें स्वातंत्र्याचें लक्षण नाहीं, तें गुलामगिरीचें लक्षण आहे.

## प्रश्न जनशक्तीनें सुटावे

आज भूदानाकडे लोकांचें लक्ष कां जातें ? परदेशचे लोक आमच्या यात्रेंत आमच्याबरोबर कां फिरत असतात ? कारण जगांतील पुष्कळ लोकांचें लक्ष या भूदानानें आकर्षित केलें आहे. येथें जनशक्तीच्या द्वारें जमिनीचें वांटप होत आहे, ही त्यांना अद्‌भुत घटना वाटते. पण येथील लोक विचारतात-- "तुम्ही कां उगीच पायपिटी करतां ? सरकारकडून कायदा करवून घ्या. काम झालें." त्यांच्या हें लक्षांत येत नाहीं कीं कायद्यानें का कुठें प्रेम करवतां येतें ? सरकारला जमीन वांटावयाला आम्हीं नको म्हटलें आहे काय ? गेल्या पांच वर्षांत सरकारनें जमीन कां वाटली नाहीं ? त्यांनीं जमीन वांटली असती तर विनोबाची यात्रा बंद पडली असती आणि तो दुसरें काम करता. पण सरकार ज्या लोकांचें बनलेलें आहे ते सर्व लोक मोठे जमीनवाले आहेत. कॉंग्रेसवाल्यांची आणि सरकारची गोष्ट मी सोडून देतों. पण दरिद्र्यांचे पक्षपाती म्हणविणाऱ्या कम्युनिस्टांचें च पहा ना. "कम्युनिस्टांचें राज्य आलें तर आम्ही वीस एकरांचें सीलिंग करूं" असें त्यांनीं जाहीर केलें आहे. कृष्णा-गोदावरीची पाणथळ वीस एकर जमीन म्हणजे महाराष्ट्राची ५०० एकर जमीन ! येथें वीस एकर पाणथळ राखणारा माणूस लक्षाधीश होईल. इतकी जमीन ठेवण्याला कम्युनिस्ट राजी आहेत. मग दुसऱ्यांची गोष्ट कशाला ? आणि समजा कायद्यानें हें काम झालें हि तरी प्रेम आणि जनशक्ति त्यांतून निर्माण होणार आहे काय ? या मुद्यामुळें जगाचें भूदानाकडे लक्ष आहे.

ज्यांची आजवर कुणीं कल्पना हि केली नाहीं अशी विलक्षण कामें आतां लोकशक्तीनें होऊं घातलीं आहेत. कारण यामुळें जनशक्तीचा विकास

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
होतो, ही गोष्ट लक्षांत येऊं लागली आहे. लोक प्रेमानें जमीन दान देतात व प्रेमानें एक प्रश्न सोडवतात, असें झालें तर या कार्यामुळें जगांतील दुसरे प्रश्न हि सुटूं शकतील. समजा, भूदानाचें कार्य जनशक्तीनें पार पडलें आणि खेडोपाडीं प्रेमपूर्वक जमीन वांटण्यांत आली, तर तें केवढें महान् कार्य ठरेल ? आम्ही जमिनीचें स्वामित्व राखणार नाहीं असें गांवोगांवच्या लोकांनीं ठरविलें, तर त्यांच्या माथीं कुणी स्वामित्व लादणार आहे काय ?

## सत्ता विचाराची, व्यक्तीची नव्हे

या प्रकारें आपल्या देशांतील एक एक प्रश्न सरकारनिरपेक्ष अशा जनशक्तीनें सोडविला पाहिजे. नाहीं तर सर्व सत्ता सरकारच्या हातीं राहील आणि जगांत शांति राहणें कठीण होऊन बसेल. कुणाहि एका माणसाच्या हातीं साऱ्या देशाला वर नेण्याची किंवा खालीं आपटण्याची सत्ता कायद्यानें देणें चूक आहे. कुणाजवळ नैतिक शक्ति असेल आणि लोक त्याचा सल्ला ऐकत असतील तर ती दुसरी गोष्ट आहे. गांधीजींची सत्ता हिंदुस्थानभर चालत असे पण ती नैतिक सत्ता होती. त्यांचें म्हणणें ऐकण्याला वा डावलण्याला सर्व लोक मोकळे होते. अशा प्रकारें महापुरुषांची नैतिक सत्ता चालली तर त्यांत कुणाचा कांहीं आक्षेप नाहीं. परंतु देशाला घडविण्याची किंवा बिघडविण्याची शक्ति कुणा एकाच्या हातीं कायद्यानें देणें चूक आहे. नैतिक सत्ता सुद्धां लोकांनीं समजल्याउमजल्याविना मानूं नये अशी माझी इच्छा आहे. विनोबाची तपश्चर्या पाहून त्याचें म्हणणें न समजतांउमजतां च तुम्हीं कबूल करावें, असें विनोबा इच्छीत नाहीं. त्याचें म्हणणें तुम्हांला पटलें तर च तुम्हीं तें अंगीकारावें अशी त्याची इच्छा आहे. आमचें म्हणणें न समजतां कुणी आम्हांला दान देईल तर आम्हांला दुःख होईल असें मीं अनेक वेळां निःसंदिग्ध शब्दांत जाहीर केलें आहे. आमचें म्हणणें समजून घेऊन कुणी आम्हांला दान देतो तेव्हां मला आनंद होतो. जनशक्ति आणि लोकहृदयाचा उद्धार आम्हांला हवा आहे. सामूहिक संकल्पशक्ति प्रकट व्हावी,

समुदायाची चित्तशुद्धि व्हावी, हें आम्हांला हवें आहे. अशी शक्ति प्रकट केल्याखेरीज आपला देश आणि जग संकटांतून मुक्त होणार नाहीं.

**विशाखापट्टण,** २७-१०-'५५

## मदत ईश्वराची पुढाऱ्यांची नव्हे

साधारणपणें नेहमीं अशी तक्रार केली जाते कीं आमच्या कार्यकर्त्यांच्या मागें कोणी एखादा मोठा मनुष्य नाहीं. मोठा कोण आहे ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे. या जगांत जे सर्वांत लहान असतात ते ईश्वराच्या राज्यांत सर्वांत मोठे असतात. जर आपल्याला एखाद्या मोठ्या पुढाऱ्याची मदत मिळाली तर ईश्वराच्या मदतीपासून आपण दुरावले जाऊं, ईश्वराची ज्योत आपल्या हृदयांत प्रकट होणार नाहीं. जर जमीन मिळाली तर त्या पुढाऱ्याच्या ताकदीमुळें मिळाली आणि जर मिळाली नाहीं तर त्याच्यांत ताकद नव्हती असें आपल्याला वाटतें. म्हणजे यश किंवा अपयश ह्या दोन गोष्टी आपण त्या पुढाऱ्यावर टाकल्या तर आपल्या हृदयशुद्धीचा कांहीं प्रश्न च उरणार नाहीं. म्हणून आजची परिस्थिति फार उत्तम आहे. कारण त्यामुळें आपल्या हृदयांत जी ज्योत आहे ती वाढेल, स्वतःचें निरीक्षण करण्याची संधि मिळेल आणि जर परमेश्वरानें मनांत आणलें तर आपली ताकद वाढेल व आपल्या शक्तीनें काम होईल. परंतु आपल्या शक्तीनें काम झालें असा अभिमान ठेवूं नका. हें काम नवीन आहे म्हणून तें नवीन नवीन मनुष्यांसाठीं आहे असें आपण समजलें पाहिजे. नवीन काम जुन्या लोकांच्यासाठीं असत नाहीं. ईश्वर नवीन काम निर्माण करतो तर त्यासाठीं नवीन माणसांची पण उत्पत्ति करतो. जुना पुढारी नवीन काम व्यवस्थितपणें करील ही आशा धरणें निरर्थक आहे. जुने लोक तुमच्या कामाला चांगलें म्हणतात, तुम्हांला आशीर्वाद देतात, यापेक्षां जास्त काय पाहिजे ? परमेश्वरानें आपल्यासाठीं सर्व दरवाजे खुले ठेवले आहेत. तेव्हां निशंकपणें काम करा. आपल्या प्लॅटफार्मवर बोलायला कोणी येणार नाहीं, तो अगदीं मोकळा आहे, आपल्यासाठीं च मोकळा ठेवला आहे. पावसांत, थंडींत, उन्हांत फिरावें लागतें, लहान लहान गांवांत जावें लागतें, लोकांना वरचेवर

समजावून सांगावें लागतें. कोण जातो पावसांत आणि काम करतो ? तो संपूर्ण कार्यक्रम आपल्यासाठीं ठेवलेला आहे. यासाठीं परमेश्वराचें नांव घेऊन उत्साहानें काम करा.

**भवानी** (कोयम्बतूर),
२३-८-५६

## शस्त्रांचे नांगर बनतील

बाबा जप करील आणि तुम्ही काम कराल. तुमचें काम बाबा करील काय ? तुमचें खाणें बाबा खाईल काय ? तुमची झोंप बाबा घेईल काय ? तुम्हांला तुमचें खाणें स्वत: च खाल्लें पाहिजे, आपली झोंप आपण च घेतली पाहिजे. हिंदुस्थानचा प्रश्न हिंदुस्थान च सोडवील. बाबानें आपला प्रश्न सोडविला आहे. त्यानें आपली मालकी ठेविली नाहीं. जसा साप दुसऱ्याच्या घरांत जाऊन राहतो तसा बाबा हि दुसऱ्याच्या घरांत जाऊन राहतो. बाबानें सापाचें जीवन अंगीकारलें आहे. तो आपलें घर बनवीत नाहीं. भागवतांत अवधूत मुनींनीं म्हटलें आहे कीं, "मी सापापासून हा बोध घेतों." त्या च प्रमाणें बाबानें सापापासून हा बोध घेतला आहे आणि आपली मालकी सोडली आहे. तो आपल्या देहाची हि मालकी मानीत नाहीं. तो असें मानतो कीं, हा देह समजाच्या सेवेसाठीं आहे. त्यानें स्वत:साठीं कोणती हि इच्छा ठेविली नाहीं. तेव्हां बाबाचा प्रश्न सुटला आहे. त्यामुळें बाबाला कोणता हि विकट प्रश्न सोडवायचा राहिलेला नाहीं. जो सर्व देशाचा प्रश्न आहे तो सर्व देश च सोडवील.

आज जगांत लोक मोठाले बॉंब तयार करीत आहेत. परंतु हीं सारीं शस्त्रास्त्रें नाहींशीं होतील. त्यांचा कोण नाश करील? ज्या हातांनीं त्यांना बनविलें ते च हात त्यांचा नाश करतील. ह्या सर्व तलवारी, बंदुका, लोखंडाच्या कारखान्यांत परत येतील. तेथें त्यांचा रस तयार करून त्यांतून नांगर तयार केले जातील. सर्व शस्त्रें वितळविलीं जातील आणि त्यांपासून चांगलीं औजारें तयार होतील. कापण्यासाठीं कोयते, शेतीसाठीं नांगर

आणि सूत कांतण्यासाठीं टकळ्या तयार होतील. हें कोण तयार करतील? ज्या लोकांनीं शस्त्रें तयार केलीं ते च लोक हीं औजारें तयार करतील. केव्हां? जेव्हां विचार बदलतील तेव्हां. विचार बदलला तर सर्व सृष्टीचा नाश होतो आणि नवीन सृष्टि निर्माण होते. सूर्याचीं किरणें पसरलीं कीं सर्व लोक आपलीं अंथरुणें गुंडाळतात. ज्यांनीं अंथरुणें घातलीं होतीं ते च लोक तीं गुंडाळतात. त्या च प्रमाणें ज्यांनीं शस्त्रास्त्रें तयार केलीं आहेत त्या लोकांच्या जेव्हां असें लक्षांत येईल कीं ह्यांनीं प्रश्न सुटणार नाहींत तेव्हां ते च शस्त्रांचा नाश करतील. लोक विचारतात, एवढ्या मोठ्या योजना ढासळून पडतील काय? जेवढी मोठी इमारत असेल तेवढी भूकंपामुळें लवकर पडते. छोटीं घरें टिकतात. त्यासाठीं काय करावें? विचार पसरवावे लागतील आणि तें च कार्य बाबा करीत आहे.

**मुलूर** (कोइम्बतूर), ता. ६-१०-५६

## सर्वोदय म्हणजे शासनमुक्ति : २८ :

### सर्वत्र स्वतंत्र राज्यसंस्था

जगामध्यें लोकांनीं एक राज्यसंस्था बनवली आहे. पूर्वीं ती एका व्यक्तीच्या हातीं होती तेव्हां तिला राजेशाही म्हणत असत. एका काळीं सर्व जगांत अशी राजेशाही चालू होती. पूर्वींच्या काळीं देशां-देशांमध्यें विशेष संपर्क नव्हता. दिल्लीवाल्यांना रोमचें ज्ञान नव्हतें. रोमवाल्यांना दिल्लीचें नव्हतें. परंतु दोन्ही प्रदेशांत राजे च राज्य करीत होते. पूर्वीं चीन, हिंदुस्थान आणि दुसऱ्या देशांत हि राजे राज्य करीत होते. जगांतल्या सर्व लोकांनीं एकत्र बसून तें पसंत केलें होतें असें नाहीं. त्या वेळीं वेगवेगळ्या देशांचा एकमेकांशीं विशेष परिचय हि नव्हता असें मीं आतां च सांगितलें आहे. कांहीं व्यापारी इकडून तिकडे जात असत, परंतु ते फार थोडे. कांहीं प्रवासी हि येत जात. ह्यू-एन्-त्संग चीनहून इकडे आला होता आणि इकडून हि परमार्थ नांवाचा मनुष्य तिकडे गेला होता. याप्रमाणें विचारांची

कांहीं थोडी देवाण-घेवाण होत होती. पण वेगवेगळ्या देशांतल्या राज्यसंस्था बनल्या त्या स्वतंत्रपणें च बनल्या. त्या स्वाभाविकपणें च बनल्या. लोकांना वाटायचें कीं, चांगला राज्यकारभार चालायला राजा असला च पाहिजे.

## बेडूक आणि राजा

एक जुनी गोष्ट आहे.एकदां बेडकांना आपल्याला राजा असावा अशी इच्छा झाली. त्यांना वाटलें राजाशिवाय आपली व्यवस्था ठीक होत नाहीं म्हणून 'परमेश्वरा, आमच्यासाठीं कुणी राजा पाठवून दे' अशी त्यांनीं देवाची प्रार्थना केली. परमेश्वरानें त्यांची प्रार्थना ऐकली आणि एक बैल पाठवून दिला. बैल खालीं उतरला तेव्हां ५-५० बेडूक त्याच्या पायांखालीं चिरडून मेले. तेव्हां ते देवाला म्हणाले, 'असला राजा आम्हांला नको. दुसरा कोणी-तरी पाठव.' देवानें एक मोठा दगड वरून खालीं टाकून दिला. त्याच्या-खालीं दोन चारशें बेडूक खतम झाले. तेव्हां ते फार घाबरले आणी पुन्हां देवाला म्हणाले, 'तूं आमच्यावर मोठें संकट च टाकलेंस !' देवानें उत्तर दिलें, 'मीं बैल पाठवला तें माझें वाहन होतें. त्यानें तुमचें काम झालें नाहीं तेव्हां मी ज्या स्फटिक शिळेवर बसतों ती पाठविली. ती हि तुम्हांला चांगली वाटत नाहीं. आतां आणखी कोठला राजा पाठवूं ? म्हणून राजा-शिवाय च तुमचें काम चांगलें चालेल असें समजा.' तेव्हां बेडकांनीं राजाचें नांव सोडून दिलें.

## डोके मोजणीची लोकशाही

राजांच्या ऐवजीं राज्यसंस्था पाहिजे कीं नाहीं असा आतां प्रश्न उभा आहे. पाहिजे असेल तर ती राज्यसंस्था कशा प्रकारची असावी ? आज तर पांच वर्षांतून एकदां निवडणूक होते. ५१ लोकांचें एक मत पडलें आणि ४९ लोकांचें दुसरें तर ५१ लोकांच्या मतावर च राज्य चालतें. पण असें कां ? कीं राजसत्तेवर ४९ लोकांचें प्रतिबिंब कां पडूं नये ? याला कांहीं उत्तर आहे काय ? कीं ४९ लोकांना कांहीं विचार च नाहीं? सर्वांच्या संमिश्र विचारानें राज्य चालावें ही स्वतंत्र गोष्ट आहे. परंतु येथें तर मोजणी करून राज्य

चालतें. आणि ती हि शिरगणति! केवळ रावणाला दहा मतांचा अधिकार राहील आणि बाकीच्या सर्व लोकांना एक च मताचा अधिकार राहील. ही काय राज्यव्यवस्था आहे?

त्यांतहि जे लोक निवडून येतात त्यांत कांहीं चांगलें असतात, कांहीं वाईट. राजांच्या काळीं सुद्धां कांहीं चांगले राजे असत, कांहीं वाईट. 'मी प्रजेच्या वतीनें हें सर्व करीत आहे' असा दावा मात्र त्या काळीं राजे करूं शकत नसत. गोळीबार केला तर तो आपल्या जबाबदारीवर करीत. पण आजचें सरकार गोळीबार करील तर म्हणेल कीं, "जनतेच्या वतीनें जनतेच्या हिताकरितां च गोळीबार केला." याचा अर्थ असा झाला कीं, आज जो गोळीबार होतो त्याची पूर्ण जबाबदारी जनतेवर पडते. राज्यसंस्थेमध्यें आणि लोकशाहीमध्यें एवढा च फरक पडला, जास्ती नाहीं. आतां एक मुख्य मंत्री होतो आणि तो आपलें मंत्रिमंडळ बनवितो. मुख्य मंत्री पसंत करील ते च लोक मंत्रिमंडळांत राहूं शकतात. ही तर अगदीं राजांच्या-सारखी च व्यवस्था झाली. म्हणजे एक राजा आणि त्याचे थोडे सरदार अशी च ही स्थिति आहे. पूर्वीं हि राजा एकटा च राज्य करीत नव्हता. त्याला हि दुसऱ्या मंत्र्यांची जरूर पडे च. अकबराच्या मंत्रिमंडळांत ९ मंत्रि होते. त्यानें तोडरमल, अब्दुल फैझी वगैरे मंत्रि निवडले आणि सर्वांनीं मिळून राज्य चालविलें.

## केंद्रित सत्तेचे दोष

आतां मुख्य मंत्रि चांगला असेल तर राज्य चांगलें चालेल. त्याची अक्कल जाईल तर तुम्ही सर्व नष्ट व्हाल. आज सगळ्या जगाला आग लावण्याची शक्ति आईक, बुल्गानिन, ईडन, चाओ आणि माओ यांच्या हातीं आलेली आहे. यांच्यापैकी एकाची हि बुद्धि फिरली तर तो दुनियेला आग लावूं शकतो. जगाला आग लावायला चार पांच लोकांच्या एकमताची हि जरूरी नाहीं. कोण्या एखाद्याचें हि डोकें फिरलें तर पुरे आहे. परंतु जगांत शांति राखायची असेल तर त्या सर्वांचें एकमत व्हावें च लागेल. किती भयानक स्थिति आहे! जगांतल्या २५० कोटि लोकांनीं आपली सत्ता आठ-दहा लोकांच्या हातांत सोंपवून दिलेली आहे. हल्लीं सर्वत्र या च

आईक, माईक आणि चाऊ-माऊसंबंधीं चर्चा चालते. यांनीं च वर्तमानपत्रें भरलेलीं असतात. कारण हे लोक केव्हां आग लावून देतील त्याचा नेम नाहीं म्हणून लोक घाबरले आहेत.

मी कोयमतूर जिल्ह्यांत असतांना तिथल्या धारापूर गांवीं लोण्याचा भाव सहा रुपयांवरून चार रुपये झाला. आतां त्या बिचाऱ्या लोणीविक्यांची काय स्थिति होईल ? लढाई चालू नसतांना ही स्थिति आहे; तर महायुद्ध सुरू झाल्यावर किमती कुणीकडे जातील कोणाला सांगतां येणार आहे काय ? या सर्वांचें एक मात्र कारण हें च कीं, लोकांचें भलें-वाईट करण्याचा अधिकार एका व्यक्तीच्या हातीं सोंपविला आहे. आजचें चित्र तर असें आहे कीं, प्रत्येक खेड्यांत कसें काम चालावें याची योजना दिल्लींत बनते आणि ज्यांनीं कधीं खेड्यांचें दर्शन हि घेतलें नाहीं असले लोक ती बनवतात. ते च ठरवतात कीं जेवढे विणकर आहेत त्यांनीं दारूच्या दुकानाप्रमाणें लायसेन्स घेतला पाहिजे. ही आहे लोकांनीं निवडून दिलेल्या सरकारची योजना !

## सर्वोदय म्हणजे शासनमुक्ति

सर्वोदय काय आहे हा विचार लोकांना अजून समजला नाहीं म्हणून मी हें सर्व सांगत आहें. 'सर्वोदय' म्हणजे चांगलें राज्य किंवा बहुमताचें राज्य नव्हे तर सर्वोदय म्हणजे शासनमुक्ति किंवा सत्तेचें विकेंद्रीकरण होय. कोणतें हि काम बहुमतानें नाहीं तर सर्वसंमतीनें आणि गांवच्या जनशक्तीनें झालें पाहिजे.

## सरकारला दोन वर्षांची सुट्टी द्यावी

हे सर्व राज्यकर्ते जर शरीरपरिश्रम करूं लागतील तर दुनियेचा कारभार चांगला चालेल. आज तर हे लोक काम करतात थोडेसें आणि सुट्या घेतात भरपूर. प्रोफेसरला सहा सहा महिने सुट्टी असते. शिक्षकांना तीन तीन महिने सुट्या असतात. ही च स्थिति अन्य विभागांची.

मीं एकदां असें सुचविलें होतें कीं, या राज्यकर्त्यांना दोन वर्षें सुट्टी देऊन टाकावी आणि पहावें त्यांच्याशिवाय देशांत काय काय गडबड होते ती ! मग लोणी बनविणारा लोणी बनविणार नाहीं कीं भाजी विकणारा

भाजी विकायला आणणार नाहीं, का ती विकत घेणारा विकत घेणार नाहीं ? मग लग्नें होणार नाहींत कीं मुलें जन्माला येणार नाहींत कीं मरणारे मरणार नाहींत, आणि त्यांच्या दहनक्रियेला जाणारे जाणार नाहींत ? मग आया आपल्या मुलांना पाजणार नाहींत कीं लोक आपलें अंगण झाडणार नाहींत कीं आईबाप आपल्या मुलांना रामायणांतल्या गोष्टी सांगणार नाहींत ? आज जें सर्व चाललें आहे त्यापैकीं काय होणार नाहीं तें सांगा. हो, तंटे होणार नाहींत म्हणून वकिलांना काम राहणार नाहीं, एवढी गोष्ट खरी. मग त्यांची कांहींतरी दुसरी व्यवस्था करावी लागेल. परंतु सरकारनें दोन वर्षें सुट्टी घेतली तर या राज्यकर्त्यांशिवाय जगाचें चालणार नाहीं हा जो भ्रम आहे तो नाहींसा होईल. सूर्य उगवला नाहीं तर जगाचा नाश होईल, दान आणि तप झालें नाहीं; परमेश्वरकृपेनें पाऊस पडला नाहीं; तर जग चालणार नाहीं ह्या गोष्टी समजतात, परंतु सरकारशिवाय चालणार नाहीं हें कांहीं लक्षांत येत नाहीं.

परंतु हल्लीं लोक म्हणतात कीं, आम्हांला ईश्वर नको, सरकार पाहिजे. नशीब बिचाऱ्यांचें ! बिचारे ईश्वराला नाहींसा करण्याच्या मागें लागले आहेत; पण सरकार तोडण्याची गोष्ट करूं शकत नाहींत. मित्रांनो, ईश्वराच्या मागें कां लागतां ? तो एका कोपऱ्यांत बसला आहे. त्यानें तुमचें काय बिघडतें ? तो आहे म्हणाल तर आहे, नाहीं म्हणाल तर नाहीं. जो बिचारा तुमच्या म्हणण्यावर च अवलंबून आहे त्याच्या मागें हात धुवून लागलां आहांत ही आश्चर्याची गोष्ट आहे. आणि जी सत्ता तुमच्या डोक्यावर चढून बसलेली आहे, जिच्याखालीं तुम्ही चिरडून जात आहां, ती मात्र डोक्यावरून झुगारून द्यायला तयार नाहीं याला काय म्हणावें ? मी केवळ हिंदुस्थान सरकाची, प्रांतीय सरकारची गोष्ट करीत नाहीं, कारण त्याची चर्चा करण्याचें कांहीं कारण नाहीं. मी त्यांचें अस्तित्व च मानत नाहीं. तुम्हीं निवडले आहेत म्हणून तें सरकार तेथें बसलें आहे. मी तुम्हां लोकांची च किंमत मानतों.

**बोडीनायकल्लुर** (मदुराई)

१०-१२-५६

## शासन-हीनता, सुशासन, शासनमुक्ति : २९ :

प्रश्नः–सरकारचें स्वरूप कसें असावें ?

उत्तरः–ही गोष्ट लोकांच्या परिस्थितीवर अवलंबून आहे. समजा एखाद्या कुटुंबांत अगदीं लहान-लहान मुलें व तरुण आईबाप आहेत. तर अशा कुटुंबांत आईबापांची आज्ञा प्रमाण मानून त्याप्रमाणें मुलांनीं वागलें पाहिजे हें त्या कुटुंबाचें स्वरूप राहील. पण ज्या कुटुंबांत मुलें लहान नसून शहाणीं झालेलीं आहेत व आई बाप प्रौढ असले तरी काम करणारे आहेत त्या ठिकाणीं दोघांच्या सहकार्यानें काम चालेल, केवळ मातापितरांची आज्ञा चालणार नाहीं. पण माता-पितरें अगदीं वृद्ध व मुलें प्रौढ झालीं असतील, अशा कुटुंबांत मुलें च सर्व कारभार चालवितील, आईबाप केवळ सल्ला देतील. त्यांची आज्ञा चालणार नाहीं व त्यांची मुलांनाच्या कामांत कांहीं मदत हि राहणार नाहीं. असें ह्या कुटुंबाचें स्वरूप राहील.

### सरकारचें स्वरूप जनतेच्या शक्तीवर अवलंबून आहे

अशा प्रकारें परिस्थितीला अनुसरून कुटुंबाचें स्वरूप भिन्न भिन्न राहील. पण ह्या सर्व परिस्थितींत कुटुंबाचें मुख्य तत्त्व प्रेम हेंच राहील; व त्याला बाधा येणार नाहीं असें त्याच्या स्वरूपाचें बाह्य परिवर्तन होत राहील. कुटुंबाचें मूलतत्त्व ज्याप्रमाणें प्रेम, त्याप्रमाणें समाजाचें मूलतत्त्व ‘सर्वोदय’ असलें पाहिजे. समाजाचें मूलतत्त्व काय असावें हें दर्शविणारा ‘सर्वोदय’ हा उत्कृष्ट शब्द आहे. ज्या समाजांत लोक अगदीं च अज्ञान असतील व विचार करण्याची शक्ति त्यांच्या ठिकाणीं आलेली नसेल अशा ठिकाणीं सरकारच्या हातांत अधिक सत्ता राहील व मुलें ज्या प्रमाणें आई-बापापासून रक्षणाची अपेक्षा राखतात, त्याप्रमाणें लोक सरकारपासून संरक्षणाची अपेक्षा राखतील. प्रजा अशा प्रकारें अज्ञान किंवा दुर्बल असेल तर अशा ठिकाणीं सरकार सर्वोदयाची इच्छा असणारे पण

कल्याणकारी राहील. त्या सरकारला 'मा-बाप' सरकारचें रूप येईल. पण लोकांची शक्ति, ज्ञान व योग्यता जसजशी वाढत जाईल, व लोकांत जसजसें सहकार्य चांगलें वाढीस लागेल तसतशी सरकारची गरज कमी कमी होत जाईल. मग सरकार हुकूम करणारें राहणार नाहीं तर त्याला सल्ला देणाऱ्या संस्थेचें रूप येईल. अशा प्रकारें जनतेच्या नैतिक शक्तीची पातळी जसजशी उंचावत जाईल तसतशी राज्यसत्तेची सत्ता चालविण्याची शक्ति क्षीण होत जाईल, म्हणजे तिची सत्ता कमी कमी होत जाईल. अखेर तर तिचें अस्तित्व च राहणार नाहीं अशी आम्हांला आशा आहे.

## शासन-हीनता, सुशासन व शासनमुक्ति

सर्वोदयाच्या अंतिम आदर्शस्थितींत आम्हीं 'शासन-मुक्त' समजाची कल्पना केलेली आहे. आम्ही 'शासन-हीन' असा शब्दप्रयोग करीत नाहीं. कारण शासन-हीनता तर पुष्कळप्रकारच्या समाजांत आढळते व त्या ठिकाणीं अंदाधुंद कारभार चालतो. ज्या ठिकाणीं कसल्याच प्रकारची व्यवस्था नाहीं, दुर्जन लोक मनांत येईल त्याप्रमाणें वागू शकतात, अशा अवस्थेला 'शासन-हीन' अवस्था म्हणतां येईल. असा 'शासन-हीन' समाज आमचा आदर्श नाहीं. आमची तर इच्छा शासन-हीनता जाऊन सुशासन व्हावें व नंतर तें हि जाऊन शासन-मुक्त समाज बनावा अशी आहे. शासनमुक्त समाजांत व्यवस्था राहीलच, पण ती गांवोगांव वाटलेली असेल. अशा समाजांत दंडाची–शिक्षेची–गरज राहणार नाहीं. समजांत कांहीं विचार इतके सर्व-तो-मान्य झाले असतील कीं ते समाजाच्या आचरणांत प्रगट झालेले असतील व समाजांतील लहान लहान मुलांना हि त्यांचें शिक्षण मिळालेलें असेल. अशा समाजांतील लोक स्वतः होऊन त्या नैतिक विचाराप्रमाणें वागणारे असतील. तो समाज स्वयं-शासित असेल.

## संग्रह हि पाप आहे

आज लाखों लोक चोरी करीत नाहींत. ह्याचें कारण चोरी कायद्या-विरुद्ध गुन्हा आहे म्हणून नव्हे. कायदा असो बिचारा, पण 'चोरी करणें अयोग्य आहे' हा विचार त्यांना मान्य असतो म्हणन. ज्याप्रमाणें चोरी

करणें अयोग्य आहे ही गोष्ट सर्व-मान्य झाली असल्यामुळें, चोरी न करणें ही गोष्ट अगदीं स्वाभाविक मानली जाते, चोरीसाठीं कायद्याचें किंवा शिक्षेचें भय असो वा नसो, चोरी आम्ही करणार नाहीं, कारण ती वाईट आहे, असें ज्याप्रमाणें लोक मानतात, त्याच प्रमाणें संग्रहाला हि ते लोक वाईट मानूं लागतील. संग्रह करणार नाहींत व थोडा बहुत संग्रह झालाच तर तो ताबडतोब वाटून टाकतील. ज्याप्रमाणें व्यभिचाराच्या विरुद्ध कायदा असो वा नसो समाजांत तो अत्यंत वाईट मानला जातो व लोक त्यापासून बचावून राहतात, कारण लोकांच्या विचारांत व्यभिचार न करणें हाच कायदा ठरलेला आहे, त्याच प्रमाणें 'संग्रह योग्य नाहीं' हा विचार हि सर्वमान्य होऊन जाईल व समाजांत अपरिग्रहाला मान्यता मिळेल. असें झालें कीं आजचे पुष्कळसे प्रश्न व कटकटी नाहींशा होतील. 'चोरी करणें पाप आहे' हा विचार ठीक आहे पण तो एकांगी व अपूर्ण आहे. ज्यावेळीं 'संग्रह हि पाप आहे' ही गोष्ट समाजांत मान्य होईल त्यावेळीं तो विचार पूर्ण होईल आणि समाजाचें आरोग्य वाढेल. आज ज्याच्या जवळ अधिक संग्रह आहे त्याचा सन्मान होतो पण पुढें असा काळ येईल कीं ज्यावेळीं त्याची स्थिति आजच्या चोरासारखी होईल.

### सर्वोदय-समाजाकडे

अशा प्रकारें समाज-रचनेचा आधार अपरिग्रह झाला कीं, सरकारची गरज कमींत कमी पडेल. गांवचे लोक गांवचा सर्व कारभार पाहून घेतील व सरकारची सत्ता निमित्त मात्र राहील. सरकार सल्ला देणारें राहील, सत्ता चालविणारें नव्हे. अशा सरकारांत नीतिमान्, चारित्र्यवान् व सदाचारी लोक राहतील. त्यांच्या हातीं नैतिक सत्ता राहील. भौतिक सत्ता राहणार नाहीं. अशा प्रकारचा सर्वोदयसमाज स्थापन करण्याची आमची इच्छा आहे व त्यासाठीं आपण सर्व प्रकारें प्रयत्न केला पाहिजे.

### सुशासन शासन-मुक्तींत येऊन जातें

सध्यां 'समाजवादी समाजरचना' इत्यादि ज्या गोष्टी चालतात, त्या साऱ्या सुशासनाच्या आहेत, शासन-मुक्तीच्या नव्हेत. त्या सर्व शासन-

मुक्तीच्या पोटांत येऊन जातात. ज्या प्रमाणें मातेच्या पोटांतील गर्भाला मातेकडून पोषण मिळत असतें, पण त्याला त्याची जाणीव नसते, त्याच प्रमाणें सर्वोदय-विचारानें त्याच्या गर्भांत असणाऱ्या समाजवादी-समाज रचनादि गोष्टींना पोषण मिळत असतें. सर्वोदयांत अशासन किंवा शासनहीनतेकडून सुशासनाकडे व सुशासनाकडून शासन-मुक्तीकडे जावयाचें असतें. अशा प्रकारें आम्ही एक एक पाऊल पुढें जात जाऊं. पण आमचा अंतिम अदर्श शासन-मुक्तीचा असेल. म्हणून सुशासन सुद्धां शासन-मुक्तीचें द्वार खुलें राहील ह्या पद्धतीनें आम्हांला चालवावें लागेल. ज्याप्रमणें सामान्यत: असंयमी असलेल्या मनुष्याला गहस्थाश्रमाचें शिक्षण आम्हीं दिलें तर तो गृहस्थ बनतो व त्याच्या ठिकाणीं संयम येतो. पण तो जर गृहस्थाश्रमांत च अडकून पडला व वानप्रस्थाश्रमाकडे त्याची वृत्ति नसली तर त्याचा विकास खुंटून जातो; सारांश, असंयमाला आळा घालण्यासाठीं गृहस्थाश्रमाची स्थापना असली तरी गृहस्थासमोर वानप्रस्थाश्रमाचा आदर्श पाहिजे. केव्हां तरी आपणाला वानप्रस्थ व्हावयाचें आहे त्या वृत्तीनें त्यानें गृहस्थाश्रम केला पाहिजे. त्याच प्रमाणें शासन-मुक्तीकडे दृष्टि ठेवून आपण एकीकडे सुशासन चालविलें पाहिजे व दुसरीकडे शासन-मुक्तीसाठीं जनशक्ति संघटित करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

## आमचा दुहेरी प्रयत्न

एवढ्यासाठीं च भूदान-यज्ञामार्फत जनतेच्या शक्तीला जागवून तिला स्वत:च्या पायावर उभे करण्याचा आमचा प्रयत्न आहे. दुसरीकडे मद्य-बंदीचा कायदा व्हावा अशी हि आमची खटपट आहे. कारण मद्यपानाविरुद्ध पुष्कळ लोकमत तयार झालेलें आहे. मद्यपानबंदी झाली नाहीं तर देशांत सुशासन होणार नाहीं, दु:शासन होईल व तें शासन-मुक्तीच्या मार्गांत बाधा आणील. म्हणून शासन-मुक्तीची इच्छा असून हि मी मद्यपानबंदीच्या कायद्याची हि मागणी करतों. पण जमिनीच्या बाबतींत माझी अशी इच्छा आहे कीं सर्व जमीन गांवची व्हावी. अशा प्रकारें एकीकडे लोक-शक्ति संघटित कर-ण्याचा आमचा प्रयत्न आहे तर दुसरीकडे शासनाला सुशासन बनविण्याची हि आमची खटपट आहे.

## कायदा म्हणजे सर्व कांहीं समाप्त

गांवाची सर्व जमीन गांवाची व्हावी अशा तऱ्हेचें सक्रिय लोकमत जर बनलें, म्हणजेच लाखों लोकांनीं भूदानांत जर जमीन दिली, तर गांवाची सर्व जमीन गांवाची व्हावी असा कायदा होईल. हा कायदा लोकमताला अनुसरून होणार असल्यामुळें तो लोकांना अप्रिय न होतां प्रिय होईल. समजा, प्रत्येक गांवांतील शेकडा ८० लोकांनीं जमीन दिली पण २० टक्के लोक, त्यांना विचार पसंत असून हि मोहामुळें जमीन देण्यास तयार झाले नाहींत, तर अशा स्थितींत हि कायदा बनू शकेल. पण आमचा प्रयत्न मात्र सर्वच्या सर्व लोकांनीं जमीन द्यावी व सरकारकडे फक्त त्याची नोंद करून त्यावर शिक्का मोर्तब करण्याचें काम शिल्लक रहावें असा राहील. ज्याप्रमाणें एक अध्याय पुरा लिहून झाल्यावर, लिहिण्याचें शिल्लक नाहीं म्हणून आपण 'समाप्त' लिहितों, त्याचप्रमाणें जनतेनें एखादें काम करून संपविलें कीं त्यावर 'समाप्त' लिहण्याचें काम सरकारचें आहे. पण लोकशक्तीमार्फत काम पुरें न होतां अध्याय अपुरा राहिला असून हि सरकार जर समाप्त लिहून टाकील, तर केवळ समाप्त लिहील्यानें तो पूरा होत नाहीं, पूरा लिहून काढल्यावरच तो पूरा होतो.

सरकारचें हि एक काम असतें. अंतिम अवस्थेंत सरकारचें काहीं एक काम राहत नाहीं, पण आजच्या स्थितींत राहतें. पण आज सुद्धां जनता प्रथम पुढें जाईल व तिच्या मागून जाण्याचें काम सरकारचें राहील. अशा प्रकारें सुशासन राहून हि आम्ही शासन-मुक्तीकडे प्रगति करूं. आमचा प्रयत्न शासन-मुक्तीचा आहे, पण त्यांतून कमींत कमी सुशासन तरी होईल. कोट रुपये मिळविण्याची आशा राखली तर लाख त्यांत येऊन च जातात.

**दिगपाहंडी, १४-५-५५**

## सरकार फार भयानक वस्तु आहे

सरकार ही अशी भयानक वस्तु आहे कीं तिच्यासारखी दुसरी भयानक वस्तु नसेल. आजच्या सारखें प्रबळ सरकार पूर्वी कधीं हि नव्हतें.

सरकार चालविणारांचा असा दावा आहे कीं, प्रजेच्या कल्याणासाठीं त्यांनीं इतकी सत्ता आपल्या हातांत ठेवली आहे. त्यांनीं समाजाला इतकें नियंत्रित करून ठेवलें आहे कीं सर्व लोकांची असलेली सत्ता मूठभर लोकांच्या हातीं आलेली आहे. भिन्न भिन्न देशांतील लोकांचे प्रतिनिधि आपल्याच हातीं लोकांचें भलें बुरें पाहण्याचा अधिकार ठेवतात व लोक हीन-दीन लाचार होऊन हें पाहतात. ते बिचारे म्हणतात कीं ह्यांच्याशिवाय आमचें काम कसें चालणार ? आज लोकांना नाम-मात्र मतदानाचा अधिकार मिळालेला आहे.

## बुद्धि-स्वातंत्र्यावर प्रहार

रशियांत हि आज हीच स्थिति आहे. लोकांना किती चांगलें जेवण द्यावें हें सुद्धां सरकार ठरवितें. पण ही वस्तु गौण आहे. मुख्य वस्तु बुद्धि-स्वातंत्र्य ही आहे. सरकार जनतेच्या बुद्धीचें हि नियंत्रण करतें. कोणत्या हि ज्ञानी पुरुषाच्या हातीं जी वस्तु आतांपर्यंत नव्हती, ती आज शिक्षण-खात्याच्या हातांत आहे. ज्ञानी लोकांनीं उपनिषदें लिहिलीं, पण तीं लोकांनीं वाचलींच पाहिजेत अशी सक्ति ते करूं शकत नव्हते. पण आज शिक्षण-खात्याचा अधिकारी जें पुस्तक नेमतो त्याचाच अभ्यास विद्यार्थ्यांना करावा लागतो व त्याची परीक्षा द्यावी लागते. सरकार 'फॅसिस्ट' असलें तर विद्यार्थ्यांच्या हातांत 'फॅसिस्ट' विचारसरणीचीं पुस्तकें पडतात. भांडवल-शाही सरकार असलें तर भांडवलशाहीच्या पुस्तकांचा अभ्यास त्यांना करावा लागतो. सरकार कम्युनिस्ट असलें तर त्यांच्या विचाराचें अध्ययन विद्यार्थ्यांना करावें लागतें. सारांश, जसें सरकार असेल तशी विद्या विद्यार्थ्यांना दिली जाईल. ज्यांना वस्तुतः स्वातंत्र्याचा अधिकांतअधिक अधिकार आहे, त्यांच्या मेंदूंत ठराविक साच्याचे विचार कोंबले जातात.

स्वातंत्र्याचा अधिकार सर्वांत अधिक विद्यार्थ्यांना आहे. ते म्हणूं शकतात कीं ज्ञानाच्या बाबतींत सक्ति चालूं शकत नाहीं. जें आम्हांला योग्य वाटेल तें आम्ही वाचूं. प्राचीन काळाचे ऋषि म्हणत कीं, "**यानि अस्माकम् सुचरितानि तानि त्वया उपास्यानि नो इतराणि**" आमच्या चांगल्या गोष्टींचें अनुकरण करा, वाईटांचें करूं नका. पण सध्यां शिस्त ही गुणांचा राजा

बनलेली आहे. लोक म्हणतात विद्यार्थ्यांत शिस्त कमी झालेली आहे. पण मला तर आश्चर्य वाटतें कीं एवढ्या रद्दी शिक्षणांत मुलें शिस्तीचें पालन कां करतात? मला आठवतें कीं कॉलेजांतील एका प्रोफेसराचें व्याख्यान मला पसंत नव्हतें. मीं विचार केला कीं, ज्यांचें व्याख्यान ऐकून माझें कल्याण होणें शक्य नाहीं, त्यांचें व्याख्यान मी कशासाठीं ऐकूं? म्हणून मी त्यावेळीं क्लासच्या बाहेर निघून जात असे.

विजयवाडा, १८-१२-५५

## राज्य नव्हे स्वराज्य : ३० :

आज देशांत निष्कामसेवा जवळ जवळ शून्य झालेली आहे. निष्काम-सेवा म्हणजे अशी सेवा ज्यांत आपल्या लाभाची इच्छा नसेल, पक्षाच्या लाभाची इच्छा नसेल किंवा प्रतिष्ठेचा हि प्रश्न नसेल. स्वराज्य प्राप्तीच्या पूर्वीं निष्काम-सेवेचा थोडाबहुत अभ्यास लोकांना होता. त्यावेळीं काँग्रेसची कांहीं मंडळी केवळ स्वराज्याच्या भावनेनें निष्काम-वृत्तीनें काम करीत विधायक कार्यकर्ते हि निष्काम-बुद्धीनें गरिबांची सेवा करीत.

### स्वराज्यानंतर निष्काम-सेवा राहिली नाहीं

पण स्वराज्यानंतर परिस्थिति बदलली. लोक अनेक राजकीय पक्षांत वांटले गेले. आणि कांहीं सेवक जे लोकांची सेवा करीत ते सरकारांत दाखल झाले. स्वराज्य हातीं आल्यानंतर तें चालविणें हें हि कर्तव्य मानलें गेलें, व त्यामुळें वजन व योग्यता असणारीं माणसें सरकारांत गेलीं. सरकारांत गेलेलीं माणसें निष्काम असूं शकत नाहींत, असें नाहीं. काहीं तर असूं च शकतात. जनक राजा असून निष्काम होता व निष्काम-कर्मयोगाच्या बाबतींत त्याचें उदाहरण गीतेंत दिलें आहे. पण अशीं माणसें बोटावर मोजण्याइतकीं असणार, बाकी पुष्कळशीं माणसें सत्तेचा उपभोग घेणारीं च असतात. म्हणून त्यांच्या हातून निष्काम-सेवा घडत नाहीं.

विधायक कार्यकर्ते पूर्वी सरकारच्या मदतीची अपेक्षा राखीत नव्हते. त्यांचें काम एक प्रकारें सरकार विरोधी च होतें, त्यामुळें त्यांना पुष्कळ त्याग करावा लागे. त्यांना पगार मिळाला, तरी हि कमींत कमी मिळे व त्या सर्वांचा भार जनतेवर असे. पण आज परिस्थिति बदलली आहे. आज सरकारी योजनेंत पुष्कळ रचनात्मक कार्यकर्ते दाखल झालेले आहेत. तेथें त्यांना अनेक प्रकारच्या सोयी प्राप्त आहेत. त्यांना आतां तितकीशी त्यागाची गरज राहिलेली नाहीं. जनतेवर अवलंबून राहण्याचें कारण हि त्यांना राहिलेलें नाहीं. सरकारच्या आधाराशिवाय विधायक कार्य होऊं शकत नाहीं अशी त्यांची श्रद्धा बनून गेली आहे. अशा स्थितींत निष्काम-सेवा करणारे असले च तर फार च कमी, बोटांवर मोजण्याइतकें च शिल्लक आहेत.

## राजकीय पक्षवाल्यांची स्थिति

राजकीय पक्षांत वांटल्या गेलेल्या लोकांपैकीं बरे च लोक अधिकाराच्या जागांवर आहेत. कांहीं म्युनिसिपॅलिटी, डिस्ट्रिक्ट बोर्ड इत्यादींत आहेत तर कांहीं काँग्रेस कमिटयांचे अध्यक्ष मंत्री आदि आहेत. आज काँग्रेसपक्ष राज्य करणारा पक्ष असल्यामुळें काँग्रेस कमिटयांच्या अध्यक्ष-मंत्र्यांच्या हातीं हि पुष्कळ सत्ता असते. अशा स्थितींत निष्काम सेवक कोण राहणार ? दुनियेंत थोडेबहुत ईश्वराचे भक्त सर्वत्र आढळतात तसे अर्थात् येथें हि आढळतील. विरोधी पक्षांतील लोकांच्या हातीं सत्ता नाहीं, पण ते सत्तेचे अभिलाषी आहेत. त्यामुळें काँग्रेस सरकारच्या चुका कोठें सांपडतात ह्याकडे त्यांचें सर्व लक्ष असतें. अशा तऱ्हेनें दुसऱ्याच्या चुका पाहत बसणारा स्वतःचें चित्त शुद्ध राखूं शकत नाहीं. आणि चित्तशुद्धि नसेल तर निष्काम-सेवा कोठून होणार ? तरी हि त्या लोकांत कांहीं लोक निष्काम वृत्तीचे असणार च.

## सेवेचा सौदा

स्वराज्य प्राप्तीच्या नंतरच्या सेवेचा हा असा हिशेब मीं केलेला आहे. आज हि ' रामकृष्ण-मिशन ' सारख्या संस्था पूर्ववत् काम करीतच आहेत.

त्यांच्यांत कांहीं निष्काम सेवक अवश्य असतीलच. निष्काम सेवा ही खरी सेवा आहे. बाकीची सेवा म्हणजे सौदा आहे. कोणी जेलमध्यें गेलेला असेल तर तो आज म्हणतो 'मला हि कांहीं मिळालें पाहिजे.' कांहींनीं भूदानासाठीं कांहीं त्याग केला असेल तर त्याला हि वाटतें आपल्याला कांहीं मिळालें पाहिजे. नुकतेंच कॉंग्रेसनें असें जाहीर केलें आहे कीं, ज्यांनीं ज्यांनीं जें कांहीं काम केलें असेल त्याचा हिशेब द्यावा, त्याला अनुसरून त्यांना अधिकार-पदादि मोबदला मिळेल. कांहीं लोक आपल्या कामाचा अहवाल देऊन म्हणतील हि कीं आम्हीं इतकें काम केलें, आम्हांला निवडून दिलें पाहिजे. त्यांना तशी अपेक्षा राखण्याचा अधिकार हि आहे. पण ह्यांत निष्कामता कोठें राहिली ? ही शुद्ध सेवा राहिली नाहीं, हा सौदा झाला.

## राज्य-सत्तेमार्फत धर्म-प्रचार अशक्य

आतां मी दुसरें गणित करतों. सध्यांच्या परिस्थितींत जनशक्तीवर श्रद्धा किंवा जनसेवेवरचा विश्वास अत्यंत अल्प आहे. राजकीय पक्षवाले लोक मानतात कीं सत्तेमार्फत च काम होऊं शकतें. त्यांचा सरकारच्या शक्तीवर जेवढा विश्वास आहे तेवढा लोक-शक्तीवर नाहीं. त्यांची जनसेवा म्हणजे हि सरकारकडून लोकांना मदत पोंचविण्याची आहे. लोक हि त्यांना विचारतात कीं आमच्यातर्फें तुम्ही प्रतिनिधि बनला आहांत. आमच्यासाठीं तुम्ही काय केलें ? ह्यामुळ स्थिति अशी झाली आहे कीं लोकांचा आपल्या शक्तीवर विश्वास नाहीं व राजकीय पक्षवाल्यांचा हि लोकांच्या शक्तीवर विश्वास नाहीं. त्यामुळें स्वतंत्र जनसेवेला कांहीं किंमत राहिलेली नाहीं. तरी पण हे लोक सत्तेवर कब्जा जमविण्यासाठीं जनसेवा करीतच राहतील. आम्हीं सेवा केली तरच लोक आम्हांला निवडून देतील व तरच आमच्या हातीं सत्ता येईल, असें त्यांचें गणित असल्यामुळें त्यांची सेवा ही सत्तेची दासी बनली आहे.

लोकांच्या जीवनांत सुधारणा, परिवर्तन किंवा क्रांति सरकारच्या शक्तीनें केव्हां हि होऊं शकत नाहीं. सरकारच्या शक्तीनें हें होत असतें तर बुद्ध भगवानांनीं हातांतलें राज्य कां सोडलें असतें ? पण सध्यां लोक उदाहरण देतात तें बुद्धाचें न देतां अशोकाचें देतात. ते म्हणतात अशोकाचें परिवर्तन

झालें व त्यानें धर्मप्रचार केला, ह्याचा अर्थ राज्यसत्तेनें धर्मप्रचार झाला कीं नाहीं ? पण ह्या लोकांना इतिहासाचें थोडेंसुद्धां ज्ञान नाहीं असें मी म्हणेन. सरकारचें बळ प्राप्त झाल्यापासून तर येथून बुद्ध धर्म उखडण्याची तयारी झाली. ख्रिस्ती धर्माला कान्स्टेन्टाॅईननंतर सत्तेचा पाठिंबा मिळाला, तेव्हां-पासून तो धर्म नाम-मात्र शिल्लक राहिला. येशूचे अनुयायी ज्या शुद्ध धर्माचें आचरण करीत तो लोप पावला व चर्च सुरू झालें व ढोंग आलें. आपल्या देशांत जे शैव-वष्णव-जैन होते, त्यांची संख्या राज्यसत्तेच्या पाठिंब्या-नंतर पुष्कळ वाढली, पण वस्तुत: शैव-वैष्णव किंवा जैन वाढले नाहींत, राजनिष्ठ व राजभक्त लोक वाढले. आज दुनियेंत हजारों शैव वैष्णव व जैन व लाखों करोडों हिंदु व ख्रिस्ति लोक आहेत, पण त्यांचें आचरण कसें आहे ?

राज्य-सत्तेमार्फत सद्विचार किंवा सद्धर्म प्रसार पावतो ही कल्पना च मनांतून काढून टाका. पण खऱ्या अर्थानें राज्यसत्ता धर्माशीं जोडली गेली तर धर्म राज्यसत्तेला नष्ट च करून टाकील. दोन्ही एका च वेळीं राहूं शकणार नाहींत. अंध:कार व सुर्यनारायण एका च वेळीं राहूं शकत नाहीं. राज्यसत्तेंत धर्म खराखुरा शिरला तर तिला तोडल्याशिवाय तो राहणार नाहीं. दुसऱ्यावर सत्ता चालविणें ह्याला धर्म-प्रचार म्हणत नाहींत. सर्वांची सेवा करणें, प्रेमानें सर्वांना समजाविणें हा च खरा धर्म-प्रचार. लाखों लोक एकदम धर्म-निष्ठ बनून जातात, ह्याला कोणी धर्म-निष्ठा म्हणेल काय ?

## कोणा हि राजाच्या आज्ञेनें काम होत नसतें

हिंदुस्थानचा इतिहास पाहिला तर असें दिसेल कीं त्यांतील समाजाची ज्या ज्या वेळीं प्रगति झाली त्या त्या वेळीं ती सत्पुरुषांच्या मार्फत च झाली. बुद्ध किंवा महावीर ह्यांची आज हि छाप भारतावर आहे. त्या वेळच्या राजांची मात्र मुळीं च शिल्लक नाहीं. कबीर-तुलसीदासांचा उत्तर-प्रदेशावर जो प्रभाव आहे, तो कोणत्या हि राजाचा नाहीं. चैतन्य महाप्रभु, रामकृष्ण परमहंस किंवा रवीन्द्रनाथांची जी छाप बंगालवर आहे, ती कोणत्या हि बंगालच्या राजाची नाहीं. शंकर, रामानुज, माणिक्यवाचकर व नम्माडवार ह्यांचा आज जो प्रभाव तमिळ-

नाडवर आहे, तो कोणा हि पांड्य, पल्लव किंवा चोल वंशाच्या राजाचा नाहीं. दक्षिणेकडे सर्व लोक भस्म लावतात ते काय कोणा हि पांड्य किंवा चोल राजाच्या आज्ञेनें लावतात ? अखेर लोक कोणाच्या नांवानें जीवनांत इतका मोठा त्याग करीत असतात ? विवाह-संस्थेसारखी संस्था कोणी बनविली ? त्यांत कोणता कायदा येतो ? आई मुलाची जोपासना कोणा राजाच्या किंवा सरकारच्या हुकुमानें करते ? असंख्य यात्रा कोणाच्या आज्ञेनें चालू आहेत ? मरणोत्तर होणारे स्मशान-विधि व श्राद्धविधि कोणाच्या आज्ञेनें केले जातात. त्या ठिकणीं जो 'तिरुक्कुलर' चा किंवा 'तिरुवाचकम्' चा पाठ होतो तो का कोणा युनिव्हर्सिटीच्या कीं म्युनिसिपालिटीच्या कीं डिस्ट्रिक्टबोर्डाच्या आज्ञेनें होत असतो ? आज लोकांच्या ठिकाणीं जी विवेकबुद्धि दिसते. ती कोणी बनविली. ? आज इतकें दान दिलें जातें, तें कोणाच्या आज्ञेनें ? इतकें सारें तप, उपवास, एकादशी, रोजे केले जातात ते कोणाच्या आज्ञेनें ? हिंदुस्थानांत स्नानाशिवाय लोक जेवीत नाहींत ते कोणाच्या आज्ञेनें ?

### शिकंदर व दरोडेखोराची गोष्ट

शिकंदर बादशाहाची गोष्ट आहे. एका डाकूला पकडून त्याच्या समोर आणलें. शिकंदरानें त्याला विचारलें " तूं काय काम कतोस ? " तो डाकू म्हणाला " तूं जें करतोस तेंच. " शिकंदर म्हणाला " तुझी माझी बरोबरी कशी होईल ? मी बादशाहा आहें." डाकू म्हणाला : ' तूं जें काम करतोस तेंच मी करतों. फरक इतकाच कीं तूं यशस्वी झालास व मी अशयस्वी झालों ! तूं हि चोर आहेस व मी हि चोर आहें. तूं यशस्वी चोर असल्यामुळें लोकांच्या शिरावर बसलास व मी अयशस्वी चोर असल्यामुळें तुझ्या समोर उभा आहें इतकेंच. तूं मनांत पक्कें जाणतोस कीं तुझी व माझी योग्यता सारखीच आहे.' त्याचें हे बोलणें ऐकून शिकंदर स्तंभित झाला. येथें ईस्ट इंडिया कंपनीचें राज्य चाललें. त्यांतले क्लाईव्ह, वॉरन हेस्टिंग काय महा पुरुष होते ? त्यावेळीं इंगलडच्या पार्लमेंटांत हि वॉरन हेस्टिंगवर केस चालली होती. त्या वेळच्या बर्कच्या भाषणावरून हेस्टिंग किती बदमाश होता हें दिसून येतें. पण हिंदुस्थानांत त्यांची सत्ता झाली व ते राज्यकर्ते बनले.

## जन-शक्तीनें स्वराज्य

आतां इंग्रजाच्या हातची सत्ता आमच्या हातीं आलेली आहे. शास्त्रांत म्हटलें आहे कीं, 'राज्यान्ते नरकप्राप्तिः' राज्यानें अखेर नरक प्राप्त होतो. म्हणजे राज्य करणारा राजा मेल्यानंतर नरकांत जातो. लोक म्हणतील 'ह्याचा अर्थ मग स्वराज्य चालवितांच कामा नये.' ह्यावर माझें म्हणणें असें कीं स्वराज्य जरूर चालवा, पण राज्य नका चालवूं. वेदाचा ऋषि हि म्हणतो कीं 'यतेमहि स्वराज्ये' स्वराज्यासाठीं प्रयत्न करा. शास्त्रांत हि लिहिलें आहे कीं 'नत्वहम् कामये राज्यम्' म्हणजे मला राज्य नको, स्वराज्य पाहिजे. दिल्लीहून चालणारें तें राज्य, मग तें आमचे लोक कां चालवीना ना? दिल्लीहून चालतें तें राज्य पण गांवोगांवीं प्रत्येक मनुष्य स्वतःवर चालवितो तें स्वराज्य. मला उपाशी रहावें लागलें तरी हरकत नाहीं, मी चोरी करणार नाहीं याचें नांव स्वराज्य 'माझ्यावर दुसऱ्याची सत्ता चालत असेल तर तें स्वराज्य कसलें? स्वराज्याचा अर्थ च हा आहे कीं स्वतःचें स्वतःवर राज्य. अशा प्रकारें ज्यावेळीं लोकांना स्वतःवर नियंत्रण घालण्याची शक्ति येईल व त्यांना आपल्या कर्तव्याची जाणीव होईल त्यावेळीं 'स्वराज्य' येईल. तोंपर्यंत 'राज्य' च चालेल. मग तें हिंदीवाल्यांचें असो कीं तामीळवाल्यांचें असो. आम्हांला स्वराज्याचें काम करावयाचें आहे. त्यासाठीं जन-शक्ति निर्माण करावयाची आहे. लोकांच्या हृदयांत आत्मशक्तीचें भान निर्माण करावयाचें आहे. आमच्या गांवचा कारभार चालविण्यास आम्ही समर्थ आहों, कोणातीहि बाहेरची शक्ति आम्हांला अडथळा करूं शकणार नाहीं, अशी शक्ति लोकांच्या ठिकाणीं निर्माण झाली पाहिजे.

## स्वराज्याची दोन लक्षणें

दुनियेंतील दुसऱ्या कोणाची हि सत्ता आपल्यावर चालू न देणें हें स्वराज्याचें एक लक्षण आहे, आणि दुसऱ्या कोणावर आपली सत्ता चालवूं नये हें स्वराज्याचें दुसरें लक्षण आहे. कोणाची सत्ता आमच्यावर व आमची कोणावर चालणार नाहीं ह्या दोन गोष्टी मिळून स्वराज्य होतें. हें काम सरकारी शक्तीनें होणार नाहीं, लोकमानसांत परिवर्तन करून च होऊं

शकेल. त्या साठीं हृदय-शुद्धीची गरज आहे. लोकांत जाऊन हृदय-शुद्धि होईल असा प्रयत्न केला पाहिजे. त्यासाठीं च यज्ञ, तप दान ह्या गोष्टी आहेत.

**मलयकाटार्ट** ( कोयम्बतूर )
२९-१०-५६

## सत्ता नष्ट कशी होईल : ३१ :

सध्यां लोकांनीं धर्म-कार्याची व सेवा-कार्याची जबाबदारी थोडया लोकांवर टाकलेली आहे. किंवा असें म्हणा कीं थोडया लोकांनीं आपल्या कुशलतेनें सर्व जबाबदारी व सत्ता हि आपल्या हातांत घेतली व लोकांनीं तें सहन केलें. किंवा दुसऱ्या भाषेंत लोकांनीं त्यांच्या हातांत सत्ता दिली किंवा त्यांनीं सत्ता घेतली व लोक तिला वश झाले असें हि म्हणतां येईल.

### ‘ सत्तेच्या मार्फत सेवा ’ हा भ्रांति-मंत्र

हें कसें हि घडलें असो, पण जें घडलें त्याच्या मुळाशीं दुनियेंत सत्ते-मार्फत सेवा चांगली व जलद होते ही श्रद्धा आहे. म्हणून च ‘ सत्तेमार्फत सेवा ’ हा मंत्र निघाला. मी ह्याला ‘ भ्रांति-मंत्र ’ म्हणतों. प्रत्येक काळांत कांहींना-कांहीं भ्रम हि प्रभावी असतात. त्या भ्रमांना आधारभूत कांहीं सत्य च असतें. ह्या युगांत एका विशेष सत्याचें दर्शन झालेलें आहे. तें हें कीं ‘ प्रत्येक गुण व्यक्तिगत न राहतां सामूहिक बनला पाहिजे. ’ ह्या सत्याचें ओझरतें दर्शन पूर्वीं झालें नव्हतें असें नाहीं. दर्शन होतें च, पण तें ओझरतें होतें, पण विज्ञानामुळें त्याचें स्पष्ट दर्शन ह्या युगांत झालें आहे. परंतु ह्या सत्याबरोबर च त्याची छाया म्हणून भ्रांतिदर्शन हि झालेलें आहे. तसें होण्याची गरज नव्हती, पण तरी हि तें झालेलें आहे.

आज असें मानलें जातें कीं गुणाला सामूहिक स्वरूप अवश्य मिळालें पाहिजे व त्याच्या आधारावर सामूहिक जीवन चाललें पाहिजे. पण ह्यासाठीं

जी व्यवस्था लागेल, त्यासाठीं सत्ता पाहिजे. म्हणजे गुण स्वतः होऊन स्वतःची प्रतिष्ठा करूं शकत नाहीं, त्यासाठीं सत्ता पाहिजे असा ह्याचा अर्थ झाला. म्हणून आजच्या लोकशाहींत लोक येथपर्यंत म्हणतात कीं ज्ञानानें गुणाचा प्रचार झाला पाहिजे व शासनाचें म्हणजे च सत्तेचें स्वरूप त्याला अनुकूल पाहिजे. केवळ सत्तेनें किंवा केवळ गुण-प्रसारानें काम भागत नाहीं. गुण-प्रसारासाठीं दुसऱ्या शक्तींची म्हणजे च सत्तेची गरज आहे. म्हणून पहिल्यानें सत्ता मान्य करण्याचा गुण लोकांत असला पाहिजे. ह्यासाठीं च शिस्तीचें शिक्षण दिलें जातें, शिक्षण सरकारच्या हातीं दिलें जातें व कायदे बनविले जातात. अशा प्रकारें अनेक प्रकारांनीं लोकांना विशिष्ट पद्धतीनें वागावयास लावलें जातें. ह्याचा परिणाम असा होतो कीं त्या गुणाचें महत्त्व कमी होतें.

आज दुनियेंतील पुष्कळ विचारक म्हणतात कीं "हल्लींचा समाज हा आदर्श समाज नाहीं व विनोबा तर आदर्श समाजाच्या गोष्टी सांगत आहेत, त्या आजच्या समाजाला लागू नाहींत. आदर्श समज येण्यास बराच अवकाश लागेल. पण मधल्या संक्रमण काळांत सत्तेची गरज आहे." म्हणून आज सर्वांना सत्तेचा मोह आहे. पण माझें तर म्हणणें हें आहे कीं, 'माझी कोणावर सत्ता चालू नये' अशी बुद्धि जोंपर्यंत मनुष्यांत निर्माण होत नाहीं तोंपर्यंत समाज च बनत नाहीं. आदर्श समाजाची गोष्ट दूरच. सामाजिक कार्य हें सत्तेमार्फत होतें हा केवळ भ्रम आहे. वस्तुस्थिति अशी आहे कीं सत्तेद्वारा समाज च बनूं शकत नाहीं. 'तुम्हांला पटो वा न पटो माझ्या विचाराची सत्ता तुमच्यावर चालली पाहिजे' असा मी विचार करीत असेन तर मी समाज-द्रोही व अहंवादी आहें असें म्हटलें पाहिजे. विचार-स्वातंत्र्याची गरज स्वतःसाठीं मात्र आहे, दुसऱ्यासाठीं तें आवश्यक नाहीं असें मानल्याबरोबर समाजाचे दोन तुकडे पडतात व समाज च बनत नाहीं. म्हणून गुणांना सामाजिक स्वरूप देण्याच्या कामीं जे कांहीं अडथळे असतील ते दूर केले च पाहिजेत. ह्या कामामध्यें सत्ता आली कीं हे अडथळे निर्माण होतात. ही गोष्ट समजण्यास थोडी सूक्ष्म आहे, पण ती समजून घेतलीच पाहिजे.

## गृहस्थाश्रमांत सत्ता

देवानें आईबापांच्या स्वाधीन मुलें केलीं आहेत. तुम्हांला माहीतच आहे कीं ४/५ वर्षांचें मूल झालें कीं त्याच्या डोक्यांत स्वतंत्र विचार येण्याला सुरवात होते व तेंव्हांपासून त्याच्या व आईबापांच्या विचारांत टक्कर होणें सुरू होऊन जातें. ह्यावेळीं आईबाप काय करतात? ह्या बाबतींत जुन्या लोकांचें एक वचन आहे पण तें अत्यंत भ्रांतिमूलक आहे. गृहस्थानें सर्व प्रकारच्या हिंसेचा त्याग करावा असा आदेश आहे. पण त्याला हि दोन अपवाद राखले आहेत. 'अन्यत्र पुत्रात् शिष्यात् वा' पुत्र आणि शिष्य सोडून कोणाला त्यानें ताडन करतां कामा नये असें वचन आहे. पुत्राला आणि शिष्याला मात्र विद्येसाठीं ताडन केलें च पाहिजे. गृहस्थाच्या अहिंसेच्या विधानांत हा अपवाद घातला असल्यामुळें तो भूतदयात्मक आहे ह्यांत शंका नाहीं. आम्हीं मुलांना व शिष्यांना ताडन केलें नाहीं तर ते आडमार्गाला लागतील अशी भीति मागें आहे. मुलांना आपलें हित समजत नाहीं म्हणून प्रसंगी प्रेमपूर्वक त्यांच्या हितार्थ ताडन केलें च पाहिजे.

ह्या बाबतींत माता-पितरांनीं व त्यांना सल्ला देणारांनीं हार खाऊन दंडशक्तीला वरदान देऊन टाकलें आहे. आई-बापाच्या पोटीं जन्मलेल्या त्या मुलाची स्थिति काय होती? मानवाचे दुसरे गुण त्याच्या ठिकाणीं नव्हते पण एक गुण होता–श्रद्धा. बाकीचे गुण तर मागाहून येणारे आहेत. मुलानें आईच्या पोटीं श्रद्धेसह जन्म घेतला. तो श्रद्धापूर्वक आईच्या स्तनाला आशीर्वाद मानतो. त्याच्या मनांत ह्या दुधानें मला पोषण मिळेल कीं नाहीं अशी शंका, तर्क किंवा युक्तिवाद मुळींच उठत नाहीं. तो पूर्ण श्रद्धेनें स्तनपान करतो. त्याची आई पथ्यकर आहार घेणारी नसून त्याचें नुकसान होणार असलें तरी त्याच्या श्रद्धेंत बिघाड येत नाहीं. त्यानंतर थोडा मोठा झाल्यावर आई जें कांहीं म्हणते तें तो प्रमाण मानतो. आईनें म्हटलें हा चांदोबा आहे कीं मुलगा निःशंक त्याला चांदोबा मानून घेतो. इतका श्रद्धावान् प्राणी आपल्या हातीं आला असतां त्याला मारण्याची पाळी आपल्यावर यावी ही आपल्या केवळ्या नालायकीची गोष्ट आहे? इतकें

असून हि आम्ही मानतों कीं मुलाला दंड केला कीं गुण वाढतील. दंड करणें हाच मुळीं दोष आहे, तो सहन करणें दुसरा दोष व दंडाच्या भीतीनें आपल्या वर्तनांत बदल करणें हा तिसरा दोष. ह्या त्रिदोषामार्फत गुणप्रचार करण्याचा आमचा मानस असतो! आमच्या गृहस्थाश्रमांत अशा प्रकारची सत्ता चालते.

## विद्यालयांत व धर्मसंस्थांत सत्ता

सध्यां शाळांतून हि सत्ता चालते. 'मुलें शिस्त पाळीत नाहींत' अशी हल्लीं सर्वत्र तक्रार आहे. पण ती करणारे ज्ञानी माणसांचा अनुभव विसरून जातात. ज्ञानी लोकांनीं म्हटलें आहे कीं, 'शिष्यापराधे गुरोर्दंडः' विद्यार्थ्यांत शिस्त नसेल तर तो दोष शिक्षकांचा आहे, शिक्षण-पद्धतीचा आहे, समाज-व्यवस्थेचा आहे. आज आम्हीं शिस्त हाच काय तो मोठा भारी गुण मानला व दुसरे गुण त्याच्या मानानें गौण मानले. वस्तुतः नीट समजूत पटल्या-खेरीज शिष्यानें एखादी गोष्ट मानली तर गुरूला दुःख झालें पाहिजे व तो पटल्याखेरीज आपली गोष्ट मानीत नसला तर त्याला आनंद झाला पाहिजे. असें होईल तर च गुणांची खरोखर वृद्धि होईल. सध्यां गृहस्था-श्रमांत जी सत्ता शिरलेली आहे, तिची वास्तविक तेथें गरज नाहीं. कारण मुलें स्वयंसिद्ध श्रद्धावान् असतात. विद्येंत हि आम्हीं सत्तेला स्थान दिलें, तेथें हि तिची मुळीं च गरज नाहीं. कारण गुरु ज्ञानी असतात व ज्ञानाहून अधिक सत्ता कोणाची चालू शकेल ?

धर्मसंस्थांत हि आम्हीं सत्तेला जागा दिली आहे. कोणी हि संत पुरुष सत्ता इच्छीत नाहीं व कोणता हि मठाधिपति सत्ता सोडण्यास तयार नसतो. म्हणजे अगदीं च उलटा प्रकार चाललेला आहे. संतांचें कार्य चालू ठेवण्यासाठीं मठ, मंदिर इ० ची योजना असते. शंकराचार्यांनीं सर्व वस्तूंचा त्याग केला, आपल्याजवळ कोणत्या हि प्रकारची सत्ता ठेवली नाहीं. त्यांनीं म्हटलें आहे कीं, "तुम्हांला पटेपर्यंत सतत मी विचार समजावून सांगत राहीन. हें च माझें शस्त्र आहे. मी तुमच्याकडून कांहीं करवूं इच्छीत नाहीं. फक्त तुम्हांला समजावूं इच्छितों." पण आज त्यांचे मठाधिपति सर्व प्रकारची सत्ता चालवीत आहेत. त्यांच्या नांवाचीं आज्ञापत्रें

निघत आहेत, ते कांहीं लोकांना बहिष्कृत करीत आहेत व प्रायश्चित्त घेण्यास सांगत आहेत. आपल्या च देशांत नव्हे तर यूरोपांत हि ही च स्थिति आहे. वास्तविक धर्माच्या क्षेत्रांत, विचार समजावून देण्याचाच प्रश्न असल्यामुळें, सत्तेला मुळींच स्थान नसलें पाहिजे.

अशा प्रकारें घर, शाळा व धर्म-संस्था ह्या सर्व ठिकाणीं आम्हीं सत्तेला स्थान दिलें आहे. त्यामुळें समाज-व्यवस्थेंत हि स्वाभाविक तिला स्थान मिळालें आहे. म्हणून सारें सत्तेचें राजकारण वरवरून खुडून नाहींसें होणार नाहीं. त्यांत जो दोष आहे, तो मानवाच्या हृदयांतला आहे, म्हणून त्याचें आधीं निवारण केलें पाहिजे.

## सत्ता सोडा

दुनियेंत ह्या साऱ्या सत्ता चालू असून, शांतीची इच्छा असून हि शांति होत नाहीं. ह्याचा एकमात्र उपाय सत्ता सोडणें हा आहे. पण सत्ता-धारी व सत्ताकांक्षी लोकांना तो सुचत च नाहीं. व त्यांना तो सुचणार हि नाहीं, कारण ते सत्तेचे बनलेले जीव आहेत. पण आई-बाप, गुरु व धर्म-गुरु ह्यांना तो कां सुचत नाहीं? ह्या तीन क्षेत्रांत परिवर्तन झालें तर राजकीय क्षेत्रांत तें झाल्याशिवाय राहणार नाहीं. त्यासाठीं जितका काल लागेल तितका आपण दिला पाहिजे. उलटपक्षीं जर ही गोष्ट लवकर होते असें दिसलें तर शंका आली पाहिजे, कीं जुन्याच पद्धतीनें तर हें काम होत नाहीं ना? मी रात्रीं निजतांना ध्यान करीत असे. एक-दीड महिन्यांत च माझी समाधि लागूं लागली. तेव्हां मला शंका आली कीं ज्या समाधी-साठीं इतके परिश्रम करावे लागतात ती इतक्या लवकर कशी लागूं लागली? तेव्हां ह्या गोष्टीची परीक्षा करण्यासाठीं मी रात्रींच्या ऐवजीं सकाळीं उठून ध्यान करूं लागलों. पण समाधि लवकर लागेना. तेव्हां माझ्या लक्षांत आलें कीं रात्रीं जी समाधि लागत होती, तिच्यांत निद्रेचा अंश होता. म्हणून जलदी समाधि लागूं लागली तर साधकाला शंका आली पाहिजे. ह्याच न्यायानें आमची गोष्ट चटकन् लोक मान्य करूं लागले तर आम्हांला अवश्य शंका आली पाहिजे. म्हणून त्यासाठीं जो काळ लागत आहे तो जास्त नसून इतका काल त्यासाठीं आवश्यक च आहे.

## सूर्यासारखा निष्काम कर्मयोग

सत्तेची ही अभिलाषा कशी दूर होईल त्याबद्दल माझें निरंतर चिंतन चाललें आहे. त्याबरोबर मीं माझ्या मनाचें असें हि संशोधन चालविलें आहे कीं सर्वांवर आपल्या विचाराची सत्ता चालली पाहिजे अशी इच्छा तर आपल्या मनांत चुकून लपलेली नाहीं ! आमचें म्हणणें लोकांनीं मानलें कीं सुख व न मानलें तर दुःख असा जर आम्हांला अनुभव येत असेल तर समजावें कीं आपण लोकांवर कांहीं ना कांहीं सत्ता चालवूं इच्छीत आहो. म्हणून माझी ईश्वराला हीच प्रार्थना आहे कीं, 'माझा परिणाम समाजावर झाला पाहिजे' अशी थोडी सुद्धां भावना माझ्या मनांत असेल तर ती त्यानें दूर करावी. दुसऱ्यावर उपकार करण्याची वासना सोडून जर आपण काम करूं तर त्याचा शीघ्र परिणाम होतो अशी माझी श्रद्धा आहे. सूर्य उगवतो व सर्व दुनियेला प्रकाशित करतो. पण तो 'लोकांनीं लवकर उठलें पाहिजे, लवकरांत लवकर दारें उघडलीं पाहिजेत व आपल्याला घरांत प्रवेश दिला पाहिजे' अशी थोडी तरी वासना राखतो काय? तो केवळ उगवतो. तो सेवक आहे, स्वामींच्या दरवाजावर उभा राहतो. कोणीं दार न उघडलें तर तो आंत जात नाहीं बाहेरच उभा राहतो. कोणीं थोडेंसें दार उघडलें तर थोडासा च आंत जातो पूर्ण दार उघडलें तर पूर्ण आंत जातो. स्वामींना पाहिजे तेव्हां उठण्याचा, हक्क आहे. ते निजून राहिले असले तरी तसें करण्याचा त्यांना हक्क आहे. पण सेवकाला निजण्याचा हक्क नाहीं. त्याला स्वामींच्या सेवेसाठीं सतत जागे राहिले पाहिजे. स्वामींनीं लवकर उठावें अशी वासना त्यानें राखतां कामा नये. अशा प्रकारें सूर्यनारायणाचा आदर्श डोळ्यापुढें ठेवून आम्ही निष्काम कर्म-योग करीत राहूं, तर दुनियेंतून सत्ता लवकरांत लवकर नाहींशी होईल.

पळणी (मदुरा), ता. १८-११-५६

## सेवेच्या द्वारा सत्तेची समाप्ति

कोणा हि माणसावर आपली सेवा लादावयाची नाहीं असा सर्वोदयाचा सिद्धांत आहे. ह्यावर कोणी म्हणेल 'सर्वांना जोंपर्यंत आमची सेवा

पसंत पडणार नाहीं, तोंपर्यंत सेवा च करायची नाहीं काय ?" ह्याला उत्तर हें कीं सेवा आम्ही अवश्य करूं, पण निवडणुकीच्या द्वारा नव्हे, तिच्याशिवायच. सेवेसाठीं निवडून येण्याची गरज च काय ? बाबा सेवा करीत करीत पायीं फिरत आहे, त्याला कोणीं निवडलें आहे ? त्यानें स्वतःच स्वतःला निवडलें. त्याला कोणी म्हणत नाहीं कीं, "तुम्ही निघून जा, तुमची सेवा आम्हांला नको. आम्ही तुम्हांला निवडून देत नाहीं" सारांश, सेवेंत निवडण्याचा प्रश्नच कोठें येतो ? एखादा भला माणूस आजारी माणसाजवळ जाऊन म्हणाला कीं 'माझ्याजवळ औषध आहे तें तुला देतों.' तर तो 'मीं तुला निवडलें नाहीं, तुझें औषध मला नको' असें का म्हणणार आहे ? कोणी हि दुःखी प्राणी तें औषध घेईल. सेवेसाठीं निवडणुकीची गरज नाहीं, हें समजून घेऊन आमचा कोणी हि कार्यकर्ता निवडणुकीमार्फत मिळणारें स्थान, जबाबदारी किंवा पदवी घेणार नाहीं. तो लोक-नीति मानणारा असेल व सरळ लोक-सेवक बनेल. सरकारमार्फत लोकांना बदलण्याच्या ऐवजीं लोकांमार्फत सरकारला बदलील. हा आमचा दुसरा मार्ग आहे.

सरकारमार्फत लोकांना बदलण्याचा प्रयत्न यच्चयावत् राजकीय पक्षांचा असतो. आम्ही त्याच्यावर टीका करणार नाहीं. त्यांच्या विचाराचे लोक दुनियेंत अधिक आहेत. आमच्या विचाराचा समाज लहान आहे. सत्तेमार्फत सेवा करावी असें च मानणारा समाज आज दुनियेंत फार मोठा आहे. आम्ही म्हणतों सेवेच्या द्वारा आम्ही सत्ताच नष्ट करूं. ह्याशिवाय हि आणखी एक पंथ आहे. तो म्हणतो, 'सेवाद्वारा सत्ता मिळवूं' आज सत्ता आमच्या हातीं नाहीं. आम्ही सेवा करीत करीत ती प्राप्त करूं.

गांधीग्राम (मदुरा), ता. ३०-११-५६

## सरकार आणि शांतिसेना

: ३२ :

### सरकारवर भरवसा तर जनता अनाथ

देशाचा कारभार व त्याचें रक्षण सरकार करतें. सरकार कोणत्या तरी एका पक्षाचें असतें. पांच वर्षांनंतर त्याला बदलतां येतें. फ्रान्ससारख्या देशांत तर सरकार बनत च नाहीं. चार पांच महिन्यांत नवें सरकार येतें. पक्षीय राजकारण जसजसें वाढत जाईल तसतसा ह्या बाबतचा अनुभव हि वाढत जाईल. अनेक पक्ष निर्माण होतात. एका पक्षाची आयडियालॉजी ( विचार-सरणी ) दुसऱ्याशीं मिळत नाहीं व त्यांच्यांत टक्कर होते. लोक कधीं ह्या पक्षाला वर कधीं त्या पक्षाला निवडून देतात. कधीं कधीं ज्याच्या हातांत लष्कर असतें तो च सत्ता बळकावून बसतो असें हि घडतें. लष्कराचा सेनापति ( कमांण्डर इन् चीफ ) हा लोक-प्रिय असला व मंत्रिमंडळ दुर्बल असलें व लोकांत पक्षांचे झगडे असले तर तोच, इजिप्त मध्यें नासिरनें घेतली तशी, सर्व सत्ता आपल्या हातीं घेतो. लोकशाहींत एखादा हिटलर हि पुढें येतो. एखाद्याचा मंत्र चालला तर त्यानें भारलेले लोक त्यालाच वारंवार निवडून देतात. प्रे. रुझवेल्ट चार वेळ निवडून आले. ते न मरते तर पांचव्यांदा हि निवडून आले असते. कारण त्यांच्या जादूचा प्रभाव लोकांवर होता. म्हणून पक्षीय राजकारणानें लोकांचें रक्षण होतें ही समजूत भ्रामक आहे. लोक अनाथचे अनाथ च राहतात. त्यांच्यांत आमचें रक्षण आम्ही करूं शकतों अशी हिंमत नसते.

### नाममात्र लोकशाही

आम्ही आमचें रक्षण, आमचा न्याय किंवा आमचा कारभार करूं शकत नाहीं. जें कांहीं करावयाचें तें आमचे प्रतिनिधि करतात. प्रतिनिधि कोणाचे ? तर आमचे. म्हणजे आम्ही मालक व ते आमचे नोकर. नोकराच्या हातीं सर्व सत्ता, मालक मात्र कांहीं करूं शकत नाहीं! मी मोठा मालक असेन, पण मला तहान लागली तर मी स्वतः जाऊन पाणी पीत नाहीं. नोकर नसला तर पंधरा मिनिटें पाण्यासाठीं थांबेन. तो येईल,

पाणी आणील व नंतर मी पाणी पिईन. तो वारंवार उशीर करूं लागला तर त्याला काढून दुसरा नोकर ठेवीन. पण स्वतः घेऊन पाणी पिणार नाहीं. नोकर पाणी आणील तर मी पिईन तो नसला तर त्याची वाट पाहीन. कारण मी मालक आहें. स्वतः होऊन पाणी पिण्याची शक्ति माझ्या ठिकाणीं नाहीं. घटनेंत मालकानें स्वतः पाणी आणून प्यावें असें थोडेंच लिहिलें आहे! त्यांत पाणी नोकरानें आणावें असें विधान आहे. तो कामांत ढिलाई करीत असेल तर पांच वर्षांनंतर त्याला काढून आम्ही दुसरा नेमूं शकतों. अशा प्रकारें आम्ही नाममात्र मालक आहोंत. वस्तुतः आम्ही गुलाम आहोंत. नांव मालक, पण त्याचा अर्थ 'गुलाम.' एखाद्या दरिद्री मुलीचें नांव लक्ष्मी नसतें का? किंवा मूर्ख मुलींचीं नावें हि विद्या, सरस्वती अशी नसतात का? त्याच प्रकारचें डेमॉक्रसी ( लोकशाही ) हें नांव आहे. सर्व लोक वस्तुतः मालक असून ते नोकर निवडतात. पण स्वतःच्या हातानें पाणी घेण्याचा अधिकार त्यांना नाहीं. लोक स्वतः उठूं शकत नाहींत, माठाजवळ जाऊं शकत नाहींत, त्यावरचें झांकण काढूं शकत नाहींत किंवा त्यांत तांब्या घालून पाणी काढून पिऊं शकत नाहींत. ते नोकराची वाट पाहत राहतील. ही स्थिति केवळ याच देशाची आहे असें नाहीं, सर्व दुनयेंत हीच स्थिति आहे.

## पक्षांपासून मुक्ति पाहिजे

हें सर्व, शांतिसेना, सर्वोदय, ग्रामदान वगैरे काय आहे? ह्या सर्वांचा एकच भावार्थ आहे व तो हा कीं आपला कारभार आपण आपल्या हातीं घ्यावयाचा आहे. आज पक्ष बनवून आम्ही आमच्यावर सत्ता लादून घेत आहोंत व स्वतः कांहीं एक करीत नाहीं. म्हणून पक्षापासून आपणास मुक्त व्हावयाचें आहे. 'उद्धरेदात्मनात्मानं'—स्वतःचा उद्धार स्वतःच करावा लागेल.

## संमतीचा गोवर्धन

सरकार लष्कर राखतें. पण त्याच्या पाठीशीं तुमची संमति असते. तुमच्यापैकीं प्रत्येक त्याला मदत करीत असतो. सैन्यावर जो २००/३०० कोटि रुपये खर्च होतो, तो सर्व तुम्ही देत आहांत. माझ्यासमोर

बसलेला छोटासा मुलगा हि कर देत आहे. तो कपडा वापरत नाहीं काय? कपड्यावर कर आहे. तो पोस्ट कार्ड लिहितो, त्याच्यावर हि कर आहे. कधीं कधीं आगगाडींत बसत असेल, तर तेथें हि कर आहेच. तुम्ही सर्व जण कर देतां व कर देणें म्हणजेच संमति देणें. सरकार कांहीं हि करो, त्याला तुमची संमति आहे असा ह्याचा अर्थ आहे. अर्थात् त्यानें राखलेल्या लष्कराला हि तुमची संमति आहे च. अशा प्रकारें सर्व लोकांची संमति असणें ही एक शक्ति आहे. म्हणून माझी अशी इच्छा आहे कीं गांवोगांवच्या लोकांनीं आपली शांतिसेना तयार करावी. गांवची नित्य सेवा करण्यास तीच सेवा-सेना म्हणून राहील व गांवच्या रक्षणाच्या वेळेस शांतिसेना म्हणून काम करील. ह्या शांति-सेनेच्या पाठीशीं शक्ति कोणती राहील ? तुमची सर्वांची संमति. संमति नसेल तर ती काम करूं शकणार नाहीं.

येथील पुष्कळशा लोकांनीं संपत्ति-दान दिलेलें आहे. त्याचा अर्थ इतकाच कीं इतक्या लोकांची संमति आम्हांला मिळाली. पण सरकारच्या कारभाराला व सैन्याला ह्या छोट्या मुलाची हि संमति आहे. तो कपडा वापरतो त्याचा कर सरकारला जातो. ह्या पद्धतीनें माणूस सरकारला आपली संमति देत असतो, त्याशिवाय सरकारला शक्तिच प्राप्त होणार नाहीं. ह्याच न्यायानें तुम्हां सर्वांची संमति जोंपर्यंत शांतिसेनेला मिळत नाहीं तोंपर्यंत तिला हि शक्ति प्राप्त होणार नाहीं. थोड्या लोकांनीं संपत्ति-दान दिलें आहे, आणखी हि लाखों करोडों देतील, सेवेचें काम हि पुष्कळ होईल, पण तरी हि तुमच्या सर्वांची संमति मिळाल्याखेरीज शांति-सेनेची शक्ति वाढणार नाहीं. म्हणून प्रत्येक घराकडून तिला 'संमति-दान' मिळालें पाहिजे. फक्त संपत्तिदान पुरेसें नाहीं. शांति-सेनेचा खर्च संपत्ति-दानांतून चालेल पण तिला शक्ति प्राप्त होईल ती संमति-दानांतून. त्यासाठीं प्रत्येक बाल-वृद्धाची, स्त्री-पुरुषाची सर्वांची संमति तिला पाहिजे. तुम्हांला गोवर्धन पर्वताची कथा माहीत आहे? भगवान् म्हणाले मी पर्वत उचलूं शकतों, उचलेन हि, पण त्यानें तुम्हांला शक्ति प्राप्त होणार नाहीं. म्हणून गोकुळां-तील बाल-वृद्ध, स्त्री-पुरुष सर्वांनीं मिळून गोवर्धन उचलला व शेवटीं भगवंतांनीं आपली करांगुळी त्याला लावली. सारांश हा कीं सर्वांचे हात लागत नाहींत तोंपर्यंत शक्ति निर्माण होत नाहीं.

### प्रत्येक घरांतून एक गुंडी

शांतिसेनेची शक्ति वाढली पाहिजे. त्यासाठीं तुम्ही काय करावयास पाहिजे ? प्रत्येक घरांत जितकीं माणसें असतील, त्या प्रत्येकाच्या वतीनें संमतिदान म्हणून कांहीं तरी दिलें पाहिजे. संपत्ति-दान ही अगदीं प्रत्यक्ष मदत झाली. त्यांत हि संमति आहेच. पण ती प्रत्येक बाल, वृद्ध किंवा स्त्रीची नसते. प्रत्येक घरांतल्या सर्वांनीं संमति-दान द्यावयाचें आहे. तें कसें होणार ? मीं सुचविलें आहे कीं पैशाच्या ऐवजीं श्रम द्या. प्रत्येक महिन्यांत पांच माणसांच्या कुटुंबांतून एक गुंडी मिळाली पाहिजे. तिची किंमत २० नये पैसे होईल. म्हणजे पांच माणसांच्या कुटुंबांतून माणशीं प्रत्येक चार पैसे मासिक मिळाले पाहिजेत. असें झालें तर फार मोठी क्रांति होऊन जाईल. घरोघर उत्पादन सुरू होईल. म्हातारीं व आजारीं माणसें हि गुंडी देऊं शकतील, हें झाल्यास सर्व घरांची संमति आम्हांला मिळेल. एका गुंडीनें शांति-सेनेला फार मदत मिळणार नाहीं. ज्यादा मदत संपत्तिदानांतूनच मिळेल. पण शक्ति संमतिदानानें प्राप्त होईल. म्हणून प्रत्येक घराची संमति मिळाली पाहिजे.

### कोणाचा तोटा नाहीं

हा नवा विचार आहे. त्याचा हळू हळू मी विकास करीत आहें. केरळांतच मला हा विचार सुचला. म्हणून तुम्हां लोकांवर ह्याची जबाबदारी येते. केरळांत १ कोट ३६ लक्ष लोक आहेत. म्हणून ३६ लाखाहून अधिक गुंड्या घरां-घरांतून जमा झाल्या पाहिजेत. एकाच घरांतून ५-१० गुंड्या मिळून २५ लाख गुंड्या झाल्या तर तें चालणार नाहीं. घरांत पांच माणसें मानून त्या हिशोबानें प्रत्येक घरांतून एक गुंडी मिळाली पाहिजे. अखिल केरळांतुन हें संमति-दान जेव्हां मिळणार असेल तेव्हां मिळो. पण एका तालुक्यांत किंवा क्षेत्रांत हें काम सुरू होऊन गेलें पाहिजे. एका तालुक्यांत हें काम यशस्वी झालें तर त्याचा प्रभाव सर्व हिंदुस्थानावर पडेल. ह्या कामानें कोणत्या हि पक्षाचें नुकसान होणारें नाहीं. गांवांत शांति-सेना झाली तर न्याय निवाडा त्या गांवांत च होईल, झगडे कमी होतील, चोऱ्या कमी होतील, व पुष्कळसें समाधान लाभेल. परस्पर सहकार्याचें वातावरण निर्माण होईल. ह्यांत कोणत्याच पक्षाचा कसलाहि तोटा नाहीं.

## सरकार विरोध कां करील?

एका गृहस्थानें विचारलें, सरकारनें विरोध केला तर काय करावयाचें? सरकार मार्फत ह्याला विरोध होण्याचें कारण दिसत नाहीं. लोक जर एक एक काम हातीं घेतील तर सरकारचा बोजा कमी होईल. ज्या देशांतील लोकांत शक्ति असेल, त्या देशाची शक्ति वाढते. समजा हल्ला झाला, तर सैन्य ठिकठिकाणीं विखुरलें जाईल, अब्जावधि रुपये खर्च होतील लोक भयभीत होतील. ह्या उलट जर गांवोगांवीं शांति-सेना असेल तर अशा प्रसंगीं सरकारला मदत मिळेल. मग सरकारला ठिकठिकाणीं सैन्य पाठवावें लागणार नाहीं कारण लोक स्वत:च स्वत:चें रक्षण करण्यास समर्थ राहतील. लोकांचा धीर व शक्ति कायम राहतील. व त्यामुळें सरकारच्या सैन्याची शक्ति खूप वाढेल.

इतका सुंदर विचार मीं तुमच्यासमोर मांडला आहे. पण तो केवळ ऐकून घेऊन भागणार नाहीं. तुम्हांला कांहीं कृति हि करावी लागेल. तुम्ही तुमच्या ह्या गांवांत हि शांति-सेना तयार करूं शकतों. ह्या कार्याला बाल-वृद्ध स्त्री-पुरुष सर्वांची सहानुभूति तुम्हांला प्राप्त होईल. सर्व राजकीय पक्षांचें समाधान होईल. शांति-सेनेचा प्रभाव गांवोगांव पडेल तेव्हांच देश वांचेल, नाहीं तर देशाच्या रक्षणाला धोका आहे. योजना अशी पाहिजे कीं सरकारला लष्कर किंवा पोलिस पाठविण्याचा प्रसंगच येऊं नये. इतकी स्वसंरक्षण क्षमता आपल्या ठिकाणीं पाहिजे. पण ती येणार कोठून? त्यासाठीं समाजांत शक्ति निर्माण करावी लागेल. म्हणून शांति-सेना हीच नित्य सेवा करणारी सेवा-सेना राहील. तिचे सैनिक ग्रामदान, भूदानादींचा प्रचार करतील, लोकांची सेवा करतील व प्रसंगीं बलिदान देण्यास तयार राहतील. ही भूदान-यज्ञाची नवी प्रक्रिया आहे. सामान्य भूदानांत मी जमिनीचा लहानसा हिस्सा मागत होतों, त्या नंतर मालकीच्या विसर्जनाचें आवाहन मीं केलें. ग्रामदानांतून ग्राम-स्वराज्य निघालें. आतां ग्रामरक्षणाची बाब आली आहे. आणि शांति-सेनेची अखेरची गोष्ट सुचली आहे.

तेरुवत्तुकट्टु (कोझीकोड), ता. २६-७-५७

आमचा देश फार मोठा आहे. येथली लोकसंख्या मोठी व देशाचा विस्तार हि मोठा. आतां स्वराज्य हि मिळालें आहे. पण एवढयानें च देशाची शक्ति वाढणार नाहीं. देशाची शक्ति तेथील लोकांच्या चारित्र्यानें वाढते. देशाचें लष्कर बलवान् आहे म्हणून देश बलवान् होत नाहीं. देशांतील गुणांवर त्याची शक्ति अवलंबून असते. म्हणून देशाचा विकास व त्याची उन्नति व्हावयाची तर त्यांतील लोकांच्या गुणांचा विकास करावयास पाहिजे.

## भित्र्या देशाला लष्कर वाचवूं शकत नाहीं

सध्यां लोकांनीं बहुतेक सारा भार सरकारच्या शिरावर टाकलेला आहे. ते फार तर सरकारला थोडें बहुत सहकार्य देतात. मोठें लष्कर उभारण्यासाठीं पैसा लागतो, तो कररूपानें लोक देतात व आपण सुरक्षित झालों असें समजतात. परंतु जोंपर्यंत स्वतः निर्भय बनले नाहींत तोंपर्यंत सुरक्षित होत नाहींत. दुर्बळ च राहतात. कारण त्यांचा सर्व भरवंसा सैन्यावर आहे. आमचें रक्षण आम्ही करूं शकूं असा विश्वास त्यांना नाहीं. त्यांचा विश्वास सैन्यावर आहे. त्यांचें जीवन भोगविलासपर बनलें आहे. ते रोज सिनेमा पाहत आहेत. शृंगारिक साहित्य वाचीत आहेत. व्यसनांत मग्न आहेत. रात्रीं जागतात. पहांटेस उठत नाहींत. पावसाला भितात, उन्हांत काम करीत नाहींत. सर्व माणसें नाजुक बनलीं आहेत. अशा स्थितींत लढाई सुरू झाली व आमचें सैन्य मागें हटत आहे अशी बातमी ऐकल्याबरोबर काय होतें ? आतां आमचें काय होणार म्हणून सर्वच्यासर्व खचून जातात. देशाचें मॉरल च नाहींसें झाल्यासारखें आहे. भित्र्या देशाला लष्कर वाचवूं शकत नाहीं. म्हणून देशाचा प्रत्येक माणूस–स्त्री पुरुष, मुलगा मुलगी– निर्भय बनला पाहिजे. नाजूक बनतां कामा नये. भोग-साधनें वाढवितां कामा नये. अशा प्रकारची कृति, निर्भयतेची तपस्या देशाकडून होईल तेव्हां च तो बलवान होईल. ह्याचाच अर्थ हा कीं देशांतील गुण वाढले पाहिजेत.

## ज्ञान-तृष्णा वाढली पाहिजे

समजा, देशांत युनिवर्सिटच्या व कॉलेजें खूप वाढविलीं, जो तो उठला कॉलेजमध्यें जाऊं लागला. ज्ञानप्राप्तीसाठीं नव्हे, कारण ज्ञान त्याच्या शिरावर लादलें जातें. आणि जें लादलें जातें तें ज्ञान कसलें? मग तो कशासाठीं जातो? तर कॉलेजमध्यें गेल्यानें नोकरी मिळेल म्हणजे काम न करतां जेवण्याची सोय होऊन जाईल. म्हणून सुशिक्षितांची संख्या आज खूप वाढली असून हि ज्ञान वाढलेलें नाहीं. किंवहुना कामाशिवाय राहण्याची प्रेरणा वाढली. ह्यामुळें जितक्या युनिवर्सिटच्या वाढतील, तितका देश उत्तरोत्तर नालायक व दुर्बल बनत जाणार. पण लोकात ज्ञानाची खरीखुरी जिज्ञासा असेल तर देश उन्नत होईल. देशांतील प्रत्येक मुलगा शेतावर जाऊन काम करतो व सांयकाळीं घरीं आल्यावर अभ्यास करतो, रात्रीं लवकर निजतो, पहांटें लवकर उठतो, कामावर ६ वाजतां जावयाचें तर त्याच्या आधीं दोन तास गंभीर आध्यात्मिक अध्ययन करतो, म्हणजे खाल्ल्याशिवाय जसा त्याचा दिवस जात नाहीं, त्याचप्रमाणें ज्ञानाशिवाय हि जात नाहीं. अशाप्रकारें लोकांत ज्ञानाविषयीं प्रेम निर्माण झालें तर देशाची उन्नति होईल. केवळ युनिवर्सिटच्या वाढवून ती होणार नाहीं. प्रत्येकाची ज्ञान-तृष्णा वाढली पाहिजे.

## उन्नति कारुण्य गुण वाढल्यानेंच होईल

गरिबांच्या सेवेसाठीं सरकारला पैशाची गरज़ आहे. उत्पादन वाढवायाचें आहे, त्यासाठीं पैसा पाहिजे तर सरकार कर लावतें व त्यांतून दवाखाने उघडतात. म्हणजे तुमच्याकडून गरिबांची सेवा होऊन गेली. पण ह्यानें कारुण्य गुणाचा विकास होत नाहीं. लोक थोडा थोडा पैसा जमा करून त्यांतून दवाखाना चालवितील तर कारुण्याचा विकास होईल. प्रत्येक घरचा मुलगा म्हणेल कीं माझ्या घरच्या दानानें दवाखाना चालला आहे. आज मुलगा काय म्हणेल? मी चहा प्यालों, म्हणून दवाखाना उभा झाला. सरकारी शक्तीनें दवाखाने बनले तर देशाची उन्नति होणार नाहीं. कारुण्य गुण वाढेल तेव्हांच उन्नति होईल.

सरकार दवाखाने काढते, त्याला माझा विरोध नाहीं. कॉलेजें काढते त्याचा हि मी निषेध करीत नाहीं. गरज असल्यास त्यानें सैन्य राखलें तर त्याला हि माझा विरोध नाहीं. माझें म्हणणें एवढेंच कीं निर्भयतेची जागा लष्कर घेऊं शकत नाहीं, कारुण्याची जागा दवाखाना घेऊं शकत नाहीं किंवा ज्ञान-तृष्णेची जागा कॉलेजें घेऊं शकत नाहींत. देशांत निर्भयता गुण असेल तरच त्याचें रक्षण होईल, केवळ लष्कर वाढविल्यानें नव्हे. देशांत कारुण्य वाढलें तर देशाची उन्नति होईल, सरकारी पैशानें दवाखाने उघडून नव्हे. लोकांत ज्ञानतृष्णा असेल तर ज्ञान वाढेल, कॉलेज किंवा युनिवर्सिटया वाढवून नव्हे. म्हणून तुमच्या ही गोष्ट लक्षांत आली असेल कीं सरकारवर काम सोंपवून आपली उन्नति होणार नाहीं. हें काम इतकें सोपें नाहीं.

## राज्य जितकें 'उत्तम' तितका धोका हि 'जास्त'

सरकार सर्व प्रकारें तुमच्यासाठीं उत्तम योजना बनवीत असेल तर मी म्हणेन ह्यांत तुम्हांला धोका आहे. योजना जितकी उत्तम, तितका धोका जास्त. कारण अशा परिस्थितींत तुमच्या गुणांचा विकास होणार नाहीं. विजयनगरचें प्राचीन राज्य ता. २८ ला वैभवाच्या शिखरावर होतें व ता. २९ ला तें नष्ट झालें. सारांश हा कीं त्याचा जो उत्कर्ष दिवस तोच त्याच्या नाशाचा आरंभींचा दिवस ठरला. ह्याचा अर्थ काय ? सरकारनें उत्तम व्यवस्था केली. रक्षणासाठीं सैन्य राखलें व लोक ऐष-आरामांत मग्न राहिले. दुनियेचा प्रवास करणाऱ्या प्राचीन प्रवाशांनीं लिहून ठेवलें आहे कीं असें अद्‌भुत वैभव आम्हीं पाहिलें नाहीं. पण दुसऱ्याच दिवशीं राज्य गडगडलें. कारण जनतेंत गुण-विकास झालेला नव्हता. गुण-विकास झाला नसतां कोणी उत्तम राज्य-व्यवस्था राखली, लोकांना सुखी केलें तरी ते लोक गुलाम च राहतात. राज्य चांगलें किंवा वाईट चालतें ह्याचें श्रेय जनतेला नाहीं थोड्या कार्यकर्त्यांना आहे. जुन्या काळच्या राज्यांत असें च होतें व आज हि तीच स्थिति आहे. म्हणून ही लोकसत्ता नव्हे. फरक इतका च कीं पूर्वीं भिस्त राजावर होती आतां प्रतिनिधींवर आहे.

समाजा प्रीत्यर्थ प्रत्येक नागरिक जेव्हां जबाबदार असेल व त्याचा गुण-विकास होत असेल तेव्हांच खरीखुरी लोक-शाही बनेल.

मंगलूर ( मैसूर ) २५-८-५७

## सरकारनें खादीसाठीं काय करावें ? : ३४ :

मी जर सरकार असेन तर सरकारमार्फत कांहीं गोष्टी मी जाहीर करून टाकीन.

(१) प्रत्येक माणसाला सूत कांतण्याचें शिकविण्याची जबाबदारी सरकारची आहे. त्याचा सर्व खर्च सरकार करील. प्रत्येक माणसाला शिक्षित (साक्षर) बनविण्याची जबाबदारी सरकाराची समजली जाते. पण ज्या खेडेगांवच्या माणसाला लिहिणें, वाचणें व कांतणें येत नाहीं त्याला मी शिक्षित समजणार नाहीं.

(२) लोकांना चरखे पाहिजे असतील तर सरकार देईल व गांववाले त्यांची किंमत हप्त्या हप्त्यानें भरून देतील.

(३) गांवचा जो माणूस आपल्या सुताचा कपडा स्वत:साठीं बनवू इच्छीत असेल, तर त्याची विणाई सरकार देईल. ह्याबाबतींत एक मर्यादा राहील. माणसाला कमींत कमी किती कपडा लागतो हें सर्वांनीं मिळून ठरवावें. मी मानतों कीं खेडेगांवच्या माणसाला १२ वार कपडा पाहिजे. माझ्या राष्ट्रीय नियोजनांत मात्र १२ वारच नव्हे तर माणशीं २५ वार कपडा मीं मानला आहे. पण कमींत कमी कपड्याचें रेशनिंग करावयाचें तर प्रत्येक खेडेगांवच्या माणसाला १२ वार कपडा मोफत विणून मिळाला पाहिजे. हीच गोष्ट दुसऱ्या भाषेंत सांगावयाची तर "आम्ही विणाईचें राष्ट्रीयीकरण करूं इच्छितों, तिला 'सेवेचें' (सर्विस) रूप देऊं इच्छितों"

ह्याच प्रकारें डॉक्टराची सेवा हि राष्ट्रीय केली जाईल. सरकारमार्फत डॉक्टराला मान्यता व पगार मिळेल. तो लोकांजवळून फी घेणार नाहीं.

लोकांनीं आजारी पडावें अशीं इच्छा आज डॉक्टराची राहते, तशी स्थिति राहणार नाहीं. डॉक्टर व विणकर सेवक बनतील. अंबर चरख्यामुळें सूत हि चांगलें निघेल व १२ वार कपडयासाठीं दीड रुपया विणाई द्यावी लागेल. एका माणसामागें दीड रुपया दिल्यामुळें हिंदुस्थानांतील सर्व खेडयांचा विमा उतरल्यासारखें होईल. हा दीड रुपया पुढें कसा वसूल करावा ह्याची अक्कल सरकारजवळ आहे. त्याच्याजवळ वसूल करण्याचे पुष्कळ प्रकार आहेत.

**पलनी** (मदुरा) ता. १९-११-५६

## 'राज्य' नको, 'प्राज्य' हवें : ३५ :

अहिंसेमध्यें श्रद्धा ठेवणाऱ्यांनीं लोकनीतीच्या स्थापनेसाठीं शक्ति लावली असें आम्ही वारंवार म्हणत आलों आहों. म्हणजे राजकारणाची समाप्ति करण्याच्या प्रयत्नास आपण लागावें. 'राज' आणि 'नीति' हे शब्द एक दुसऱ्याचा छेद करतात. जिथें नीति येते तिथें राज्यव्यवस्था आपोआप खंडित होते आणि जिथें राज्यव्यवस्था येते तिथें नीति समाप्त होते. आतां यापुढें आम्हांला राज्य नको असून प्राज्य हवें आहे. हें किती दिवसांत होईल हें आम्हांला माहीत नाहीं परंतु आम्हांला करण्यासारखें कांहीं कार्य असेल तर तें हें च आहे. '**मेरे तो मुख रामनाम दूसरा न कोई**' असा निश्चय सर्वोदयसमाजाला करावयाला पाहिजे. परंतु गांधीजींचे पुष्कळसे सोबती मोहग्रस्त आहेत. राज्य चालविण्याची कोणत्या हि स्थितींत आमची जबाबदारी आहे च असें ते समजतात. स्वराज्य प्राप्त करून राज्य चालविण्याची जबाबदारी जर घेतली नाहीं तर तें स्वराज्य मिळविलें च कशाला हें त्यांचें म्हणणें खरें आहे हें आम्ही कबूल करतों. आम्हीं स्वराज्य मिळविलें आहे परंतु सत्ता आपल्या हातीं येण्याच्या दुसऱ्या क्षणापासून च त्या सत्तेचें विलयन करण्याला आरंभ करावा यासाठीं तें स्वराज्य आम्हीं मिळविलें आहे. ही

गोष्ट साधण्याला पन्नास वर्षें कां लागेनात परंतु तिचा प्रारंभ आम्हीं आजपासून च करावयास पाहिजे.

सर्वोदय संमेलन, कांचीपुरम्
ता. २९-५ ५६

## उत्तम राज्याचें लक्षण

हल्लीं सर्वांत कनिष्ट शास्त्र म्हणजे राज्य-शास्त्र आहे. राजनीति-शास्त्रज्ञ सांगतात कीं, जे राज्यसत्ता चालवीत नाहींत ते सर्वश्रेष्ठ होत. जेथें कमींत कमी सत्ता गाजवली जाते तें अधिकांत अधिक चांगलें राज्य होय. जेथें व्यवस्था केली जात आहे असें दिसून हि येत नाहीं असें एखादें राज्य असेल तर तें सर्वोत्तम राज्य होय. ईश्वराचें राज्य कशा प्रकारें चालतें ? त्यानें अशी सुंदर व्यवस्था केली आहे कीं, स्वत: कोठल्या कोपऱ्यांत जाऊन झोंपला आहे कळत नाहीं. त्यानें निरनिराळ्या प्रकारची शक्ति आणि बुद्धि सर्व प्राणिमात्रांत वांटली आहे. तें एक परिपूर्ण विकेंद्रीकरण आहे आणि त्या च बरोबर सर्वांचा सहयोग करण्याची प्रेरणा हि आहे. त्याचा परिणाम असा होतो कीं परमेश्वर आहे किंवा नाहीं याची शंका लोकांना येऊं लागते. परमेश्वराच्या योजनेची सर्वांत मोठी खुबी ही च आहे कीं, परमेश्वर आहे कीं नाहीं असें म्हणायचें धाडस लोक करतात. फक्त असा संशय च घेत नाहींत, तर नास्तिक होऊन ईश्वर नाहीं च असें हि म्हणतात.

त्याप्रमाणें, भारताचें उमत्त पैकीं राज्य दिल्लींत चालावें आणि कोणी पहावयास गेलें तर कोण राज्य चालवत आहे हें हि त्याला दिसूं नये. पार्लमेंट दिसूं नये आणि त्या मोठमोठ्या इमारती हि दिसूं नयेत. 'राज्य करणारे कोठें आहेत' असें विचारलें असतां उत्तर मिळावें कीं, 'ते शेतांत काम करीत आहेत.' जर विचारलें कीं, 'काय हे च ते राज्यकर्ते ?' तर उत्तर मिळावें, 'हो. हे च ते. आतां च त्यांचें काम संपलें म्हणून ते शेतांत झाडाखालीं बसून आपसांत गप्पागोष्टी करीत आहेत. 'काय रे बाबा इराणवर हल्ला झाला आहे, त्या बाबतींत काय करावें ? त्यांना काय सल्ला द्यावी ?' इत्यादि चर्चा तिथें चालली आहे. त्यांना जर विचारलें कीं 'तुम्ही काय करीत आहां ?' तर त्यांनीं उत्तर द्यावें कीं, 'आम्ही

भारताचे राज्यकर्ते आहोंत आणि जगाचे हि राज्यकर्ते आहोंत त्यामुळें शेतीचें काम संपल्यावर फुरसतीचे वेळीं आम्हांला या गोष्टींचा विचार करावा लागतो.' 'विचार करून तुम्ही काय करतां ?' 'सल्ला देतों.' 'नंतर काय होतें ?' 'जर लोकांना आमची सल्ला पसंत पडली तर ती ते मान्य करतात आणि पसंत पडली नाहीं तर अमान्य करतात.' अशा प्रकारें जग उत्तम प्रकारें चाललें आहे असें जेव्हां दिसून येईल तेव्हां च त्याला उत्तम राज्य असें म्हटलें जाईल. आज तर अशी परिस्थिति आहे कीं, पंडित नेहरूंना दिल्लींतून हलविण्याची गोष्ट निघाली तर सर्व देश अस्थिर होतो आणि असा प्रश्न येतो कीं, आतां राज्य चालविणार कोण ?

याशिवाय आज अशी स्थिति आहे कीं, पं. नेहरूंना हिंदुस्थानचें राज्य चालविण्यासाठीं सोळा सोळा तास काम करावें लागतें. पण ईश्वराला जगाचें राज्य चालविण्यासाठीं किती तास काम करावें लागतें ? हिंदूंना हा प्रश्न विचारला तर ते म्हणतील कीं, परमेश्वर तर क्षीरसागरांत झोंपला आहे. तो कांहीं हि करीत नाहीं. याचा अर्थ असा कीं, राज्य चालविणें ही कांहीं क्रिया नाहीं तर तो एक विचार, एक चिंतन आहे. चिंतनानें च जगाचें, राज्य चाललें पाहिजे. क्रियेचें, योजनेचें जितकें कमी प्रमाण असेल तितकें राज्य चांगलें चालेल. ज्या राज्यांत शिपाई नाहींत, शस्त्रसामग्री नाहीं, लोकांसाठीं कोणत्या हि प्रकारच्या दंडाची अगर शिक्षेची भीति नाहीं तरी हि लोक नीतीचा प्रभाव आपल्या मनावर होऊं देतात व राज्य चालवितात तें च उत्तम राज्य होय.

**गांधीग्राम** (मदुरा) ३०-११-५६

## मी मोठ्या पक्षाचा नेता असतों तर !

समजा, ज्या पक्षाच्या विरुद्ध सामना देण्यासारखा दुसऱ्या पक्षांत कोणी नाहींत अशा एखाद्या मोठ्या पक्षाचा मी पुढारी असतों तर मीं असें जाहीर केलें असतें कीं 'सर्व पक्षांतील चांगल्या लोकांनीं मला सहकार्य द्यावें.' चांगले लोक म्हणजे कोण ? तर ज्यांच्यांत सचोटी आहे असे. हिंसा मानणारे सुद्धां खरेपणानें विचारानें हिंसा मान्य करीत असतील तर ती हि

एक सचोटीच आहे. कम्युनिस्टांची आपल्या तत्त्वावर खरी निष्ठा असेल तर त्यांत हि सचोटी आहे. असे जितके लोक असतील त्यांतून मी निवड करीन. अमक्या तमक्या मनुष्याविरुद्ध कोणाला हि उभें करणार नाहीं. ज्यांना कांहीं अनुयायी आहेत, जे आपले विचार–मग ते चुकीचे का असेनात–मांडू शकतात आणि जे पैशाच्या मोहाला बळी पडणार नाहींत, अशा लोकांना मी पार्लमेंटमध्यें येऊं देईन आणि सांगेन कीं, मला यांचे विरुद्ध कोणास हि उभें करावयाचें नाहीं. राजकीय पुढाऱ्यांना सूचना करण्यासाठीं मी हें सांगत नाहीं कारण त्यांना सूचना देण्याचा अधिकार मला नाहीं. जे त्या कार्यांत पडतात व त्याची जबाबदारी उचलतात अशा च लोकांना तो अधिकार आहे. माझें जबाबदारी नसलेलें बोलणें आहे म्हणून यांत मी सूचना करण्याची गोष्टच नाहीं. तरी हि मी हा एक प्रकट विचार आपणांसमोर मांडीत आहें. कारण मला कोठें मंत्रिमंडळ बनवायचें नाहीं. सारांश, कीं भिन्न भिन्न पक्षांतील लोक जे या कार्यांत प्रामाणिकपणें सहभागी होऊं इच्छीत असतील–मग त्यांचा विश्वास हिंसेवर असो कीं अहिंसेवर असो, ते ईश्वरनिष्ठ असोत वा नास्तिक असोत–त्या सर्वांचा आम्ही स्वीकार करूं अशीच आमची वृत्ति असली पाहिजे. दुसरे पक्षीं आमच्या चळवळीचे मूक सेवक केवळ दहा-वीस न राहतां लोकनीतीवर पूर्णपणें विश्वास ठेवणारे असे लाखोंच्या संख्येनें झाले पाहिजेत.

**पळणी (मदुराओ)**, ता. २०-११-'५६

## डाळिंबाच्या दाण्यासारखें राज्य

ग्रामदानी गांवांचीं अनेक चित्रें असू शकतील. त्याला पाहिजे तो रंग तुम्हीं देऊं शकतां. गांववाल्यांनीं आपल्या गांवांसाठीं योजना स्वतः बनवावी. गांवांच्या आयातनिर्यातीच्या बाबतींत ठरविण्याचा अधिकार त्यांनाच असावा. यासंबंधीं हिंदुस्थानांतल्या अनेक मोठमोठ्या पुढाऱ्यां-बरोबर माझें बोलणें झालें आहे. 'हें कसें होऊं शकेल? हा तर स्टेटचा अधिकार आहे. एका स्टेटमध्यें दुसरें स्टेट कसें चालेल?' असें त्यांना वाटतें. ह्याचें कारण त्यांची प्रचालित पद्धति राजकीय चिंतनाची पण

आम्हांला वाटतें कीं लोकशक्तीनें हें काम होऊं शकतें. डाळिबांतला प्रत्येक दाणा वेगवेगळा असतो त्याप्रमाणें एका मोठ्या स्टेटमध्यें हि वेगवेगळीं स्टेट्स् राहूं शकतील. डाळिबाचा प्रत्येक दाणा पूर्ण स्वतंत्र असतो. त्याला वेगळी पेशी असते. परंतु सर्व मिळून एक च डाळिबाचें फळ बनतें. त्याप्रमाणें प्रत्येक गांव स्वतंत्र स्टेट होईल, आणि अशी असंख्य स्टेटस् मिळून एक मोठें स्टेट बनेल, आणि अशीं मोठीं स्टेटस् एकत्र झालीं म्हणजे जगाचें एक स्टेट अशी रचना आम्हांला ग्रामदानाच्या साह्यानें बनवायची आहे. त्यांत गांवाला पूर्ण स्वातंत्र्य राहील. अमुक एक दुकान आमच्या गांवीं असलें तर तें बंद करावें असें आम्ही म्हणूं शकत नाहीं. परंतु समजा, त्या दुकानदारानें बाहेरून मिठाई आणवली परंतु गांवच्या लोकांनीं ठरविलें कीं, घरांत बनविलेल्या वस्तु च खायच्या, दुकानांतल्या खायच्या नाहींत, तर ती मिठाई आम्ही माशांच्याकरितां सोडून देऊं. कारण माशांनीं बाहेरील पदार्थ खायचे नाहींत असें ठरविलेलें नाहीं. मग त्या माशांच्याकरितां दुकानदाराला तें दुकान चालवायचें असेल तर तें त्यानें खुशाल चालवावें. यावरून ही गोष्ट उघड आहे कीं, लोकमताच्या विरुद्ध दुकानदार दुकान चालवूं शकत नाहीं. याचें नांव आहे लोकशक्ति. या लोकशक्तीला कोणी हि अडवूं शकत नाहीं. त्याप्रमाणें आमचें राज्य आम्ही च चालवूं असा आत्मविश्वास लोकांमध्यें उत्पन्न झाला पाहिजे.

**चिंगकटले** (मदुरा), २३-१२-'५६

## टॉलस्टॉयची वासना 

प्रश्नः–" सत्याग्रही लोकसेवक राजकीय पक्षाचा सभासद राहिला तरी काय हरकत आहे ?"

विनोबाः–" जो माणूस एखाद्या पक्षाचा सभासद असतो, तो खात्रीनें आपली नैतिक शक्ति कमी करतो असें मी मानतों. शुद्ध धर्माचें पालन करणा-राला राज्य-सत्तेहून अलगच राहिलें पाहिजे. मी अमुक पक्षाचा आहें असें म्हटल्याबरोबर दुसऱ्या पक्षांचा नाहीं असा त्याचा अर्थ होतो. मी हिंदु आहें म्हटल्याबरोबर मुसलमान नाहीं हें सिद्ध होतें. आम्हांला तर सर्व पक्षांवर समान प्रेम करावयाचें आहे.

तुम्ही म्हणाल आम्ही पक्षांत राहिलों कीं त्या पक्षाशीं आमचा संपर्क राहतो पण हा संपर्क केवळ शारीरिक नव्हे, तर मानसिक हि असतो. टॉलस्टॉयनें ६० वर्षांपूर्वीं एक पुस्तक लिहिलें. त्यांत त्यानें लिहिलें होतें कीं जमिनीची मालकी नष्ट झाली पाहिजे.त्याच वेळीं माझा जन्म झाला.मी समजतों कीं बहुधा त्यांनीं हें लिहून आपली वासना माझ्यांत भरली. आम्ही लोकांना लोकनीतीचा विचार देऊं इच्छितों. तुम्ही जहाजांत बसून जाता तेव्हां किनाऱ्यावरचें प्रकाशगृह तुम्हांला मार्गदर्शन करतें. पण त्या प्रकाशगृहानें च तुमच्याबरोबर किनारा सोडून जहाजावर येऊन बसावें अशी तुमची इच्छा असली तर कसें व्हावें ? प्रकाशगृहाप्रमाणें कांहीं लोक राजकारणा-पासून अलग राहिले तर चांगलें आहे. दुनियेसमोर चिरकालीन मूल्यें ठेवणारीं कांहीं मुक्त माणसें दुनियेंत असलीं पाहिजेत.

कल्लांदरा ( मदुरा ), ३-१-'५७

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठा
अनुक्रम २८७३२ वि: निबंध
क्रमांक १२८८ नों दि: २-७-७६



विद्यार्थ्यांबद्दल एक प्रश्न नेहमीं विचारला जातो कीं, त्यांनीं राजकारणांत भाग घ्यावा कीं नाहीं ? आम्हीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं आम्ही सध्यां सर्व दुनियेचे नागरीक बनलेलों आहोत. आमची इच्छा नसली तरी विज्ञानानें तसें आम्हांला बनविलेलें आहे. आज सर्व जग जवळ आलें आहे, तेव्हां कांहीं दिवस कुस्ती चालेल, अखेर त्याचें परिवर्तन आलिंगनांत होईल. आजच्या परिस्थितींत भिन्न भिन्न देश अलग अलग राहूं शकत नाहींत. म्हणून राजकारणाचा विचार आम्हांला दुसऱ्याच प्रकारानें केला पाहिजे. आतां आम्हांला विश्वव्यापक राजकारणाचा विचार केला पाहिजे. त्याला मी लोकनीति म्हणतों, म्हणजे अशी विशाल व्यापक राजनीति कीं ज्यांत सर्व विश्व एक झालेलें आहे, आम्ही सर्व त्याचे नागरिक आहोंत, ज्यांत कोणाचें नियंत्रण कोणावर चालत नाहीं, पण प्रत्येक नागरिक स्वतःवर नियंत्रण ठेवतो. अशी राजनीति, असा समाज आम्हांला बनवावयाचा आहे. पण विश्व-मानव तयार करणाऱ्या राजनीतीला, 'राज-नीति' शब्द योग्य होणार नाहीं. म्हणून मी म्हणतों कीं विद्यार्थ्यांनीं 'लोकनीतींत' प्रवीण झालें पाहिजे.

## सर्वानुमतीची लोक-नीति

विद्यार्थ्यांना २१ वर्षांच्या आधीं मतदानाचा अधिकार नसतो. कारण तो एक अल्प अधिकार आहे. निवडणुकींत काय होतें ? आम्हांला १०० माणसांची सेवा करावयाची असेल व तेवढ्यासाठीं आम्ही निवडणुकीला उभे असूं, तर ५१ माणसांनीं सर्वांच्या सेवेसाठीं आम्हांला पसंत केलें, आणि ४९ माणसांनीं नापसंत केलें असलें तरी हि आम्ही सेवक म्हणून निवडले जातों. **आतां आमची सेवा ज्यांनीं संमति दिली त्यावर तर लादावयाची आहेच पण ज्यांना आमची सेवा नको होती त्या ४९ माणसांवर हि लादावयाची आहे.** हा विचार मूळतःच चुकीचा आहे. आणि तो जोंपर्यंत आम्ही **सोडीत नाहीं** तोंपर्यंत दुनियेची सोडवणूक होणार नाहीं. कारण मग बहुमत

अ.पमत हे झगडे चालूच राहतील. म्हणून फूट पाडणाऱ्या ह्या राजनीतीचें भविष्यकाळीं कोणतेंच प्रयोजन उरलेलें नाहीं. आतां आम्हांला 'सर्वानुमती'नें चालणारी नीति पाहिजे, हिलाच मी लोकनीति म्हणतों. ती कशा प्रकारें आणतां येईल ह्याचा आपण विचार केला पाहिजे. ह्याचा थोडासा आरंभ सिक्युरिटी कौन्सिलमध्यें 'वेटो'च्या रूपानें केला आहे. क्वेकर्स पंथांतहि सर्व ठराव सर्वानुमतीनें पास होतात. हीं उदाहरणें लहान असलीं तरी ते लोकनीतीचे प्रयोग आहेत त्यांना आपणाला पुढें न्यावयाचें आहे.

फूट पाडणाऱ्या राजनीतींत विद्यार्थ्यांनीं भाग घ्यायचाच कशासाठीं? त्यांनीं लोकनीतीचें अध्ययन केलें पाहिजे. आणि त्यासाठीं सध्यांच्या सर्व-प्रकारच्या राजकीय विचार-सरणींचा—सोशॅलिझम् (समाजवाद) कम्युनिझम् (साम्यवाद) वेलफेअरिझम् (कल्याणराज्यवाद) सर्वोदय ह्या सर्वांचा अभ्यास करून त्यांच्या गुणदोषांची त्यांनीं चर्चा केली पाहिजे व आपल्या विचारांना व्यापकता आणली पाहिजे.

## विश्व-व्यापक दृष्टीनें सेवेस लागावें

विचार व्यापक बनल्यानंतर त्यांनीं छोटया क्षेत्रांत काम केलें तरी हरकत नाहीं. पण विचार व्यापक बनण्याच्या आधींच जर ते संकुचित क्षेत्रांत सांपडले तर त्यांचें सर्व जीवनच सकुंचित होऊन जाईल. आमच्या कोणत्या हि कामाची सुरवात छोटया क्षेत्रापासूनच होते. देहाशीं संबद्ध क्षेत्रांतच सेवेची सुरवात होते. आई कुटुंबांत काम करील, ग्रामसेवक गांवांत काम करील, देशसेवक देशांत काम करील. पण सेवा-क्षेत्र अशा प्रकारें लहान किंवा मोठें असलें तरी सेवा विश्वव्यापक दृष्टीनें केली पाहिजे. मुलाची सेवा करतांना 'हा माझा मुलगा आहे, त्याची मी सेवा करतें' असा संकुचित भाव नको तर कौसल्या ज्याप्रमाणें भगवान् च आपल्या घरीं आले आहेत असें समजून रामाची जशी सेवा करी तशी 'हा सर्व विश्वाचा प्रतिनिधि' माझ्या उदरीं आलेला आहे अशा भावनेनें मातेनें बालकाची सेवा करावी. ह्या भावनेनें आई मुलाची सेवा करील तर त्या सेवेनें ती मोक्ष हि पावूं शकेल. दृष्टि जितकी व्यापक तितकी सेवेची किंमत अधिक. सेवेची किंमत तिच्या आकारावर अवलंबून नाहीं.

## सेवेचें रहस्य

सेवेच्या छोटे-मोठेपणावर तिचें मूल्य अवलंबून नाहीं. ती कोणत्या भावनेनें केली जाते ह्यावर तिचें मूल्य अवलंबून आहे. देशाची सेवा ही छोटी दृष्टि ठेवून केली तर तो संकुचित विचार ठरेल, उलट घरची सेवा ही विशाल दृष्टि ठेवून केल्यास तो महान् विचार ठरेल. हिटलरनें जर्मनीची सेवा केली. तो स्वतःला देशसेवक च समजत होता व सर्व जर्मनीची काळजी वाहत होता. पण त्याचें चिंतन संकुचित बुद्धीचें होतें. ह्याचा परिणाम सर्व समाजाच्या विनाशांत झाला. आज हि आपण पाहतों कीं सार्वजनिक कामें करणाऱ्या मोठमोठ्या लोकांत हि रागद्वेषादि आढळून येतात. कारण त्यांची दृष्टि संकुचित असते. म्हणून संकुचित दृष्टीनें व्यापक सेवा करणारांची सेवा छोटी होऊन जाते व व्यापक दृष्टीनें, निर्मळ बुद्धीनें केलेली निष्काम छोटी सेवा हि महान् बनते. सेवेचें हें असें रहस्य आहे.

म्हणून विद्यार्थ्यांनीं राजकारणांत पडावें कीं नाहीं ह्याचा विचार मूलभूत दृष्टीनें केला पाहिजे. आजची प्रचलित राजनीति फार च संकुचित आहे. ती समाजाचे तुकडे करते व सत्तेच्या जोरावर सेवा लादूं इच्छिते. महापुरुषांनीं अगदीं ह्याच्या विरुद्ध गोष्ट सांगितली आहे. त्यांनीं म्हटलें आहे कीं, प्रत्येकाला आमचा विचार जाणून घेण्याचा व समजून घेण्याचा अधिकार आहे. पण आमची आज्ञा कोणावर चालता कामा नये. ज्याला तो विचार पटेल तो तो मंजूर करील, ज्याला पटणार नाहीं तो त्याचा त्याग करील.

## कल्याण-राज्य म्हणजे जड-दशा

सध्यांच्या राजनीतींत सत्तेच्या जोरावर समाजावर पुष्कळशा गोष्टी लादण्याचा प्रयत्न होत असतो. आणि कल्याण-राज्यासारखें भयानक दुसरें राज्य असूं शकत नाहीं. दिसण्यांत तें फार गोजिरवाणें दिसतें. असें म्हटलें जातें कीं 'पूर्वींचें राज्य केवळ पोलिस राज्य होतें, तें फक्त प्रजेच्या रक्षणाचीच चिंता करीत असे, बाकी सर्व कामें समाज च करीत होता. आतां तें जुनें राज्य जाऊन नवें राज्य आलें आहे. तें समाजाच्या कल्याणाची सर्वप्रकारें काळजी वाहत आहे." पण कल्याण-राज्याची कल्पना

कांहीं नवी नाहीं. रघुवंशांत कालिदासानें ज्या राज्याचें वर्णन केलें आहे, तें आदर्श कल्याण-राज्याचें आहे. "प्रजानां विनयाधानात्, रक्षणात् भरणादपि" तो राजा प्रजेचें रक्षण च नव्हे, तर भरणपोषण हि करीत होता, व म्हणून वस्तुत: तो च त्यांचा एकमात्र पिता होता. बाकीचे बाप केवळ त्यांना जन्म देणारे होते– 'पितरस्तासां केवलं जन्महेतव:" मी कालिदासाचा हा श्लोक वाचून अगदीं घाबरून गेलों. असें राज्य खरोखर असलें तर त्याची कल्पना च मोठी भयानक वाटते. अशा राज्यांत जनतेचें जीवन करकसून बांधलेलें असणार, त्यांत तिला स्वतंत्रणें कांहीं करण्याची गरज च नसणार. सर्व कांहीं योजना सरकार च बविणार. समाजाची, शेतीची सुधारणा, वस्त्राचा व शिक्षणाचा प्रश्न, साहित्याला उत्तेजन, उद्योगाबाबतींतील धोरण ( पॉलिसी, ) लोकांचें रक्षण सर्व कांहीं सरकार च करणार व लोक केवळ–दुसरे त्यांचें सर्व कांहीं करणारे असे–रक्ष्य बनणार. ही केवळ जड दशा आहे, मेंढरासारखी अवस्था आहे.

बंगलोर, ता. १७-१०-'५७

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम २८७३२ वि: निबंध
क्रमांक १२८६ नों: दि: २.११.२१.६१

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१०२५९

# सर्व-सेवा-संघाचा निवडणुकीचा ठराव

अहिंसक समाज-रचना हें सर्व-सेवा-संघाचें उद्दिष्ट आहे. अशी अहिंसक समाज-रचना सत्तेच्या द्वारा होऊं शकत नाहीं असा त्याचा विश्वास आहे. लोकतंत्राचा मुख्य आधार लोक-संमति आहे ही गोष्ट तर सर्वमान्यच आहे. त्याच्या सिद्धीसाठीं दंड-निरपेक्ष समाज-व्यवस्थेच्या दिशेनें पाऊल टाकणें आवश्यक आहे. ज्या पक्षाच्या हातांत सत्ता आहे, अथवा जो पक्ष सत्ताकांक्षी आहे, अशा सर्व पक्षांविषयीं सर्व-सेवा-संघ तटस्थ बुद्धि राखतो. आजचें लोक-तंत्र 'पक्ष-निष्ठ' आहे. त्याला 'लोक-निष्ठ' बनविण्यासाठीं पक्षातीत व पक्ष-निरपेक्ष भूमिका आवश्यक आहे असें तो मानतो. कोणत्या हि पक्षाच्या जय किंवा पराभवाबद्दल त्याला विशेष उत्सुकता असूं शकत नाहीं. कारण मतपरिवर्तनाची प्रक्रिया जय-पराभवाच्या पलीकडची आहे. आम्ही जर कोणाचा जय किंवा पराभव इच्छूं तर त्या दोहोंपैकीं कोणाचें हि हृदय-परिवर्तन करण्याची पात्रता गमावून बसूं. म्हणून सर्व-सेवा-संघ कोणत्या हि निवडणुकांत भाग घेऊं शकत नाहीं किंवा कोणाला निवडणुकीबाबत सल्ला देणें उपयुक्त समजत नाहीं.

पण सद्यपरिस्थितींत सर्वोदय-सिद्धांत मानणाऱ्या कांहीं व्यक्ति मतदानाचा आपला अधिकार बजावूं इच्छितील. स्वाभाविकपणेंच शांतिमय साधनांवर विश्वास नसणाऱ्या किंवा जातिवादी उमेदवारांना मत देणें ते योग्य मानणार नाहींत. जे लोक भिन्न-भिन्न राजकीय पक्षाचे सभासद आहेत, त्यांना माहीत आहे कीं नागरिकानें मत देणें हें त्याचें जितकें पवित्र कर्तव्य आहे, तितकेंच विशिष्ट परिस्थितींत त्यानें आपला मतदानाचा हक्क न बजावणें हि कर्तव्य असतें. म्हणून त्यांच्या पक्षानें जर चुकीचे उमेदवार उभे केले तर लोक-निष्ठ नागरिकाचें हें कर्तव्य ठरतें कीं त्या त्या पक्षाचें सभासद असून हि त्यांनीं त्या त्या उमेदवारांना मत देऊ नये.

धर्मपुरी (सेलम), ता. ५-८-५६